प्रभात Tue, 25 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65858

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

**लोकमत**

शिक्षण विकास मंच आयोजित चर्चासत्रातून निघाला सूर

## विद्यापीठ कायद्यातील बदल शिक्षणव्यवस्थेला मारक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्य शासनातर्फे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यात करण्यात आलेले बदल अतार्किक असून, त्याचा परिणाम विद्यापीठाच्या कामकाजावर, स्वायत्तता व गुणवत्तेवरच होणार आहे. तसेच पुढील काळात त्यामुळे विद्यापीठांमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढणार आहे. ही बाब महाराष्ट्राच्या शैक्षणिक व्यवस्थेला मारक असल्याने कायद्यातील बदलाचा पुनर्विचार केला पाहिजे, असा सूर सोमवारी माजी कुलगुरु व शिक्षणतज्ज्ञांच्या चर्चेतून निघाला.

विद्यापीठ विकास मंचतर्फे आयोजित 'प्रस्तावित नवीन विद्यापीठ कायदा' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. त्यात माजी कुलगुरु डॉ. आर. एस. माळी, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. मुरलीधर चांदेकर, डॉ. शशिकला वंजारी, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. अनिरुद्ध देशपांडे, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. राजेंद्र विखे-पाटील, डॉ. संजय चोरडिया, डॉ. सुधारक जाधवर, दीपक शहा, डॉ. एस. आय. पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य राजेश पांडे, प्रसेजनीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर तसेच विद्यापीठ विकास मंचचे ए. पी. कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

> राज्य शासनाने प्र-कुलपती पदाच्या नियुक्तीसंदर्भात केलेल्या बदलामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चांगल्या पद्धतीने राबविले जाणार नाही. उलट त्यामुळे राजकीय हस्तक्षेप वाढण्याची भीती आहे. शासनाने कुलगुरु व प्र-कुलगुरुंच्या पात्रतेत बदल करावेत. तसेच विनाकारण अधिसभेवर नॉमिनेटेड सदस्यांची संख्या वाढवू नये.
>
> **- डॉ. आर. एस. माळी, माजी कुलगुरु**



राज्य शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन केली होती. मात्र, याबाबत सुधारणा करण्याऐवजी प्र-कुलपती हे उच्च शिक्षणमंत्री म्हणून कार्यरत राहतील आणि कुलगुरु निवडप्रक्रियेत राज्य शासन नियुक्त दोन माजी कुलगुरु असतील, असे बदल केले. याबाबत चर्चासत्रात सहभागी असणाऱ्या सर्वांनी विरोध केला आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या विद्यापीठ कायद्यात राज्य शासनाला अनेक अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यापीठांवर राज्य शासनाचे नियंत्रण आहे. परंतु, विधिमंडळात घाईघाईने प्र-कुलपती नियुक्तीबद्दलचे विधेयक मंजूर का करण्यात आले, याबाबत शंका निर्माण होते.

विद्यापीठ कायद्यात दुरुस्ती करण्यात आलेल्या विधेयकाची अंमलबजावणी झाली तरी कुलगुरुंना कोणी विचारणार नाही. सर्वाधिकार उच्च शिक्षण मंत्र्यांकडे केंद्रीत होतील. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात राजकारणाचा शिरकाव होऊ नये, या हेतूला हरताळ बसेल, अशी भावना चर्चासत्रात व्यक्त करण्यात आली.

Hello Pune
Page No. 6 Jan 25, 2022
Powered by: erelego.com

## विद्यापीठ कायद्यातील बदल विद्यापीठांच्या स्वायत्ततेला मारक

### चर्चासत्रात शिक्षणतज्ज्ञांचा सूर; राजकीय हस्तक्षेपही शैक्षणिक व्यवस्थेला मारक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील बदलांमुळे विद्यापीठाच्या कामकाजावर, स्वायत्तता, गुणवत्तेवरच परिणाम होणार आहे. तसेच विद्यापीठांतील वाढणारा राजकीय हस्तक्षेप शैक्षणिक व्यवस्थेला मारक ठरेल, असा सूर शिक्षणतज्ज्ञांच्या चर्चासत्रात उमटला.

विद्यापीठ विकास मंचातर्फे प्रस्तावित नवीन विद्यापीठ कायदा या विषयावर गरवारे महाविद्यालयात चर्चासत्र झाले. माजी कुलगुरू डॉ. आर.एस. माळी, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. मुरलीधर चांदेकर, डॉ. शशिकला वंजारी, शिक्षणतज्ज्ञ प्रा. अनिरुद्ध देशपांडे, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. राजेंद्र विखे-पाटील, डॉ. संजय चोरडिया, सुधाकर जाधवर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य राजेश पांडे, प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, प्रा. ए. पी. कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी आदी या वेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठ कायद्यात सुधारणा होणे अपेक्षित असताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यासाठी प्र-कुलपती पदाची दुरुस्ती प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. त्यामुळे कुलगुरूंचे महत्त्व कमी होऊन सर्व अधिकार शिक्षणमंत्र्यांकडे केंद्रित होतील.

परिणामी शिक्षणाचा आणि विद्यार्थिकेंद्रित विद्यापीठ हा हेतू साध्य होणार नाही. एकूणच नवीन सुधारणा विधेयक विश्वार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणार असल्याची भूमिका शिक्षणतज्ज्ञांनी मांडून या बदलांबाबत फेरविचार आवश्यक असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले.

**लोकसत्ता** Wed, 26 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65830850

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

# विद्यापीठे राजकीय अड्डा बनतील

## प्रस्तावित महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यावरील परिसंवादात तज्ज्ञांचे मत

महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील सुधारणेबाबत मंजूर झालेल्या विधेयकाप्रमाणे अंमलबजावणी झाल्यास विद्यापीठांच्या कामकाजात राजकीय हस्तक्षेप वाढेल. स्वायत्ततेवर गदा येऊन शैक्षणिक गुणवत्ता ढासळेल व विद्यापीठे राजकीय अड्डा बनतील, अशा शब्दांत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी विद्यापीठ कायद्यातील सुधारणा विधेयकावर टिप्पणी केली.

विद्यापीठ विकास मंचातर्फे 'प्रस्तावित महाराष्ट्र विद्यापीठ कायदा' विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. शशीकला वंजारी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, डॉ. सुधाकर जाधवर, अधिसभा सदस्या व मंचाच्या समन्वयक बागेश्री मंठाळकर आदी मान्यवर सहभागी झाले होते.

डॉ. विद्यासागर म्हणाले, ''राज्य विद्यापीठ कायद्यातील सुधारणा विधेयकानुसार अंमलबजावणी झाल्यास विद्यापीठांच्या स्वायत्तता धोक्यात येईल. नव्या बदलानुसार राज्य सरकारच्या अधिकाराखाली विद्यापीठांचे कामकाज राहील.'' डॉ. वंजारी यांनी नवे सुधारणा विधेयक नवीन शैक्षणिक धोरणाला तर्कसंगत नसल्याचे नमूद केले. त्या म्हणाल्या, ''विधेयकात नव्याने नियुक्त केलेले प्र- कुलपती हे पद त्रासदायक ठरेल.''

दरम्यान, तज्ज्ञांनी मांडलेल्या मते, सूचना याचे निवेदन राज्य सरकारला दिले जाणार असल्याचे पांडे यांनी सांगितले.

### 'सुधारणा विधेयकाचा फेरविचार करावा'

डॉ. एकबोटे म्हणाले, ''विद्यापीठ कायद्याने यापूर्वीच राज्य सरकार, शिक्षणमंत्री यांना अधिकार बहाल केले आहेत. त्यात आणखी वाढ करण्याची किंवा स्वतंत्र काही तरतूद करण्याची गरज नव्हती. विद्यापीठ कायद्यात सुधारणा करताना तज्ज्ञांशी विस्तृत चर्चा करणे अपेक्षित होते. कायद्यातील नव्या सुधारणेनुसार आता विद्यापीठात शासनाचे बहुमत असेल. घाईघाईने केलेल्या या सुधारणा विधेयकाचा राज्य सरकारने फेरविचार करावा, अशी मागणी लावून धरावी लागणार आहे.''

**" कुलगुरूंच्या नियंत्रणाखाली विद्यापीठाचे कामकाज होत नसेल, तर विद्यापीठाची गुणवत्ता ढासळणार आहे. प्र-कुलपती हे पद असण्यालाही विरोध नाही. परंतु प्र-कुलपती शिक्षणमंत्रीच का असावा, असा प्रश्न आहे.**

**- डॉ. मुरलीधर चांदेकर,** माजी कुलगुरू

Pune, Pune-Today
28/01/2022 Page No. 4

# विद्यापीठ सुधारणा विधेयकावरून मतांतरे



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३१ -** विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयकावरून विद्यार्थी संघटना, शैक्षणिक संस्थांकडून उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहे. काही विद्यार्थी संघटनांनी हे विधेयक योग्य असल्याचे म्हटले आहे. याउलट हे विधेयक शिक्षण क्षेत्रात दूरगामी परिणाम करणार असल्याची टीका होत आहे.

विद्यापीठ कायद्यात सुधारणा करणारे विधेयक नुकतेच विधिमंडळात मंजूर करण्यात आले. यात आत उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांना विद्यापीठाशी संबंधित सर्व माहिती व अधिकार प्राप्त होणार आहे. कुलगुरू नियुक्तीसाठी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीकडून दोन जणांच्या नावांची शिफारस कुलपतींना केली जाईल. कुलगुरूंच्या निवडीत कुलपती तथा राज्यपालांऐवजी राज्य शासनाला जादा अधिकार प्राप्त होणार आहेत.

"विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयक हे अतिशय चांगला आहे. कायद्यातील दुरुस्तीसह आणलेले विधेयक स्वागतार्ह आहे. या विधेयकामुळे राज्य सरकारचा विद्यापीठांवर अंकुश राहील. त्याचप्रमाणे विद्यापीठात ठराविक विचारसरणीची असलेली मक्तेदारी मोडीत निघणार आहे. कुलगुरू निवड प्रक्रिया अतिशय पारदर्शक होणार असून, वेळेतही होणार आहे. त्यामुळे या विधेयकाचे सकारात्मक परिणाम दिसून येतील.

**किरण साळी**, सहसचिव, युवा सेना

"विद्यापीठ कायद्यातील सुधारित विधेयकामुळे एकूणच मुक्त शिक्षणावर निर्बंध येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्वायत्ततेस प्राधान्य देण्यात येत आहे. याउलट राज्याच्या सुधारित विधेयकावरून स्वायत्तताच धोक्यात येणार आहे. यात प्रत्येक पक्ष अजेंडा घेऊनच विद्यापीठाचा कारभार चालवतील. पर्यायाने विद्यापीठात राजकीय हस्तक्षेप वाढेल, ही बाब चिंताजनक आहे.

**डॉ. निवेदिता एकबोटे**, सहकार्यवाह, प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

प्रभात Sat, 01 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65317649

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

## 'प्रोग्रेसिव्ह'ची यशोगाथा 'साम'वर

पुणे, ता. ४ : पारंपरिक शिक्षणाबरोबरच अभियांत्रिकी, व्यवस्थापन, ॲग्रिकल्चर बायोटेक्नॉलॉजी, औषधनिर्माणशास्त्र, डेटा सायन्स अशा विविध विद्याशाखांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असलेल्या 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची यशोगाथा 'महाब्रँड्स'मधून मांडण्यात येणार आहे. महाराष्ट्रीय ब्रँड्ना सलाम करणारा हा कार्यक्रम 'साम टीव्ही'वर प्रसारित केला जात आहे. त्या अंतर्गत बुधवारी (ता. ५) दुपारी तीन वाजून २५ मिनिटांनी 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'चा प्रवास 'साम टीव्ही'वर प्रसारित केला जाणार आहे. देशाच्या उन्नतीसाठी शिक्षण क्षेत्रात काम करून सुसंस्कृत, सुसंस्कारित, कर्तव्यदक्ष आणि चारित्र्यसंपन्न नागरिक घडविणे हा राष्ट्रभक्तीचा व राष्ट्रसेवेचा उत्कृष्ट मार्ग आहे. या उद्देशाने पुण्यामध्ये माननीय गुरुवर्य शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या पाच सहकारी शिक्षकांनी 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना १६ मे १९३४ रोजी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर केली होती.

Pune, District-Today
05/01/2022 Page No. 1

### पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेअंतर्गत मान्यता

## गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयात मत्स्य विकार निदान केंद्राची उभारणी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयामध्ये मत्स्य विकार निदान केंद्र उभारण्यात आले आहे. पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेअंतर्गत या प्रयोगशाळेला मान्यता मिळाली आहे. पुणे परिसरातील आणि पारंपरिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील ही पहिलीच प्रयोगशाळा असून, या प्रयोगशाळेद्वारे मत्स्य उत्पादनासाठी पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी आणि माशांमधील आजारांची तपासणीची सुविधा उपलब्ध झाली आहे.

राज्यात तलाव, धरणांची संख्या मोठी आहे. त्यातही पुण्याच्या आजूबाजूला अनेक धरणे आहेत. गेल्या काही वर्षांत केवळ नदीवर मासेमारी न करता धरणे, तलावांत मत्स्य उत्पादन घेतले जाते. मात्र गेल्या काही वर्षांत अनेक कारणांनी पाणी दूषित होऊ लागले आहे. पाण्याची गुणवत्ता चांगली नसल्यास त्याचा परिणाम माशांवर होऊन माशांची वाढ चांगली न होणे, माशांमध्ये आजार निर्माण होणे असे प्रकार होतात. त्यामुळे चांगल्या मत्स्य उत्पादनासाठी पाण्याच्या गुणवत्ता तपासणी आवश्यक असते. तसेच माशांमधील विषाणू प्रादुर्भाव, त्यांच्यातील आजार तपासले जाणे गरजेचे असते. सूक्ष्मजीवशास्त्र आणि जैवतंत्रज्ञानातील पद्धतींचा वापर करून ही तपासणी केली जाते. महाविद्यालयातील प्रयोगशाळेत या तपासणीसाठीच्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. या प्रयोगशाळेसाठी पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेअंतर्गत केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळून सोळा लाखांचा निधी प्राप्त झाला आहे. तर या प्रयोगशाळेचा एकूण प्रकल्प चाळीस लाखांचा आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मत्स्य संशोधक डॉ. संजय खरात यांनी माहिती दिली.

राज्यात मुंबई आणि रत्नागिरी येथील मत्स्य महाविद्यालयात मत्स्य विकार निदान केंद्र आहेत. मात्र पारंपरिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयात मत्स्य विकार निदान केंद्र पहिल्यांदाच सुरू होत असल्याचेही डॉ. खरात यांनी नमूद केले.



### मत्स्यविषयक अभ्यासक्रम...

महाविद्यालयातर्फे ॲक्वा कल्चर, फिश डिसिज डायग्नोस्टिक्स हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. तसेच वैदिका ॲक्वा कल्चर या संस्थेसह हडशी येथे संशोधन केंद्र सुरू करण्यात येणार आहे, असे डॉ. खरात यांनी सांगितले

लोकसत्ता Thu, 06 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65419240

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

पुढारी

## शिष्यवृत्ती परीक्षेत चमकले मॉडर्न हायस्कूलचे १५ विद्यार्थी

**तळवडे : पुढारी वृत्तसेवा**

यमुनानगर निगडी येथील मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीमधील यशाची परंपरा कायम ठेवत या ही वर्षी गुणवत्ता यादीत झळकण्याचा विक्रम केला आहे. १५ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून ऑगस्ट २०२१ मध्ये इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती. त्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत प्रो. ए. सो.चे मॉर्डन हायस्कूल निगडी या प्रशालेतील एकूण १५ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केलेले आहे.

इयत्ता ५ वी गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी : समर्थ रायते, रणवीर डांगे, संस्कार पाटील, अभिषेक भताने, भूमी हारे, पूजा चाळक, कृष्णा रंदवे, आर्या जामदार.

इयत्ता ८ वी गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी : प्रसाद सावंत, सुहानी केदार, प्रतीक दळवी, संकेत कांबळे, एकनाथ आगलावे, पुष्कराज कुलकर्णी, गायत्री केणे. विद्यार्थ्यांना अर्चना उंडे, श्रीकृष्ण निकम, आशा कुंजीर, उमा बिर्जे, सुजाता ठोंबरे, अमोल नवलपुरे, साधना राऊत, मीना अधिकारी या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष गजानन एकबोटे, सहसचिव ज्योत्स्ना एकबोटे, शाला समिती अध्यक्ष चिंतामणी घाटे, प्र-मुख्याध्यापिका मृणजा कुलकर्णी, प्राचार्य प्रकाश पाबळे, पर्यवेक्षिका वर्षा पाचारणे यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

My Pimpri Edition
Jan 9, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

Pudhari Pimpri Edition 9.1.2022

सकाळ

## एच. व्ही. देसाई महाविद्यालयाची बाजी

पुणे : किर्लोस्कर वसुंधराच्या वतीने घेण्यात आलेल्या 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज' स्पर्धेत एच. व्ही. देसाई महाविद्यालयाने पहिला क्रमांक मिळवीत 'किर्लोस्कर वसुंधरा करंडक' पटकाविला आहे. तर गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालय आणि डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने द्वितीय क्रमांक, तर फर्ग्युसन महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला आहे. एन. सी. एल. ज्युनिअर कॉलेज आणि अण्णासाहेब मगर महाविद्यालय यांनी उत्तेजनार्थ पटकाविले आहे.

सकाळ

## 'पुरुषोत्तम'च्या प्राथमिक फेरीचा निकाल जाहीर

पुणे, ता. १७ : पुरुषोत्तम करंडकाच्या प्राथमिक फेरीची सोमवारी सांगता झाली. या फेरीचा निकालही जाहीर झाला आहे. एकूण नऊ एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली असून, आता २२ व २३ जानेवारी रोजी होणाऱ्या अंतिम फेरीत या संघांमध्ये यंदाचा करंडक पटकावण्यासाठी चुरस रंगेल.

निवड झालेल्या एकांकिकांमध्ये आय. एम. सी. सी., कावेरी महाविद्यालय, प. भू. वसंतदादा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे व आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयांच्या संघांचा समावेश आहे. प्राथमिक फेरीत सादर झालेल्या ४९ संघांच्या एकांकिकांमधून यांची अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. ३ जानेवारीपासून भरत नाट्य मंदिर येथे पुरुषोत्तम करंडकाची प्राथमिक फेरी रंगली होती. प्रवेश घेतलेल्या ५० संघांपैकी ४९ संघांनी सादरीकरण केले.

**अंतिम फेरीसाठी निवडलेले संघ** (लॉट्‌सच्या अनुक्रमे)

१) **वरात** : आय. एम. सी. सी.
२) **सफर** : कावेरी महाविद्यालय, पुणे
३) **कला ?** : प. भू. वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बावधन
४) **मंजम्मा पुराणम्** : बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय
५) **एव्हरी नाइट इन माय ड्रीम्स** : श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
६) **सहल** : पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर
७) **भाग धन्नो भाग** : मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड
८) **पाणीपुरी** : अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
९) **कंप्लीट व्हॉईड** : आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

Pune, Main
18/01/2022 Page No. 2

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

लोकमत

# देसाई कॉलेज 'किर्लोस्कर वसुंधरा करंडक'चे विजेते

## 'ग्रीन कॉलेज, क्लिन कॉलेज' स्पर्धा ; मॉडर्न, डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज द्वितिय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : किर्लोस्कर वसुंधराच्या वतीने गेली ५ वर्षे 'ग्रीन कॉलेज, क्लिन कॉलेज' या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावर होते. पुणे, कोल्हपूर, नाशिक, सोलापूर आणि कर्नाटक येथील होस्पेट-कोप्पल या शहरांचा या स्पर्धेत समावेश करण्यात येतो. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील स्पर्धेचा निकाल संयोजक वीरेंद्र चित्राव यांनी घोषित केला असून, एच.व्ही. देसाई महाविद्यालयाने पहिला क्रमांक व करंडक पटकाविला आहे.

'ग्रीन कॉलेज, क्लिन कॉलेज'ही एक चळवळ बनली असून, विद्यार्थी, व्यवस्थापन समिती, प्राचार्य व प्राध्यापक यांच्या संयुक्त प्रयत्नातून कॉलेज परिसरात अनेक नावीन्यपूर्ण पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातात व त्याचे सादरीकरण या स्पर्धेमध्ये करण्यात येते. गेली २ वर्षे, कोरोनाच्या समस्येमुळे महाविद्यालयात विद्यार्थांची नगण्य उपस्थिती होती. या कारणाने प्रत्यक्षात अत्यंत कमी उपक्रम राबविले गेले. ही वास्तवता लक्षात घेता यंदाच्या वर्षी सादरीकरणाचा विषय 'आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महाविद्यालय परिसर ग्रीन व क्लिन कसा करता येईल?'असा होता.

बी.एन.सी.ए., एन.सी.एल. ज्युनिअर कॉलेज, बी.एम.सी.सी.,एस.पी. कॉलेज, सिंबायोसिस बायोडायव्हर्सिटी कॉलेज, बी.के.पी.एस. कॉलेज आर्किटेक्चर, आण्णासाहेब मगर महाविद्यालय, सिंबायोसिस कॉलेज आर्ट्स अॅण्ड सायन्स, फर्ग्युसन कॉलेज, मॉडर्न कॉलेज, एच.व्ही. देसाई या पुण्यातील महाविद्यालयांनी स्पर्धेमध्ये भाग घेतला व अभ्यासपूर्ण सादरीकरण ऑनलाईन पद्धतीने केले.

स्पर्धेचे संयोजन सुवर्णा भांबुरकर व नयनीश देशपांडे यांनी केले व परीक्षण शंतनु जोर्वेकर, अक्षता पवार, अतुल ढवळे यांनी केले. स्मृतिचिन्ह व मानपत्र प्रदान करून महाविद्यालयांना सन्मानित केले जाणार आहे.

### स्पर्धेचा निकाल :

- प्रथम क्रमांक : एच. व्ही. देसाई महाविद्यालय
- द्वितीय क्रमांक (विभागून): मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड व डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑर्किटेक्चर
- तृतीय क्रमांक : फर्ग्युसन महाविद्यालय
- उत्तेजनार्थ : एनसीएल ज्युनिअर कॉलेज व अण्णासाहेब मगर महाविद्यालय

Hello Pune
Page No. 4 Jan 19, 2022
Powered by: erelego.com

# 'पुरुषोत्तम करंडक'ची अंतिम फेरी आजपासून

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : महाविद्यालयीन नाट्यविश्वातील प्रतिष्ठेच्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी शनिवार आणि रविवारी रंगणार आहे.

या फेरीत नऊ महाविद्यालयांच्या संघांची सादरीकरणे होणार असून, महाविद्यालयीन रंगकर्मीचा नाट्यजल्लोष भरत नाट्य मंदिर येथे होणार आहे. करोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करून महाराष्ट्रीय कलोपासकतर्फे पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच झाली. आता अंतिम फेरीत आयएमसीसी (वरात), कावेरी महाविद्यालय (सफर), पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (कला?) बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (मंजम्मा पुराणम्) श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय (एव्री नाइट इन माय ड्रीम्स), पेमराज सारडा महाविद्यालय अहमदनगर (सहल), मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड (भाग धन्नो भाग), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (पाणीपुरी) आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालय (कम्प्लिट व्हॉइड) या संघांची सादरीकरणे होतील. अंतिम फेरीचे परीक्षण रंगकर्मी चिन्मयी सुर्वे, शैलेश देशमुख आणि नितीन धंदुके करणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्रीय कलोपासकचे मंगेश शिंदे यांनी दिली.

लोकसत्ता Sat, 22 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65801055

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

# पुरुषोत्तम करंडक 'बीएमसीसी'चा !

## 'मंजम्मापुराणम्' एकांकिकेला विजेतेपद

**पुणे, ता. २३ :** महाविद्यालयीन जीवनातील प्रतिष्ठेच्या पुरुषोत्तम करंडकाचे यंदाचे विजेतेपद पुण्याच्या बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) 'मंजम्मापुराणम्' या एकांकिकेने पटकावले आहे, द्वितीय क्रमांक अहमदनगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या 'सहल' या एकांकिकेने, तर तृतीय क्रमांक मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंडच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेने पटकावला आहे.

सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेसाठी दिला जाणारा जयराम हर्डीकर करंडक श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'एव्हरी नाईट इन माय ड्रीम्स' या एकांकिकेने आपल्या नावे केला आहे. 'सहल' एकांकिकेसाठी आविष्कार ठाकूर यास सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, तर 'एव्हरी नाईट इन माय ड्रीम्स' एकांकिकेसाठी हेमंत पाटील यास सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखकाचे पारितोषिक जाहीर झाले आहे. या फेरीसाठी परीक्षक म्हणून चिन्मयी सुमीत, शैलेश देशमुख आणि नितीन दंदुके यांनी काम पाहिले.

रविवारी रात्री अंतिम फेरी झाल्यावर निकालाची घोषणा करण्यात आली. निकालानंतर पारितोषिकप्राप्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या एकांकिकांची अंतिम फेरी २२ व २३ जानेवारी रोजी नाट्यप्रेमींच्या 'हाउसफुल्ल' प्रतिसादात भरत नाट्य मंदिर येथे झाली होती. या फेरीत 'आयएमसीसी'ची 'वरात', कावेरी महाविद्यालयाची 'सफर', प. भू. वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बावधानची 'कला?', बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाची 'मंजम्मापुराणम्', श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'एव्हरी नाइट इन माय ड्रीम्स', पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगरची 'सहल', मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंडची 'भाग धन्नो भाग', शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणेची 'पाणीपुरी' आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालयाची 'कंप्लीट व्हॉईड' या नऊ एकांकिकांचे सादरीकरण झाले.

विजेत्या स्पर्धकांना २९ जानेवारीला होणाऱ्या पारितोषिक वितरण समारंभात प्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते गौरवण्यात येईल.

chrome enterprise

## सविस्तर निकाल...



### सर्वोत्कृष्ट एकांकिका

- **प्रथम : पुरुषोत्तम करंडक :** बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (मंजम्मापुराणम्)
- **द्वितीय : हरी विनायक करंडक :** पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर (सहल)
- **तृतीय : संजीव करंडक :** मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड (भाग धन्नो भाग)

### सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका...

- **जयराम हर्डीकर करंडक :** श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय (एव्हरी नाईट इन माय ड्रीम्स)

### सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन...

- **प्रथम : आविष्कार ठाकूर :** पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर (सहल)
- **उत्तेजनार्थ :** प्रणव काळे - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (पाणीपुरी); अपूर्व बाजारे, संकेत बडे - प. भू. वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (कला?)

### लेखन...

- **सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखक :** हेमंत पाटील - काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय (एव्हरी नाईट इन माय ड्रीम्स)
- **उत्तेजनार्थ विद्यार्थिनी लेखिका :** अनुष्का मेंडजोगे - पी. ई. एस. मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय (द लिव्हिंग रूम)
- **सर्वोत्कृष्ट विद्यार्थी प्रायोगिक लेखक :** सुशांत दिवेकर - आबासाहेब गरवारे महाविद्यालय (कंप्लीट व्हॉईड)

### अभिनय...

- **सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्य :** गौरी डांगे - पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर (सहल)
- **सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय नैपुण्य :** स्वराली पेंडसे - कावेरी महाविद्यालय (सफर)
- **अभिनय नैपुण्य (अभिनेता) :** संकेत बडे - प. भू. वसंतदादा पाटील इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (कला?)
- **अभिनय नैपुण्य (अभिनेत्री) :** तनया जाधव - मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड (भाग धन्नो भाग)

Pune, Main
24/01/2022 Page No. 5

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

लोकमत



बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या संघाने (बीएमसीसी) 'मंजम्मा पुराणम' एकांकिकेसाठी पुरुषोत्तम करंडक पटकावला.

# 'बीएमसीसी'कडे पुरुषोत्तम करंडक

## पेमराज सारडा द्वितीय, तृतीय क्रमांक मॉडर्न महाविद्यालयाला

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : 'अरे आवाज कुणाचा'च्या जयघोषात बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या संघाने (बीएमसीसी) 'मंजम्मा पुराणम' एकांकिकेसाठी रविवारी पुरुषोत्तम करंडक पटकावला.

नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाने 'सहल' एकांकिकेसाठी द्वितीय क्रमांकाचा हरी विनायक करंडक तर तृतीय क्रमांकाचा संजीव करंडक गणेशखिंड येथील मॉर्डन महाविद्यालयाच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेला मिळाला. श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाची 'एव्हरी नाईट इन माय ड्रीम्स' ही एकांकिका जयराम हर्डीकर सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी शनिवारी ( दि. २२ आणि रविवारी ( दि. २३) पार पडली. भरत नाट्य मंदिरात रविवारी रात्री निकाल जाहीर होणार असल्याने सर्व संघांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. बीएमसीसीने करंडक मिळविल्याचे जाहीर होताच विद्यार्थ्यांनी आवाज कोणाचा म्हणत जल्लोष केला.

नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या गौरी डांगे हिला सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्य, कावेरी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या स्वराली पेंडसे हिला सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय नैपुण्य, वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या संकेत बडे याला अभिनय नैपुण्य, मॉर्डन महाविद्यालयाच्या (गणेशखिंड) तनया जाधव हिला अभिनय नैपुण्य ही पारितोषिके मिळाली. पेमराज सारडा महाविद्यालयाचा आविष्कार ठाकूर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक ठरला.

आयएमएमसीसी, कावेरी महाविद्यालय, वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बीएमसीसी, श्रीमती काशिबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, पेमराज सारडा महाविद्यालय, मॉर्डन महाविद्यालय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालय हे नऊ संघ अंतिम फेरीत होते. चिन्मयी सुमीत, नितीन धंदुके आणि शैलेश देशमुख यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**शासकीय अभियांत्रिकी** महाविद्यालयाचा प्रणव काळे आणि वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अपूर्व बाजारे आणि संकेत बढे यांना दिग्दर्शनासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. प्रणव सपकाळे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय), हेमंत पाटील आणि गणेश सोडमिसे (श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय), मानस घोरपडे (कावेरी कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय), श्रुता भाटे आणि निरंजन केसकर (पेमराज सारडा महाविद्यालय,नगर) , ऐश्वर्या तुपे आणि आशुतोष भागवत ( आयएमसीसी) , योगेश सप्रे आणि शंतनू जोशी(बीएमसीसी) यांना अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाले.

Hello Pune
Page No. 1 Jan 24, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## ‘बीएमसीसी’ची ‘पुरुषोत्तम’वर मोहोर

### नगरचे पेमराज सारडा कॉलेज दुसरे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

तरुणाईच्या अभिव्यक्तीचे सशक्त व्यासपीठ असलेला पुरुषोत्तम करंडक बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) 'मंजम्मा पुराणम' या एकांकिकेने पटकावला. नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाला 'सहल' या एकांकिकेसाठी द्वितीय क्रमांकाचा हरी विनायक करंडक मिळाला. तृतीय क्रमांकाचा संजीव करंडक गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेने पटकावला.

'महाराष्ट्रीय कलोपासक संस्थे'तर्फे घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी शनिवारी आणि रविवारी रंगली. भरत नाट्य मंदिरात रविवारी रात्री निकाल जाहीर होताच 'बीएमसीसी'च्या विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'एव्हरी नाइट इन माय ड्रीम्स'ला जयराम हर्डीकर सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचा पुरस्कार मिळाला.

नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या गौरी डांगे हिला सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्य, कावेरी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या स्वराली पेंडसे हिला सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय नैपुण्य, वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या संकेत बडे याला अभिनय नैपुण्य, मॉडर्न महाविद्यालयाच्या (गणेशखिंड) तनया जाधव हिला अभिनय नैपुण्य ही पारितोषिके मिळाली. पेमराज सारडा महाविद्यालयाचा आविष्कार ठाकूर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक ठरला.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रणव काळे आणि वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अपूर्व बाजारे, संकेत बडे यांना दिग्दर्शनासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. प्रणव सपकाळे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय), हेमंत पाटील आणि गणेश सोडमिसे (श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय), मानस घोरपडे (कावेरी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय), श्रुता भाटे, निरंजन केसकर (पेमराज सारडा महाविद्यालय, नगर), ऐश्वर्या तुपे आणि आशुतोष भागवत (आयएमसीसी), योगेश सप्रे आणि शंतनू जोशी (बीएमसीसी) यांना अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.



'बीएमसीसी'चा विजेता संघ.

#### या संघांमध्ये झाली लढत

आयएमसीसी, कावेरी महाविद्यालय, वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बीएमसीसी, श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, पेमराज सारडा महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालय हे नऊ संघ अंतिम फेरीत होते. चिन्मयी सुमीत, नितीन धंदुके आणि शैलेश देशमुख यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

Maharashtra Times 24.1.2022

पुढारी

## पुरुषोत्तम करंडक स्पर्धेने खूप काही दिले

### करंडक विजेती 'मंजम्मा पुराणम' एकांकिकेचा दिग्दर्शक योगेश सप्रे याची भावना; निकालानंतर एकच जल्लोष

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

संघातील प्रत्येकाने टीमवर्कने काम केले. मेहनतीने स्पर्धा गाजवली. 'बीएमसीसी'ने पुरुषोत्तम करंडकावर नाव कोरले याचा आनंद आहे. आमच्या कष्टाचे चीज झाले. सेलिब्रेशन तर आता सुरू झाले आहे. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेने खूप काही दिले, असे 'बीएमसीसी'च्या 'मंजम्मा पुराणम' एकांकिकेचा दिग्दर्शक योगेश सप्रे सांगत होता.

पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या संघाने (बीएमसीसी) 'मंजम्मा पुराणम' एकांकिकेसाठी पुरुषोत्तम करंडक पटकाविला. नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाने 'सहल' एकांकिकेसाठी द्वितीय क्रमांकाचा हरी विनायक करंडक मिळविला. तृतीय क्रमांकाचा संजीव करंडक गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या संघाला 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेसाठी मिळाला.

रविवारी रात्री निकाल जाहीर झाल्यानंतर विजयी संघातील विद्यार्थ्यांनी जल्लोष केलाच; शिवाय सोमवारीही सेलिब्रेशन सुरूच होते. आपापल्या महाविद्यालयांत भेटून विजयी संघांतील विद्यार्थ्यांनी सेलिब्रेशन केले. पण, महाविद्यालयाकडूनही त्यांचा सत्कार करण्यात आला. विजयी संघांच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत दै. 'पुढारी'नेही त्यांचा आनंद जाणून घेतला.

बीएमसीसीच्या संघाच्या 'मंजम्मा पुराणम' एकांकिकेचा दिग्दर्शक योगेश सप्रे म्हणाला की, पुरुषोत्तम करंडक पटकाविल्याचा खूप आनंद आहे. कारण, आम्ही एकांकिकेतून वेगळ्या धाटणीचा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आणि तो प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. १४ वर्षांनी बीएमसीसीला पुरुषोत्तम करंडक मिळाल्याचा आनंद आहे. माझ्यासह शंतनु जोशी यानेही एकांकिकेचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. पुरुषोत्तम ही खूप मानाची स्पर्धा आहे. त्यामुळे स्पर्धा जिंकल्याचा आनंद खूप आहे आणि या स्पर्धेत आम्ही सहभागी झाल्यानंतर खूप शिकलो. आम्हाला यातून भविष्याच्या दृष्टीने एक व्यासपीठ मिळाले आहे. संधी मिळाली आणि त्याचे चीज झाले. स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. संघातील प्रत्येकाचा एक मैत्रीचा बंध जुळला आहे. याच टीमवर्कने आम्ही पुढेही काम करणार आहोत.

नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या 'सहल' एकांकिकेचा दिग्दर्शक आविष्कार ठाकूर यानेही आनंद व्यक्त केला. तो म्हणाला की, दिग्दर्शनासाठी पारितोषिक मिळाले, याचा आनंद आहेच; पण सगळ्यात जास्त आनंद महाविद्यालयाला द्वितीय क्रमांकाचा करंडक मिळाल्याचा आहे. आम्ही मन लावून आणि जीव ओतून काम केले आणि त्या कष्टाला यशाची पावती मिळाली. आम्ही एकांकिकेसाठी दोन महिन्यांपासून तयारी करीत होतो. मी दिग्दर्शन करीत असताना संघातील प्रत्येकाने पूर्ण साथ दिली. एकांकिकेत आम्ही एका कुटुंबातील चार जणांचा प्रवास दाखविण्याचा प्रयत्न केला. नगरहून पुण्यात सादरीकरण करायला मिळणे, हे आमच्यासाठी खूप उत्साहवर्धक होते. यशाचे सेलिब्रेशन सुरू आहे.



गणेश खिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. त्यानिमित्ताने संघाने सोमवारी महाविद्यालयात सेलिब्रेशन केले.




नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. त्यानिमित्ताने संघाचा सोमवारी महाविद्यालयाकडून गौरव करण्यात आला.

> पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत सहभागी होणे, हे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते. ते स्वप्न माझ्या संघातील प्रत्येकाने पाहिले अन् त्याला मूर्तरूप मिळाले. माझे एकांकिका दिग्दर्शनाचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले. महाविद्यालयाचा संघ काही वर्षांनंतर अंतिम फेरीच्या नऊ संघांमध्ये स्थान मिळवू शकला आणि अंतिम फेरी गाजविल्यानंतर आम्ही स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविल्याचा आनंद आहे. संपूर्ण संघ नवखा होता. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत आम्ही वेगळ्या पद्धतीने सादरीकरण केलेच. पण, अंतिम फेरीतही तितकीच मेहनत घेतली अन् यश मिळाले. माझ्यासोबत सिद्धेश नेवे यानेही एकांकिकेचे दिग्दर्शन केले. आम्ही सर्वांनी खूप ऊर्जेने आणि नव्या दमाने एकांकिका सादर केली.
>
> \- **वरुण जोशी**, दिग्दर्शक, 'भाग धन्नो भाग' एकांकिका, मॉडर्न महाविद्यालय (गणेश खिंड)

My Pune Edition
Jan 25, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# 'पुरुषोत्तम'मध्ये बीएमसीसीची बाजी



**पुणे, दि. २४** - पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत यंदा बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या 'मंजम्मापुराणम' या एकांकिकेने 'करंडक' पटकावला. तर, श्रीमती काशिबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'एव्हरी नाइट इन माय ड्रीम' या एकांकिकेने सर्वोत्तम प्रायोगिक एकांकिकेसाठी देण्यात येणाऱ्या 'जयराम हर्डीकर' करंडकावर आपले नाव कोरले.

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेकडून आयोजित 'पुरुषोत्तम करंडक' आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी २२ आणि २३ जानेवारी रोजी झाली. याचा निकाल रविवारी रात्री जाहीर करण्यात आला. चिन्मयी सुमीत, नितीन धुंदके आणि शैलेश देशमुख यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. अहमदनगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या 'सहल' या एकांकिकेने 'हरि विनायक करंडक' आणि मॉडर्न महाविद्यालयाच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेने 'संजीव करंडक' ही सांघिक पारितोषिके पटकावली. यासह अहमदनगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या गौरी डांगे हिला सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्य, आविष्कार ठाकुल याला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, कावेरी कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या स्वराली पेंडसे हिला सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय नैपुण्य, पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या संकेत बडे याला अभिनय नैपुण्य (अभिनेता), मॉडर्न महाविद्यालयाच्या तनया जाधव हिला अभिनय नैपुण्य (अभिनेत्री) ही पारितोषिके मिळाली. यासह दिग्दर्शक उत्तेजनार्थ आणि अभिनय उत्तेजनार्थ या पारितोषिकांची देखील घोषणा केली.

> बीएमसीसीने अनेक वर्षांनंतर करंडक जिंकला आहे. याचा आनंद वाटतो. महाविद्यालयाच्या संघात देखील आनंदी वातावरण आहे. मागील वर्षी स्पर्धेत खंड पडल्याने 'पुरुषोत्तम' राहिले असे वाटत होते. मात्र, यंदा स्पर्धा पार पडली आणि सहभागी होता आले याचे समाधान वाटते. आमच्या संघात अनेकांनी पहिल्यांदाच नाटकात सहभाग घेतला होता.
>
> – **शंतनु जोशी**, बीएमसीसी

प्रभात Tue, 25 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65

---

**पुढारी**




महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या वतीने आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेतील विजेत्या बीएमसीसीच्या संघाने श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते पुरुषोत्तम करंडक स्वीकारल्यानंतर जल्लोष केला.

# आव्हाने पेलण्यासाठी सज्ज व्हा : गोडबोले

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'पुरुषोत्तम करंडक किंवा राज्य नाट्य स्पर्धांनी चांगले लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते रंगभूमीला दिले आहेत. त्यामुळे अशा व्यासपीठांद्वारे तरुण कलाकारांनी अधिकाधिक शिकून बाहेर पडावे. आज नाटकांचे स्वरूप बदलले आहे. अनेक आव्हानेही आहेत. ती आव्हाने पेलण्यासाठी सज्ज व्हा,' असा सल्ला रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले यांनी शनिवारी दिला.

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या वतीने पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम भरत नाट्य मंदिर येथे जल्लोषात झाला. 'अरे आव्वाज कुणाचा'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडत बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) संघाने 'मंजम्मा पुराणम' या एकांकिकेसाठी श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते पुरुषोत्तम करंडक स्वीकारला. नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाने 'सहल' एकांकिकेसाठी द्वितीय क्रमांकाचा हरी विनायक करंडक मिळवला तर तृतीय क्रमांकाचा संजीव करंडक गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेला मिळाला. प्राथमिक व अंतिम फेरीमधील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, अभिनेता आणि अभिनेत्री यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या प्रसंगी स्पर्धेचे परीक्षक शैलेश देशमुख, नितीन धंदुके, मंदार पटवर्धन, मयूरेश कुलकर्णी तसेच संस्थेचे अध्यक्ष अनंत निघोजकर उपस्थित होते. यानिमित्ताने 'मंजम्मा पुराणम' या एकांकिकेचे सादरीकरण करण्यात आले.

**'पुरुषोत्तम करंडक'च्या विजेत्यांना पारितोषिके**

गोडबोले म्हणाले, 'पुरुषोत्तम करंडक मिळाला असला तरी हे टार्गेट नव्हे तर पावती आहे. अजूनही 'लक्ष्य' मिळवायचे आहे. चांगल्या कामाची चटक लागली पाहिजे. या रंगमंचावरून जास्तीत जास्त शिकून बाहेर पडा. भरत नाट्य मंदिरमधल्या स्पर्धा, विद्यार्थ्यांची हुरहूर या सगळ्या गोष्टींची मजा अनुभवली आहे.' संस्थेचे चिटणीस राजेंद्र ठाकूरदेसाई यांनी सूत्रसंचालन केले.

Pune Edition
Jan 30, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# 'पुरुषोत्तम'चे पारितोषिक वितरण जल्लोषात

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** 'अरे आव्वाज कुणाचा', 'श्री चिअर्स फॉर' अशा आरोळ्यांनी भरत नाट्य मंदिरातील प्रेक्षकांमध्ये निम्म्या संख्येने असलेल्या तरुणाईच्या जल्लोषात पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी रंगला.

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) विद्यार्थ्यांनी 'पुरुषोत्तम करंडक' स्वीकारला. नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाला हरी विनायक करंडक, गणेशखिंड रस्ता येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या संघाला संजीव करंडक,तर काशीबाइ नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाला जयराम हर्डीकर सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचे पारितोषिक मिळाले. स्पर्धेचे परीक्षक शैलेश देशमुख, नितीन धंदुके, मंदार पटवर्धन, मयूरेश कुलकर्णी तसेच संस्थेचे अध्यक्ष अनंत निघोजकर, चिटणीस राजेंद्र ठाकूरदेसाई या वेळी उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले,की पुरुषोत्तम करंडक तसेच राज्य नाट्य स्पर्धा या चळवळीमुळे मराठी रंगभूमीचे भरणपोषण झाले आहे. या स्पर्धांनी रंगभूमीला चांगले लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते दिले आहेत. पुरुषोत्तम करंडक ही पावती असून यापेक्षा मोठे लक्ष्य गाठले पाहिजे. चांगल्या कामाची चटक लागण्यासाठी या रंगमंचावरून जास्तीत जास्त शिकून बाहेर पडा.

लोकसत्ता Sun, 30 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65925715

लोकमत




बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) विद्यार्थ्यांनी पुरुषोत्तम करंडक स्वीकारला त्यावेळी उपस्थित मान्यवर.

# चांगल्या कामाची चटक लागावी

## श्रीरंग गोडबोले : बीएमसीसीला पुरुषोत्तम करंडक प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : पुरुषोत्तम करंडक किंवा राज्य नाट्य स्पर्धा ही एक चळवळ आहे. यामुळे मराठी रंगभूमीचे भरण- पोषण झाले आहे. या स्पर्धांनी चांगले लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता रंगभूमीला दिले आहेत, अशा शब्दांत रंगभूमी परीनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष श्रीरंग गोडबोले यांनी स्पर्धांविषयी गौरवोद्गार काढले. पुरुषोत्तम करंडक मिळाला असला तरी हे टार्गेट नव्हे तर पावती आहे. अजूनही लक्ष्य मिळवायचंय. चांगल्या कामाची चटक लागली पाहिजे. स्वत:मध्ये एक अहमहमिका निर्माण झाली पाहिजे. या रंगमंचावरून जास्तीत जास्त शिकून बाहेर पडा, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ भरत नाट्य मंदिर येथे जल्लोषात पार पडला. 'अरे आव्वाज कुणाचा' या घोषणांनी परिसर दणाणून सोडत बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) विद्यार्थ्यांनी श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते पुरुषोत्तम करंडक स्वीकारला.

प्राथमिक व अंतिम फेरीमधील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, अभिनेता आणि अभिनेत्री यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली, त्यावेळी ते बोलतहोते. यापसंगी स्पर्धेचे परीक्षक शैलेश देशमुख, नितीन बंदुके, मंदार पटवर्धन, मयुरेश कुलकर्णी, तसेच संस्थेचे अध्यक्ष अनंत निघोचकर उपस्थितहोते. परीक्षक शैलेंद्र देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. संस्थेचे चिटणीस राजेंद्र ठाकूरदेसाई यांनी केले.

### भाग धन्नो भाग....

१ नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाला 'सहल' एकांकिकेसाठी द्वितीय क्रमांकाचा हरी विनायक करंडक मिळाला, तर तृतीय क्रमांक संजीव करंडक गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेने मिळविला.

२ श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाची 'एव्हरी नाइट इन माय ड्रीम्स' या एकांकिकेला जयराम हर्डीकर सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचे पारितोषिक मिळाले.



### अहमहमिका महत्त्वाची

- गोडबोले म्हणाले, भरत नाट्य मंदिरमधल्या स्पर्धा, विद्यार्थ्यांची हुरहुर या सगळ्या गोष्टींची मजा रंगकर्मी या नात्याने अनुभवली आहे. पुण्यात कट्ट्याकट्ट्यावर चर्चा व्हायची. हे पारितोषिक मला मिळायला हवे होते ना, माई भिडे म्हणजे मीच अशी जी काही अहमहमिका असते ना तीच महत्त्वाची आहे.
- पुरुषोत्तममध्ये बक्षीस मिळणे खूप मोठी गोष्ट आहे. मात्र, काही जणांच्या मते पुरुषोत्तम केले त्यांची तहान भागली; पण पुरुषोत्तम मिळाले हे आव्हान आहे. मात्र, काही जणांच्या मते पुरुषोत्तम केले त्यांची तहान भागली; पण पुरुषोत्तम मिळाले हे आव्हान आहे. साध्य नाही.

Hello Pune
Page No. 4 Jan 30, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# पुरुषोत्तम करंडकामुळे मराठी रंगभूमीचे भरण-पोषण झाले

### श्रीरंग गोडबोले यांचे प्रतिपादन

**पुणे :** पुरुषोत्तम करंडक व राज्य नाट्यस्पर्धा ही एक चळवळ असल्याने मराठी रंगभूमीचे भरण-पोषण झाले आहे. या स्पर्धांनी चांगले लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता रंगभूमीला दिले आहेत, अशा शब्दांत रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष श्रीरंग गोडबोले यांनी गौरवोद्गार काढले. पुरुषोत्तम करंडक मिळाला असला, तरी हे लक्ष्य नव्हे, तर पावती आहे. लक्ष्य अजूनही मिळवायचेय. चांगल्या कामाची चटक लागली पाहिजे. या रंगमंचावरून जास्तीत जास्त शिकून बाहेर पडा, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ भरत नाट्य मंदिर येथे जल्लोषात पार पडला. 'अरे आव्वाज कुणाचा' च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडत बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) विद्यार्थ्यांनी श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते पुरुषोत्तम करंडक स्वीकारला. नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या संघाने 'सहल' एकांकिकेसाठी द्वितीय क्रमांकाचा हरी विनायक करंडक मिळाला, तर तृतीय क्रमांकाचा संजीव करंडक गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेने घेतला. श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाची 'एव्हरी नाईट इन माय ड्रीम्स' या एकांकिकेला जयराम हर्डीकर सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचे पारितोषिक मिळाले. प्राथमिक व अंतिम फेरीमधील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, अभिनेता आणि अभिनेत्री यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्पर्धेचे परीक्षक शैलेश देशमुख, नितीन बंदुके, मंदार पटवर्धन, मयूरेश कुलकर्णी तसेच संस्थेचे अध्यक्ष अनंत निघोचकर उपस्थित होते.



**आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ भरत नाट्य मंदिर येथे शनिवारी पार पडला. बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते पुरुषोत्तम करंडक स्वीकारला.**

गोडबोले म्हणाले, भरत नाट्य मंदिरमधल्या स्पर्धा, विद्यार्थ्यांची हुरहूर या सगळ्या गोष्टींची मजा रंगकर्मी या नात्याने अनुभवली आहे. पुण्यात कट्ट्याकट्ट्यावर चर्चा व्हायची. हे पारितोषिक मला मिळायला हवे होते ना? माई भिडे म्हणजे मीच अशी जी काही अहमिका असते ना तिचं महत्त्वाची आहे. पुरुषोत्तममध्ये बक्षीस मिळणे खूप मोठी गोष्ट आहे. मात्र काही जणांच्या मते पुरुषोत्तम केले, त्यांची तहान भागली; पण पुरुषोत्तम मिळाले हे आव्हान आहे. साध्य नाही. परीक्षक शैलेंद्र देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. संस्थेचे चिटणीस राजेंद्र ठाकूरदेसाई यांनी केले.

Kesari 30.1.2022

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

नवभारत

## अथर्व को 'राष्ट्रीय बालश्री' पुरस्कार

■ **पुणे,** नवभारत न्यूज नेटवर्क. मॉडर्न महाविद्यालय का 17 वर्षीय छात्र अथर्व अभयार्पिता ने शास्त्रीय संगीत का प्रतिष्ठित 'राष्ट्रीय बालश्री' पुरस्कार प्राप्त किया है. औरंगाबाद के गरवारे बालभवन में हुए एक समारोह में अथर्व को इस पुरस्कार से सम्मानित किया गया. उपजिलाधिकारी अंजली धानोरकर के हाथों उसे यह पुरस्कार दिया गया. इस पुरस्कार वितरण समारोह में लेफ्टनंट कर्नल अभिजीत बर्वे, गरवारे बालभवन के संचालक सुनील सुतवणे, विक्रांत मोरे, हेमंत निकम प्रमुख अतिथि के तौर पर उपस्थित थे. बता दें कि, अथर्व अभयार्पिता मॉडर्न महाविद्यालय में बीएससी के पहले वर्ष का छात्र है.



### नाट्य कलाकार के तौर पर छात्र ने बनाई पहचान

■ गायक, संगीतकार, संगीत संयोजन, नाट्य कलाकार के तौर पर अथर्व ने अपनी एक अलग पहचान बनाई है. उसे शास्त्रीय गायन समेत राज्य बाल नाट्य प्रतियोगिता में पहला पुरस्कार, रेडियो मिर्ची गायन में प्रथम पुरस्कार, कांकरिया कप में पहला पुरस्कार, रामकृष्ण मिशन संस्कृत गायन में प्रथम पुरस्कार, वंदे मातरम गायन प्रतियोगिता में प्रथम क्रमांक तथा शारदाबाई देशमुख गायन प्रतियोगिता में पहला पुरस्कार प्राप्त कर चुका है. अथर्व को उसके माता-पिता, नाना जयंत केजकर, मामा भालचंद्र केजकर, मौसी स्वरमोहिनी जोशी से संगीत की शिक्षा मिली है. बचपन से ही उसने संगीत की शिक्षा अर्जित करते हुए अपने हुनर की चमक दिखाई है. इस सफलता के लिए मॉडर्न महाविद्यालय के प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव तथा शिक्षकों ने अथर्व की सराहना की.

Pune Edition
01-january-2022 Page No. 6
epaper.enavabharat.com

लोकमत

## महाविद्यालयात उभारले अकौंटन्सी म्युझियम

**पुणे** : दि इन्स्टिट्यूशन ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या पुढाकारातून आयसीएआय पुणेतर्फे शहरातील पाच नामांकित महाविद्यालयांमध्ये 'अकौंटन्सी म्युझियम' उभारण्याल आले. हडपसर येथील रयत शिक्षण संस्थेचे एस. एम. जोशी महाविद्यालय, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, शिवाजीनगर मॉडर्न कॉलेज व मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयात ही संग्रहालये आहेत. आयसीएआयच्या पुणे शाखेचे अध्यक्ष सीए समीर लड्डा, 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, माजी अध्यक्ष सीए अभिषेक धामणे, सीए अमृता कुलकर्णी, सचिव सीए काशिनाथ पाठारे आदी यावेळी उपस्थित होते.

Hello Pune
Page No. 4 Jan 02, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## शहरात पाच अकौन्टन्सी संग्रहालये

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्राचीन काळापासून व्यवहाराच्या बदलत्या पद्धती, अकौन्टन्सीमधील कालानुरूप बदल, जुनी नाणी, चलन, पदके, जुने ताळेबंद, धनादेश, खातेपुस्तिका असा अकौन्टन्सीशी संबंधित अनेक गोष्टी एकाच छताखाली पाहण्याची संधी पुणेकरांना उपलब्ध झाली आहे.

सनदी लेखापालांची नियामक संस्था असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया अर्थात 'आयसीएआय'च्या पुणे शाखेने शहरातील पाच महाविद्यालयांमध्ये उभारलेल्या अकौन्टन्सी संग्रहालयांच्या माध्यमातून पुणेकरांना ही संधी मिळणार आहे. 'आयसीएआय'च्या पुणे शाखेतर्फे पश्चिम विभागीय समितीच्या (डब्ल्यूआयआरसी) पुढाकारातून नेस वाडिया कॉलेज, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, एस. एम. जोशी महाविद्यालय, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स या पाच महाविद्यालयांत ही संग्रहालये उभारण्यात आली आहेत.



'आयसीएआय'च्या संग्रहालयातील दस्तावेज.

या संग्रहालयाचे उद्घाटन नुकतेच झाले. या वेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य चंद्रशेखर चितळे, पुणे शाखेचे अध्यक्ष व खजिनदार समीर लड्ढा, उपाध्यक्ष व सचिव सीए काशिनाथ पाठारे, अमृता कुलकर्णी, माजी अध्यक्ष अभिषेक धामणे आदींसह संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक उपस्थित होते. भारतासह जगभरात सनदी लेखापालांना विविध क्षेत्रांत असलेल्या संधींबद्दल चंद्रशेखर चितळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

''आयसीएआय'तर्फे विद्यार्थ्यांच्या व सनदी लेखापालांच्या प्रगतीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयांमध्ये 'अकौन्टन्सी संग्रहालय' स्थापन करण्यात येत आहे. मुख्य 'अकौन्टन्सी संग्रहालय' नोयडा येथील 'आयसीएआय' भवनमध्ये आहे. पाच महाविद्यालयांत असे म्युझियम उभारणारी 'आयसीएआय' पुणे ही भारतातील पहिलीच शाखा आहे,' असे लड्ढा म्हणाले.

Maharashtra Times 2.1.2022

सकाळ

## पुणे शहरातील पाच महाविद्यालयांत 'अकौंटन्सी म्युझियम'ची उभारणी

पुणे, ता. १ : अकौन्टसीमध्ये होत गेलेली प्रगती, जुन्या काळातील हस्तलिखिते, व्यवहाराच्या बदलत्या पद्धती, जगभरातील संग्रहालयांमध्ये साठवलेल्या कलाकृतींची छायाचित्रे, जुने ताळेबंद अशी खासियत असणारे 'अकौंटन्सी म्युझियम' दि इन्स्टिट्यूशन ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) पुणे शाखेतर्फे शहरातील पाच महाविद्यालयात उभारले आहे.

आयसीएआय वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, अण्णासाहेब मगर महाविद्यालय (हडपसर) आणि एस. एम. जोशी महाविद्यालयातील या संग्रहालयाचे उद्घाटन 'आयसीएआय'च्या पुणे शाखेचे अध्यक्ष सनदी लेखापाल (सीए) समीर लड्ढा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी काशिनाथ पाठारे, अमृता कुलकर्णी, दीपक कोरगावकर आदी उपस्थित होते. तर मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (शिवाजीनगर) आणि मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयात संग्रहालयाचे उद्घाटन आयसीएआयच्या केंद्रीय समितीचे सदस्य, सनदी लेखापाल चंद्रशेखर चितळे यांच्या हस्ते झाले.

Pune, Main
02/01/2022 Page No. 4

## 'अकाऊंटन्सी'चा प्रवास संग्रहालयाच्या रूपात

पुणे : दि इन्स्टिट्यूशन ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या (डब्ल्यूआयआरसी) पुढाकारातून आयसीएआय पुणेतर्फे शहरातील पाच महाविद्यालयात अकाऊंटन्सी संग्रहालय उभारले आहे. नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, हडपसर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, रयत शिक्षण संस्थेचे एस. एम. जोशी महाविद्यालयातील अकाऊंटन्सी संग्रहालयाचे उद्घाटन 'आयसीएआय'च्या पुणे शाखेचे अध्यक्ष व खजिनदार सीए समीर लड्ढा यांच्या हस्ते झाले. प्रसंगी उपाध्यक्ष व सचिव सीए काशिनाथ पाठारे, सीए अमृता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

शिवाजीनगर येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनच्या मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज व डेक्कन परिसरातील मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयात 'अकौंटन्सी म्युझियम'चे 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी 'आयसीएआय'च्या पुणे शाखेचे अध्यक्ष व खजिनदार सीए समीर लड्ढा, माजी अध्यक्ष सीए अभिषेक धामणे, सीए अमृता कुलकर्णी उपस्थित होते. पाच महाविद्यालयात असे म्युझियम उभारणारी 'आयसीएआय' पुणे ही भारतातील पहिलीच शाखा ठरली आहे.

### काय पाहाल संग्रहालयात ?

प्राचीन काळापासून आजपर्यंत अकाउंटसीमध्ये होत गेलेली प्रगती, व्यवहाराच्या बदलत्या पद्धती, विकसित होत गेलेल्या प्रणाली, जुन्या काळातील हस्तलिखिते, शिल्पे, जगभरातील संग्रहालयामध्ये साठवलेल्या कलाकृतींची छायाचित्रे, महत्त्वाची जर्नल्स, नाणी, पदके, पहिल्या अकाउंटन्सीच्या प्रतिमा, जुने ताळेबंद इत्यादि या संग्रहालयामध्ये पाहायला मिळणार आहे. सुमेरियन, हडप्पा संस्कृतीच्या काळातील चलने, पहिले भारतीय नाणे, मोहरा, हस्तलिखित धनादेश, खातेपुस्तक, मुनीमची परंपरा आदी गोष्टींचा यात समावेश असून, नव्या पिढीला अकौंटसीबद्दल माहिती व्हावी, गोडी लागावी व अकाउंटचा इतिहास, व्यवहाराच्या पद्धती समजून घेता याव्यात, यासाठी हे संग्रहालय उपयुक्त ठरणार आहे.

Kesari 3.1.2022

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

**सामना**



## 'अकाउंटन्सी'चा प्रवास संग्रहालयाच्या रूपात

पुणे, दि. २ (प्रतिनिधी) – 'दी इन्स्टिटयूशन ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'च्या (आयसीएआय) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या पुढाकारातून आयसीएआय पुणेतर्फे शहरातील पाच महाविद्यालयांत 'अकाउंटन्सी म्युझियम' उभारण्यात आले आहे.

नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, एस. एम. जोशी महाविद्यालय, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स येथे उभारण्यात आलेल्या 'अकाउंटन्सी म्युझियम'चे उद्घाटन 'आयसीएआय'चे पुणे शाखेचे अध्यक्ष व खजिनदार सीए समीर लड्डा, सीए चंद्रशेखर चितळे यांच्या हस्ते झाले. या वेळी उपाध्यक्षा व सचिव सीए काशिनाथ पाठारे, सीए अमृता कुलकर्णी, 'आयसीएआय'चे शाखाप्रमुख दीपक कोरगावकर, माजी अध्यक्ष सीए अभिषेक धामणे आदी उपस्थित होते.

या वेळी जगभरात सनदी लेखापालांना विविध क्षेत्रांत असलेल्या संधींबद्दल चंद्रशेखर चितळे यांनी मार्गदर्शन केले. समीर लड्डा यांनी 'आयसीएआय'च्या कार्याविषयी माहिती दिली.

प्राचीन काळापासून आजपर्यंत अकाउंटन्सीमध्ये होत गेलेली प्रगती, व्यवहाराच्या बदलत्या पद्धती, विकसित होत गेलेल्या प्रणाली,

### पाच महाविद्यालयांत उभारले 'अकाउंटन्सी म्युझियम'

जुन्या काळातील हस्तलिखिते, शिल्पे, जगभरातील संग्रहालयांमध्ये साठविलेल्या कलाकृतींची छायाचित्रे, महत्त्वाची जर्नल्स, नाणी, पदके, जुने ताळेबंद आदी गोष्टी पाहण्याची संधी या म्युझियमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लाभणार आहे. सुमेरियन, हडप्पा संस्कृतीच्या काळातील चलने, पहिले हिंदुस्थानी नाणे, मोहरा, खातेपुस्तक, मुनीमची परंपरा आदी गोष्टींचा या म्युझियममध्ये समावेश आहे.

Pune Edition
Jan 3, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

**सकाळ**

## मॉडर्न कॉलेजला जेतेपदाचा मान

पुणे, ता. २ : श्री शाहू मंदिर महाविद्यालय आयोजित आंतरमहाविद्यालयीन गटाच्या हॅण्डबॉल स्पर्धेत महिला गटात मॉडर्न महाविद्यालयाने विजेतेपदाचा मान मिळविला.

मुकुंदनगर येथील चंद्रशेखर आगाशे कॉलेजमध्ये झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात मॉडर्न महाविद्यालयाने चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयाचा ८-५ असा तीन गोलच्या फरकाने पराभव केला. या सामन्यात मॉडर्नच्या खेळाडूंचे वर्चस्व होते. मध्यंतरास त्यांनी ६-० अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात आगाशे कॉलेजच्या खेळाडूंनी पाच गोल केले होते. यावेळी विजयी संघाकडून मानसी कापरे, महानंदा जंगले व मानसी मारणेने प्रत्येकी दोन तर स्वप्नाली कांबळे व तनया नलावडेने प्रत्येकी एक गोल केले. पराभूत संघाकडून शीतल करपेने तीन व मोनाली हरपळेने दोन गोल केले.

तृतीय क्रमांकासाठी झालेल्या लढतीत आबासाहेब गरवारे महाविद्यालयाने मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंडचा ३-१ असा दोन गोलच्या फरकाने पराभव केला. विजयी संघाकडून तीनही गोल नेहा गिरमेने केले तर पराभूत संघाकडून एकमेव गोल शरयू कुलकर्णीने नोंदविला.

उपांत्य फेरीत मॉडर्न महाविद्यालयाने आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचा १३-३ असा दहा गोलने पराभव केला. यावेळी विजयी संघाच्या मानसी मारणेने पाच तर महानंदा जंगले व नेहा गिरमेने प्रत्येकी तीन गोल केले. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत शीतल करपळेने चार, मोनल हरपळेने तीन गोल करताना केलेल्या जोरदार खेळाच्या जोरावर चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंडचा ९-१ असा आठ गोलच्या फरकाने पराभव केला. मध्यतरांस आगाशे कॉलेजकडे ४-० अशी आघाडी होती. पराभूत संघाकडून एकमेव गोल ऋतुजा सपकाळने केला. या स्पर्धेचे उदघाटन श्री शाहू मंदिर महाविद्यालयाच्या प्राचार्य नयनीका वाघमारे यांच्या हस्ते झाले यावेळी डॉ. सुदाम शेळके, डॉ. आशा बेंगळे, डॉ. शिरीष मोरे, प्रा. विक्रम फाले हे उपस्थित होते.



मुकुंदनगर : आंतरमहाविद्यालयीन गटाच्या हॅण्डबॉल स्पर्धेत महिला गटात विजेतेपद मिळविणाऱ्या शिवाजीनगरच्या मॉडर्न महाविद्यालयाच्या खेळाडू आनंद व्यक्त करताना.

Pune, Pune-Today
03/01/2022 Page No. 8

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*



मॉडर्न कॉलेजचा विजेता संघ.

## मॉडर्न कॉलेजने मारली बाजी

**आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

शिवाजीनगरच्या मॉडर्न कॉलेजने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे शहर विभागीय क्रीडा समितीच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेत मुलींच्या गटाचे विजेतेपद पटकावले.

चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण कॉलेजच्या मैदानावर ही स्पर्धा झाली. मुलींच्या गटाच्या अंतिम लढतीत मॉडर्न कॉलेजने चंद्रशेखर आगाशे कॉलेजवर ८-५ने मात केली. मध्यंतराला मॉडर्न कॉलेजने ६-० अशी आघाडी घेऊन विजयाचा पाया रचला. मॉडर्न कॉलेजकडून मानसी कापरे (३ गोल), महानंदा जंगले (२) यांनी चमक दाखवली, तर आगाशे कॉलेजच्या शीतल करपे (३), मोनाली हरपळे (२) यांची लढत एकाकी ठरली. तत्पूर्वी, आबासाहेब गरवारे कॉलेजने गणेशखिंडच्या मॉडर्न कॉलेजवर ३-१ने मात करून तिसरा क्रमांक पटकावला. मध्यंतराला लढत १-१ अशी बरोबरीत होती. गरवारे कॉलेजच्या विजयात नेहा गिरमेने (३ गोल) चमक दाखवली.

**उपांत्य फेरीचे निकाल :** मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर - १३ (मानसी मारणे - ५, महानंद जंगले - ३) वि. वि. आबासाहेब गरवारे कॉलेज - ३ (नेहा गिरमे - ३); चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण कॉलेज - ९ (शीतल करपे -४, मोनाली हरपळे -३) वि. वि. मॉडर्न कॉलेज, गणेश खिंड - १ (ऋतुजा सपकाळ - १).

Maharashtra Times 3.1.2022

**नवभारत**

## कॉलेजों में स्थापित हुआ 'एकाउंटेंसी म्यूजियम'



**पुणे,** नवभारत न्यूज नेटवर्क. इंस्टीट्यूशन ऑफ चार्टर्ड एकाउंटेंट्स ऑफ इंडिया (आईसीएआई) ने वेस्टर्न इंडिया रीजनल काउंसिल (डब्ल्यूआईआरसी) की पहल पर शहर के पांच कॉलेजों में 'एकाउंटेंसी म्यूजियम' की स्थापना की है. पुणे जिला शिक्षा बोर्ड के अन्नासाहेब मगर कॉलेज, नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, हडपसर, रयत शिक्षण संस्थान के एस एम जोशी कॉलेज में लेखा संग्रहालय का उद्घाटन सीए समीर लड्ढा, अध्यक्ष और कोषाध्यक्ष, पुणे शाखा, आईसीएआई द्वारा किया गया. इस अवसर पर उपाध्यक्ष एवं सचिव सीए काशीनाथ पठारे, सीए अमृता कुलकर्णी, आईसीएआई के शाखा प्रमुख दीपक कोरगांवकर उपस्थित थे.

### कई लोगों का महत्वपूर्ण योगदान

शिवाजीनगर के प्रोग्रेसिव एजुकेशन के मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स एंड साइंस कॉलेज और डेक्कन क्षेत्र में मराठवाड़ा मित्र मंडल कॉलेज ऑफ कॉमर्स में सीए चंद्रशेखर चितले, आईसीएआई की केंद्रीय समिति के सदस्य के हाथों अकाउंटेंसी संग्रहालय का उद्घाटन किया गया. इस अवसर पर आईसीएआई पुणे शाखा अध्यक्ष एवं कोषाध्यक्ष सीए समीर लड्ढा, पूर्व अध्यक्ष सीए अभिषेक धामने, सीए अमृता कुलकर्णी, आईसीएआई शाखा प्रमुख दीपक कोरगांवकर उपस्थित थे. आईसीएआई पुणे पांच कॉलेजों में इस तरह का संग्रहालय स्थापित करने वाली भारत की पहली शाखा है. वाडिया कॉलेज के प्राचार्य डॉ. वृषाली रणधीर, उप प्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी, मॉडर्न एजुकेशन सोसाइटी के ट्रस्टी मनोहर सानप, प्रोफेसर सीए जयश्री वेंकटेश, अन्नासाहेब मगर कॉलेज के प्राचार्य डॉ. पंडित शेलके, उप प्राचार्य डॉ. ए बी माने, हेड ऑफ प्लेसमेंट सेल एंड कॉमर्स ब्रांच प्रा. डॉ जी पी सातव, एस एम जोशी कॉलेज के प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उप प्राचार्य एवं वाणिज्य विभाग के प्रमुख ए वी कांबले का स्थापना में महत्वपूर्ण योगदान रहा है.

Pune Edition
03-january-2022 Page No. 2
epaper.enavabharat.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## पाच महाविद्यालयांमध्ये लेखाशास्त्र दालनाची निर्मिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : विद्यार्थ्यांना लेखाशास्त्र विषयाची गोडी लावण्यासाठी शहरातील पाच महाविद्यालयांमध्ये लेखाशास्त्र दालनाची निर्मिती करण्यात आली आहे. प्राचीन काळापासून लेखाशास्त्रात होत गेलेली प्रगती, हस्तलिखिते, नाणी, जुने ताळेबंद आदींबाबतची माहिती या दालनाद्वारे देण्यात आली आहे.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) पश्चिम भारत प्रादेशिक परिषद, आयसीएआय पुणे शाखेतर्फे नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय, मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालय, एस. एम. जोशी महाविद्यालयात हे दालन तयार करण्यात आले आहे. या दालनाच्या उद्घाटनावेळी आयसीएआयच्या पुणे शाखेचे अध्यक्ष समीर लड्डा, सचिव काशिनाथ पठारे, अमृता कुलकर्णी,



अभिषेक धामणे, चंद्रशेखर चितळे, नेस वाडिया महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वृषाली रणधीर, मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त डॉ. मनोहर सानप, एस. एम. जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. झुंजारराव, मराठवाडा मित्र मंडळाचे प्राचार्य डॉ. देविदास गोल्हार, अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित शेळके आदी या वेळी उपस्थित होते.

प्राचीन काळापासून आजपर्यंत लेखाशास्त्रात झालेली प्रगती, व्यवहाराच्या बदलेल्या पद्धती, हस्तलिखिते, शिल्पे, जगभरातील संग्रहालयांमध्ये साठवलेल्या कलाकृतींची छायाचित्रे, जुने ताळेबंद, नाणी, पदके आदींबाबतची माहिती या दालनाद्वारे देण्यात येत आहे. सनदी लेखापाल आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने नवोपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयांमध्ये लेखाशास्त्र दालन स्थापन करण्यात आले आहे. मुख्य दालन नोयडायेथील आयसीएआय भवनमध्ये आहे. पाच महाविद्यालयात दालन उभारणारी आयसीएआय पुणे ही देशातील पहिलीच शाखा आहे, असे लड्डा यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 05 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65406072

---

**लोकमत**

कोरोनामुळे महाविद्यालये पुन्हा बंद ; ऑनलाइन पद्धतीनेच विद्यार्थ्यांना शिक्षण

## शिकवणी, परीक्षा पद्धत आता आली बदलाच्या उंबरठ्यावर

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी १५ फेब्रुवारीपर्यंत महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे पुण्यातील स्वायत्त महाविद्यालयांसह विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना शिकवण्याच्या व परीक्षा घेण्याच्या पद्धतीत बदल करावा लागणार आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने फेब्रुवारी महिन्यात परीक्षा घेण्याचे निश्चित केले असून प्राप्त परिस्थितीचा विचार करता विद्यापीठाला ऑनलाईन पद्धतीनेच सर्व परीक्षा घ्याव्या लागतील, असे चित्र दिसत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिलेल्या सूचनांनुसार पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालये काही महिन्यांपूर्वी सुरू झाली. कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयातील ऑफलाईन वर्गात प्रवेश दिला. तरीही पुण्यातील दोन नामांकित शिक्षण संस्थामधील विद्यार्थ्यांना कोरोनाचा संसर्ग झाल्याचे समोर आले. त्यामुळे शैक्षणिक संस्थांमधील ऑफलाईन वर्ग सुरू ठेवणे योग्य आहे का? असा प्रश्न निर्माण झाला होता. राज्य शासनाने स्वतःच ऑफलाईन वर्ग बंद करून ऑनलाईन वर्ग सुरू ठेवण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे परगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा घरी जावे लागणार आहे. वसतिगृह सुरू न झाल्याने अनेक विद्यार्थ्यांनी भाडेतत्त्वावर खोली घेऊन महाविद्यालयातील वर्गांना उपस्थिती लावण्यास सुरुवात केली होती. परंतु, वसतिगृह सुरू न झाल्याने आता त्यांना पुन्हा घरी परतावे लागणार आहे. केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर शैक्षणिक संस्थांना सुद्धा आपल्या नियोजनात बदल करावे लागणार आहेत.

### परीक्षाही ऑनलाईन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे फेब्रुवारी महिन्यात घेतल्या जाणाऱ्या परीक्षा कोणत्या पद्धतीने होणार याबाबत अद्याप शिक्कामोर्तब झाले नाही. एकूण परिस्थितीचा विचार करून विद्यापीठातर्फे याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. मात्र, १५ फेब्रुवारीपर्यंत महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे सर्व परीक्षा आता ऑनलाईन पद्धतीनेच घ्याव्या लागतील, अशी चर्चा विद्यापीठातील अधिकाऱ्यांमध्ये होत आहे.

सर्व नियमांचे काटेकोर पालन करून महाविद्यालयातील ऑफलाईन वर्ग सुरू केले होते. स्वायत्त महाविद्यालय असल्याने ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षांचे नियोजन केले होते. परंतु, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार परीक्षांचे नियोजन केले जाईल.

**- डॉ. सविता दातार, प्राचार्य, स. प. महाविद्यालय**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन, विद्यापीठ व स्थानिक प्रशासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार ऑनलाईन/ऑफलाईन वर्ग व परीक्षांबाबत निर्णय घेतला जाईल.

**- डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर**



Hello Pune
Page No. 4 Jan 06, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

# एकांकिकेतून सामाजिक भान

## पुरुषोत्तम एकांकिका करंडक; दोन वर्षांनंतर स्पर्धेला पुन्हा सुरुवात

फॉलो अप

पुणे : लोकनृत्याच्या आधारे समाजात आपला ठसा उमटवणारी महिला, नाटकातील वेशभूषाकाराचा जीवनसंघर्ष आणि देशात घडलेल्या घटनांचा सध्याच्या जीवनावर होणारा परिणाम, अशा विषयावर भाष्य करणाऱ्या एकांकिकेने पुरुषोत्तम करंडक स्पर्धेची सुरुवात झाली.

कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून ही स्पर्धा खंडित झाली होती. महाराष्ट्रीय कलोपासकने नाट्यगृह सुरू झाल्यांनतर नियमांत पुरुषोत्तम घेण्याचे ठरवले. यंदाच्या स्पर्धेत ५० महाविद्यालयांनी सहभाग घेतला आहे. ३ जानेवारीपासून महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेला सुरुवात झाली.



**'अस्थिकलश'**

'देशात घडलेल्या फाळणी, बाबरी मशीद, आणीबाणी, मुंबई बॉम्ब स्फोट अशा घटनांचा आजच्या मानवी जीवनावर कसा परिणाम होतो. त्या घटनांची आताच्या सामाजिक जीवनाशी सांगड घातली जात आहे. त्यांचे आताच्या मानवी जीवनावर उमटणारे पडसाद दोन व्यक्तींच्या सिम्बॉलिक मनाच्या भूमिकेतून दाखवण्यात आले आहेत. अशी सामान्य माणसाच्या सामाजिक जीवनावर आधारित अस्थिकलश एकांकिका शिवाजीनगरच्या आर्ट्स, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केली आहे. लेखक इरफान मुजावर यांची ही कथा असून, विद्यार्थी दिग्दर्शक अरुण गावडे याने नाटकाचे दिगदर्शन केले आहे.

**'मंजम्मापुराणं'**

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यंदा जाहीर झालेल्या पद्मश्री पुरस्कार विजेत्या मंजम्मा जोगती यांच्या जीवनावर आधारित एकांकिकेचे सादरीकरण केले आहे. एका तृतीयपंथी व्यक्तीला समाजात मान्य करून घेताना होणारा त्रास 'मंजम्मापुराणं' या एकांकिकेतून दाखवला आहे. तृतीयपंथी ते लोकनृत्य हा प्रवास अतिशय वेगळ्या धाटणीने प्रेक्षकांसमोर मांडला आहे. योगेश सप्रे, शंतनू जोशी या दोघांनी एकांकिकेचे लेखन आणि दिगदर्शन केले आहे.

### कोरोनाची खबरदारी



- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ज्यांचे दोन्ही लस झाले आहेत, त्यांनाच प्रवेश दिला जात आहे. त्याशिवाय नाट्यगृहात प्रवेश मिळतच नाही.
- तसेच प्रेक्षकांनाही शारीरिक अंतर ठेवून बसविण्यात येत आहे. कोरोनाची योग्य काळजी घेऊनच ही स्पर्धा घेतली जात आहे.

**कला?**

नाटक क्षेत्रात 'वेशभूषा' या कलेला कला म्हणून मिळणारी कमी किंमत आणि एकंदरीतच वेशभूषा नाटकात नकळत किती महत्त्वाची भूमिका निभावते. यावर हे नाटक विश्वनाथ या अशाच एका वेशभूषाकार ज्याचं आपल्या कलेवर नितांत प्रेम असते. पण ज्याचा पदोपदी अपमान झालाय त्याच्या गोष्टीवरून भाष्य करते. काही प्रसंगामुळे विश्वनाथला त्याची कला जोपासणे सोडून त्याचं वडिलोपार्जित शिवणकामाचं दुकान चालवावं लागते. पण शेवटी त्याला त्याची ती कला आणि वेशभूषाकार ही ओळख परत मिळते. अशी 'कला' नावाची एकांकिका प.भू. वसंतदादा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने सादर केली आहे. लेखन अथर्व बाजारे व दिग्दर्शन अथर्व बाजारे आणि संकेत बडे यांनी केले आहे.

Hello Pune
Page No. 4 Jan 08, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

## ‘मॉडर्न’च्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**पुणे :** मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने वाणिज्य शाखेच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा मेळावा महाविद्यालयाच्या सभागृहात नुकताच पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. सुवर्णमहोत्सवी बॅचच्या निमित्ताने काढलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अ. गो. गोसावी यांच्या हस्ते करण्यात आले. स्मरणिकेचे संपादन या बॅचचे विद्यार्थी आणि ज्येष्ठ पत्रकार सुरेशचंद्र पाध्ये यांनी केले. तत्कालीन प्राचार्य मो. भा. लिमये यांनी दूरध्वनीच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. या वेळी विद्यमान प्राचार्य डॉ. झंजारराव व उपप्राचार्य डॉ. कांबळे उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयाच्या ५० वर्षांच्या प्रगतीविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ हार्मोनिअम वादक आणि बॅचचे विद्यार्थी श्यामकांत सुतार व अन्य सहध्यायांनी मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला. लता कुबेर यांनी सूत्रसंचालन केले.

Pune, Pune-Today
12/01/2022 Page No. 6

## ‘मॉडर्न’मध्ये रंगला स्नेहमेळावा

**पुणे :** मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त मॉडर्न वाणिज्य महाविद्यालयाच्या ‘बीकॉम’च्या पहिल्या तुकडीतर्फे नुकतेच स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्यात मॉडर्नच्या बीकॉमच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन कॉलेजच्या आठवणींना उजाळा दिला. या वेळी ‘मॉडर्न’चे माजी प्राचार्य अ. गो. गोसावी यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. स्मरणिकेचे संपादन ज्येष्ठ पत्रकार सुरेशचंद्र पाध्ये यांनी केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, उपप्राचार्य डॉ. कांबळे यांच्यासह महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक या वेळी उपस्थित होते. तत्कालीन प्राचार्य मो. भा. लिमये वयोमानामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांना दूरध्वनीवरून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने हार्मोनिका वादक, सहाध्यायी गुरू श्यामकांत सुतार व इतर सहाध्यायींनी मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला.



मॉडर्न कॉलेजच्या मेळाव्यात उपस्थित माजी विद्यार्थी, शिक्षक.

Maharashtra Times 14.1.2022

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

## 'पुरुषोत्तम'चा निकाल जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**तरुणाईच्या सळसळत्या उत्साहात आणि जल्लोषात सुरू झालेल्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये नऊ संघ दाखल झाले आहेत.**

### स्पर्धेतील अभिनयासाठी उत्तेजनार्थ पारितोषिके

अनुष्का गोखले (ठसका, एमएमसीसी), मैत्रेयी हातवळणे (हिरवीन, पीसीसीओई), अरुण गावडे (अस्थिकलश, मॉडर्न महाविद्यालय), तन्वी कांबळे (शोधयात्रा, कमिन्स), राज निंबाळकर (लाल, टिमवि), अथर्व शेटे (द हंगरी, म. ए. सो. सीनिअर महाविद्यालय), मुकुल ढेकले (घुंगरू एमएमसीसी), ऋषिकेश वनवे (झापड, जी. एच. रायसोनी महाविद्यालय), राघव वर्तक (कधी तरी, इंडसर्च महाविद्यालय) आणि राजेश नागरगोजे (क्षुधा, टिळक आयुर्वेद महाविद्यालय).

### उत्तेजनार्थ विद्यार्थी दिग्दर्शक

शुभम शहाजी घोडके (म्हातारा पाऊस, न्यू आर्ट्स महाविद्यालय)

### उत्तेजनार्थ विद्यार्थिनी दिग्दर्शक

शांभवी जोशी (शोधयात्रा, कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालय).

महाराष्ट्र कलोपासक संस्थेतर्फे या स्पर्धेच्या परंपरेत कोरोनामुळे काहीसा खंड पडला. मात्र यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव काहीसा कमी झाल्याने संस्थेने स्पर्धेच्या आयोजनाचा निर्णय घेतला. त्यानुसार भरत नाट्य मंदिर येथे गेल्या काही दिवसांपासून रंगलेल्या स्पर्धेमध्ये ५० संघ सहभागी झाले होते. स्पर्धेची प्राथमिक फेरी सोमवारी पार पडली. स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये ९ संघांची वर्णी लागली आहे.

**स्पर्धेच्या अंतिम फेरीत नऊ संघ दाखल**

आयएमएमसी (वरात), कावेरी महाविद्यालय (सफर), प. भू. वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बावधन (कला?), बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (मंजम्मा पुराणम), श्रीमती काशिबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय (एव्हरी नाइट इन माय ड्रीम्स), पेमराज सारडा महाविद्यालय, नगर (सहल), मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड (भाग धन्नो भाग), अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (पाणीपुरी) आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालय (कंप्लिट व्हॉईड) या संघांचा समावेश आहे.

स्पर्धेची अंतिम फेरी २२ व २३ जानेवारी रोजी होणार असून, दरवर्षीप्रमाणे शेवटच्या दिवशी त्या त्या फेरीतील निकाल जाहीर होतील.

पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम २९ जानेवारी रोजी होईल.

My Pune Edition
Jan 18, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

## पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत नऊ संघांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : 'अरे आव्वाज कुणाचा'चा जल्लोषात सुरू झालेल्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये नऊ संघ दाखल झाले आहेत.

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेतर्फे दरवर्षी घेण्यात येणारी ही स्पर्धा महाविद्यालयीन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. कोरोनामुळे स्पर्धेच्या परंपरेत काहीसा खंड पडला. मात्र, यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव काहीसा कमी झाल्याने संस्थेने स्पर्धेच्या आयोजनाचा निर्णय घेतला. भरत नाट्य मंदिर येथे गेल्या चौदा दिवसांपासून रंगलेल्या स्पर्धेमध्ये ५० संघ सहभागी झाले होते. स्पर्धेची प्राथमिक फेरी सोमवारी पार पडली. स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये नऊ संघांची वर्णी लागली.

त्यामध्ये आयएमएमसी (वरात), कावेरी महाविद्यालय (सफर), प. भू. वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बावधान (कला?), बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (मंजम्मा पुराणम), श्रीमती काशिबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय (एव्हरी नाइट इन माय ड्रीम्स), पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर (सहल), मॉर्डन महाविद्यालय, गणेशखिंड (भाग धन्नो भाग), अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (पाणीपुरी) आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालय (कंप्लिट व्हॉईड) या संघांचा समावेश आहे.

स्पर्धेची अंतिम फेरी २२ व २३ जानेवारीला होणार असून, दरवर्षीप्रमाणे शेवटच्या दिवशी त्या-त्या फेरीतील निकाल जाहीर होतील. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. २९ जानेवारीला होईल. स्पर्धेचे परीक्षक म्हणून मयूरेश कुलकर्णी, विश्वास करमरकर आणि मंदार पटवर्धन यांनी काम पाहिले.

### स्पर्धेतील अभिनयासाठी उत्तेजनार्थ पारितोषिके

- अनुष्का गोखले (ठसका, एमएमसीसी), मैत्रेयी हातवळणे ( हिरवीन, पीसीसीओ ई), अरुण गावडे (अस्थिकलश, मॉडर्न महाविद्यालय), तन्वी कांबळे (शोधयात्रा, कमिन्स), राज निंबाळकर (लाल, टीमवि),
- अथर्व शेटे (द हंगरी, म.ए सो सीनिअर महाविद्यालय), मुकुल ढेकले (घुंगरू एमएमसीसी), ऋषिकेश वनवे (झापड, जी. एच. रायसोनी), राघव वर्तक (कधीतरी, इंडसर्च) आणि राजेश नागरगोजे (क्षुधा, टिळक आयुर्वेद महाविद्यालय)



### उत्तेजनार्थ विद्यार्थी दिग्दर्शक

- शुभम शहाजी घोडके (म्हातारा पाऊस, न्यू आर्टस् महाविद्यालय)
- उत्तेजनार्थ विद्यार्थिनी दिग्दर्शक
- शांभवी जोशी (शोधयात्रा, कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालय)

Hello Pune
Page No. 4 Jan 18, 2022
Powered by: erelego.com

## सीओईपीसह नऊ महाविद्यालये 'पुरुषोत्तम करंडक'च्या अंतिम फेरीत

### विद्यार्थ्यांच्या उत्साहात प्राथमिक फेरी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत गेले पंधरा दिवस रंगलेल्या प्राथमिक फेरीचा निकाल सोमवारी रात्री जाहीर करण्यात आला. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (सीओईपी), आबासाहेब गरवारे महाविद्यालयासह नऊ महाविद्यालयांच्या संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला असून २२ आणि २३ जानेवारीला अंतिम फेरी रंगणार आहे.

महाराष्ट्रीय कलोपासकतर्फे पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी भरत नाट्य मंदिर येथे ३ ते १७ जानेवारीदरम्यान झाली. गेल्या काही दिवसांत करोना बाधितांची संख्या वाढलेली असताना कोणत्याही अडचणीविना स्पर्धेची प्राथमिक फेरी पार पडली. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात प्राथमिक फेरीत एकांकिकांचे सादरीकरण केले. विश्वास करमरकर, मयूरेश कुलकर्णी, मंदार पटवर्धन यांनी प्राथमिक फेरीचे परीक्षण केले. अंतिम फेरीनंतर २९ जानेवारीला ज्येष्ठ रंगकर्मी श्रीरंग गोडबोले यांच्या हस्ते पारितोषिक वितरण कार्यक्रम होईल.

प्राथमिक फेरीतून आयएमसीसी (वरात), कावेरी महाविद्यालय (सफर), पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (कला?) बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (मंजम्मा पुराणम्) श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय (एव्री नाइट इन माय ड्रीम्स), पेमराज सारडा महाविद्यालय अहमदनगर (सहल), मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड (भाग धन्नो भाग), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (पाणीपुरी) आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालय (कम्प्लिट व्हॉइड) यांची अंतिम फेरीत निवड झाली.

### पारितोषिक प्राप्त विद्यार्थी

प्राथमिक फेरीतील अभिनयासाठी अनुष्का गोखले (एमएमसीसी), मैत्रेयी हातवळणे (पीसीसीओई), अरुण गावडे (मॉडर्न महाविद्यालय), तन्वी कांबळे (कमिन्स महाविद्यालय), राज निंबाळकर (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ), अथर्व शेटे (मएसो वरिष्ठ महाविद्यालय), मुकुल ढेकळे (एमएमसीसी), ऋषिकेश वनवे (जी. एच. रायसोनी महाविद्यालय), राघव वर्तक (इंडसर्च), राजेश नागरगोजे (टिळक आयुर्वेद महाविद्यालय) यांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र मिळाले. तर विद्यार्थी दिग्दर्शक म्हणून शुभम घोडके (न्यू आर्ट्स महाविद्यालय, अहमदनगर) विद्यार्थिनी दिग्दर्शक म्हणून शांभवी जोशी (कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालय) यांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र देण्यात आले.

उन्हाळ्यात शहरात पाणीटंचा

लोकसत्ता Tue, 18 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65671897

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

# वैविध्यपूर्ण विषयांवर तरुणाईचा रंगाविष्कार

**पुणे, ता. १८ :** महाराष्ट्रीय कलोपासकतर्फे आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा सोमवारी समारोप झाला. या फेरीचा निकालही जाहीर झाला असून, नऊ एकांकिकांनी अंतिम फेरीत प्रवेश केला. या फेरीत विद्यार्थ्यांकडून अतिशय वैविध्यपूर्ण विषयांवर सादरीकरण पाहायला मिळाले, अशी प्रतिक्रिया परीक्षकांनी 'सकाळ'शी बोलताना व्यक्त केली.

"प्राथमिक फेरींमधील एकांकिकांमध्ये वैविध्यपूर्ण विषय मांडण्यात आले होते. अगदी एलजीबीटीक्यू समुदायाच्या प्रश्नांपासून ते अलीकडील एसटी कामगारांच्या समस्यांपर्यंतच्या विषयांवर या तरुण रंगकर्मींना भाष्य केले. या एकांकिका सादरही उत्तम केल्या गेल्या. विद्यार्थ्यांचे कष्टही त्यात जाणवत होते. तांत्रिक बाबींपेक्षाही संहिता कशी आहे आणि ती अभिनयातून किती ताकदीने सादर केली जात आहे, या बाबी आम्ही प्रामुख्याने पाहिल्या. मात्र एकच गोष्ट खटकली. अनेक एकांकिका विनाकारण लांबल्या. लेखकांना कुठे थांबायचे, हे कळले पाहिजे. प्रेक्षकांना व परीक्षकांना प्रत्येक गोष्टीचे 'स्पून फिडिंग' न करता काही भाग त्यांच्या आकलनासाठी सोडून देणे गरजेचे आहे," असे मत परीक्षक मयुरेश कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

"पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत कायमच दर्जेदार नाटकांचे सादरीकरण होते. स्पर्धेचा जल्लोषही नेहमीच दमदार असतो. यंदाही तेच पाहायला मिळाले. बहुतांश संघांचे सादरीकरण उत्तमच होते. विद्यार्थी लेखकांची संख्याही सुखावणारी होती. मात्र त्यातील आश्वासक संहिता कमी होत्या. खूप कमी संघांनी काही नवीन प्रयोग करण्याचे धाडस केले. आत्ताची पिढी अतिशय प्रतिभावान आहे. फक्त त्यांनी त्यांचे वाचन व निरीक्षण अधिक वाढवण्याची गरज आहे," असा सल्ला परीक्षक मंदार पटवर्धन यांनी विद्यार्थ्यांना दिला.

'एकांकिकेची रंगीत तालीम होते आणि ती एकांकिका पॉलिश झालेली असते. यंदा त्या स्पर्धा न झाल्याचा परिणाम जाणवला', असे निरीक्षणही त्यांनी नोंदवले.

### उत्तेजनार्थ पारितोषिकांची घोषणा

प्राथमिक फेरीच्या निकालासह उत्तेजनार्थ पारितोषिकांचीही घोषणा करण्यात आली. यात अभिनयासाठीचे उत्तेजनार्थ पारितोषिक अनुष्का गोखले (एकांकिका - ठसका), मैत्रेयी हातवळणे (एकांकिका - हिरवीन), अरुण गावडे (एकांकिका - अस्थिकलश), तन्वी कांबळे (एकांकिका - शोधयात्रा), राज निंबाळकर (एकांकिका - लाल), अथर्व शेटे (एकांकिका - द हंगरी), मुकुल ढेकले (एकांकिका - घुंगरू), ऋषिकेश वनवे (एकांकिका - झापडं), राघव वर्तक (एकांकिका - कधीतरी) आणि राजेश नागरगोजे (एकांकिका - क्षुधा) या कलाकारांना जाहीर झाले आहे. तर उत्तेजनार्थ विद्यार्थी दिग्दर्शकाचे पारितोषिक 'म्हातारा पाऊस' या एकांकिकेसाठी शुभम घोडके याला व उत्तेजनार्थ विद्यार्थिनी दिग्दर्शिकेचे पारितोषिक 'शोधयात्रा' एकांकिकेसाठी शांभवी जोशी हिला जाहीर झाले आहे.

Pune, Main
19/01/2022 Page No. 2

पुणे महाराष्ट्र टाइम्स | पुणे | शनिवार,

# कॉलेज सुरू करण्याची मागणी

## बहुतांशी विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण; अपूर्ण अभ्यासक्रमामुळे परीक्षेचा प्रश्न अनुत्तरित

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राज्यातील शाळा सुरू होऊ शकतात, तर महाविद्यालये सुरू करायला काय अडचण आहे, असा प्रश्न विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून उपस्थित केला जात आहे. बहुतांश महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाल्याने महाविद्यालये तातडीने सुरू करण्याची मागणी केली जात आहे.

विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होत नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, परीक्षा कशा द्यायच्या, असा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर उभा राहिला आहे.

राज्यात दिवाळीनंतर महाविद्यालये खऱ्या अर्थाने सुरू झाली. विद्यार्थी महाविद्यालयांमध्ये येत नाहीत, तोवर पुन्हा एकदा करोनाने डोके वर काढले आणि महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनेक अभ्यासक्रमांचे प्रवेश उशिराने झाल्याने काही विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम १० टक्केही पूर्ण झालेले नाहीत. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण सुरू असले, तरी त्याला उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प आहे. फेब्रुवारी महिन्यात विद्यापीठाच्या सत्र परीक्षा होऊ घातल्या आहेत. या सगळ्याचा विचार करून महाविद्यालये तातडीने सुरू करण्यात यावीत, अशी मागणी केली जात आहे. राज्यात शाळा सुरू करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले असल्याने महाविद्यालयांमध्ये करोनाचा प्रसार वाढण्याची शक्यता कमी आहे. याचा विचार करून महाविद्यालये सुरू करावीत, अशी अपेक्षा विद्यार्थी व्यक्त करीत आहेत.

'राज्यातील महाविद्यालये सुरू करण्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. त्या दृष्टीने लवकरच प्रस्ताव तयार करून तो मुख्यमंत्र्यांकडे पाठवला जाणार आहे. मुख्यमंत्र्यांनी अंतिम निर्णय दिल्यानंतर महाविद्यालये सुरू केली जातील,' असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.




### अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आव्हान

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्णच झाले नसल्याच्या अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. अशात येत्या काही दिवसांत सत्र परीक्षा होणार आहेत. अशा वेळी विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आव्हान महाविद्यालयांसमोर आहे.

"दोन लाटांच्या तुलनेत तिसरी लाट इतकी गंभीर नाही, हे आतापर्यंत जाणवते आहे. त्यामुळे या दरम्यान महाविद्यालये सुरू करण्यास हरकत नाही. केवळ एकाच वेळी सर्व वर्ग सुरू न करता टप्प्याटप्प्याने महाविद्यालये सुरू करणे गरजेचे आहे. ज्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा असतात, अशा वर्गांना आधी प्राधान्य द्यायला हवे. उर्वरित वर्ग टप्प्याटप्प्याने सुरू करता येतील.

– प्रा. डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

विद्यार्थी आता कंटाळले आहेत. जे विद्यार्थी पुण्याबाहेर राहतात, त्यांना दर काही दिवसांनी यावे लागते आणि पुन्हा करोनासंसर्ग वाढला, की घरी जावे लागते. या सततच्या येण्या-जाण्याने विद्यार्थी कंटाळले आहेत. आता महाविद्यालये सुरू झाली, की ती एका सत्रापुरती सुरूच ठेवावीत. पुन्हा बंद करण्याचा निर्णय नको.

– डॉ. सीमा पुरोहित, प्राचार्य, बीएमसीसी

Maharashtra Times 22.1.2022

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5



Vaccination drive at Fergusson College. HT PHOTO

## Colleges ready to welcome students, hold inoculation drives

Dheeraj Bengrut

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** With the state higher and technical education minister Uday Samant announcing that Class 1 to Class 12 will reopen on January 24, many city colleges have started preparations to welcome students again on campuses.

Many educational institutes in the city have planned on-campus special vaccination drives for students.

Vaccination for 15-18 age group, those going to schools and colleges, have started from January 3 this year.

As the board examinations of class 10 and 12 are planned to be conducted offline in the state, many institutes conducted special vaccination drives on campuses along with the Pune Municipal Corporation (PMC) for students since the last few weeks.

"As per the state government guidelines, only classes from 1 to 12 will resume from January 24 and it will cover junior colleges. We are waiting for the guidelines from the local government body, while our preparations for restarting offline classes have begun.

Already the college campus was reopened and lectures were going on, before rise in Covid cases in the state led to stopping of offline mode.

We had organised vaccination drives for students in the college along with Pune Municipal Corporation health department," said Professor Ravindra Pardeshi, principal of Fergusson College.

"We are planning to hold vaccination drive for students who have not yet taken the jab. Once the college campus is reopened for Class 11 and Class 12 students, we will be taking registration of students for vaccination and hold a special vaccination camp," he said.

AS THE BOARD EXAMINATIONS OF CLASS 10 AND 12 ARE PLANNED TO BE CONDUCTED OFFLINE IN THE STATE, MANY INSTITUTES CONDUCTED SPECIAL VACCINATION DRIVES ON CAMPUSES

Rajendra Zunjarrao, principal, Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar said, "Safety of our students is top priority and we will cover maximum students under vaccination.

We will register students in groups of 25 and conduct vaccination drive with the help of Pune Municipal Corporation."

Pooja Sonawane, a Class 12 student, said, "Our board examination schedule is declared and our classes were conducted online due to Covid restrictions. We eagerly look forward to offline mode since last two years as in-person interaction is needed with teachers to grasp subjects and score good marks.

So, we are happy that offline classes will restarting soon."

Hindustan Times 22.1.2022

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

# Career needs fuel midway subject switch by students

## Migration In Humanities And Science Streams

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** A careful look at the form filling data for the semester examinations being conducted by the Savitribai Phule Pune University from February shows that students have switched subjects in the first and second years especially in the humanities stream.

Officials who scrutinised the data said it was a reflection of the times. With more students with a will to explore, and with colleges becoming more relaxed about their structures due to online classes coupled with their adoption of choice based credit system, students are able to choose from a wide variety of options now, principals said.

V B Gaikwad, principal of KTHM College, Nashik, said that his college has seen this trend in the undergraduate level and not at the master's level.

"There is a big change among students now. Many students have opted for English even though they had not done so in their first term. Then there are cases of a complete change of subjects too. This is not limited to humanities, though the highest numbers are there, but also in the science stream. We have students who had chosen chemistry in first year of their undergraduate studies and then picked something totally different in their second year. The online education, the choice based credit system allow such transfers," Gaikwad said.

Sahil Alhat, a second-year BA student, said that he had taken political science in the first year which he dropped in second year and took optional English.

"When I was enrolling in BA, I was fresh out of school and didn't know much about the subjects to choose from, the jobs available or what I wanted to do. Now I want to try for MPSC and UPSC exams and I want to specialise in English in my BA final year so that I can take English as my optional subject in the competitive exams. Hence I dropped one of my subjects and added a new subject," he added.

Anshara Shaikh, a final year student of geology had not chosen the subject at all when she enrolled in her first year of graduation.

"I was not very aware about the difference between geography and geology and I was also told by some people that both are almost the same. I took admission, only to realise that both the subjects are very different. When I tried to change my subject, I was told that I cannot do it. That is when I came to know that there was a provision to add subjects, which very few people know and colleges do not advertise. I changed my college and added geology as a third subject and now in my third year, I am specializing in in as I want to become a hydrogeologist," she said.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College of Arts, Commerce and Science, said that students are more aggressively pursuing what they want now, which was not the case a few years ago.

"The earlier generations also wished to change subjects or add subjects. But there was a fear of actually approaching the principal or the university with such demands because it was widely believed that such changes cannot happen once you have taken admission. But now, students are aggressively pursuing what they think is right, which is a good sign," said Zunjarrao.

"While it is common in graduation, I have someone who changed his mind in postgraduation. He completed his first term in MA Marathi, realized he doesn't like it and now has taken up history. So, he also has to appear for all term I exams of MA History," Zunjarrao said.

### PRACTICAL DIFFICULTIES

- Real potential of choice based credit systems is yet to be realized in state universities
- Rigid timetable structures, less manpower and a need for streamlining examination systems to blame
- Teachers agree that change is happening but at a slow pace
- The problem is when colleges do not get approval from examination department of the university
- A more integrated system is needed so that all such changes, at the college level, are reflected in the examination department
- It helps at the time of form filling, where there are no discrepancies and students do not face any problems

Many weigh in their job prospects



"The students are jumping subjects or adding subjects in a way never seen before. We used to get about 7-8 such cases earlier, but in the past two years, it is happening on a bigger scale. Many students who had taken Marathi in the first year, want to change to English or add English. Or those who had taken geography, now want to jump to geology in the second semester. Even at the master's level, we are seeing this behaviour" — **A senior official from SPPU**

The Times of India 25.1.2022

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

# Colleges wait for local orders, but plan to reopen in phases

Ardhra.Nair
@timesgroup.com

**Pune**: The state higher and technical education minister Uday Samant recently announced that colleges in the state will reopen from February 1 and students who are fully vaccinated can attend the classes offline.

While most city colleges are planning to reopen in a phased manner starting with practical batches for final year students, they are still awaiting orders from local authorities before reaching out to students.

Savita Datar, principal of Sir Parashurambhau College, said there would not be much of a difference immediately in the first week as her college is conducting its term examinations online at the moment.

"Since the exams are being conducted online, we do not expect to start immediately. We have time to reopen physically as we are also waiting for the local government's orders regarding the same. At least 60% or above students are double-vaccinated. Since hostels are closed, many students from outside Pune cannot come for offline classes. Hence, the classes would continue to be taken in a hybrid mode. Even if there is a notification to start the hostels, it will take at least a week more to clean up the hostels, fix a vendor to run the mess and other arrangements," Datar said.

P B Buchade, principal of Abasaheb Garware College, said that he will start with practical sessions for all students as a priority when the colleges reopen.

"Most of the theory is over as classes were conducted online. What remains are the practicals. Hence, those will be done for all classes. Since practical batches are small, they can be conducted without hassles and following all Covid-19 safety protocols. However, even these would need to be done in a hybrid mode as hostels are still closed and most students come from outside Pune," Buchade said, adding that 90% of his students are already vaccinated.

## PRIORITY TO FINAL-YEAR STUDENTS

- Colleges can open physically in a phased manner with priority to final-year students in undergraduate, graduate and postgraduate level
- Students in their final year must have some hands-on training before they go out into the world to find jobs

"Once this is done, we can slowly progress to other classes and even start with some theory for the final years or other practical-oriented courses. But, at least for a couple of months, every college would need to keep the hybrid option open for teaching

— **Rajendra Zunjarrao** | PRINCIPAL OF MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE COMMERCE COLLEGE

The Times of India 28.1.2022

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

**लोकमत**

# स्वायत्त महाविद्यालयांच्या परीक्षा ऑनलाइनच

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्य शासनाने विद्यापीठ व महाविद्यालयांना येत्या १५ फेब्रुवारीनंतरच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यास मुभा दिली आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. तसेच ऑफलाइन परीक्षांच्या तयारीसाठी काही दिवस वेळ द्यावा लागणार आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांतर्फे पहिल्या सत्राच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच घेतल्या जाणार आहेत.

पुणे विद्यापीठाशी संलग्न शहरातील बहुतांश सर्व नामांकित महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत. त्यामुळे या महाविद्यालयांना आपल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने घेता येऊ शकतात. कोरोना परिस्थितीत सुधारणा होत असल्याने राज्य शासनाने परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठे व महाविद्यालयांवर सोपवला आहे. येत्या सोमवारी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात,अशी भूमिका मांडली जाणार आहे. परंतु, स्वायत्त महाविद्यालये ऑफलाइन परीक्षेस तयार नसल्याचे दिसून येत आहे. परीक्षांचा निर्णय एकाएकी घेता येत नाही. महाविद्यालयांच्या विद्या परिषदेच्या सदस्यांशी याबाबत चर्चा करावी लागेल तसेच ऑफलाइन परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका तयार कराव्या लागतील.

Pune Main
Page No. 4 Jan 31, 2022
Powered by: erelego.com

**लोकमत**

स.प. महाविद्यालयाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जात असून, येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत बहुतांश परीक्षा पूर्ण होतील. महाविद्यालयाने ऑनलाइन परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे सर्व परीक्षा प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसारच होणार आहेत. **- डॉ. सविता दातार, स. प. महाविद्यालय**

कोरोनामुळे बंद असलेली वसतिगृह अद्याप सुरु झालेली नाहीत. त्यामुळे महाविद्यालयाने ऑफलाइन परीक्षांचा निर्णय घेतला, तर विद्यार्थ्यांनी परीक्षांसाठी कुठे मुक्काम करायचा, असा प्रश्न पालकांकडून उपस्थित होणार आहे. त्यामुळे या सत्रातील परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच घेतल्या जातील. **- डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर**

Pune Main
Page No. 4 Jan 31, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

## यूजीसीचा उपक्रम

# विद्यार्थ्यांकडून ७५ कोटी सूर्यनमस्कार

### स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ३० हजार शिक्षण संस्थांना सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त १ जानेवारी ते ७ फेब्रुवारीदरम्यान देशभरातील ३० हजार शिक्षण संस्थांद्वारे ७५ कोटी सूर्यनमस्कार घालण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिली आहे. या उपक्रमात सहभागी होण्याची सूचना देशभरातील शिक्षण संस्थांना करण्यात आली आहे.

योगासनांविषयी तरुणांमध्ये जागृती करण्यासाठी कार्यरत नॅशनल योगासन स्पोर्टस फेडरेशन ही संस्था युवक आणि क्रीडा मंत्रालयाची मान्यताप्राप्त संस्था आहे. देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त फेडरेशनतर्फे हा उपक्रम राबविला जाणार आहे. त्यासाठी शिक्षणसंस्थांमधील विद्यार्थ्यांवर सामूहिकरीत्या ७५ कोटी सूर्यनमस्कार घालण्याची जबाबदारी असणार आहे.

करोनामुळे गेल्या दीड वर्षांपासून आरोग्यभान वाढले आहे. शरीराची व्यायाम आणि योगासनांद्वारे काळजी घेण्याचे प्रमाण कधी नव्हे इतके वाढले आहे. त्या पार्श्वभूमीवर वर्षाच्या आरंभापासून विद्यार्थ्यांना आरोग्याबाबत सजग करण्यासाठी सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. देशाच्या अमृतमहोत्सवानिमित्ताने प्रत्येक शिक्षण संस्थेमध्ये यांचे आयोजन करण्यात येणार आहे.

### महत्त्व काय?

सूर्यनमस्कारामुळे शरीरातील प्रत्येक भागाला व्यायाम मिळतो. हाताचे मनगट, कोपर, खांदे, पाठीचा कणा, गुडघे, पायाचे घोटे, सर्व सांध्यांना सूर्यनमस्कारामुळे फायदा मिळतो. रक्ताचा प्रवाह वाढतो, शरीराची चपळता-स्फूर्ती वाढते. शरीर संवर्धनासाठीही सूर्यनमस्कार उपयुक्त असतात. एकूणच संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो



### पुढील चाळीस दिवस...

देश राज्यातील ३० हजार शिक्षण संस्थातील तीन लाख विद्यार्थ्यांद्वारे ७५ कोटी सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प करण्यात आला आहे. १ जानेवारी ते ७ फेब्रुवारीदरम्यान हा उपक्रम होईल. तर २६ जानेवारीला संगीतमय सूर्यनमस्काराद्वारे तिरंगा साकारण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Sat, 01 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65321057

---

## सामना

# विद्यापीठे, महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय कुलगुरूंच्या अभिप्रायानंतर



### उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी घेतली आढावा बैठक

मुंबई, दि. ३१ (प्रतिनिधी) - मुंबईसह राज्यात कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचे सावट निर्माण झाले असून या पार्श्वभूमीवर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी रात्री उशिरा मुंबईसह राज्यातील विद्यापीठांचे कुलगुरू, रजिस्टार, उच्च शिक्षण विभागातील अधिकारी यांची आढावा बैठक घेतली. मुंबई, पुण्यासारख्या शहरात कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण सापडत असल्याने राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरू ठेवणे कितपत योग्य राहील यावर चर्चा करण्यात आली. तसेच या विषयावर कुलगुरूंनी येत्या काही दिवसांत अभिप्राय सादर करण्याच्या सूचनाही उदय सामंत यांनी दिल्या आहेत. कुलगुरूंकडून अभिप्राय आल्यानंतर विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरू ठेवायची की नाहीत यावर धोरणात्मक निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या या बैठकीला राज्यभरातील विद्यापीठांचे कुलगुरू, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक अभय वाघ, अकृषी विद्यापीठांचे सर्व कुलगुरू उपस्थित होते. या बैठकीत राज्यातील विद्यापीठ, महाविद्यालयांमध्ये सध्या सुरू असलेल्या परीक्षा, अभ्यासक्रमांचा आढावा घेत कोरोना परिस्थितीवर काय उपाययोजना करता येतील, यासाठीच्या सूचना उदय सामंत यांनी कुलगुरूंना केल्या. पदवी महाविद्यालये आणि विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी यांच्या लसीकरणाविषयी बैठकीत चर्चा झाली.

बैठकीत कुलगुरूंनी आपल्या परिसरातील सध्या निर्माण झालेल्या कोरोना परिस्थितीची माहिती दिली. उदय सामंत यांनी सुचविलेल्या उपाययोजनांवर येत्या काही दिवसांत कुलगुरूंकडून अभिप्राय मागवले जाणार असून त्यानंतर राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालये बंद ठेवायची की सुरू ठेवायची याविषयीचा निर्णय घेतला जाणार आहे.

Pune Edition
Jan 1, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

पुढारी

## परीक्षा पद्धतीचा निर्णय नव्या सूचनांनंतर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाकडून कोरोना प्रतिबंधासाठी नवीन नियमावली येण्याची शक्यता विचारात घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हिवाळी सत्र परीक्षांबाबत सावध भूमिका घेतली आहे.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सावध भूमिका**

कुलगुरू नियुक्त समितीने परीक्षा पद्धतीबाबतचा अहवाल विद्यापीठाला सादर केला आहे. मात्र नव्या मार्गदर्शक सूचनांनंतर परीक्षा पद्धतीबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती विद्यापीठातील सूत्रांनी दिली आहे. पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांची शैक्षणिक प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने झाल्याने परीक्षाही ऑनलाइन पद्धतीनेच घेण्याची विद्यार्थ्यांची मागणी आहे. मात्र ऑनलाइन परीक्षेतील निकालांमध्ये वाढ झाल्याने ऑफलाइन परीक्षा आवश्यक असल्याचे मत शैक्षणिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे. तसेच महाविद्यालयेही सुरू असल्याने ऑफलाइन परीक्षा घेणे शक्य असल्याचेही मत मांडले जात आहे. समितीने परीक्षा पद्धतीचा अहवाल सादर केला आहे. मात्र राज्य शासनाकडून नव्या मार्गदर्शक सूचना जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नव्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन परीक्षा पद्धतीचा निर्णय घेण्यात येईल, असे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**अद्याप अंतिम निर्णय नाही**

परीक्षा पद्धत निश्चित करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी समिती नियुक्त केली होती. या समितीने विद्यापीठाला अहवाल सादर केला आहे. त्यात समितीने अंतिम वर्ष आणि विषम सत्राच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने, अन्य वर्षांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने सादर करण्याची शिफारस केली आहे. मात्र या संदर्भात विद्यापीठाने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही.

Pune Edition
Jan 2, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

## विद्यापीठाच्या परीक्षा फेब्रुवारी महिन्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील सुमारे सहा लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या परीक्षा येत्या फेब्रुवारी महिन्यात घेतल्या जाणार आहेत. त्यातही कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन तर इतर सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा विचार आहे. येत्या आठवड्याभरात त्यावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑफलाइन की ऑनलाइन पद्धतीने घेणार, याबाबत अजूनही संभ्रम कायम आहे. विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांकडून परीक्षांबाबत अंतिम निर्णय डिसेंबर अखेरीस घेतला जाणार होता, परंतु केंद्र व राज्य शासनाकडून कोरोना व ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर नवे निर्बंध लागू केले जात आहेत. त्यामुळे विद्यापीठाकडून परीक्षांबाबत निर्णय घेण्यास विलंब होत आहे.

ऑनलाइन परीक्षा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या निकालात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे, तसेच ऑनलाइन परीक्षा दिल्यानंतर नोकरीसाठी खासगी कंपन्यांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची कंपनीकडून पुन्हा परीक्षा घेतली जात असल्याचे निदर्शनास येत आहे.

त्यामुळे केवळ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेऊन इतर विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

त्यांना एक महिना अगोदर परीक्षेचे वेळापत्रक उपलब्ध करून दिले जाणार आहे, असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 4 Jan 02, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

**विश्लेषण**

बातमी कोणत्याही क्षेत्रातील असो. तिच्यामागचे महत्त्वाचे मुद्दे, एखाद्या घडामोडीचे इंगित नेमके समजावे यासाठी हे नवे सदर, आजपासून सोमवार ते शनिवारी दररोज...

## राज्य विद्यापीठ कायदा सुधारणा
## राज्यातील विद्यापीठांच्या स्वायत्ततेला राजकीय हस्तक्षेपाचा धोका

रसिका मुळ्ये

**राज्य विद्यापीठ** कायद्यातील सुधारणांचे विधेयक नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात गदारोळातच मंजूर झाले. विद्यापीठ कायद्यात करण्यात आलेले बदल हे विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर गदा आणणारे असल्याचा आक्षेप विरोधकांनी घेतला आहे, तसाच तो शिक्षण क्षेत्रातूनही घेण्यात येत आहे. हे बदल काय आहेत, त्यावर नेमका वाद का होतो आहे, शासनाची बदलांमागील भूमिका काय, बदलांचे परिणाम काय होणार, अशा मुद्द्यांवर टाकलेला दृष्टिक्षेप...



### विद्यापीठ कायद्यात नेमके काय बदल केले गेले आहेत?

बदल होण्यापूर्वी असलेला विद्यापीठ कायदा चार वर्षांपूर्वी लागू झाला. त्यातील कुलगुरूंच्या निवडीच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. राज्यपाल हे विद्यापीठांचे प्रमुख म्हणजेच कुलपती असतात. त्यांचे प्रतिनिधी म्हणून कुलगुरू कामकाज पाहतात. उच्चशिक्षण विभाग हा विद्यापीठातील काही पदे, प्राध्यापकांचे निधी आणि काही योजनांसाठी निधीची तरतूद करतो. मात्र, शासन आणि प्रशासनाचा थेट हस्तक्षेप विद्यापीठाच्या कारभारात नसतो. यापुढे मात्र, कुलगुरूंच्या वर राज्याच्या उच्च शिक्षणमंत्र्यांचे स्थान असणार आहे. प्र-कुलपती असे नवे पद निर्माण करण्यात आले असून उच्च शिक्षणमंत्री हे प्र-कुलपती असतील. कुलपतींच्या अनुपस्थितीत प्र-कुलपती कामकाज पाहू शकतील. कुलपतींच्या अनुपस्थितीत कुलगुरू अधिसभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहात असत. यानंतर मात्र उच्च शिक्षणमंत्री अधिसभेचे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहतील. कुलगुरूंच्या निवड प्रक्रियेतही बदल करण्यात आले आहेत. आतापर्यंत कुलगुरू निवड समिती पाच उमेदवारांची नावे कुलपतींकडे पाठवत असे. कुलपती त्यांची मुलाखत घेऊन त्यातील एकाची कुलगुरू म्हणून निवड करत असत. यानंतर समितीने निवडलेल्या उमेदवारांपैकी दोन नावांची शिफारस शासन कुलपतींकडे करणार आहे. त्यापैकी एक नाव कुलपतींनी कुलगुरुपदासाठी अंतिम करायचे आहे. तसेच निवड समितीमध्ये शासनाचे दोन प्रतिनिधी असतील.

### या कायद्याला विरोधक तसेच शिक्षण क्षेत्रातून कोणता आक्षेप आहे?

आतापर्यंत विद्यापीठांच्या शैक्षणिक, आर्थिक स्वायत्ततेत शासनाला थेट हस्तक्षेप करण्यास फारशी मुभा नव्हती. मात्र, आता विद्यापीठांच्या कारभारात थेट उच्च शिक्षणमंत्र्यांचा हस्तक्षेप होऊ शकणार आहे. विद्यापीठाचा अर्थसंकल्प, बृहत आराखडा यांसह विविध मुद्द्यांचे निर्णय अधिसभेत घेण्यात येत होते. आता शिक्षणमंत्री अधिसभेचे अध्यक्ष असल्यामुळे विद्यापीठांच्या निर्णयप्रक्रियेत शासनाचा वरचष्मा राहील. प्र-कुलपती हे कुलगुरूंच्या वरील पद आहे. कुलगुरू या पदासाठी शिक्षण क्षेत्रातील अनुभव, संशोधन क्षेत्रातील अनुभव असे अनेक निकष आहेत. उच्च शिक्षणमंत्र्यांसाठी शैक्षणिक किंवा गुणवत्तेचे कोणतेही पात्रता निकष नाहीत. त्यामुळे विद्यापीठातील पदरचनेत कुलगुरू पदापेक्षा उच्च शिक्षणमंत्र्यांचे पद वर असण्याबाबतही शिक्षण क्षेत्रातून आक्षेप घेण्यात येत आहेत.

### या विरोधावर शासनाची भूमिका काय आहे?

शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी विद्यापीठांमध्ये योग्य पद्धतीने व्हावी. विद्यापीठाबाबत उपस्थित करण्यात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे अधिवेशनात मंत्र्यांनाच द्यावी लागतात. त्यामुळे विद्यापीठांमधील कामकाजाची माहिती त्यांना असणे आवश्यक आहे, असे कारण प्र-कुलगुरू हे पद निर्माण करून ते उच्च शिक्षणमंत्र्यांना देण्यामागे शासनाने दिले आहे. इतर राज्यांत प्र-कुलपती पदाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच राज्यातील कृषी विद्यापीठे, आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या प्र-कुलपतिपदी संबंधित खात्याचे मंत्रीच असतात. कुलगुरूंच्या निवडीच्या निकषांमध्ये कोणतेही बदल नाहीत किंवा कुलपतींचे अधिकारही कमी करण्यात आलेले नाहीत. शासनाने शिफारस केलेल्या नावांपैकी अंतिम निवड करण्याचे अधिकार हे कुलपतींनाच असणार आहेत, अशी भूमिका शासनाने मांडली आहे.

### या बदलांना खरोखरच राजकीय वादाची किनार आहे का?

शासन आणि राज्यपाल यांच्यातील वादाची किनार या बदलांमागे असल्याचीही चर्चा आहे. राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा रद्द करण्यावरून उच्च शिक्षण विभाग आणि राज्यपाल यांच्यातील वाद गेल्या वर्षी रंगला होता. तेव्हा विद्यापीठांवर अधिकार कुणाचा हा प्रश्न समोर आला. त्यानंतर सातत्याने विद्यापीठांबाबत राज्यपाल आणि शासनात खटके उडत आहेत. मुंबई विद्यापीठातील जमीन इतर संस्थांना देणे, निधी, नियुक्त्या अशा बाबी वादग्रस्त ठरल्या आहेत. सध्या विद्यापीठाच्या कारभारात थेट हस्तक्षेप करण्याची शासनाला फारशी मुभा नसल्याने राज्यपालांसमोर विद्यापीठांतील वाद गेल्यानंतर शासनाला काही वेळा माघारही घ्यावी लागली आहे. सध्याही विधिमंडळात सुधारणा विधेयक मंजूर झाले असले तरी राज्यपाल त्याला मंजुरी देणार का, याबाबतही शंका व्यक्त केल्या जात आहेत. राज्यपालांनी विधेयक मंजूर न केल्यास राज्याला त्याचा पुनर्विचार करावा लागू शकतो.

### देशभरात शिक्षणासाठी सामायिक कायदा हवा अशी मागणी का होते आहे?

शिक्षण हा देशाच्या सामायिक सूचीतील घटक आहे. शिक्षणाबाबतचे निर्णय घेण्याचे कायदे करण्याचे अधिकार हे राज्य आणि केंद्र या दोन्ही शासनांना आहेत. त्यानुसार काही धोरणे ही केंद्र तर काही राज्य पातळीवर निश्चित होतात. स्थानिक परिस्थिती, गरजा यांनुसार कायदा करण्याचे अधिकार राज्यालाही देण्यात आले आहेत. त्यानुसार प्रत्येक राज्याचा विद्यापीठ कायदा वेगळा आहे. त्याचबरोबर केंद्र पातळीवरही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचे नियमन केले जाते. राज्यांचे कायदे हे केंद्राच्या नियमांच्या अधीन असणे अपेक्षित असते. मात्र, आता परिस्थिती आणि शिक्षणाचे आयाम, बाजारपेठेच्या गरजा या सगळ्यात बदल झाल्यामुळे उच्च शिक्षणाचे नियम देशभरात एकसारखेच का लागू करण्यात येऊ नयेत, असाही एक मतप्रवाह निर्माण झाला आहे.

rasika.mulye@expressindia.com

लोकसत्ता Mon, 03 January 2022 https://epaper.loksatta.com/c/65360377

---

# विद्यापीठ कायद्यातील बदलांबाबत गैरसमज

**मुंबई, दि. २ -** हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहात मंजूर झालेले महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, सुधारणा विधेयक संदर्भात गैरसमज पसरवला जात आहे. या कायद्यात सुधारणा करताना राज्यपालांचे कुठल्याही प्रकारचे अधिकार कमी केलेले नाहीत. शिवाय, इतर सर्व राज्यांचा कुलगुरू निवडीचा कायदा विचारात घेऊन राज्यातील कायद्यामध्ये बदल केले आहे, असे उच्च तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारणा कायद्यात नेमका काय बदल करण्यात आला आहे? आणि नेमके राज्यपालांना आणि प्र-कुलपती म्हणून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना काय अधिकार आहेत? त्याची माहिती त्यांनी आज पत्रकार परिषद घेत दिली.

**राज्यपालांच्या कोणत्याही अधिकारांवर गदा नाही**



उदय सामंत म्हणाले, प्र-कुलपती म्हटल्यानंतर तो राजकारणाचा अड्डा होईल, तिथे राजकीय काहीतरी घडामोडी घडतील, कुलगुरू पक्षांचे असतील. एक गोष्ट समजून घेतली पाहिजे, कुलगुरूंच्या नियुक्तीला शिक्षणाचे बंधन आहे. हे बंधनं का आहेत हे सुद्धा मी तुम्हाला सांगणार आहे, पण राजकीय अड्डा कसा असतो हे देखील मी सांगणार आहे. ज्या पद्धतीने हा कायदा सुधारण्यासाठी सुखदेव थोरात समिती ही स्थापन केली गेली त्यातून काही निर्णय झाले. तो अहवाल आम्ही विधानभवनामध्ये आला, त्याला विरोध केला गेला.

हा कायदा आल्यामुळे अनेक लोकांना दु:ख झाले आहे. अनेकांच्या अस्तित्वाची लढाई झालेली आहे. प्र-कुलपती हे महाराष्ट्रात आधीपासूनच आहेत.

महाराष्ट्राच्या आरोग्यमंत्र्यांना आरोग्य विद्यापीठाचे प्र-कुलपती असे म्हटले जाते. कृषी मंत्र्यांना कृषी विद्यापीठाचे प्र-कुलपती असे म्हटले जाते. हा कायदा नव्याने आणलेला नाही. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे कुलपती केरळ, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशमध्ये देखील आहेत. प्रत्येक सरकारची प्र-कुलपती नेमण्याची भूमिका वेगवेगळी असते, असेही त्यांनी सांगितले.

प्रभात Mon, 03 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65359832

---

**लोकमत**

# महाविद्यालयांबाबत दोन दिवसांत निर्णय घेणार

## सामंत : गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये सुरू ठेवायची की ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय निवडायचा याबाबत येत्या दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी दिली.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांबाबत निर्णय घेण्यासाठी अलीकडेच कुलगुरूंसोबत बैठक झाली. मात्र, यात कोणता निर्णय होऊ शकला नाही. दोन दिवसांत विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि कुलगुरूंची बैठक घेतली जाईल. यात महाविद्यालये सुरू ठेवायची की नाही याचा निर्णय घेतला जाईल, असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. विद्यार्थी आणि पालकांच्या आरोग्याला आमची प्राथमिकता आहे. दोन दिवसांत बैठक घेऊन चर्चा करू. त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आपत्ती व्यवस्थापन विभाग, आरोग्य विभागाशी चर्चा करून महाविद्यालयांबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यापीठ कायद्यातील सुधारणेवरून सुरू असलेल्या वादंगावर मंत्री सामंत यांनी यावेळी नाराजी व्यक्त केली. कुलगुरू हे पक्षाचे असतील असा आरोप चुकीचा आहे, असे सामंत म्हणाले.

Pune Main
Page No. 2 Jan 03, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# महाविद्यालयांबाबत आज निर्णय

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४ -** करोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महाविद्यालये सुरू की बंद, याबाबतचा निर्णयबुधवारी (दि.५) सायंकाळी ४ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी ट्विटद्वारे माहिती दिली.

सामंत यांची राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंसह सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, कुलगुरू यांच्यासह ऑनलाइन बैठक मंगळवारी झाली. यात करोनाच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्याचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, कर्मचारी यांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा झाली.

गेल्या काही दिवसांपासून करोना बाधितांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनात आले आहे. तसेच ओमायक्रॉनची लागण झालेल्यांचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे शहरातील पहिली ते नववीचे वर्ग ३० जानेवारीपर्यंत बंद करून ऑनलाइन पद्धतीने शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रभात Wed, 05 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65405775

### आज निर्णय : सत्र परीक्षा ऑनलाइन

# राज्यातील महाविद्यालयेही बंद?

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने राज्यातील शाळांपाठोपाठ महाविद्यालयेही बंद करण्याबाबत कुलगुरू आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मंगळवारच्या बैठकीत मतैक्य झाले. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळाल्यावर बुधवारी घोषणा केली जाईल. त्यामुळे सत्र परीक्षा ऑनलाइन घेण्यात येणार आहे.

करोना रुग्ण वाढल्याने मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुण्यातील शाळा ३१ जानेवारीपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. करोना प्रसारानुसार, अन्य शहरांमधील शाळाही टप्प्याटप्प्याने बंद केल्या जातील. महाविद्यालयेही बंद करण्याची मागणी पालकांकडून करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठांचे कुलगुरू आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. करोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येमुळे (पान २ वर)

### राज्यात मोठी रुग्णवाढ, १८, ४६६ नवे बाधित

मुंबई : राज्यात करोना रुग्णसंख्येत मंगळवारी मोठी वाढ नोंदविण्यात आली. दिवसभरात करोनाचे १८,४६६ नवे रुग्ण आढळले, तर ७५ ओमायक्रॉनच्या रुग्णांची नोंद झाली. नवीन रुग्णांपैकी मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या हद्दीत १५ हजार रुग्णांची भर पडली. राज्यातील उपचाराधीन रुग्णांची संख्या ६६, ३०८ झाली आहे. राज्यात आतापर्यंत ओमायक्रॉनच्या रुग्णांची संख्या ६५३ झाली. गेल्या २४ तासांत मुंबईत १०,६०६, ठाणे शहर १३५४, कल्याण-डोंबिवली ४५७, उल्हासनगर ५३, मीरा भाईंदर ४५५, पालघर ७६, वसई-विरार ४५०,रायगड २१४, नाशिक ५१, नाशिक शहर २५७, पुणे १९८, पुणे शहर १११३, पिंपरी-चिंचवड ३३८, सातारा ८९ नवे रुग्ण आढळले.



"जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, कुलगुरु यांची बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. कुलगुरूंनी त्यांच्या अडचणी मांडल्या. महाविद्यालये बंद करण्याबाबत अजून निर्णय झालेला नाही. बुधवारी मुख्य सचिवांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.
- उदय सामंत, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री

### आज आढावा बैठक

मुंबई : राज्यात करोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता संपूर्ण राज्यभरासाठी एकच नियमावली असावी. त्यासाठी बुधवारी मंत्रालयात बैठक होणार आहे. या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना माहिती देऊन त्यांच्या मान्यतेनंतर संपूर्ण राज्यासाठीचे नियम जाहीर केले जाणार आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी दिली.

लोकसत्ता Wed, 05 January 2022 https://epaper.loksatta.com/c/65398328

### राज्यातील महाविद्यालयेही बंद?

(पान १ वरून)

महाविद्यालये बंद करावी व ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यावर सर्वांचे एकमत झाले. बुधवारी या संदर्भात अधिकृत घोषणा केली जाईल, असे सामंत यांनी जाहीर केले. सुमारे दीड वर्षांनंतर राज्यातील महाविद्यालये २३ ऑक्टोबरपासून सुरू झाली होती. परंतु, रुग्णसंख्या वाढल्याने महाविद्यालये पुन्हा बंद करण्याशिवाय पर्याय नसल्याचे वरिष्ठांचे म्हणणे आहे. सध्या तरी या महिनाअखेर महाविद्यालये बंद ठेवली जातील. रुग्णसंख्या लक्षात घेता पुढे निर्णय घेतला जाईल. सत्र परीक्षा ऑनलाइन घेण्यावरही बैठकीत चर्चा झाली.

लोकसत्ता Wed, https

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# विद्यापीठाच्या कुलगुरूंची निवड प्रक्रिया सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाळ मेमध्ये संपत असल्याने नव्या कुलगुरूंच्या निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी राज्यपाल कार्यालयाने विद्यापीठाला पत्र पाठवून राष्ट्रीय स्तरावरील व्यक्तीचे नाव सुचवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

राज्य शासनाकडून नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेधनामध्ये विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयक पारित करण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांचे प्र कुलपतीचे पद आणि कुलगुरू निवड प्रक्रिया यातील हस्तक्षेप आदी मुद्द्यांवरून या सुधारणांना विरोध होत आहे. विद्यापीठांमध्ये राजकीय आणि सरकारी हस्तक्षेप नको अशी भूमिका सातत्याने मांडली जात आहे. मात्र राज्यपालांनी या विधेयकाला मान्यता दिल्याशिवाय या सुधारणा विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणार नाही. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या विद्यापीठ कायद्यानुसार कुलगुरू निवड प्रक्रिया राबवली



जाईल.

विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार विद्यमान कुलगुरूंच कार्यकाल संपण्यापूर्वी नव्य कुलगुरूंच्या निवडीची प्रक्रिया सुरु करण्याबाबत राज्यपाल कार्यालयान कार्यवाही सुरू केली आहे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषदेच्या सदस्यांच १० जानेवारीला बैठक होणार आहे त्यात राज्यपाल कार्यालयाच्य सूचनेनुसार चर्चा करून राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तीचे नाव सुचवण्यात येईल. त्यामुळ विद्यापीठाकडून कोणाचे नाव सुचवले जाणार याबाबत उत्सुकत आहे.

लोकसत्ता
Wed, 05 January 2022
https://epaper.loksatta.com/c/6

सामना

# विद्यापीठ, महाविद्यालयांचेही शिक्षण ऑनलाइन?

## ▮ वसतिगृहावर मर्यादा
## ▮ कुलगुरूंच्या बैठकीतील सूर

मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) – राज्यात कोरोना रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याने राज्यातील विद्यापीठे, त्याअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांतील शिक्षण हे ऑनलाइन सुरू करावे तसेच वसतिगृहेही बंद करून त्यावर मर्यादा आणल्या जाव्यात असा सूर आज राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या बैठकीतून आला.

### महाविद्यालयांबाबत आज निर्णय

बैठकीनंतर उदय सामंत यांनी प्रत्येक जिल्ह्याचा आढावा घेत यासंदर्भात बुधवार ५ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता आपला निर्णय जाहीर करणार असल्याचे स्पष्ट केले. यासाठीची माहिती सामंत यांनी एक ट्विट करून दिली.

मुंबई, पुणे आदी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात कोरोनाचे रुग्ण वाढत असून तातडीने पदवी महाविद्यालयांतील शिक्षण ऑनलाइन पद्धतीने सुरू केले जाईल. काही विद्यापीठांच्या हिवाळी अणि इतर सत्राच्या परीक्षा सुरू आहेत, त्यालाही इतर पर्याय देण्याचे आदेश होण्याची शक्यता आहे. मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या तसेच उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व वसतिगृहावरही निर्बंध घातले जाण्याची शक्यता अधिकारी सूत्रांकडून वर्तवली जात आहे.

Pune Edition
Jan 5, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# 'नवे शैक्षणिक धोरण महात्मा गांधींच्या 'नई तालीम'सारखे'

लोकसत्ता प्रतिनिधी

**वर्धा :** देशाचे नवे शैक्षणिक धोरण हे महात्मा गांधी यांच्या 'नई तालीम'सारखेच आहे, असे मत उपराष्ट्रपती एम. व्यंकय्या नायडू यांनी व्यक्त केले. मातृभाषेच्या संदर्भात ते विशेष लागू पडत असल्याचेही त्यांनी सांगितले.

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या रौप्यमहोत्सवी समारोहात आभासी पद्धतीने उपराष्ट्रपती बोलत होते. याच सोहळयात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण तसेच अटलबिहारी वाजपेयी भवन व चंद्रशेखर आझाद वसतिगृहाचे लोकार्पणही केले.

शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने उपराष्ट्रपती नायडू म्हणाले, १९३७ ला वर्धेतच महात्मा गांधी यांनी नई तालीमचा प्रस्ताव मांडला होता. त्यात अनिवार्य मोफत शिक्षण तसेच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असण्यावर भर दिला होता. कौशल्य प्रशिक्षण देण्याचे सूचित केले होते.

या विद्यापीठाने नई तालीमवर केलेले अध्ययन नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरू शकते. महात्मा गांधी यांनी भाषेचा प्रश्न हा देशाच्या एकतेचा प्रश्न असल्याचे म्हटले होते. त्या दृष्टीने हिंदी भाषेला सामान्य जनतेसाठी सुलभ करण्याचा आग्रह त्यांनी धरला होता.

हिंदीप्रति आग्रही असूनही महात्मा गांधी मातृभाषेच्या उपयोगाबाबत संवेदनशील होते. कोणतीही भाषा जनतेवर थोपवण्याच्या ते विरोधात होते. सभ्य समाजाची भाषा सौम्य, सुसंस्कृत व सृजनशील असणे अपेक्षित असल्याचे उपराष्ट्रपती म्हणाले. डॉ. आंबेडकर शिक्षण व समतेसाठी कटिबद्ध राहिले. त्यांची ही प्रतिमा शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणास्तंभ ठरेल, असे सांगत उपराष्ट्रपतींनी आपल्या भाषणातून अटलबिहारी वाजपेयी तसेच चंद्रशेखर आझाद यांच्या कार्यालाही उजाळा दिला.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आभासी संबोधनातून हिंदी विद्यापीठाच्या कार्याचा गौरव केला. उपराष्ट्रपती यांचे स्वागत कुलपती रजनीश कुमार यांनी केले.



उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू यांनी हैदराबाद येथून वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी समारोहात बोधचिन्हाचे अनावरण दूरदृष्य पद्धतीने केले.

लोकसत्ता Wed, 05 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65401383

---

'TEACH COURSES ON DEMAND'

# UGC's letter to universities draws criticism

EXPRESS NEWS SERVICE
NEW DELHI, JANUARY 4

THE UNIVERSITY Grants Commission (UGC) has written to central universities citing the Union government's instructions that courses should be taught based on demand from students, drawing criticism from a teachers' body that it will lead to job losses and weaken language and social science departments.

In its communicationto the universities dated December 28, 2021, UGC said that the Ministry of Education, on November 30, wrote to it conveying its observation that some departments have been started in central universities "without any assessment of the number of students interested in such courses".

"Therefore, it is requested that you may conduct the courses based on the demand of the students and the number of students attending a particular course and do a rationalization of all Departments within the sanctioned number of students and teaching staff aligned with the number of students enrolled in such courses," the UGC wrote to the registrars of all central universities on December 28.

In a statement on Tuesday, the Delhi University Democratic Teachers' Front (DTF) criticised the move, saying the government should not be guided by job prospects only while deciding on such matters.

"This UGC advice will not only see small language and some social science Departments closing down across universities and colleges and loss of jobs for teachers and scholars but also truncate growth of research in these areas. It will weaken these subjects at the school level too. This exposes the farcical NEP (National Education Policy, 2020) propaganda that it emphasizes on languages and diversity," the teachers' front said.

The UGC, in its communication to the registrars, also cited a May 26, 2020, note of the Department of Higher Education in which the Centre had set norms on the number of departments that can be opened in a central university in the initial five years of their operations, keeping in mind the number of potential students expected.

Referring to that guideline, a UGC official said on the condition of anonymity that the apprehensions over the latest UGC communication are "misplaced" as it is a reiteration of existing guidelines that universities should launch courses and departments after a thorough assessment of demand.

"The universities should promote any course they want to launch and raise awareness among students. But there may be a case where there are very few or no takers for a course even after attempts by a particular university to promote it. Going ahead with the launch of that course or department in such a situation cannot be encouraged considering the UGC funds them. The letter makes it clear that some universities launched departments without following the laid down norms," a senior official said on Tuesday.

The official also rejected the allegation that the UGC's directive will disproportionately hit language and social science departments.

"The demand for high quality liberal arts education has not reduced. But the policies also need to be attuned to the 21st century marketplace of ideas," the official added.

Meanwhile, the DTF has also expressed fear that the decision to rationalise will disproportionately hit ad-hoc teachers. "Any such move is unacceptable especially in DU, where 4,500 teachers have been working on an ad hoc basis for the last several years," it said.

The Indian Express 5.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

### विद्यापीठात 'अश्वगंधा' संशोधन प्रकल्प

**नागरिकांना सहभागी होण्याची संधी**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे**, दि. ५ - 'अश्वगंधा' या औषधी वनस्पतीची करोना लसीकरणानंतरची उपयुक्तता सिद्ध करण्यासाठी सुरू असणाऱ्या आयुष मंत्रालयाच्या संशोधनात सामान्य नागरिकांना सहभागी होण्याची संधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे.

करोना प्रतिबंधासाठी लस घेतल्यानंतर अश्वगंधा वापरल्यास प्रतिकारशक्ती वाढण्यास किती मदत होऊ शकेल आणि त्याचे काय सकारात्मक परिणाम होतील हे तपासण्यासाठी आयुष मंत्रालयाकडून हे संशोधन सुरू आहे. या प्रकल्पाची संकल्पना आयुष मंत्रालयातील राष्ट्रीय संशोधक प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांची आहे. डॉ. अरविंद चोप्रा या अभ्यासाचे प्रमुख आहेत, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत दुधगावकर, आरोग्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गिरीश टिल्लू तसेच संशोधक विद्यार्थी या प्रकल्पासाठी काम करीत आहेत. या संशोधन प्रकल्पाचे पुण्यातील केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आहे.

विद्यापीठात केवळ चाकोरीबद्ध अभ्यासक्रम देण्याऐवजी समाजातील मूळ प्रश्नांवर काम करण्याची संधी विद्यार्थी, प्राध्यापकांना उपलब्ध झाली आहे, असे प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी यांनी सांगितले.

**सहभागी होण्यासाठी काय करावे?**

१८ ते ४५ वयोगटातील व्यक्तींनी लशीचा पहिला किंवा दुसरा डोस घेतल्यानंतर ७ दिवसांच्या आत विद्यापीठातील आरोग्य केंद्रास भेट द्यायची आहे. तिथे त्यांना या संशोधनबाबतची संपूर्ण माहिती समजावून सांगितली जाईल. सहभागी होण्यास अनुमती दिलेल्या नागरिकांची आरोग्य तपासणी केली जाईल आणि त्यांना अश्वगंधाच्या गोळ्या दिल्या जातील. त्या गोळ्यांचे सेवन नियमितपणे करणे अपेक्षित आहे. ठराविक कालानंतर पुन्हा तपासणी केली जाईल. यासाठी सर्व खर्च केंद्राकडून दिला जाईल, असेही डॉ. गिरीश टिल्लू यांनी सांगितले.

"आयुर्वेदिक औषधींची उपयुक्तता पटवून देण्यासाठी व त्यांचा अधिक प्रचार, प्रसार होण्याच्या दृष्टिकोनातून अशाप्रकारचे देशपातळीवरील संशोधन प्रकल्प हे आयुष मंत्रालयाने हाती घेतले आहेत. अश्वगंधाबाबतचे शास्त्रशुद्ध संशोधन हा त्याचाच एक भाग आहे. अधिकाधिक नागरिकांनी या संशोधनात सहभागी होऊन आयुर्वेदाला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावेत.

- **डॉ. भूषण पटवर्धन,** राष्ट्रीय संशोधक प्राध्यापक, आयुष मंत्रालय

प्रभात Thu, 06 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65430650

### राज्यातील महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद

**मुंबई**, दि. ५ - करोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येमुळे शाळांपाठोपाठ आता राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठ, महाविद्यालयेही १५ फेब्रुवारीपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. मात्र, विद्यापीठ, महाविद्यालयातील परीक्षा या १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा निर्णय सर्व अभिमत, खासगी विद्यापीठांनासुद्धा लागू होणार आहे.

राज्यातील महाविद्यालयांसंदर्भात सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, कुलगुरू यांच्यासमवेत उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री

**ऑनलाइन परीक्षा घेण्याची मुभा**

त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

उदय सामंत म्हणाले, राज्यातील फक्त अकृषी विद्यापीठ नव्हे, तर इतर खासगी विद्यापीठांनासुद्धा हा निर्णय लागू राहणार आहे. सर्व विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय काल मान्य केला आहे. परीक्षांमध्ये अडचणी येत असतील तर महाविद्यालयांनी, विद्यापीठांनी हेल्पलाइन नंबर देण्याचा सूचना दिल्या आहेत. महाविद्यालयासोबत वसतिगृहदेखील बंद

प्रभात Thu, 06 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65419748

### अकरावी 'सीईटी'चे शुल्क परत मिळणार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता अकरावीसाठी घेण्यात येणारी 'सीईटी' रद्द करण्यात आली आहे. यामुळे राज्य मंडळाच्या व्यतिरिक्त अन्य मंडळांच्या विद्यार्थ्यांना शुल्क परवाता मिळणार आहे.

करोनामुळे दहावीची परीक्षा रद्द झाली होती. अंतर्गत मूल्यमापनाद्वारे निकाल जाहीर झाला. त्यानंतर अकरावी प्रवेशासाठी परीक्षा घेण्याचा निर्णय झाला होता. राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांनी पूर्वीच दहावीच्या परीक्षेसाठी शुल्क भरल्यामुळे स्वतंत्र शुल्क घेण्यात आले नव्हते. राज्य मंडळाव्यतिरिक्तच्या विद्यार्थ्यांकडून मात्र प्रत्येकी १७८ रुपये शुल्क घेण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थी, पालकांनी शुल्क परत मिळावे यासाठी मागणी केली होती. संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परत देण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागवले होते. राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर २ हजार ७५२ विद्यार्थ्यांनी आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक कार्यालयाच्या अकरावी प्रवेशासाठी निश्चित केलेल्या संकेतस्थळावर ४१ हजार ५८२ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते.

प्रभात Thu, 06 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/6542466

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

लोकमत

# कायदा दुरुस्तीमुळे विद्यापीठाची स्वायत्तता संपुष्टात

राज्य शासनाने महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात केलेल्या दुरुस्त्या म्हणजे विद्यापीठ प्रशासनावर सत्तेच्या माध्यमातून राजकीय नियंत्रण आणण्याचा प्रयत्न आहे. विद्यापीठे राजकारणाची केंद्रे बनावीत, विद्यापीठाची शैक्षणिक ,आर्थिक ,प्रशासकीय स्वायत्तता संपुष्टात आणावी व विद्यापीठावर सत्ताधारी राजकीय पक्षाचा शिक्षण मंत्र्यांच्या माध्यमातून अंकुश ठेवण्याच्या हेतूनेच कायद्यात बदल केले जात आहेत. विद्यमान सत्ताधारी व राज्यपाल याच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ कायद्यातील राज्यपालांचे अधिकार नियंत्रित करण्याचा प्रयत्न हे सरकार या कायदा बदलाच्या माध्यमातून करत आहे.

कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, विविध संचालक, अधिष्ठाता ही विविध पदे भरण्याचा पूर्ण अधिकार राज्य शासनाकडे देण्याची तरतूद केली जात आहे. त्यासाठी प्र-कुलपती हे पद निर्माण करून ते पद शिक्षण मंत्र्यांना पदसिध्द देण्यात आले आहे. पर्यायाने कुलगुरु ते अधिष्ठाता या पदांवरील व्यक्ती प्र-कुलापतींच्या नियंत्रणाखाली आल्या आहेत. विद्यापीठातले सर्व ज्येष्ठ अधिकारी राजकीय नेतृत्वाच्या आदेशाला बांधले गेले आहेत.त्यामुळे शिक्षण मंत्र्यांच्या पुढे त्यांना बोलता येणार नाही.

व्यवस्थापन परिषदेतील राज्यपाल नियुक्त सदस्यास अन्य सर्व अधिकार मंडळात सदस्यत्व देऊन विद्यापीठात कुलगुरुंना समांतर अधिकार स्थान निर्माण केले आहे. हा कायद्यातील बदल कुलगुरुंना विद्यापीठ प्रशासनात निष्प्रभ करणारा व विद्यापीठ कारभारावर शासनाचे दैनंदिन नियंत्रण लादणारा आहे. त्यामुळे विद्यापीठातील सर्व अधिकार मंडळे नामधारी होणार आहेत, असे सातत्याने जाणवते.

विद्यापीठांच्या अधिसभेचे अध्यक्ष आता प्र-कुलपती असणार आहेत. त्यामुळे अधिसभेचे कामकाज शिक्षण मंत्री चालवणार आहेत. परिणामी अधिसभेत कुलगुरुंना नगण्य स्थान राहील. अधिसभेत प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालय व्यवस्थापन प्रतिनिधी शिक्षण मंत्र्यांच्या विरोधात हितसंबध गुंतले असल्यामुळे बोलणार नाहीत. एकूणच मंत्र्यांच्या मर्जीवरच विद्यापीठाचे कामकाज चालावे यासाठीच विद्यापीठ कायद्यातील हा बदल आहे. सध्या सत्तेत असलेली शिवसेना मागील युती सरकारमध्ये सत्तेत असताना २०१६ मध्ये विद्यापीठ कायदा बदल झाला होता. सर्व पक्षीय मान्यतेने झालेला कायदा बदल ५ वर्षात पुन्हा करण्याची गरज काय? याचे शासनाकडे समर्पक उत्तर नाही. खरे तर विद्यापीठ परीक्षा हा कोरोना काळात एक आव्हानात्मक प्रश्न झाला आहे. शिक्षण हा विषय केंद्र व राज्य सरकार यांच्या सामायिक यादीतील आहे. केंद्र सरकारने नुकतेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. त्या धोरणानुसार संबधित विद्यापीठ कायद्यात बदल करावे लागणार आहेत,असे असताना राज्य शासनाने विद्यापीठ कायद्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विसंगत बदल का केले. या प्रश्नाचे शासनाकडे उत्तर नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून होणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीत अडथळे आणण्यासाठी या कायद्यात बदल केला, असे म्हणण्यास पूर्ण वाव आहे. एकूण विद्यापीठ कायद्यातील बदल विद्यापीठांना पक्षीय राजकारणाची केंद्र बनवणारा व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस विरोधाची पूर्वतयारी करणारा आहे,असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.



**धनंजय कुलकर्णी**
माजी अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Hello Pune
Page No. 6 Jan 06, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# राज्यातील महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद

## उदय सामंत यांची माहिती; परीक्षाही ऑनलाइन होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता राज्यातील सर्व महाविद्यालये आता १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहेत. ऑनलाईन पद्धतीने शिक्षण सुरू ठेवून परीक्षाही ऑनलाईनच घेतल्या जाणार आहेत. याशिवाय शाळांमधील बाधित विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने औरंगाबाद शहर, रायगड जिल्ह्यातील शाळा बंद करण्यात आल्या आहेत. नागपूर शहर आणि हिंगणा, कामठी, कळमेश्वर सावनेर तालुक्यांमधील शाळाही बंद राहणार आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू, विभागाचे प्रधान सचिव, तंत्रशिक्षण संचालक, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांची ऑनलाईन बैठक घेतली होती. या बैठकीत जिल्हावार कोविड परिस्थिती काय आहे? किती परीक्षा झाल्या आहेत आणि किती परीक्षा बाकी आहेत? वसतिगृहांची काय परिस्थिती आहे? या सगळ्या बाबींची माहिती घेऊन आढावा घेण्यात आला होता. त्यानंतर बुधवारी १५ फेब्रुवारीपर्यंत महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय सामंत यांनी जाहीर केला.

ऑनलाईन शिक्षणादरम्यान विजेची समस्या, कोरोना संदर्भातील अडचणी, नेटवर्कची अडचण अशा कारणांमुळे जर विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देऊ शकले नाहीत तर त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, याची खबरदारी आणि जबावदारी विद्यापीठांची असेल, असेही विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. गोंडवाना, नांदेड, जळगावसारख्या ठिकाणी नेटवर्कची समस्या असल्याने तेथे कुलगुरूंनी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधत स्थानिक पातळीवर नियोजन करून ऑफलाईन परीक्षा कशा घेता येतील याचा निर्णय घ्यावा, अशा सूचना सामंत यांनी दिल्या आहेत.

### विद्यार्थी, प्राध्यापकांचे लसीकरण आवश्यक

ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण बाकी आहे. त्यांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना देऊन त्यांचे लसीकरण करून घेण्याच्या सूचनाही महाविद्यालये आणि विद्यापीठांना दिल्या आहेत.



शालेय शिक्षण विभागाच्या काही परीक्षा या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या कला संचालनालयाच्या अखत्यारित येतात. त्यामुळे कला शिक्षण संचालनालयाला त्या परीक्षा ऑनलाईन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

\- उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

### शिक्षक व कर्मचाऱ्यांची ५० टक्के उपस्थिती

- विद्यार्थ्यांप्रमाणेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १०० टक्के लसीकरण करून घेण्याची सक्ती महाविद्यालये आणि विद्यापीठांना असणार आहे.
- सोबतच महाविद्यालये आणि विद्यापीठातील उपस्थिती ही ५० टक्केप्रमाणे आणि चक्राकार (रोटेशन) पद्धतीने असावी, असेही निर्णयात नमूद केले आहे.
- विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्रशासकीय कामांसाठी ५० टक्के उपस्थिती आवश्यक असणार आहे.
- ज्यामुळे विद्यार्थी आणि संस्थेची अडचण होणार नाही, हा त्यामागील उद्देश असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.



### वसतिगृहांना लागणार टाळे

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वकल्पना आणि पुरेसा वेळ देऊन वसतिगृहे बंद करण्याच्या सूचनाही दिल्या असून, त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, जे विद्यार्थी परदेशातून शिक्षण, संशोधनासाठी आले आहेत, त्यांची पूर्ण काळजी घेऊन त्यांना वसतिगृहात राहण्याची परवानगी मिळणार आहे.

Pune Main
Page No. 3 Jan 06, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# Maha shuts colleges till Feb 15, lectures & exams move online

**Hemali.Chhapia**
@timesgroup.com

**Mumbai:** With rising Covid cases, higher and technical education minister Uday Samant on Wednesday announced that college campuses across the state will be closed and teaching will be completely conducted online till February 15. The decision is applicable to all colleges and universities—public, private and deemed.

Students occupying hostels have been asked to return home, except foreigners who have been permitted to stay back and continue their education from hostel rooms. On Tuesday, Samant held a meeting with senior officials of the higher education department and all university vice-chancellors while officers of various district authorities apprised every one of the ground realities. The decision to take teaching online comes two days after the BMC asked schools in Mumbai to close campuses for classes 1-9.

Uma Kadam



The decision of closing is applicable to all colleges and universities—public, private and deemed

Keeping all that in mind, lectures and exams have been shifted to the online mode, the way they were being conducted last year during the previous Covid-19 waves. A government resolution to that effect will be out soon. The state government had ordered colleges to open gates to fully vaccinated students from October 13, 2021.

Faculty and staff need to be fully vaccinated and campuses have been asked to call 50% staff on a rotational basis, while the other half works from home. From past experience, it is clear that students face issues while taking exams from home. Samant has ordered that all universities direct colleges to run helplines to address students' grievances. Colleges must also provide detailed information to students regarding exam syllabi and model question papers.

"If students have network issues, or if electricity is lost, if any candidate has health problems or if s/he or someone in the family is Covid-positive, all universities and colleges must be sensitive towards these issues and ensure that the candidate does not lose a year. These rules are applicable to all colleges and universities in the state, private and deemed included," Samant said.

He added there are pockets under universities of Gondia, Jalgaon and Nanded where internet connectivity is particularly poor. "In such cases, the vice-chancellor of each of these universities must discuss the situation on the ground with the disaster control authority and the collectors and in conjunction take a call on how and when offline exams can be conducted." School students who are due to take intermediate art exam, will be able to do so online. "We have asked the directorate of art to conduct the exam online as school students get grace marks during admission to Class XI. We don't want them to miss out on that," added Samant.

The Times of India 6.1.2022

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

**अन्वयार्थ**

## स्वायत्ततेवर घाला



**देशातील केंद्रीय** विद्यापीठांनी केवळ नोकरी वा उद्योगधंद्यास उपयोगी पडतील, असेच अभ्यासक्रम सुरू ठेवावेत, असा फतवा विद्यापीठ अनुदान मंडळाने (यूजीसी) काढला असून, त्यामुळे आधीच क्षीण असलेल्या अनेक विद्याशाखांना मृतप्राय व्हावे लागणार आहे. मंडळाने ज्यांच्याकडे अधिक विद्यार्थी आकृष्ट होतील, असेच अभ्यासक्रम सुरू करण्यासंबंधीचे परिपत्रक देशातील केंद्रीय विद्यापीठांच्या कुलसचिवांकडे धाडले आहे. अशा विद्यापीठांना त्यांच्या स्थापनेनंतरच्या पहिल्या पाच वर्षांत अधिक विद्यार्थी मिळणे आवश्यक आहे, असे यूजीसीचे म्हणणे दिसते. कालांतराने हाच निकष अन्य विद्यापीठांनाही लागू केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने ३० नोव्हेंबर रोजी पाठवलेल्या पत्रात असे निरीक्षण नोंदवले आहे, की केंद्रीय विद्यापीठांमध्ये काही विभागांची निर्मिती करताना, त्या विषयासाठी किती विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील, याबद्दल कोणताही विचार केलेला दिसत नाही. त्या पार्श्वभूमीवर यूजीसीने २८ डिसेंबर रोजी शिक्षणक्रमाचे विभाग सुरू करताना विद्यार्थी संख्या हा निकष अधोरेखित केला आहे. नव्याने अस्तित्वात आलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षणाचा हेतू विशद करताना देशाचे भावी नागरिक सुसंस्कृत आणि विचार करण्याची शक्ती असणारे असले पाहिजेत, असे म्हटले आहे. शिक्षणाची दिशा ठरवताना, या मुद्द्याचा विचार होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात कोणता अभ्यासक्रम नोकरी मिळवून देण्यास उपयोगी ठरेल, यावरच आजवर भर देण्यात आला. नीट आणि जेईई या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वर्षागणिक ज्या गतीने वाढते आहे, ते पाहिल्यास हे स्पष्ट होईल. भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये मूलभूत संशोधनासाठी वाव नसल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातून अनेकदा टीका होते. विशेष संशोधन करू इच्छिणाऱ्याला त्यासाठी पाश्चात्त्य विद्यापीठांमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. त्यामुळे संस्कृत, पाली यासह भारतीय भाषा, तत्त्वज्ञान, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, पुरातत्त्व यांसारख्या विषयांना फार मागणी नसते. त्यांच्या अभ्यासक्रमात सातत्याने कालानुरूप बदल होत नाहीत, हेही त्याचे कारण असू शकते. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसारच अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात यावी, असे यूजीसीचे म्हणणे आहे. भारतीय उच्च शिक्षण रोजगारकेंद्रित होण्याने या देशात शतकानुशतके होत आलेल्या मूलभूत संशोधनास खीळ बसण्याचीच शक्यता अधिक. दिल्ली विद्यापीठ डेमॉक्रेटिक टीचर्स फ्रंट या संघटनेने या फतव्यावर केलेली टीका म्हणूनच रास्त ठरते. अशा प्रकारे सक्ती झाल्यास अनेक विषयांचे विभागच बंद करावे लागतील व त्यामुळे अध्यापकीय क्षेत्रातील बेरोजगारी वाढेल, असे या संघटनेचे म्हणणे आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात सध्याच्या व्यवस्थेत विषयनिवडीबाबत असलेली ताठरता कमी करून हव्या त्या आवडीच्या विषयाचा अभ्यास करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे कौशल्य आणि आवड यांची सांगड घातली जाऊन शिक्षण हे जगण्यासाठीही उपयुक्त होणारे ठरू शकते, याचा अनुभव देशातील विद्यार्थ्यांना मिळू शकणार आहे. प्रत्यक्षात या धोरणाच्या विरुद्ध भूमिका यूजीसीकडून घेतली जात असेल, तर त्यास सर्व स्तरांतून विरोध व्हायला हवा. एकीकडे विद्यापीठांना स्वायत्तता देण्याची भाषा करायची आणि दुसरीकडे त्यांच्या सगळ्या निर्णयांत अधिक्षेप करायचा, हे शिक्षणाच्या मूळ हेतूशीच विसंगत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

लोकसत्ता Thu, 06 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65422750

---

**लोकमत**

## विद्यापीठाची पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रातील प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याच्या सूचना विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागातर्फे देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना येत्या १३ ते १७ जानेवारीपर्यंत संशोधन केंद्र बदलण्यास मुदत दिली असून प्रवेशाच्या मुलाखती येत्या ८ फेब्रुवारीपर्यंत घेण्याचे निर्देश दिले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी. प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात आली. त्यात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन प्रवेश दिला जाणार आहे. पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील सर्व संशोधन केंद्रातील प्रवेश प्रक्रिया आरक्षणाच्या कारणावरून रखडली होती. कोरोना, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 'काम बंद आंदोलन' आदी कारणांमुळे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यास विलंब झाला. मात्र, उशिरा का होईना विद्यापीठ प्रशासनाने पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे.

संशोधन केंद्रात सध्या कार्यरत असलेल्या मार्गदर्शकांकडील जागांचा तपशील संकेतस्थळावर दर्शविला आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत कार्यरत असलेले संशोधक विद्यार्थ्यांचे आरक्षण विचारात घेऊन टक्केवारीनुसार इतर प्रवर्गास आरक्षण निश्चित करून १० जानेवारीपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बीओडी लॉगिनमधून सादर करावे, असे विद्यापीठातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 07, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

लोकमत

# इंजिनिअरिंग मराठीत शिकवण्याची घाई का?

### अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम यंदा प्रथम वर्षासाठी मराठीतूनही सुरू करण्यात आला आहे. अतिउत्साहापोटी केलेली ही घाई नक्की नडेल!

डॉ. सुनील कुटे



अधिष्ठाता, क. का. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक

**मातृभाषेतून दिलेलं** शिक्षण अधिक प्रभावी ठरते याबद्दल जगातील सर्व शिक्षणतज्ज्ञांचे एकमत आहे. याला अनुसरून जपान, जर्मनी, फ्रान्स, युरोपातील अनेक देश, चीन व जगभरात सुनियोजितपणे पहिलीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. असे केल्याने ते देश प्रगतीत मागे पडले किंवा तेथील वर्ग ओस पडले असे घडलेले नाही. जगाच्या या अनुभवावरूनच आपल्याकडे अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'राष्ट्रीय शिक्षण धोरणात' मातृभाषेतून शिक्षण या संकल्पनेचा पुरस्कार केला आहे.

या धोरणाला प्रतिसाद देत राज्यातील १७१ तंत्रनिकेतनमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून प्रथम वर्षासाठी अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. सुरुवातीला इंग्रजी व मराठी भाषेतून हे अभ्यासक्रम शिकणे ऐच्छिक असेल व विद्यार्थ्यांना सैद्धांतिक विषयात, परीक्षेत इंग्रजी वा मराठीत उत्तरे लिहिण्याची मुभा असेल. त्यासाठी सैद्धांतिक विषयांच्या मराठी अभ्यास साहित्याची निर्मिती करण्यात आली आहे. अन्य अभ्यास साहित्याची निर्मिती संस्था स्तरावर करण्याचे निर्देश आहेत. अशाच प्रकारचा प्रयोग अभियांत्रिकी पदवी शिक्षणात करण्याचा मानस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) याआधीच व्यक्त केला आहे. त्याला मात्र राज्यात हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्या महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला आहे. आता १७१ तंत्रनिकेतनांमधून मराठी माध्यमात शिक्षण घेतल्यानंतर अभियांत्रिकी पदवी महाविद्यालयात थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतल्यावर या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमात पदवी अभ्यासक्रम शिकविणारी महाविद्यालयेच उपलब्ध नसतील तेव्हा त्यांनी काय करावे, असा गंभीर प्रश्न भविष्यात निर्माण होऊ शकतो.

शिक्षण क्षेत्रात कोणताही निर्णय घेताना पहिली ते पदवी असा एकात्मिक व सर्वांगीण विचार होणे आवश्यक असते. कोणत्याही टप्प्यावर स्वतंत्रपणे एकांगी विचार अमलात आणल्यास त्याचे परिणाम प्रदीर्घ काळ भोगावे लागतात. धोरणकर्त्यांची धोरणे प्रत्येक सत्ताबदलानंतर बदलत असतात. शिक्षणतज्ज्ञांनी प्रत्येक बदलाची तळी उचलली तर अनेक पिढ्यांचे अशा धरसोडीमुळे नुकसान होऊ शकते. विदेशात शिक्षणविषयक निर्णय प्रदीर्घ चिंतन व मंथन करून टप्प्याटप्प्याने सुनियोजित पद्धतीने अमलात आणले जातात, त्यामुळे ते यशस्वी होतात. आपल्याकडे नियोजन व अंमलबजावणीत उथळपणा, फाजील आत्मविश्वास व अती उत्साही प्रतिसाद यामुळे व्यवस्थाच कोलमडते.

अभियांत्रिकी शिक्षण मातृभाषेतून देण्याची संकल्पनाही अशीच कोलमडू नये म्हणून दुसऱ्या बाजूचाही विचार होणे आवश्यक आहे.

इंग्रजी या जागतिक ज्ञानभाषेतून शिक्षण घेतले नाही तर आपली मुले मागे पडतील या भावनेने इंग्रजी माध्यमात मुलांना शिक्षण देण्याची प्रबळ इच्छा पालकांमध्ये दिसते.



याला मराठी माध्यमात शिक्षण देणाऱ्या शाळांची उदासीनता, भाषेकडे होणारे अक्षम्य दुर्लक्षही कारणीभूत आहे. यामुळेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या बेसुमार वाढून मराठी शाळांना मुले मिळेनाशी झाली. काही ठिकाणी मराठी शाळा प्रवेशाअभावी बंद पडल्या, काही ठिकाणी बंद पाडल्या गेल्या, तर काही ठिकाणी 'सेमी इंग्लिश'चा मधला मार्ग स्वीकारून अनुदानावर 'जगवल्या' गेल्या; पण इंग्रजी माध्यमांचे आकर्षण कमी झाले नाही.

मराठी माध्यमाच्या शाळा सशक्तपणे चालविणे, तेथे शिकविण्यात येणाऱ्या इंग्रजी भाषेत विद्यार्थी निपुण कसे बनतील यावर लक्ष केंद्रित करणे, भाषा विषयाकडे होणारे दुर्लक्ष थांबविणे, यासाठी तेथे पैसे देऊन टीईटी परीक्षा पास झालेले शिक्षक न नेमणे यासारखे प्रयत्न होताना दिसत नाहीत. मराठी विषय इंग्रजी माध्यमात शिकविला नाही तर अनुदान बंद करू, अशी धमकी शासन इंग्रजी शाळांना देते. याचा अंतिम परिणाम म्हणजे मराठी शाळांतील विद्यार्थ्यांचे इंग्रजी कच्चे व इंग्रजी शाळांतील विद्यार्थ्यांचे मराठी कच्चे. दोन्ही माध्यमात मुळातच भाषा, समाजशास्त्र, आदी विषयांकडे दुर्लक्ष झाल्याने मातृभाषेत शिक्षण द्या किंवा इंग्रजीत द्या, विद्यार्थी सुमार दर्जा घेऊन भरमसाट गुणांनी उत्तीर्ण होणार. दहावीच्या निकालाला आलेली सूज व त्या विद्यार्थ्यांना साधे लिहिता, वाचता न येणे या बाबी याचेच द्योतक आहेत. आपल्याला इंग्रजी भाषेवर प्रभुत्व हवे होते, आपण त्यासाठी इंग्रजी माध्यमात मुलांना डांबले. भाषेवरील प्रभुत्व व माध्यमाची निवड या पूर्णत: भिन्न बाबी आहेत. याची गल्लत झाल्याने ना मुलांचे भाषेवरील प्रभुत्व वाढले, ना त्यांचा दर्जा. यामुळे दोन्ही माध्यमात शिकलेले विद्यार्थी नित्कृष्ट दर्जाचे! त्यांचे शिक्षकही तसेच!! अर्थात सन्माननीय अपवाद सोडून!

दहावीपर्यंत इंग्रजी माध्यमात शिकलेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षण एकदम मराठीत घेणे अवघड होईल. ज्यांनी स्वत:च मराठी भाषेत अभियांत्रिकी शिक्षण घेतलेले नाही असे शिक्षक मराठी भाषेत कितपत समर्थपणे अभ्यास साहित्य निर्मिती करू शकतील व शिकवू शकतील याबद्दलही शंकाच आहे. शिवाय अभ्यास साहित्य निर्मिती फक्त सैद्धांतिक विषयांपुरती ठेवून इतर विषय संस्था पातळीवर सोपविण्यात येण्यात एकजिनसीपणा व प्रमाणीकरणही होणार नाही. शिवाय मराठी माध्यमात शिकूनही मराठीवर प्रभुत्व नसलेल्या विद्यार्थ्यांनाही भविष्यात अडचण येऊ शकते. संगणक व तत्सम 'सॉफ्ट' विद्याशाखांना मराठी प्रतिशब्द शोधणेही जिकिरीचे आहे. ही दुसरी बाजू लक्षात घेता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिफारस असली तरी मराठी माध्यमाचे शालेय शिक्षण सशक्त करून शिक्षकांना मराठी माध्यमातील अभियांत्रिकी शिक्षण व प्रशिक्षण देऊन पुढील दहा वर्षांनंतर सुनियोजित पद्धतीने मराठीतून अभियांत्रिकी शिक्षणाचा श्रीगणेशा करावा, अन्यथा माध्यमाच्या गोंधळात अभियांत्रिकी क्षेत्राचे अपरिमित नुकसान करणारे अभियंते निर्माण होतील.

**■ यदु जोशी यांचे साप्ताहिक सदर काही अपरिहार्य कारणाने आज प्रसिद्ध होऊ शकले नाही.**

Pune Main
Page No. 6 Jan 07, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

पुढारी

# परीक्षा अर्ज भरण्यास विद्यार्थ्यांची अनास्था

## १५ जानेवारीपर्यंत मुदत; परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रशासनाची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची फेब्रुवारी महिन्यात होणारी सत्र परीत्रा ऑनलाइन घेण्यात येणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. परंतु, जवळपास ३० टक्के विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्जच परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे परीक्षांचे अर्ज भरण्यास विद्यार्थीच उत्सुक नसल्याचे चित्र आहे.**



येत्या १५ जानेवारीनंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यामुळे अर्ज भरण्याची प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

ओमायक्रॉनचे वाढते संकट पाहता महाविद्यालयीन परीक्षा ऑनलाइनच घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु, अद्याप शासनाकडून कोणत्याही लेखी सूचना पुणे विद्यापीठास प्राप्त झालेल्या नाहीत. या सूचना आल्यानंतरच परीक्षेची तयारी करण्यात येणार आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्पष्ट केले आहे.

**महाविद्यालयांनी अडवणूक करू नये...**

अभ्यासक्रमाचे शुल्क भरले नाही म्हणून अनेक महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची परीक्षा अर्जाची प्रक्रिया पूर्ण करताना अडवणूक केली जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची इच्छा असूनही त्यांना अर्ज भरण्यापासून रोखले जात आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अडवणूक न करता त्यांचे परीक्षा अर्ज भरावेत, अशी मागणी विद्यार्थी संघटनांकडून केली जात आहे. विद्यार्थ्यांची अडवणूक होत असेल, तर त्यांनी विद्यापीठाकडे संबंधित महाविद्यालयाची तक्रार करावी, अशा महाविद्यालयांविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विविध संघटनांनी दिला आहे.

> फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासून परीक्षेला प्रारंभ होणार आहे. त्यामुळे परीक्षा अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांनी येत्या १५ जानेवारीपर्यंत कोणत्याही परिस्थितीत अर्ज भरून पूर्ण करावेत, ज्यामुळे परीक्षा वेळेत आणि सुरळीत पार पडण्यास कोणतीही अडचण येणार नाही.
>
> - **डॉ. महेश काकडे**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य मार्गदर्शन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**रोटरी क्लब ऑफ युवा व सुपरमाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने दहावीच्या विद्यार्थी व पालकांसाठी सक्सेस मंत्रा या विनामूल्य ऑनलाइन मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती रोटरी युवाच्या अध्यक्षा तृप्ती नानल, अर्चिता मडके, श्रीकांत जोशी आणि दीपा बडवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

कोरोनाची परिस्थिती आणि दहावीचे वर्ष, यामुळे अनेक विद्यार्थी आणि पालकांवर दडपण आहे. अशावेळी त्यांना योग्य मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्याच्या उद्देशाने या सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दहावीच्या परीक्षेसाठी कमी वेळ उरला असून, या वेळात लिखाणाचा सराव, परीक्षेची चांगली तयारी कशी करावी, यासाठी महाराष्ट्रातील दहावीच्या विद्यार्थी व पालकांसाठी विनामूल्य मार्गदर्शन सत्र आयोजिले आहे. जानेवारी महिन्यातील ८ व १५ या दोन शनिवारी अशा दोन सत्रांत बोर्डातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.



**घरबसल्या सहभागी होता येणार**

सत्राचे उद्घाटन शनिवारी (८ जानेवारी) दुपारी ४ वाजता झूम वेबिनारद्वारे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्या हस्ते होणार असून, त्यानंतर गणित विषयाच्या एसएससी बोर्ड सदस्या डॉ. जयश्री अत्रे मार्गदर्शन करतील. ऑफलाइन बोर्ड परीक्षेचे स्वरूप, गणितातील टेक्निक्स, कृतिपत्रिका सोडविण्याबद्दल मार्गदर्शन व वेळेचे नियोजन आदींबाबत मार्गदर्शन केले जाईल.

My Pune Edition
Jan 7, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# Online proctored exams for SPPU students from Jan-end

## State Govt Circular On Guidelines Awaited

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University's examination department is preparing once again to conduct online proctored semester examinations which will start from January-end.

The board of exams is awaiting a government circular on the exam guidelines and based on the circular the criteria to conduct the examinations will be announced.

Start from January-end the exams for backlog will be conducted whereas the regular examinations will begin from mid-February, officials at the exam department have stated.

In wake of the rising cases of Covid, the state higher education minister Uday Samant on Wednesday announced that colleges will remain shut till February 15 and all the exams that had been scheduled will be conducted on online mode.

The October semester exams of the SPPU had been delayed and had been scheduled in the last week of January. The timetable of the exam will soon be announced, Mahesh Kakade, director of the board of examinations at SPPU, said.

Kakade said, "Although we are still awaiting for the government circular on the guidelines to be followed while conducting university exams, we have begun preparations for online question and answer papers in the same manner we had conducted previously. The exams will be conducted in a proctored manner with audio and video mode on."

Before the surge in cases and when the situation was still normal during the first week of December, the SPPU was considering offline exams for the final year students while the semesters for previous year was being considered to be consulted in online mode.

Students had shown discontent for offline exams as most of the year the classes were conducted in online mode so they had been demanding for an online examination. Kakade said, "There is a delay in conducting the regular semesters as the forms filled by engineering students are not up to date and without the complete we will not be able to conduct the exam."

### MINISTER'S ANNOUNCEMENT HOLDS

- The SPPU had also set up a committee of experts in December to examine the situation and recommend the mode of examination
- The drastic increase in the pass percentage in the online examinations conducted for the past two semesters have raised multiple questions about the quality and transparency of the examination SPPU officials were of the opinion that to keep the sanctity of the examination and the university's standing, it was important to conduct the examinations offline
- However, in the wake of the minister's announcement to hold the exam in the online mode the committee report may not be considered for conducting the exams



Panel to decide mode of SPPU's semester exam

TOI REPORT ON DECEMBER 18, 2021

The Times of India 7.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# ३० टक्के विद्यार्थ्यांचे अद्याप परीक्षा अर्जच नाहीत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोना बाधितांची संख्या वाढत असल्याने राज्य शासनाने महाविद्यालये-विद्यापीठे बंद करून ऑनलाइन पद्धतीने अध्यापन आणि परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार असल्याचे स्पष्ट झाले असून, जवळपास ३० टक्के विद्यार्थ्यांनी अद्याप परीक्षा अर्ज भरले नसल्याचे स्पष्ट झाले आहेत.

महाविद्यालये, विद्यापीठे सुरू झाल्याने विद्यापीठाकडून ऑफलाइन परीक्षांचा विचार करण्यात येत होता, तर अध्यापन ऑनलाइन झाल्याने परीक्षाही ऑनलाइनच घेण्याची विद्यार्थ्यांची मागणी होती. त्यामुळे परीक्षा पद्धत ठरवण्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी समिती नियुक्त केली. या समितीने अंतिम वर्ष आणि विषम सत्राच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने आणि अन्य वर्षांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याची शिफारस केली. मात्र गेल्या काही दिवसांत करोना बाधितांचे प्रमाण वाढू लागल्याने विद्यापीठाने सावधगिरीची भूमिका घेत शासनाच्या नव्या निर्बंधांची प्रतीक्षा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार राज्य शासनाने महाविद्यालये, विद्यापीठे बंद करून ऑनलाइन पद्धतीने परीक्षा, अध्यापन करण्याचे निर्देश दिले.

विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाकडून परीक्षा अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी १५ जानेवारीची मुदत देण्यात आली आहे. मात्र सुमारे ३० टक्के विद्यार्थ्यांनी अद्याप अर्जच भरलेले नाहीत. येत्या काही दिवसांत विद्यापीठाकडून परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.

### विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाइन

महाविद्यालये, विद्यापीठांतील ऑनलाइन शिक्षण परीक्षांबाबतचा शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला. परीक्षा व्यवस्थितरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना, प्रश्नसंच, हेल्पलाइन क्रमांकची माहिती उपलब्ध करून द्यावी. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी, शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी हेल्पलाइनची व्यवस्था करावी. परदेशी विद्यार्थी, प्रयोगशाळांमध्ये संशोधन करीत असलेले विद्यार्थी, पीएचडीचे विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्याची परवानगी देण्यात यावी. तसेच स्थानिक प्राधिकरणांना कोविड सेंटर म्हणून वसतिगृहांची आवश्यकता असल्यास ती उपलब्ध करून देण्यात यावीत. अद्याप लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना देऊन विशेष मोहीम राबवून लसीकरण पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. सार्वजनिक विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयीन शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के असावी. चक्राकार पद्धतीने त्यांच्या कार्यालयीन उपस्थिती, घरातून कामकाज करण्याचे नियोजन विद्यापीठाने करावे असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

> **परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाकडून परीक्षेच्या वेळापत्रकाचे काम सुरू आहे. मात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज वेळेत भरणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरून कायम करावेत.**
> **- डॉ.महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sat, 08 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65460881

# हेल्पलाइनद्वारे विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवा

- **महाविद्यालयांना राज्य शासनाचे निर्देश**
- **शिक्षण आणि परीक्षा ऑनलाइन होणार**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ७ -** करोनामुळे महाविद्यालयातील वर्ग व परीक्षाही ऑनलाइनद्वारे घेण्यात येणार आहे. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकाचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयांनी हेल्पलाइनची व्यवस्था करावी, असे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.

उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सर्व महाविद्यालयातील वर्ग १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन आणि परीक्षाही ऑनलाइन होतील, अशी घोषणा केली होती. त्याबाबतचा सविस्तर शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला. परीक्षा व्यवस्थितरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना, प्रश्नसंच, हेल्पलाइन क्रमांकची माहिती उपलब्ध करून द्यावी, असेही शासन निर्णयात नमूद करण्यात आले. आता वसतिगृहे बंद असतील. मात्र फक्त परदेशी विद्यार्थी, प्रयोगशाळांमध्ये संशोधन करीत असलेले विद्यार्थी, पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्याची परवानगी द्यावी. तसेच स्थानिक प्राधिकरणांना कोविड सेंटर म्हणून वसतिगृहांची आवश्यकता असल्यास ती उपलब्ध करावीत, असे आदेशात म्हटले आहे.

### परीक्षा अर्जासाठी दि.१५पर्यंत मुदत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. या परीक्षा फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू होतील. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना १५ जानेवारीपर्यंत अर्ज करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत विद्यार्थ्यांनी अर्ज करावे, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

### कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के

सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के करण्यात यावे. चक्राकार पद्धतीने त्यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत व वर्क फ्रॉम होत याबाबत विद्यापीठाने नियोजन करावे, असेही शासनाने म्हटले आहे.

प्रभात Sat, 08 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65469413

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

पुढारी

# राज्यात नाईट कर्फ्यू; शाळा, कॉलेज १५ फेब्रुवारीपर्यंत बंद

## दिवसा जमावबंदी; वाढत्या कोरोनामुळे आज मध्यरात्रीपासून कडक निर्बंध

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

राज्यात कोरोनाची तिसरी लाट आली आहे. तिला थोपविण्यासाठी राज्य सरकारने अपेक्षेप्रमाणे कठोर प्रतिबंध लागू केले आहेत. राज्यात आता दिवसा जमावबंदी, तर रात्री ११ ते पहाटे ५ या वेळेत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त रात्री कोणालाही फिरता येणार नाही. खासगी कार्यालयांनाही ५० टक्के कर्मचारी उपस्थितीची अट लागू करण्यात आली आहे. याशिवाय शाळा-महाविद्यालये बंद करण्यात आली आहेत. मॉल्स, जलतरण तलाव, केशकर्तनालये तसेच सार्वजनिक व खासगी कार्यक्रमांवरही बंधने आणण्यात आली आहेत. रविवारी मध्यरात्रीपासून हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

सोमवारपासून दिवसा पाच किंवा त्यापेक्षा अधिक लोकांचा जमाव करण्यास मनाई करण्यात आली आहे. शाळा-महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्यात आली आहेत. याशिवाय, मैदाने, उद्याने, पर्यटनस्थळांसह स्विमिंग पूल, जिम, स्पा पुढील पान ६ वर



आपल्याला कुठलाही लॉकडाऊन करून सगळे ठप्प करायचे नाही. प्रत्येकाने आता ही लढाई अंतिम आहे आणि हा शेवटचा घाव कोरोनावर करायचाच, अशा निश्चयाने आरोग्याचे नियम पाळायचे आहेत. आपल्याला काम बंद करायचे नाही, तर गर्दी बंद करायची आहे. रोजीरोटी बंद करायची नाही, जीवन थांबू द्यायचे नाही; पण काही बंधने पाळून या विषाणूपासून राज्य कायमचे मुक्त करायचे आहे.

\- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

### असे आहेत नवे निर्बंध

- पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत पाच किंवा त्याहून अधिकच्या जमावाला बंदी.
- रात्री संचारबंदी लागू; अत्यावश्यक सेवा वगळता इतरांना रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत फिरण्यास बंदी.
- सरकारी कार्यालयांत कार्यालयप्रमुखांच्या लेखी परवानगीशिवाय अभ्यागतांना बंदी, ऑनलाइन बैठका, गर्दी टाळण्यासाठी कार्यालयीन वेळांमध्ये बदल.
- खासगी कार्यालयांत लसीकरण पूर्ण झालेल्यांनाच परवानगी; ५० टक्के क्षमतेने काम चालवावे लागणार. २४ तास शिफ्टमध्ये काम करण्याची परवानगी.
- लग्न सोहळे - कमाल उपस्थिती ५०. अंत्यसंस्कार - कमाल उपस्थिती २०.
- राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांत कमाल उपस्थिती ५०.
- शाळा-महाविद्यालये - १५ फेब्रुवारीपर्यंत बंद. कार्यालयीन कामांना परवानगी.
- स्विमिंग पूल, जिम, स्पा, वेलनेस सेंटर आणि ब्युटी सलून - पूर्णपणे बंद राहणार.
- केशकर्तनालये - ५० टक्के उपस्थितीच्या अटीसह सुरू राहणार. रात्री १० ते सकाळी ७ पर्यंत बंद. ज्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे त्यांनाच परवानगी.
- क्रीडा स्पर्धा - नियोजित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा वगळता अन्य स्पर्धा रद्द.
- राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी प्रेक्षकांना बंदी, खेळाडू आणि अधिकाऱ्यांसाठी बायो बबल बंधनकारक.
- दर तीन दिवसांनी आरटी-पीसीआर चाचणी बंधनकारक.
- मनोरंजन पार्क, प्राणिसंग्रहालये, म्युझियम, गड-किल्ले, प्रेक्षणीय, तसेच पर्यटनस्थळे बंद.
- शॉपिंग मॉल्स, मार्केट कॉम्प्लेक्स ५० टक्के उपस्थिती; उपस्थित लोकांची संख्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक. रात्री १० ते सकाळी ८ पर्यंत बंद.
- हॉटेल आणि रेस्टॉरंट ५० टक्के उपस्थिती; उपस्थित लोकांची संख्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक. रात्री १० ते सकाळी ८ पर्यंत बंद.
- लशीचे दोन्ही डोस न झालेल्या व्यक्ती काम करताना आढळल्यास संबंधित हॉटेल, दुकान किंवा रेस्टॉरंटवर कारवाई.
- देशांतर्गत प्रवास - विमान, रेल्वे किंवा रस्ते प्रवासाने महाराष्ट्रात दाखल होणाऱ्यांसाठी लसीकरण पूर्ण झालेले पान ६ वर



Pune Edition
Jan 9, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# यूजीसी अध्यपदाच्या शर्यतीत डॉ. करमळकर

लोकमत न्यूज नेटवर्क



पुणे : विद्यापीठ अनुदान आयोग अध्यक्षपदाच्या निवडीच्या हालचालींना वेग आला असून, उच्च पदस्थ त्रीसदस्यीय समितीने पात्र उमेदवारांच्या मुलाखती नुकत्याच घेण्यात आल्या. अध्यक्षपदासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, दिल्लीतील जेएनयू केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू एम. जगदेश कुमार आणि आययुएसीचे संचालक प्रा. अविनाश चंद्र पांड्ये यांची नावे शॉर्टलिस्ट झाली आहेत. त्यामुळे प्रा. डी. पी. सिंग यांच्या निवृत्तीनंतर सुमारे वर्षभरापासून रिक्त असलेल्या युजीसी अध्यक्षपदाच्या शर्यतीत करमळकर यांचे नाव आले आहे.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाल पुढील काही महिन्यांत संपणार आहे. युजीसी अध्यक्ष पदासाठी ते इच्छुक असल्याची चर्चा काही दिवसांपासून विद्यापीठ वर्तुळात सुरू होती. ३ जानेवारी रोजी युजीसी अध्यक्षपदाच्या मुलाखती घेण्यात आल्या. करमळकर यांनी मुलाखत दिली असून, करमळकर यांची युजीसीच्या अध्यक्षपदी निवड झाली तर ती विद्यापीठासाठी गौरवाचीच बाब असेल.

पुणे विद्यापीठाचे माजी प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांनी यापूर्वी युजीसीचे उपाध्यक्षपद भूषविले आहे. तसेच पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी नियोजन आयोगाचे सदस्य म्हणून काम केले आहे. आता करमळकर यांचे नाव युजीसी अध्यक्षपदाच्या शर्यतीत आहे.

चालू शैक्षणिक वर्षापासूनच देशात नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यामुळे हे धोरण चांगल्या पध्दतीने राबवू शकेल, अशा व्यक्तीची निवड युजीसीच्या अध्यक्षपदासाठी केली जाईल, असे बोलले जात आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 08, 2022
Powered by: erelego.com

पुढारी

# राज्यात नाईट कर्फ्यू; शाळा, कॉलेज १५ फेब्रुवारीपर्यंत बंद

(पान १ वरून) सूचना येईपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मास्कचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचीही तरतूद करण्यात आली आहे. कोरोना रुग्णसंख्या झपाट्याने वाढत असल्याने निर्बंध अधिक कडक होणार असल्याची चर्चा होती.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे टास्क फोर्सची चर्चा करून याबाबत निर्णय घेणार असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आधीच स्पष्ट केले होते. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी शनिवारी या निर्बंधांना मान्यता दिली.

### असे आहेत नवे निर्बंध

(पान १ वरून) असावे अथवा ७२ तासांपूर्वी आरटी-पीसीआरचा निगेटिव्ह अहवाल द्यावा लागणार

- चित्रपटगृहे ५० टक्के उपस्थितीत सुरू राहणार. रात्री दहाच्या पुढे शो सुरू ठेवता येणार नाहीत.
- महाराष्ट्रात प्रवेश करायचा असेल, तर कोव्हिड प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस किंवा आरटी-पीसीआर चाचणीचा निगेटिव्ह रिपोर्ट बंधनकारक.
- एमपीएससी, यूपीएससी परीक्षेसाठी किंवा स्पर्धा परीक्षांसाठी प्रवास करणाऱ्यांना हॉल तिकिटावर प्रवास करण्याची मुभा.

Pune Edition
Jan 9, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

नवभारत

बचाव महाराष्ट्र में कड़े प्रतिबंधों की घोषणा, स्वीमिंग पुल, स्पा फिर बंद

# स्कूल, कॉलेज 15 फरवरी तक बंद

■ मुंबई, नवभारत न्यूज नेटवर्क. मुंबई समेत महाराष्ट्र में कोरोना के बेलगाम बढ़ते मामलों को देखते हुए राज्य सरकार ने अब प्रतिबंधों को और भी कड़ा करने का फैसला किया है. इस बारे में मुख्यमंत्री उद्धव ठाकरे के निर्देश पर मुख्य सचिव देबाशीष चक्रवर्ती ने शनिवार को नए दिशा– निर्देश जारी कर दिए. यह सभी नियम रविवार को मध्यरात्रि से लागू हो जाएंगे. इसके तहत 11 बजे से सुबह 5 बजे तक नाइट कर्फ्यू की घोषणा की गई है.

### सरकार के प्रमुख फैसले

इसके तहत एक साथ 5 लोगों के जमा होने पर पाबंदी होगी. रात में केवल आवश्यक सेवाएं ही जारी रहेंगी. सभी स्कूल, कॉलेज और विश्वविद्यालय 15 फरवरी तक बंद किए गए. दसवीं और बारहवीं कक्षा के लिए कोचिंग कक्षाओं के लिए भी छूट दी गई है. अन्य सभी कोचिंग कक्षाएं 15 फरवरी तक बंद रहेंगी. ये कक्षाएं ऑनलाइन शुरू रहेंगी



### कार्यालयों में 50% उपस्थिति

- सभी सरकारी कार्यालय, निगम, राज्य कार्यालय में 50% उपस्थिति
- सभी निजी कार्यालय में भी 50% उपस्थिति.

### होटलों में 50% क्षमता की अनुमति

- शॉपिंग मॉल और कॉम्प्लेक्स में 50% क्षमता को अनुमति, समय सुबह 10 बजे से शाम 5 बजे तक.
- राज्य में होटल और रेस्टोरेंट रात 10 बजे से सुबह 8 बजे तक बंद रहेंगे. दिन के दौरान 50% क्षमता पर जारी रहेगा

### महाराष्ट्र में एंट्री के लिए कड़े नियम

महाराष्ट्र में प्रवेश करने के लिए कोविड निवारक टीके की दोनों खुराक या 72 घंटे पहले की आरटीपीसीआर टेस्ट अनिवार्य किया गया है.

Pune Edition
09-january-2022 Page No. 1
epaper.enavabharat.com

# यूजीसी अध्यक्षपदासाठी डॉ. करमळकर दावेदार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ९ - विद्यापीठ व महाविद्यालयांसाठी शिखर संस्था असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) अध्यक्षपदाच्या निवडीसाठी तीन जणांची नावे निश्चित झाली आहेत. त्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचाही समावेश आहे. त्यामुळे यूजीसीच्या अध्यक्षपदासाठी कुणाची निवड होणार आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



यूजीसीच्या अध्यक्षपदासाठी उच्च पदस्थ त्रिसदस्यीय समितीने पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. अध्यक्षपदासाठी डॉ. नितीन करमळकर, दिल्लीतील जेएनयू केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू एम. जगदेश कुमार आणि आययुएसीचे संचालक प्रा. अविनाश चंद्र पांड्ये यांची नावे शॉर्टलिस्ट झाली आहेत. त्यामुळे प्रा. डी. पी. सिंग यांच्या निवृत्तीनंतर सुमारे वर्षभरापासून रिक्त असलेल्या यूजीसी अध्यक्षपदाच्या शर्यतीत करमळकर यांचे आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाल १७ मे २०२२ रोजी संपणार आहे. यूजीसी अध्यक्ष पदासाठी ते इच्छुक असल्याची चर्चा काही दिवसांपासून विद्यापीठ वर्तुळात केली जात होती. यूजीसी अध्यक्ष पदासाठी ३ जानेवारी रोजी मुलाखती घेण्यात आल्या. करमळकर यांनी मुलाखत दिली असून करमळकर यांची युजीसीच्या अध्यक्षपदी निवड झाली तर ती विद्यापीठासाठी गौरवाचीच बाब असणार आहे. यापूर्वी पुणे विद्यापीठाचे माजी प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांनी यूजीसीचे उपाध्यक्षपद भूषविले आहे.

प्रभात Mon, 10 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65515188

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

लोकमत

### कुलगुरू निवड प्रक्रियेचा पहिला टप्पा आज

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाल संपत आला असल्याने राज्यपाल कार्यालयाने कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. १०) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेच्या सदस्यांकडून कुलगुरू निवड समितीसाठी एका नामांकित संस्थेतील तज्ज्ञ व्यक्तीचे नाव निश्चित केले जाणार आहे.

विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार विद्यापीठ कुलगुरू निवडीसाठी समिती स्थापन केली जाते. या समितीमध्ये विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद व विद्या परिषद सदस्यांकडून एका व्यक्तीचे नाव निश्चित केले जाते. राज्यपाल कार्यालयाकडून याबाबत लेखी आदेश प्राप्त झाल्याव विद्यापीठाने सोमवारी संबंधि सदस्यांच्या बैठकीचे आयोजन केल आहे. त्यात विद्यापीठाती सदस्यांकडून एका व्यक्तीच्या नावाव शिक्कामोर्तब केले जाईल.

विद्यापीठ कुलगुरूंच्या निवडीसाठ स्थापन केल्या जाणाऱ्या समितीमध्‍ राज्य शासनाकडून दोन माज कुलगुरूंची नावे देण्याबाबतच्य कायद्यास नुकत्याच झालेल्य अधिवेशनात मंजुरी देण्यात आली मात्र, अद्याप त्यावर राज्यपालांच स्वाक्षरी झालेली नाही. त्यामुळ विद्यापीठ कुलगुरू यांच्या निवडीसाठ किती सदस्यांची समिती असेल आणि त्यात कोणत्या व्यक्तींचा समावेश केला जाईल, हा पुढील काळात चर्चेच विषय ठरणार आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 10, 2022
Powered by: erelego.com

### Colleges & universities to set up exam helpline

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** All colleges and universities in the state will have to establish a helpline to answer exam-related queries of students, the state government has directed.

The semester exams are scheduled by end of January and will be held online following which the government has directed the colleges to establish a mechanism to address the doubts of students.

Higher education minister Uday Samant had announced the shutdown of colleges and universities till February 15 and also said that the exams would also be conducted online.

A government notification issued on Saturday regarding this announcement also stated that, in order to ensure that the exams are held smoothly.

**FILL FORMS TILL JANUARY 15**

File photo

The Savitribai Phule Pune University will conduct the semester exams online. The semester exam will start in the second week of February. The students who wish to appear for the exam can fill the form latest till January 15, the SPPU administration has announced

**50% ATTENDANCE AT SPPU AND AFFILIATED COLLEGES**

The Savitribai Phule Pune University and its affiliated colleges will have to work on 50% strength as per the state government revised guidelines announced on Saturday. Accordingly, the staff would report to work on rotation basis, the SPPU stated



"Colleges and universities will have to publish the syllabus for the exam, a sample paper, question bank, helpline number and other details on its website," the statement added.

The hostels have also been shut down, but foreign students will be allowed to use the hostels. Students who are working on projects in the college laboratories and doctoral students have been allowed to use the hostel facilities.

The notification also stated that if the local administration demands the use of a college's premises for a Covid centre, then the management should agree to it.

The Times of India 10.1.2022

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# विद्यार्थीकेंद्रित शिक्षणावर भर

## भविष्यात एकाच वेळी विविध अभ्यासक्रमांचे मिळणार पर्याय; तज्ज्ञांची अपेक्षा

मटा विशेष


Aditya.Tanawade
@timesgroup.com
Tweet : @AdityaTanawade


**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणानुसार बदलणारी शिक्षणपद्धती विद्यार्थी केंद्रित असल्याने शिक्षणसंस्थांना विद्यार्थीसंख्या कायम राखण्यासाठी भविष्यात अनेक आमूलाग्र बदल करावे लागतील. एकाचवेळी विविध अभ्यासक्रमांचा पर्याय उपलब्ध झाल्याने विद्यार्थी साचेबद्ध अभ्यासक्रमांऐवजी नव्या वाटा आणि नव्या संधींचा शोध घेतील, अशी अपेक्षा शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

देशभरात नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे. या धोरणामध्ये विद्यार्थीकेंद्री शिक्षणावर भर देण्यात आला आहे. या शिक्षणपद्धतीत शिक्षणसंस्थांना विद्यार्थ्यांवर शिक्षणाची कोणतीही बंधने लादता येणार नाहीत. उदा. एखाद्या विद्यार्थ्याने एखादी पदवी किती वर्षांमध्ये पूर्ण करायची, हे संबंधित महाविद्यालये, विद्यापीठ ठरवतात. मात्र, भविष्यात विद्यार्थी पदवी दोन वर्षांत किंवा त्याहीपेक्षा कमी काळात पूर्ण करू शकतील. काही विद्यार्थी तीच पदवी पूर्ण करायला पाच वर्षांचा कालावधी लावतील. सध्या महाविद्यालयांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये विशिष्ट विषय शिकवले जातात. पण, नव्या धोरणानुसार विद्यार्थी एकाच वेळेला वेगवेगळ्या विषयांचे धडे घेऊ शकतील. शिवाय वेगवेगळे छोटे अभ्यासक्रमही शिकू शकतील. यासाठी त्यांना क्रेडिट देण्याची व्यवस्था करण्यात आल्याने वेगवेगळ्या विषयांचे ज्ञान घेऊन विद्यार्थ्यांच्या क्रेडिट बँकेमध्ये ते जमा होत राहतील आणि त्यावरून त्यांची गुणवत्ता ठरेल. याचा अर्थ पुढील काही वर्षांमध्ये सर्व शिक्षण संस्थांना चाकोरीबद्ध शिक्षणाला रामराम ठोकावा लागणार आहे.

पुण्यातील महाविद्यालये आणि शाळांच्या संख्येच्या बाबतीत काही बदल होतील, असे तज्ज्ञांकडून सांगण्यात आले आहे. यामध्ये संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते. भविष्यात व्हर्च्युअल रिॲलिटी तंत्रज्ञानाचा वापर होणार असल्याने एकाच अभ्यासक्रमासाठी हजारो विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ शकतो. यामुळे महाविद्यालयांना प्रवेशांचे बंधन फारसे राहणार नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षण नसेल तर, विद्यार्थी संबंधित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणार नाहीत अशी वस्तुस्थिती निर्माण होईल, याकडेही तज्ज्ञ लक्ष वेधत आहेत.

### दहा वर्षांत 'ग्लोबल शिक्षण'

पुढील दहा वर्षांमध्ये शालेय शिक्षणातही अनेक बदल अपेक्षित आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांना 'स्मार्ट क्लासरूम'मध्ये शिक्षण दिले जाईल. अनेक शाळांच्या लेखी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने (एमसीक्यूद्वारे नाही) होऊ शकतील. काही शाळांमध्ये पुस्तकांऐवजी टॅबचाही वापर केला जाऊ शकतो. व्हर्च्युअल रिॲलिटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील एखादा शालेय विद्यार्थी पुण्याच्या शाळेतून शिक्षण घेऊ शकतो. त्यासाठी त्याला पुण्यात शिकायला येण्याची गरज भासणार नाही. एका अर्थाने पुढील दहा वर्षांत शालेय शिक्षणही ग्लोबल होईल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### एकाच वेळी विविध अभ्यासक्रम

आगामी काही वर्षांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन भिन्न महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. उदा. एकच विद्यार्थी सर परशुरामभाऊ महाविद्यालय आणि गरवारे महाविद्यालयाचा विद्यार्थी असेल. शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर हे शक्य होणार आहे.

"पुण्याला पुढील दहा वर्षांमध्ये शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडवून आणता येतील. या शहराला खूप मोठी संधी आहे. नव्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली तर, पुण्यातील विद्यार्थ्यांना मुक्त पद्धतीने वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण घेता येईल. संस्था विद्यार्थ्यांवर बंधने लादू शकणार नाहीत. शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढेल.

- डॉ. भूषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष, यूजीसी

आगामी वर्षांमध्ये ऑनलाइन शिक्षणाचा वापर वाढेल. अनुदानित शाळा, महाविद्यालयांचे प्रमाण कमी होईल. यामुळे विनाअनुदानित शिक्षणावर भर राहील. पुढे जाऊन छोट्या शाळा किंवा महाविद्यालये मोठ्या शिक्षण संस्थांमध्ये वर्ग केली जातील. गुणवत्तेच्या दृष्टीने हा उपक्रम चांगला असला तरी, त्यामुळे कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक संघटनांचे अस्तित्व कमी होईल.

- धनंजय कुलकर्णी, शिक्षणतज्ज्ञ

ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना अनेक मार्ग उपलब्ध होतील. त्यामध्ये शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अनेक सुविधा निर्माण होतील. स्मार्ट क्लासरूम, व्हर्च्युअल रिॲलिटी आणि तंत्रज्ञानयुक्त शिक्षण ग्रामीण भागातील मुलांपर्यंत पोहोचेल, याबाबत विश्वास वाटतो.

- हरिश्चंद्र गायकवाड, अध्यक्ष, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ

### जिल्ह्यातील शाळा एका दृष्टिक्षेपात

- शासकीय शाळा : ४२१०
- अनुदानित शाळा : १३४६
- विनाअनुदानित : १८९९



### जिल्ह्यातील महाविद्यालये

- पारंपरिक पदवी अभ्यासक्रम महाविद्यालये : ४२८
- व्यावसायिक अभ्यासक्रम संस्था : १२७



### स्वायत्त महाविद्यालयांची संख्या वाढणार

भविष्यात स्वायत्त महाविद्यालये आणि विद्यापीठांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्याचे चित्र आहे. स्वायत्त महाविद्यालयांबरोबरच 'युनिव्हर्सिटी क्लस्टर' नावाची संकल्पनाही प्रत्यक्षात येईल. ज्यामध्ये एकाच संस्थेची विविध महाविद्यालये एकत्र येऊन त्यांचे विद्यापीठ तयार केले जाईल. स्वायत्त, महाविद्यालये आणि विद्यापीठ यांच्या संख्येत वाढ होणार असल्याने शासकीय, खासगी अशा सर्वच विद्यापीठांना आपली शैक्षणिक गुणवत्ता अबाधित राखावी लागेल.

Maharashtra Times 10.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

## कुलगुरू निवड समितीत अभय करंदीकर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १० -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नव्या कुलगुरू निवडीसाठी स्थापन केल्या जाणाऱ्या समितीमध्ये आयआयटी कानपूरचे संचालक अभय करंदीकर यांचे नाव विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. आता कुलगुरू निवडीमध्ये करंदीकर यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार विद्यापीठातर्फे कुलगुरू निवड समितीसाठी एका व्यक्तीचे नाव दिले जाते. संबंधित व्यक्तीचा विद्यापीठाशी कोणताही संबंध नसावा तसेच ती व्यक्ती राष्ट्रीय संस्थेमधील असणे अपेक्षित आहे. राज्यपाल कार्यालयाने दिलेल्या आदेशानुसार सोमवारी व्यवस्थापन परिषद सदस्य व विद्या परिषद सदस्यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. त्यात अभय करंदीकर यांच्या नावावर एकमत झाले.मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन, सिक्युरिटी अँड एक्स्चेंज ऑफ इंडिया, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, मिनिस्ट्री ऑफ इन्फॉर्मेशन अँड टेक्नॉलॉजी आदी राष्ट्रीयस्तरावरील मंत्रालयावर व संस्थावर वरिष्ठ पदावर करंदीकर कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९ विद्यार्थ्यांनी पीएच.डी पदवी प्राप्त केली आहे. करंदीकर यांच्या नावावर ११ अमेरिकन पेटंट आणि ७ भारतीय पेटंट आहेत.

प्रभात Tue, 11 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65527707

## यूजीसी अध्यक्षपदाच्या अंतिम यादीत डॉ. नितीन करमळकर यांचा समावेश

### यूजीसीचे तीन मराठी अध्यक्ष

देशभरातील महाविद्यालये, राज्य आणि केंद्रीय विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे आणि खासगी विद्यापीठांवर नियंत्रण ठेवणारी यूजीसी ही केंद्रीय संस्था आहे. आतापर्यंत डॉ. सी. डी. देशमुख, डॉ. सुखदेव थोरात आणि डॉ. अरुण निगवेकर यांनी यूजीसीचे अध्यक्षपद भूषवले आहे. त्यामुळे आता पुन्हा यूजीसीच्या अध्यक्षपदी मराठी व्यक्तीची निवड होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

करण्यात आली आहे. अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया नामनिर्देशनाने राबवली जाते. त्यामुळे अध्यक्ष निवडीसाठी नियुक्त केलेल्या शोध निवड समितीने सात जणांचे नामनिर्देशन केले. त्यानंतर केलेल्या अंतिम यादीत डॉ. नितीन करमळकर यांच्यासह जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. एम. जगदेशकुमार आणि इंटरयुनिव्हर्सिटी ॲक्सलरेटर सेंटरचे संचालक प्रा. अविनाश चंद्र पांडेय यांचा समावेश आहे आता केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून या तिघांतून एका व्यक्तीची निवड अध्यक्षपदासाठी करण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

प्रा. जगदेशकुमार यांच कुलगुरुपदाचा कार्यकाळ जानेवारीत संपला आहे. मात्र नवीन कुलगुरूंची निवड होईपर्यंत त्यांनीच कुलगुरु म्हणून काम पाहण्यास केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मान्यता दिली आहे. प्रा जगदेशकुमार इलेट्रॉनिक अभियांत्रिकीमधील संशोधक आहेत. प्रा. पांडेय नॅनो तंत्रज्ञानातील संशोधक आहेत. तर भूशास्त्र आणि भूरसायनशास्त्रातील संशोधक असलेले डॉ. करमळकर यांच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा कार्यकाळ मे २०२२मध्ये संपत आहे.

लोकसत्ता Tue, 11 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65528704

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

लोकमत

# सरसकट शाळा बंदचा निर्णय अशैक्षणिक

## शिक्षण क्षेत्रातील जाणकारांचा सरकारच्या निर्णयाला विरोध | शिक्षणात पुन्हा खंड पडण्याची भीती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोनाच्या तिसऱ्या लाटेमुळे पुन्हा शाळा, महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत सरसकट बंद करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय अनाकलनीय असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. सरसकट शाळा बंद करण्याऐवजी जिल्ह्यातील रुग्णसंख्येनुसार स्थानिक पातळीवर शाळा बंदचा निर्णय घ्यावा, असे मत ते व्यक्त करीत आहेत. ऑनलाइन शिक्षण सगळ्यांसाठीच सोयीचे नसून यामुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडेल, अशा भावना शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केल्या आहेत.

गेल्या दोन वर्षांत ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादा समोर आल्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष वर्गात बसून शिक्षण घेणे, हाच शिक्षणाचा योग्य मार्ग असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत. ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा लेखन, वाचन तसेच गणित, विज्ञान यासारख्या विषयाच्या आकलनात उणिवा राहणार असल्याचेही ते अधोरेखित करीत आहेत. एक दिवसाआड शाळा भरविणे, शाळेची वेळ कमी करणे, वाड्या-वस्ती पातळीवर शाळा सुरू ठेवणे, विद्यार्थ्यांचे छोटे-छोटे गट करून शिकविणे, अभ्यासक्रमावर आधारित कृती पुस्तिका विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, किमान आवश्यक तेवढा अभ्यासक्रम शाळेत पूर्ण करून घेणे अशा पर्यायांची चाचपणी न करता सरसकट शाळा बंद करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने अपायकारकच असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत.

### 'शाळा बंद'चे परिणाम

- विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून दुरावण्याची शक्यता
- लेखन, वाचन, ज्ञानग्रहण क्षमता होताहेत कमी
- बालविवाह, बालमजुरी यात वाढ
- शहरी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणार शैक्षणिक दरी
- ऑनलाइन शिक्षण पोहोचू न शकणारे विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या मागे पडण्याची शक्यता
- मुली शिक्षण प्रवाहापासून दुरावतील



चित्रपट क्षेत्र, धार्मिक जागा, मॉल, हॉटेल या सगळ्याला ५० टक्के उपस्थितीत परवानगी असताना शाळा सरसकट बंद का, महापालिका क्षेत्र वगळून उरलेल्या महाराष्ट्रात शाळा सुरू ठेवायला हव्यात, कारण ग्रामीण भागात ऑनलाइन शिक्षण पोहोचत नाही व मोबाइल रेंजही पुरेशी नसते. त्यातून ऑनलाइन शिक्षण घेणारे व न घेणारे अशी नवी विषमता निर्माण होत आहे.

-हेरंब कुलकर्णी, शिक्षणतज्ज्ञ

Pune Main
Page No. 7 Jan 11, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# कोरोनानंतर शिक्षण क्षेत्रातील स्थिती

## आव्हाने आणि उपाययोजना

**अशी आव्हानं प्रत्येकच क्षेत्रात या कोरोना काळात निर्माण होवू शकतात. परंतू यामध्ये वाट काढून मार्गस्थ व्हावे लागेल. भीती सोडावी लागेल. तेव्हाच कोरोनावर आपण मुक्ती मिळवू शकू हे तेवढंच खरं..**

शिक्षण हे एकमेव उन्नतीचे साधन आहे असे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात पण कोरोना ह्या जागतिक संकटामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झाली असून संस्था चालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आज आपला भारत देश प्रगतीच्या उच्च शिखराकडे वाटचाल करत असतानाच Covid 19 सारखे महासंकट कोसळले आणि जगभर थैमान घातलेल्या या विषाणूने सर्वच क्षेत्रात मोठ्या अडचणी निर्माण केलेल्या आहेत.

कोरोनाच्या संकटासमोर जागतिक बलशाली महासत्ता असलेले राष्ट्र देखील हतबल झालेली आपल्याला दिसत आहेत. यात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी २२ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात लॉकडाऊन करण्यात आला. शाळा, महाविद्यालये यांना सुट्टी देण्यात आली. दरम्यानच्या काळात कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये, विद्यार्थी शिक्षणाच्या मूलभूत हकापासून वंचित राहू नये, म्हणून बहुतांश शिक्षण संस्थांनी ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग निवडला, मात्र कोरोना पूर्व काळातील शैक्षणिक वर्षे आणि आताचे ऑनलाईन शिक्षण यात खूप फरक आहे. कोरोना पूर्व काळातील प्रत्यक्ष शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होत होता. विविध परीक्षांमुळे विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता समजून येत होती. महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास होत होता, त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागत होता, शिक्षणाची व वाचनाची ओढ निर्माण होत होती.

मात्र शाळेच्या प्रांगणात खेळणारी, बहरणारी, शिकणारी सहशिक्षणातून आनंददायी वातावरणात नवनव्या संकल्पना शिकत स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणारी मुल ऑनलाईन शिक्षण खरच शिकत आहेत का... किंवा शिकली आहेत का? हा खुप मोठा प्रश्न शिक्षण व्यवस्थेपुढे, समाजापुढे, पालकांपुढे आणि शिक्षकांपुढे उभा आहे. नियमांच्या अधिन राहून शिक्षक स्वतः विद्यार्थी पर्यंत पोहचून शिक्षण देऊ शकतात. या सर्वांचा विचार करून सरकारने आता या बद्दल निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण शिक्षण मला तुम्हाला आणि सर्वांना संविधानाने दिलेला अधिकार आहे.

**शाळा व संस्था चालकांपुढील आव्हाने.**

जेव्हा-जेव्हा मानव जातीचा उत्कर्ष झालेला आहे, जेव्हा-जेव्हा मानवजातीवर महासंकट आलेलं आहे, तेव्हा-तेव्हा शिक्षण आणि संशोधन संस्थांनी मग त्या सरकारी असो किंवा खाजगी, आपले महान योगदान दिले आहे. आजवर सर्व क्षेत्रात योगदान देणाऱ्या शिक्षण व्यवस्थेची स्थिती, आव्हाने आणि उपाययोजना काय असाव्यात, या संदर्भाचा वेध घेण्यासाठी दक्षिण पुण्यातील शिक्षणविश्वातील मान्यवरांनी केलेले विचारमंथन...

- शाळा चालवायचे हे अति जोखमीचे काम असते. त्यातच पहिलं आव्हान म्हणजे फी जमा करणे. कारण कि यातूनच शिक्षकांचे पगार व इतर सर्व खर्च चालवला जातो. आता पालकांनी कोरोनाचे कारण सांगून फी च भरली नाही तर शाळा चालणार कशी ? या मध्ये सरसकट सर्वचजण कोरोनाचे कारण सांगून फी सवलत अथवा फी माफी मागू लागले तर शिक्षकांचे पगार कसं करणार ? या हि एक महत्त्वाचा प्रश्न आहे.
- सध्या स्पर्धेचा काळ आहे. या काळात विद्यार्थी मिळवीत असतांना अनेक अडचणी असतात. त्यातच दुरच्या विद्यार्थीची ने-आण करण्यासाठी गाड्या घ्याव्या लागतात. त्या गाड्या डिझेलवर चालतात, पण त्या गाड्या चालवायला लागणारं डिझेल मिळविण्या साठीही संस्था चालकांकडे पैसा नसतो, मग चालक वाहक देखभाल दुरुस्ती अशा अनेक कारणांसाठी लागणारा पैसा कसा उभारावा हा प्रश्न संस्था चालकासमो उभा आहे.
- सध्या कोरोना काळात नेमका विद्यार्थी कोणाकडे हा प्रश्न पडलेला आहे. कोरोना महामारी आहे. परंतू ही महामारी शाळा स्तरावर गोंधळून टाकणारी महामारी आहे. शासन एकीकडे शाळा सुरु करावी असे म्हणतात. त्यातच कोरोना, ओमायक्रानची वाढती संभाव्य बाब लक्षात घेता शासन कधीकधी एक पाऊल मागं पुढं करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातच काही काही ठिकाणी शाळा सुरु झाल्या आहेत. काही करणार आहेत. त्यातच अलिकडच्या काळात शाळा सुरु झाल्यानंतर संभाव्य कोरोना जर वाढला, तर तो वाढण्यालास जबाबदार कोण ? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

कोरोना हा मानवनिर्मीत रोग नाही. तो निसर्ग निर्मीतच असल्यासारखा रोग आहे. त्यामुळं या रोगावर मानवं संक्रमणाच्या दृष्टिकोनातून योग्य उपाय नियु शकत नाही. कारण तो रोग संसर्गजन्य असल्यानं तो कोणाला होईल व कोणाला होणार नाही हे काही निश्चीत सांगता येणार नाही. महत्वपूर्ण गोष्ट ही की हे सगळं बरोबर असलं तरी अशा सोयी उपलब्ध करुन देणं सोपं आहे. पण त्याचा वापर काटकसरीनं करुन घेणं कठीण आहे. कारण एका शाळेत असंख्य विद्यार्थी असतात. सर्वच सारख्या विचारांचे नसतात. त्यातील काही विद्यार्थी मुख्याध्यापकानं दिलेल्या आदेशाचं काटेकोर पालन करतीलही. परंतू काही विद्यार्थी तसं पालन करतीलच असे नाही. त्यामुळं संभाव्य धोका होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

शब्दांकन पांडुरंग मरगजे



Hello Pune
Page No. 10 Jan 11, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

### औषधी वनस्पती अश्वगंधाच्या परिणामकारकतेबाबत संशोधन

**नागरिकांना सहभागी होण्याची संधी**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

> **आयुर्वेदिक औषधींची उपयुक्तता पटवून देण्यासाठी व त्यांचा अधिक प्रचार, प्रसार होण्याच्या दृष्टिकोनातून अशा प्रकारचे देशपातळीवरील संशोधन प्रकल्प हे आयुष मंत्रालयाने हाती घेतले आहेत. अश्वगंधासंदर्भातील शास्त्रशुद्ध संशोधन हा त्याचाच एक भाग आहे. –** **डॉ. भूषण पटवर्धन,** राष्ट्रीय संशोधक प्राध्यापक, आयुष मंत्रालय

**पुणे :** करोना प्रतिबंधक लसमात्रा घेतल्यानंतर अश्वगंधा या औषधी वनस्पतीची उपयुक्तता सिद्ध करण्यासाठी संशोधन प्रकल्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि आयुष मंत्रालयाने सुरू केला आहे. या प्रकल्पाच्या पुण्यातील वैद्यकीय चाचण्या सुरू करण्यात येत असून, या प्रकल्पात नागरिकांना सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

अश्वगंधा ही औषधी अनेक आजारांवर उपयुक्त आहे, असे या आधीच्या संशोधनातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे लस घेतल्यानंतर अश्वगंधाचा वापर केल्यास प्रतिकारशक्ती वाढण्यास किती मदत होऊ शकेल, त्याचे काय परिणाम होतील हे तपासण्यासाठी संशोधन करण्यात येत आहे. पुणे, मुंबई, नागपूर, दिल्ली, हसन, बेळगाव, जयपूर या ठिकाणी हा प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाची संकल्पना आयुष मंत्रालयातील राष्ट्रीय संशोधक प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांची आहे.

डॉ. अरविंद चोप्रा या अभ्यासाचे प्रमुख आहेत, तर विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत दुधगावकर, आरोग्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गिरीश टिल्लू, संशोधक विद्यार्थ्यांचा प्रकल्पात सहभाग आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संशोधन प्रकल्पाचे केंद्र आहे. या १८ ते ४५ वयोगटातील नागरिकांनी लशीची पहिली किंवा दुसरी मात्रा घेतल्यानंतर सात दिवसां[…] विद्यापीठातील आरोग्य केंद्रास भे[…] द्यावी. नागरिकांना प्रकल्पाची माहित[…] समजावून सहभागी होण्या[…] अनुमती दिलेल्या नागरिकांच[…] आरोग्य तपासणी करून त्यां[…] अश्वगंधाच्या गोळ्या दिल्[…] जातील. त्या गोळ्यांचे सेव[…] केल्यानंतर ठरावीक काळानंतर पुन्[…] तपासणी केली जाईल. त्यासाठी स[…] खर्च केंद्राकडून दिला जाईल, अ[…] डॉ. गिरीश टिल्लू यांनी सांगितले. य[…] संदर्भात अधिक माहितीसा[…] ९७६६५५५३१४ या क्रमांकाव[…] संपर्क साधण्याचे आवाहन करण्या[…] आले आहे.

लोकसत्ता Tue, 11 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65538457

### कुलगुरू निवड समितीसाठी अभय करंदीकर यांचे नाव निश्चित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवड समितीसाठी आयआयटी कानपूरचे संचालक अभय करंदीकर यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत या बाबत निर्णय घेण्यात आला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाळ मे २०२२ मध्ये संपत आहे. त्यामुळे नव्या कुलगुरूंच्या निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार विद्यापीठातर्फे कुलगुरू निवड समितीसाठी एका व्यक्तीचे नाव सुचवण्यात येते. संबंधित व्यक्तीचा विद्यापीठाशी कोणताही संबंध नसावा आणि ती व्यक्ती राष्ट्रीय संस्थेतील असणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर राज्यपाल कार्यालयाने दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषदेची बैठक झाली. त्यात आयआयटी कानपूरचे संचालक अभय करंदीकर यांचे नाव एकमताने निश्चित करण्यात आले.

आयआयटी कानपूरसह संरक्षण मंत्रालय, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालय, तंत्रज्ञान विभाग आदी राष्ट्रीय स्तरावरील मंत्रालय, संस्थांसाठी करंदीकर कार्यरत आहेत. तसेच संशोधक म्हणून त्यांच्या नावावर अनेक भारतीय आणि अमेरिकन एकस्व अधिकारांची नोंद आहे.

लोकसत्ता Wed, 12 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65

### लोकमत

### प्राध्यापक भरती प्रक्रियेला मिळेना गती

**पुणे :** राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने अध्यादेश प्रसिद्ध केला. तसेच वित्त विभागाने प्राध्यापक भरतीस मान्यता दिली. मात्र तरीही अद्याप भरती प्रक्रियेस गती मिळालेली आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची नियुक्ती होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे विद्यापीठांनी व विभागीय आयुक्त कार्यालयातील रोस्टर तपासणी विभागाने लवकरात लवकर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी,अशी अपेक्षा प्राध्यापक संघटनांकडून केली जात आहे.

राज्यातील महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भराव्यात, या मागणीसाठी विविध प्राध्यापक संघटनांनी आंदोलन केले. त्यानंतर राज्य शासनाने प्राध्यापक भरतीला हिरवा कंदील दिला. परंतु,भरती करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अध्यादेशात काही अटी ठेवल्या. या अटींची पूर्तता करण्यासाठी महाविद्यालयांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे प्राध्यापक भरतीची अजूनही ' जैसे थे ' असल्याचे महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून सांगितले जात आहे.

कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिक्षण द्यावे लागत आहे. या कालावधीत अनेक प्राध्यापक सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी सुद्धा महाविद्यालयांकडे प्राध्यापक नसल्याचे दिसून येत आहे. विद्यापीठाने भरती प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबींची पूर्ण करून भरती प्रक्रियेला गती द्यावी,अशी मागणी केली जात आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 12, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# परीक्षाही ऑनलाइनच!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा विभागाचे स्पष्टीकरण

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्रातील परीक्षा फेब्रुवारी-मार्च महिन्यात फक्त ऑनलाइन पद्धतीने आणि बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) पद्धतीने घेण्यात येणार आहे. ही परीक्षा शंभर टक्के अभ्यासक्रमावर होणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.



विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी आज परीक्षा पद्धतीचे स्वरुप प्रसिद्ध केले. ऑनलाइन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास उर्वरित राहिलेलाच वेळ विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर मार्फत आपोआप वाढवून देण्यात येईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप सेव्ह होऊन परीक्षा पुन्हा राहिलेल्या वेळासाठी सुरू राहील. ऑनलाइन परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना एसएमएस, ई-मेलद्वारे कळविले जाईल. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांचा ई-मेल आयडी व मोबाइल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे. या परीक्षांसाठी छायांकित प्रत व फेरमूल्यांकनाची सोय नसल्याचे परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे.

**तक्रारीत तथ्य असेल, तरच फेरपरीक्षा**

ऑनलाइन परीक्षेदरम्यान काही अडचणी निर्माण झाले असेल तर तक्रार दाखल करता येईल. लॉग-इन न होणे, अचानक लॉग-आऊट होणे, पुन्हा लॉग-इन न करता येणे, इंग्रजी अथवा मराठी प्रश्नपत्रिका उपलब्ध न होणे, आकृत्या न दिसणे, चुकीच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होणे, पेपर सबमिट न होणे, कोविड बाधा अथवा नैसर्गिक आपत्ती, एकाच दिवशी एकाच वेळी दोन विषयाची परीक्षा, अशा तक्रारी पुराव्यासह विद्यार्थ्यांनी दाखल करावी. अर्जाची छाननी करून त्यात तथ्य असेल तरच त्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्यात येणार आहे.

**शंभर टक्के अभ्यासक्रमावर होणार परीक्षा : एक तासाचा वेळ**

**अशी होईल परीक्षा**

- नियमित व अनुषेषित, बहि:स्थ, श्रेणीसुधार इत्यादीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा होतील.
- परीक्षेसाठी ६० बहुपर्यायी प्रश्नांमधून ५० अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील.
- विज्ञान, प्रथम वर्ष बीसीए (सायन्स) आणि अभियांत्रिकीतील गणित व संख्याशास्त्र या विषयासाठी ३० प्रश्न विचारले जातील व त्यामधील २५ अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राह्य धरले जातील.
- विद्यार्थ्याने प्रत्यक्ष लॉग-इन केल्यावर प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एक तासाचा कालवधी असेल.

प्रभात Thu, 13 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65580666

# शंभर टक्के अभ्यासक्रमावर सत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये ऑनलाइन पद्धतीने

## टप्प्याटप्प्याने वेळापत्रक जाहीर होण्याबाबत विद्यापीठाकडून माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्रातील परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये ऑनलाइन पद्धतीने आणि बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) पद्धतीने घेण्यात येणार आहे. परीक्षांचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येणार असून, ही परीक्षा शंभर टक्के अभ्यासक्रमावर होणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परीक्षा पद्धतीची माहिती परिपत्रकाद्वारे दिली. नियमित, अनुषेषित (बॅकलॉग), बहि:स्थ, श्रेणीसुधार आदींसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा होईल. परीक्षेसाठी साठ बहुपर्यायी प्रश्नांमधून पन्नास अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील. विज्ञान, प्रथम वर्ष बीसीए (सायन्स) आणि अभियांत्रिकीतील गणित, संख्याशास्त्र या विषयासाठी तीस प्रश्न विचारले जातील. त्यातील २५ अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राह्य धरली जातील. परीक्षांसाठीचा कालावधी एक तासाचा असेल. प्रत्यक्ष विद्यार्थ्याने लॉगीन झाल्यावर प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी एक तासाचा कालवधी असेल, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### तक्रारीत तथ्य असेल तरच फेरपरीक्षा

ऑनलाइन परीक्षेदरम्यान काही अडचणी निर्माण झाल्यास तक्रार दाखल करता येईल. लॉगीन न होणे, अचानक लॉगआऊट होणे, पुन्हा लॉगीन न करता येणे, इंग्रजी अथवा मराठी प्रश्नपत्रिका उपलब्ध न होणे, आकृत्या न दिसणे, चुकीच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होणे, पेपर सबमीट न होणे, करोनाची लागण होणे किंवा नैसर्गिक आपत्ती, एकाच दिवशी एकाच वेळी दोन विषयाची परीक्षा याबाबत विद्यार्थ्यांनी पुराव्यासह तक्रार दाखल करावी. अर्जाची छाननी करून त्यात तथ्य असेल, तरच फेरपरीक्षा घेण्यात येणार असल्याचे परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे.

ऑनलाइन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास उर्वरित राहिलेलाच वेळ सॉफ्टवेअरमार्फत आपोआप वाढवून देण्यात येईल. सोडवलेली उत्तरे ही आपोआप 'सेव्ह' होऊन परीक्षा पुन्हा राहिलेल्या वेळासाठी सुरू राहील.

ऑनलाइन परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना लघुसंदेश, ई-मेलद्वारे कळवण्यात येईल. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांचा ई-मेल आयडी, मोबाइल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे. या परीक्षांसाठी छायांकित प्रत पुनर्मूल्यांकनाची सोय नसल्याचे परीक्षा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Thu, 13 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65569120

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

### बारावी परीक्षेच्या वेळापत्रकात अंशतः बदल

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १३ - राज्य शिक्षण मंडळामार्फत इयत्ता बारावीची परीक्षा मार्च महिन्यात होत आहे. याचे वेळापत्रकही जाहीर झाले आहे. मात्र, नियोजित वेळापत्रकानुसार दि. ७ मार्च रोजी होणारी 'अर्धमागधी' या विषयाची परीक्षा आता दि. ८ मार्च या दिवशी होणार असल्याचे बोर्डाकडून स्पष्ट करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत इयत्ता बारावीची परीक्षा ३ ते ३० मार्च या कालावधीत होणार आहे. त्यानुसार या परीक्षांचे वेळापत्रक शाळांनाही पाठविण्यात आले आहे. परंतु, दि.७ मार्च रोजी दुपारच्या सत्रात ३ ते ६.३० या कालावधीत 'अर्धमागधी' या विषयाची परीक्षा आयोजित केली आहे. तथापि, फक्त 'अर्धमागधी' या विषयाच्या वेळापत्रकामध्ये अंशतः बदल केला आहे. सुधारित वेळापत्रकानुसार 'अर्धमागधी' या विषयाची परीक्षा आता दि. ८ मार्च रोजी ३ ते ६.३० या वेळेत होणार आहे. या व्यतिरिक्त बारावीच्या लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल झालेला नसल्याचे राज्य शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी स्पष्ट केले.

प्रभात Fri, 14 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65597814

### योगसाधनेसंबंधी संशोधनाची संधी

पुणे, दि. १३ - भारताच्या समृद्ध परंपरेचा एक महत्त्वपूर्ण आधार असणारी अभिजात योगसाधना समजून घेणे, तिचा सखोल अभ्यास करणे आणि त्यात संशोधन करणे याची अनोखी संधी आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महर्षि विनोद रिसर्च फाउंडेशन समवेत सामंजस्य करार केला आहे.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि फाउंडेशनचे संस्थापक डॉ. संप्रसाद विनोद यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. अभिजात योगसाधनेसंबंधी मूलभूत संशोधन करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांना या कराराद्वारे नव्या संधीचे दरवाजे उघडले आहेत.

प्रभात Fri, 14 Jan https://epa

### सामना

### इंजिनियरिंग शिकण्यास हिंदीनंतर विद्यार्थ्यांचे मराठीला प्राधान्य

**पहिल्याच वर्षी ६० विद्यार्थ्यांचा प्रवेश**

**कन्नड भाषेतून शिकण्यास एकही इच्छुक नाही**

नवी दिल्ली, दि. १३ (वृत्तसंस्था) - अभियांत्रिकी (इंजिनियरिंग) अभ्यासक्रम यंदापासून प्रादेशिक भाषांमधूनही शिकवला जाणार आहे. सर्वाधिक विद्यार्थ्यांनी हिंदीनंतर मराठी भाषा निवडली आहे. पहिल्याच वर्षी १२३० जागांपैकी २५५ जागा भरल्या. त्यात ११६ जणांनी हिंदीचा तर ६० जणांनी मराठीचा पर्याय निवडला आहे. मातृभाषेचा नेहमी उदो उदो करणाऱ्या कर्नाटकातील एकही विद्यार्थी आपल्या कन्नड भाषेतून इंजिनीअर होण्यास इच्छुक नाही, अशी आकडेवारी सांगते.

नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये प्रादेशिक भाषांमधून शिक्षण देण्याचा आग्रह धरला आहे. त्यानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) यंदापासून इंजिनियरिंग अभ्यासक्रम प्रादेशिक भाषांमधूनही सुरू करण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी एआयसीटीईने एक सर्वेक्षण करून इंजिनियरिंगला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. सुमारे ४४ टक्के विद्यार्थ्यांनी प्रादेशिक भाषेमध्येही इंजिनियरिंगचे शिक्षण मिळाले पाहिजे, असे मत व्यक्त केले होते.

एआयसीटीईने यंदापासून प्रादेशिक भाषांमधूनही इंजिनियरिंगचे अभ्यासक्रम सुरू केले. त्यासाठी देशातील १९ इंजिनियरिंग महाविद्यालयांमध्ये १२३० जागांना मान्यता देण्यात आली. त्यातील फक्त २१ टक्के जागा भरल्या गेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी, तामिळ, तेलुगू आणि बंगाली या भाषांचा पर्याय निवडला आहे. तामिळ भाषेतून ५०, बंगाली १६ तर तेलुगू भाषेतून १३ विद्यार्थी इंजिनियर होण्यास इच्छुक आहेत. एकाही विद्यार्थ्याने कन्नड भाषेची निवड केलेली नाही.

कन्नड ही कर्नाटकची मातृभाषा आहे. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाईल, अशी घोषणा करणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य होते. मात्र, तेथील एकाही विद्यार्थ्याने कन्नड भाषेचा पर्याय इंजिनियरिंग प्रवेशासाठी निवडला नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

Pune Edition
Jan 14, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

लोकमत

दुसऱ्या क्रमांकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

# 'शोधगंगा'त पहिल्या दहात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**योगेश पांडे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशांनुसार 'शोधगंगा' या संकेतस्थळावर विविध विद्यापीठांकडून पीएच. डी. प्रबंध अपलोड करण्याबाबत योगदान देण्यात येत आहे. परंतु महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये याबाबत काहीशी उदासीनता दिसून येत आहे. सर्वात जास्त योगदान देणाऱ्या पहिल्या दहा विद्यापीठांत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या राज्यातील केवळ एकाच विद्यापीठाचा समावेश आहे.

भारतातील सर्व विद्यापीठांतील संशोधकांचे अंतिम संशोधन अहवाल एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत, नवीन संशोधकांना संशोधनातील एकसारखेपणा टाळता यावा, त्यांना प्रबंधांबाबत मार्गदर्शन मिळावे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे साहित्य चोरी थांबावी यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे 'शोधगंगा' व 'शोधगंगोत्री' हे प्रकल्प सुरू करण्यात आले. आयोगाच्या दिशानिर्देशांनुसार प्रत्येक विद्यापीठाला 'पीएच.डी' प्रबंध येथे 'अपलोड' करण्यासाठी पाठविणे अनिवार्य आहे. **(पान ५ वर)**

### विद्यापीठ - अपलोड झालेले पीएच.डी. प्रबंध

| | |
|---|---|
| ११,३४१ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ |
| ५,२३५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ |
| ४,४९० | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ |
| ४,२७८ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| १,१५१ | एसएनडीटी महिला विद्यापीठ |
| १,०३४ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ |
| ६०४ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ |
| ५६४ | मुंबई विद्यापीठ |
| २०६ | पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ |
| ५६ | गोंडवाना विद्यापीठ |
| २ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ |



Pune Main
Page No. 5 Jan 14, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# 'शोधगंगा'त पहिल्या दहात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पान १ वरुन )** २०१० नंतर विविध विद्यापीठांनी 'इन्फ्लिबनेट'सोबत सामंजस्य करार केला. परंतु प्रत्यक्षात काही विद्यापीठांनीच नियमितपणे पीएच.डी.प्राप्त उमेदवारांचे प्रबंध पाठविणे सुरू ठेवले. मद्रास विद्यापीठाचे 'शोधगंगा'वर सर्वात जास्त १३ हजार ३१ पीएच.डी. प्रबंध आहेत. आतापर्यंत देशातील ३ लाख ३५ हजार ११० पीएच.डी. प्रबंध 'शोधगंगा'वर असून त्यात महाराष्ट्रातील पारंपरिक विद्यापीठांचे योगदान २८ हजार ९६९ (८.६४ टक्के) इतके आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आतापर्यंत ११ हजार ३४१ प्रबंधांचे योगदान देण्यात आले आहे. त्याखालोखाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा (५ हजार २३५) समावेश आहे. या यादीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा (४ हजार ४९०) तिसरा क्रमांक येतो.

**नागपूर विद्यापीठ तळाशी** - राज्यातील इतर विद्यापीठांच्या तुलनेत विदर्भातील विद्यापीठे यात माघारल्याचे दिसून येत आहे. नागपूर विद्यापीठाचे सर्वात कमी दोन पीएच.डी. प्रबंध 'शोधगंगा'वर आहेत. राज्यातील देखील ही सर्वात कमी संख्या आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे १ हजार ३४ व गोंडवाना विद्यापीठातर्फे ५६ पीएच.डी. प्रबंधांचे योगदान देण्यात आले आहे.

Pune Main
Page No. 9 Jan 14, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षा लांबणार

## एजन्सीच निवडली नाही : ऑनलाईनच परीक्षा घेणार कोण?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले. परंतु, परीक्षा कोणत्या एजन्सीमार्फत घेतली जाणार? याबाबतच्या प्रशासकीय निर्णयावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यामुळे परीक्षा सुरू करण्यास काही दिवस विलंब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठातर्फे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेतल्या जात आहेत. परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी विद्यापीठाने प्रॉक्टर्ड पद्धतीने परीक्षा घेतल्या. परंतु, त्यातही अनेक विद्यार्थी गैरप्रकार करीत असल्याचे आढळून आले. गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे येत्या फेब्रुवारी-मार्च महिन्यांत होणाऱ्या प्रथम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे नुकतेच जाहीर करण्यात आले.

ऑनलाईन परीक्षा घेण्याचे जाहीर केले असले तरी; त्या प्रॉक्टर्ड पद्धतीने होणार आहेत की नाही. परीक्षा कोणत्या एजन्सीमार्फत घेतल्या जातील. प्रत्येक विद्यार्थ्याच्या परीक्षेसाठी किती रुपये खर्च केले जातील याबाबतचे प्रशासकीय निर्णय अध्यापक विद्यापीठ प्रशासनाने घेतलेले नाहीत. विद्यापीठाच्या परीक्षा मंडळात (बीओई) व्यवस्थापन परिषदेत आणि पर्चेस कमिटीमध्ये परीक्षेसंदर्भातील निर्णयांवर शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यामुळे या सर्व बैठकांचे आयोजन करून त्यात परीक्षेसंदर्भातील निर्णय घ्यावे लागणार आहेत. परिणामी विद्यापीठाच्या परीक्षा काही दिवस लांबणार आहेत, असे सूत्रांनी सांगितले. विद्यापीठातर्फे गेल्यावर्षी एसपीपीयु एज्युटेक फाउंडेशन या विद्यापीठाच्या कंपनीमार्फत ऑनलाइन परीक्षा घेण्यात आल्या. काही अपवाद वगळता सर्व परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. त्यामुळे पुन्हा विद्यापीठाच्या कंपनीकडेच परीक्षा घेण्याची जबाबदारी दिली जाऊ शकते, असेही सूत्रांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Jan 14, 2022
Powered by: erelego.com

# State education board firm on offline exam this yr

**Namrata Devikar**
puneletters@htlive.com

**PUNE:** While the state board has scheduled offline exams in March and April this year, teachers and principals from various schools have noted that some topics excluded from the syllabus are crucial for students. The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE) will conduct offline exams for class 12 and class 10.

Last year, 25 per cent of syllabus was slashed for all standards after the Covid outbreak.

Harishchandra Gaikwad, president, Pune district principals' association, said that basics of subjects taught in class 9 and class 11 are not part of class 10 and class 12 reduced syllabus respectively. "So, teachers of class 10 and class 12 have to teach the basic subjects of class 9 and class 11 to the students," said Gaikwad. Sharad Gosavi, chairman, MSBSHSE, said that the decision to reduce syllabus is taken by the Maharashtra State Council of Educational Research and Training (SCERT).

"We have reduced the syllabus to help students. Many students have lost the habit of writing after classes resumed post Covid lockdowns. Hence, we have given students half and an hour more in offline examination scheduled from March. We are firm on the decision of taking offline exam as online format is not feasible in Maharashtra due to the varied geography of the state and the fact that not all students can have access to mobile or laptop to appear for the test," said Gosavi. He urged students of 15-18 age group to get vaccinated at the earliest.

"Vaccination of students will ensure that they are safe. All teaching and non-teaching staff are already getting fully vaccinated," said Gosavi.

Though the state board officials have decided to conduct examination offline, the final decision will be taken by the state government depending on the prevailing Covid situation.

> Many students have lost the habit of writing after classes resumed post Covid lockdowns. Hence, we have given students half and an hour more in offline examination scheduled from March.
>
> **SHARAD GOSAVI**, chairman, MSBSHSE

Hindustan Times 14.1.2022

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

### 'अर्धमागधी'च्या परीक्षेत बदल

**पुणे :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेच्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात आला आहे. या बदलानुसार भाषा विषयासाठी पर्याय असलेल्या जैन धर्मीयांच्या 'अर्धमागधी' या भाषेचा पेपर आता ७ मार्चऐवजी ८ मार्चला होईल, असे मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त वेळापत्रकात इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

बारावीमध्ये विद्यार्थ्यांना अर्धमागधी हा भाषा विषय शिकता येतो. बारावीच्या वेळापत्रकानुसार त्याचा पेपर सोमवार, ७ मार्च २०२२ ला होणार होता; पण त्यात आता बदल करण्यात आला असून, तो मंगळवारी ८ मार्चला दुपारी ३ ते ६.३० या वेळेत होणार आहे. याशिवाय वेळापत्रकात कोणताही बदल नसल्याचे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दहावी आणि बारावीच्या आगामी परीक्षा ऑफलाइनच होणार असल्याचे राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे.

Maharashtra Times 15.1.2022

पुढारी

### आता विद्यार्थी करणार योगशास्त्रावर संशोधन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

भारताच्या समृद्ध परंपरेचा एक महत्त्वपूर्ण आधार असणारी अभिजात योगसाधना समजून घेणे, तिचा सखोल अभ्यास करणे आणि त्यात संशोधन करणे याची अनोखी संधी आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. विद्यापीठाने यासंदर्भात एक आश्वासक पाऊल उचलले असून त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महर्षी विनोद रिसर्च फाउंडेशन (एम. व्ही. आर. एफ.) बरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि महर्षी विनोद रिसर्च फाउंडेशनचे संस्थापक आत्मयोगगुरू डॉ. संप्रसाद विनोद यांनी महर्षी न्यायरत्न विनोद यांच्या १२० व्या, तसेच स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त या करारावर पुणे विद्यापीठात स्वाक्षऱ्या केल्या.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि एम. व्ही. आर. एफ.मध्ये सामंजस्य करार

डॉ. करमळकर म्हणाले, ''योग म्हणजे फक्त आसने किंवा सूर्यनमस्कार नव्हे, तर तो स्व-शोधाचा एक प्रवास आहे. योगाभ्यासातून ती दिशा विद्यार्थ्यांना मिळावी, म्हणून हा सामंजस्य करार करण्यात आला.''

डॉ. संप्रसाद विनोद म्हणाले, ''मानसशास्त्रीय अभ्यासामध्ये ज्या संकल्पना शिकवल्या जातात त्यांच्या मुळाशी जाण्यासाठी योगाभ्यास निश्चितच उपयुक्त ठरतो. मनाचा तळ गाठण्यासाठी, खऱ्या मन:शांतीसाठी विद्यार्थ्यांना योगसाधना आणि योगाभ्यास नक्कीच उपयुक्त ठरेल.''

My Pune Edition
Jan 15, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

सकाळ

### बारावीच्या परीक्षेत अंशतः बदल

**पुणे, ता. १४ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत इयत्ता बारावीची परीक्षा ४ ते ३० मार्च या कालावधीत होणार आहे. या परीक्षेचे वेळापत्रकही मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले असून ते शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनाही देण्यात आले आहे.

मात्र, नियोजित वेळापत्रकानुसार ७ मार्च रोजी 'अर्धमागधी' विषयाची परीक्षा होणार होती. मात्र, या अंशत: बदल करण्यात आला असून आता या विषयाची परीक्षा ८ मार्च रोजी दुपारी तीन ते सायंकाळी साडेसहा या वेळेत होणार आहे. उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल केला नसल्याचे मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले.

Pune, Main
15/01/2022 Page No. 2

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

पसरलेली असते.

16-1-22

# आता उच्च शिक्षणाची 'एबीसी'

### बहुशाखा अभ्यासक्रमांच्या प्रयोगाला मान्यता

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

उच्च शिक्षणात विद्यार्थीस्नेही शिक्षण आणत असताना विविध प्रयोग सुरू आहेत. यातच आता विद्यापीठ अनुदान आयोग बहुशाखा अभ्यासक्रमांचा प्रयोग करणार आहे. यामध्ये विद्यार्थ्याला त्याचा अभ्यासक्रम स्वतः ठरवता येणार आहे; तसेच त्याने तो एकाच कॉलेजातून पूर्ण करावा, असेही अपेक्षित नाही. या प्रयोगाची चाचपणी गेल्या काही महिन्यांपासून सुरू होत होती. यावर आता अखेर शिक्कामोर्तब झाले असून, विद्यापीठांना आता 'ॲकॅडमिक क्रेडिट बँक' (एबीसी) प्रणाली सुरू करावी लागणार आहे. इतकेच नव्हे तर ही प्रणाली विद्यापीठांचे मूल्यांकन करणाऱ्या 'नॅक' आणि 'एनआयआरएफ'साठीही ग्राह्य धरली जाणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट बँक'ची स्थापना केली आहे. यामध्ये देशभरातील सर्व शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुण ठेवले जाणार आहेत. म्हणजे एखाद्या विद्यार्थ्याने एखाद्या शाखेचे शिक्षण एका कॉलेजमधून आणि दुसऱ्या विषयाचे शिक्षण दुसऱ्या कॉलेजमधून घेतले, तरी त्याचे गुण या बँकेत साठविले जाणार आहेत. 'राष्ट्रीय शिक्षण धोरणा'त याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. ही ॲकॅडमिक क्रेडिट बँक वैयक्तिक युनिक आयडीवर साठविली जाणार आहे. यासाठी एक कार्यप्रणालीही 'यूजीसी'ने जाहीर केली आहे. यामध्ये विद्यार्थी एका संस्थेतून दुसऱ्या शिक्षण संस्थेत जाताना कोणताही कागद न घेता, हा युनिक आयडी क्रमांक घेऊन गेला तरी त्या संस्थेला विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती एका क्लिकवर पाहता येऊ शकणार आहे.

### काय आहे क्रेडिट बँक?

'नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट बँक'मध्ये विद्यार्थ्याने मिळवलेल्या प्राविण्याची नोंद ठेवली जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना एका वेळी अनेक अभ्यासक्रम शिकता येणार आहेत. विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या एखाद्या विद्यार्थ्याला इतिहासाचा अभ्यास करावयाचा असेल, तर तो पर्याय त्याला या माध्यमातून खुला होणार आहे. या विद्यार्थ्याला दुसऱ्या शाखेत पाहिजे तो विषय तो शिकत असलेल्या संस्थेत उपलब्ध नसेल, तर तो दुसऱ्या संस्थेत जाऊनही हे शिक्षण घेऊ शकतो, अशी मुभाही असेल. याचबरोबर विद्यार्थ्याला काही काळ थांबून एखादा वेगळा अभ्यासक्रम किंवा स्टार्टअप असे काही करायचे असेल, तर तो 'नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट बँक'मध्ये नोंद करून अभ्यासक्रमातून काही काळ सुट्टी घेऊ शकतो. जेव्हा तो विद्यार्थी परत अभ्यासक्रम करू इच्छित असेल, तेव्हा तो या वेबसाइटवर पुन्हा लॉग-इन करून पुढचा अभ्यासक्रम सुरू करू शकतो. या योजनेमुळे देशातील उच्च शिक्षणाची नवी कवाडे खुली होतील तसेच उच्च शिक्षणाला नवे बळ मिळेल. यामुळे शैक्षणिक संस्थांना अधिक विद्यार्थीस्नेही शिक्षण द्यावे लागणार असल्याचे आयोगाने या योजनेच्या संकल्पपत्रात स्पष्ट केले आहे.

CS Scanned with CamScanner

Maharashtra Times 16.1.2022

पुढारी

# विद्यापीठांवर राज्यपालांनी केलेल्या नियुक्त्या रद्द करण्याच्या हालचाली

### राज्यपाल-सरकारमधील संघर्ष उफाळण्याच्या मार्गावर

मुंबई : राज्यात भाजप सरकार असताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी विविध विद्यापीठांच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषदांवर केलेल्या नियुक्त्या रद्द करण्याच्या हालचाली सुरू आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील सहा नियुक्त्यांचा समावेश आहे. राज्य सरकारने या नियुक्त्या रद्द केल्यास राज्यपाल आणि सरकार यांच्यामधील संघर्ष आणखी उफाळून येण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडी सरकारने विधान परिषदेवर १२ सदस्य नियुक्तीसाठी राज्यपालांकडे ठराव पाठवला आहे; पण या ठरावाकडे राज्यपालांनी कानाडोळा केला आहे. राज्यपालांवर कुरघोडी म्हणून विधानसभेत झालेल्या गदारोळाचा फायदा घेत सरकारने भाजपाच्या बारा आमदारांचे निलंबन केले. यावरून सरकार आणि राज्यपालांमध्ये सुप्त वाद सुरू असतानाच आता सरकारने राज्यपाल नियुक्त अधिसभा आणि व्यवस्थापन परिषदांवरील नियुक्त्या रद्द केल्यास या संघर्षात आणखी भर पडण्याची शक्यता आहे.

नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात महाविकास आघाडी सरकारने राज्य विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्याचे विधेयक संमत केले. त्यावरून भाजपच्या अनेक नेत्यांकडून टीका सुरू आहे. विद्यापीठ सुधारणा विधेयकामध्ये करण्यात आलेल्या सुधारणेमुळे प्र-कुलपतिपदी विद्यमान उच्च व तंत्रशिक्षणमंत्री असणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या कामकाजात सरकार आणि मंत्र्यांचा थेट हस्तक्षेप वाढेल, असा आरोपही भाजपकडून करण्यात येत आहे.

भाजपकडून सरकारवर टीकेची झोड उठवली जात असताना युवक काँग्रेस उपाध्यक्ष कुणाल राऊत यांनी राज्यातील विद्यापीठांच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषदेवर राज्यपालांनी भाजपशी संबंधित काही संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या केल्याचे उघड केले आहे.

तसेच भाजपने राज्यपालांच्या आडून अनेक विद्यापीठांचे कुलगुरू नियुक्त करत असताना निकषाकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोपही राऊत यांनी केला आहे.

**विद्यापीठांच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषदेवर राज्यपाल नियुक्त भाजप पदाधिकाऱ्यांची संख्या**

१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ - १०
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - ६
३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर - ८
४) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर - ६
५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात - ९
६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ - ९
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ - ६
८) मुंबई विद्यापीठ - ८
९) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली - १०
१०) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव - ७
११) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ - प्रत्येकी १

Pune Edition
Jan 16, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

पुढारी

# विद्यापीठाची परीक्षा 'ऑनलाइन'च

गणेश खळदकर

**पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सत्र परीक्षा 'ऑनलाइन' स्वरूपातच येत्या १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. यंदा पहिल्यांदाच ही परीक्षा २०१९ च्या पॅटर्नप्रमाणे १०० टक्के अभ्यासक्रमावर घेण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना येत्या २० जानेवारीपर्यंत अर्ज भरता येणार आहेत. आतापर्यंत ६ लाख १० हजार १२० विद्यार्थ्यांनी अर्ज भरले असून अजूनही तब्बल २ लाख ९ हजार ६९४ विद्यार्थी अर्ज भरण्याचे बाकी असल्याची माहिती विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.**

पुढारी विशेष

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोरोना काळात पुणे विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षा या अभ्यासक्रम किती झाला, त्यानुसार घेतल्या होत्या, परंतु यंदा पहिल्यांदाच १०० टक्के अभ्यासक्रमावर आधारित 'ऑनलाइन' परीक्षा होणार आहे. यंदा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे विद्यापीठाकडून राबविण्यात येणारे 'पॅटर्न' बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या 'पॅटर्न'च्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने समकक्षता देण्याचा निर्णय घेतला आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांना जुन्या 'पॅटर्न'चा समकक्ष विषय द्यायचा आहे. जर विद्यार्थ्यांना तसा विषय उपलब्ध नसेल तर विद्यार्थ्यांनी तसे अर्जात नमूद करायचे आहे. संबंधित विषयांची परीक्षा विद्यापीठ नंतर घेणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानेच संबंधित 'पॅटर्न' रद्द करण्याच्या सूचना दिल्या होत्या, परंतु केवळ विद्यार्थी हिताचा विचार करून आजपर्यंत संबंधित निर्णय घेण्यात आला नव्हता. आता मात्र विद्या परिषद तसेच परीक्षा मंडळाने संबंधित 'पॅटर्न' बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.



त्यामुळे जुन्या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना काही जुने-नवे विषय घेऊन परीक्षा द्यावी लागणार आहे. तर अन्य विद्यार्थ्यांना मात्र २०१९ च्या पॅटर्ननुसार परीक्षा देता येणार आहे.

**परीक्षेचे अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांची आकडेवारी दृष्टीक्षेपात**

| शाखेचे नाव | अपेक्षित विद्यार्थी | अर्ज भरलेले विद्यार्थी | प्रलंबित विद्यार्थी |
|---|---|---|---|
| कला | १८८४७४ | ९२३१५ | ९६१५९ |
| वाणिज्य | २२१८७० | १८८९७० | ३२९०० |
| एज्युकेशन | २१८१ | ७०५ | १४७६ |
| अभियांत्रीकी | २२९१७८ | १६४१४५ | ६५०३३ |
| विधि | २४३८९ | १२१३६ | १२२५३ |
| व्यवस्थापन | २८७६४ | ३०५६४ | -१८०० |
| एमएमएस | ४७५ | ३४९ | १२६ |
| फार्मसी | २२९३२ | २३०२३ | ९१ |
| विज्ञान | १०१५५१ | ९७९१३ | ३६३८ |
| एकूण | ८१९८१४ | ६१०१२० | २०९६९४ |

- **२० जानेवारीपर्यंत परीक्षेसाठीचे अर्ज भरता येणार**
- **२०१९ च्या पॅटर्ननुसार होणार परीक्षा ; पूर्वीचे सर्व पॅटर्न होणार रद्द**
- **६ लाख १० हजार १२० विद्यार्थ्यांनी भरले अर्ज**
- **अद्यापही २ लाख विद्यार्थ्यांकडून अर्ज येणे बाकी**

### दीड लाख विद्यार्थ्यांचे अर्ज अडविले

विद्यार्थ्यांना परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी २० जानेवारीपर्यंत मुदत दिली आहे, परंतु आत्तापर्यंत ६ लाख १० हजार १२० विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. यातील ४ लाख ६० हजार ४८१ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडून इनवर्ड करण्यात आलेले आहेत. तर अद्यापही १ लाख ४९ हजार ६८९ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडून इनवर्ड करणे बाकी आहे. त्यामुळे परीक्षा अर्ज भरताना महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची अडवणूक होत असल्याचे वास्तव उघडकीस आले आहे. यामध्ये कला शाखेचे २७ हजार ३३३, वाणिज्य शाखेचे ४८ हजार ४४८, एज्युकेशन शाखेचे १६४, अभियांत्रीकी शाखेचे १६ हजार २२८, विधि शाखेचे ६ हजार ३१९, व्यवस्थापन शाखेचे २० हजार ४५४, एमएमएस शाखेचे ९, फार्मसी शाखेचे ३ हजार ५८४ तर विज्ञान शाखेच्या २७ हजार १५० अर्जांचा समावेश आहे.

### पेपर सेटिंगची दुकानदारी होणार बंद

परीक्षा व मूल्यमापन मंडळाने फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या परीक्षेपासून सर्व जुने पॅटर्न बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. २००३ पासून आत्तापर्यंत सुरू असलेले विविध पॅटर्न बंद करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना २०१९ च्या पॅटर्ननुसारच परीक्षा द्यावी लागणार आहे. एखादा-दुसरा पेपर सेट करण्यासाठी महाविद्यालयातून कामाची सुटका करून विद्यापीठात येणाऱ्या आणि पेपर सेट करण्यासाठी मानधन घेणाऱ्या प्राध्यापकांची पेपर सेटिंगची दुकानदारी त्यामुळे बंद होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. तर विद्यार्थ्याला हव्या असलेल्या पेपरपेक्षा दुसराच पेपर मिळण्याच्या त्रासातून परीक्षा व मूल्यमापन मंडळाची सुटका होणार आहे.

Pune Edition
Jan 16, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# 'शोधगंगा'मध्ये विद्यापीठे मागे

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ११,३४१; तर 'मुंबई'चे फक्त ५६४ प्रबंध अपलोड

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशानुसार विद्यापीठांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना पीएचडी मिळते त्या सर्व विद्यार्थ्यांचे पीएचडी प्रबंध 'शोधगंगा' या वेबसाइटवर अपलोड करणे बंधनकारक आहे; मात्र याबाबत राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वगळता अन्य विद्यापीठ फारसे उत्सुक नसल्याचे चित्र आकडेवारीवरून समोर आले आहे. मुंबई विद्यापीठाने आतापर्यंत ५६४ प्रबंधच अपलोड केलेले आहेत. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. राज्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पीएचडीचे ११ हजार ३४१ प्रबंध अपलोड करण्यात आले आहेत.

देशातील सर्व विद्यापीठांतील संशोधकांचे अंतिम संशोधन अहवाल एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत, नवीन संशोधकांना संशोधनातील एकसारखेपणा टाळता यावा; तसेच वाङ्मयचौर्य होऊ नये यासाठी हे साहित्य एकाच ठिकाणी असावे या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोगाने 'शोधगंगा' व 'शोधगंगोत्री' हे प्रकल्प सुरू करण्यात आले. आयोगाच्या निर्देशांनुसारी प्रत्येक विद्यापीठाला पीएचडी प्रबंध येथे अपलोड करणे अनिवार्य आहे. २०१० नंतर विविध विद्यापीठांनी 'इन्फ्लिबनेट'सोबत करार केला; परंतु प्रत्यक्षात काही विद्यापीठांनी पीएचडी प्राप्त उमेदवारांचे प्रबंध पाठविणे सुरू ठेवलेच नाही. यामुळे दर वर्षी पीएचडी प्राप्त करणारे विद्यार्थी आणि या वेबसाइटवर अपलोड होणारे प्रबंध यांच्यात तफावत दिसून येत आहे. देशात प्रबंध अपलोड करण्यामध्ये मद्रास विद्यापीठ अव्वल असून, या विद्यापीठाचे 'शोधगंगा'वर सर्वाधिक १३ हजार ३१ प्रबंध आहेत. दुसरा क्रमांक हा सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा येतो.

### शिक्षक नियुक्तीचा प्रश्न



'विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या २००९ च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जे पीएचडीचे प्रबंध 'इन्फ्लिबनेट'वर अपलोड करून त्यांनी आयोगाच्या नियमावलीनुसार सर्व पात्रता पूर्ण केली आहे. अशाच पीएचडी उमेदवारांना नेट-सेटमधून सूट देण्याची तरतूद आहे. असे असूनही राज्यात एक हजाराच्या वर अशी पात्रता पूर्ण न करणाऱ्या पीएचडीधारकांच्या नियुक्ती करण्यात आल्या आहेत, असे ऑल इंडिया नेट सेट टीचर्स ऑर्गनायझेशन व नॅशनल फॉर्म फॉर क्वालिटी एज्युकेशन यांच्या माध्यमातून उच्च शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव यांना आम्ही निवेदन सादर केले होते,' असे संघटनेचे कुशल मुडे यांनी सांगितले. यावर उच्च शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव यांनी तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

### विद्यापीठ व 'शोधगंगा'वर अपलोड प्रबंधांची संख्या

| विद्यापीठ | अपलोड झालेले पीएचडी प्रबंध |
|---|---|
| सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | ११,३४१ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | ५,२३५ |
| स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ | ४,४९० |
| शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४,२७८ |
| एसएनडीटी महिला विद्यापीठ | १,१५९ |
| संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ | १,०३४ |
| कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ | ६०४ |
| मुंबई विद्यापीठ | ५६४ |
| पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ | २०६ |
| गोंडवाना विद्यापीठ | ५६ |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ | २ |

('शोधगंगा'वरील आकडेवारीनुसार)

Maharashtra Times 16.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

लोकमत

# 'खाशाबा जाधव' यांचा पुतळा आता विद्यापीठात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्राची आवड निर्माण व्हावी व सर्व खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उभारण्यात आलेल्या क्रीडा संकुलात ''खाशाबा जाधव'' यांचा पूर्णाकृती पुतळा लवकरच विद्यापीठात उभारला जाणार आहे.

ऑलिम्पिक मैदानावर भारताचा तिरंगा डौलाने फडकावणारे व देशाला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक जिंकून देणारे मराठमोळे पैलवान स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने क्रीडा संकुलाला ''खाशाबा जाधव'' यांचे नाव देण्याचा निर्णय काही महिन्यांपूर्वी घेतला आहे. आता येथे त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या विविध क्रीडा प्रकारांचा सराव करता यावा, या उद्देशाने विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठ आवारातील तब्बल २७ एकर जागेत सर्व प्रकारचे इनडोअर व आऊट डोअर खेळ खेळण्याची सुविधा निर्माण केली आहे.

> विद्यापीठात उभारण्यात आलेल्या क्रीडा संकुलाचे काम जवळजवळ पूर्ण झाले असून, लवकरच त्याचे उद्घाटन केले जाईल. क्रीडा संकुलामध्ये खाशाबा जाधव यांचा पूर्णाकृती पुतळा उभा केला जाणार असून, सध्या पुतळा तयार करण्याचे काम सुरु आहे.
>
> **- डॉ. संजय चाकणे, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

विद्यापीठाने या क्रीडा संकुलासाठी सुमारे ५० कोटी रुपये खर्च केले आहेत. त्यातील काही रक्कम विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झाली असून, काही राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाकडून (रुसा) मिळाली आहे. उर्वरित रक्कम विद्यापीठाने स्वत: खर्च केली आहे. सुमारे पाच ते सहा वर्षांपासून सुरू असलेल्या या क्रीडा संकुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. बालेवाडी येथील क्रीडा संकुलानंतर विद्यापीठातील क्रीडा संकुल हे सर्वांत मोठे कीडा संकुल आहे. त्यात सुमारे १०० खेळांचे प्रशिक्षण घेता येणार आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 16, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

पुढारी

# पुणे विद्यापीठ राबविणार 'प्रत्येकाला शिकवा' उपक्रम

■ निरक्षर प्रौढ व्यक्तींना साक्षर करण्यासाठी अभियान

■ उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे २५ हजार स्वयंसेवक सहभागी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रोटरी इंडिया लिटरसी मिशन यांच्यामधील सामंजस्य करारानुसार राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांमार्फत प्रौढ शिक्षणांतर्गत प्रत्येकाला शिकवा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागातील निरक्षर प्रौढ व्यक्तींना प्रशिक्षित करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये २५ हजार स्वयंसेवक सहभागी होणार असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिली. डॉ. देसाई म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना संलग्न महविद्यालयांमधील एनएसएस विभागाच्या माध्यमातून निरक्षर प्रौढ व्यक्तींना साक्षर करण्यासाठी आवश्यक मोहीम साहित्य व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी दि. १८ जानेवारीला पुणे जिल्ह्यातील कार्यक्रम अधिकारी यांचे प्रशिक्षण ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर स्वयंसेवकांनादेखील प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये निरक्षर प्रौढ व्यक्तींना साक्षर कसे करायचे, त्यासाठी कोणते साहित्य वापरायचे, याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

प्रत्येक स्वयंसेवकाने गावात किंवा शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या किमान पाच आणि जास्तीत जास्त दहा निरक्षर लोकांना साक्षर करायचे आहे. ज्या व्यक्तींना साक्षर करण्यात आले आहे त्यांना नेमके काय येते याचे मूल्यांकन केल्यानंतरच प्रमाणपत्र दिले जाणार आहे. हा उपक्रम वर्षभर सुरू राहणार असून पहिल्या टप्प्यात लिहिणे, वाचणे आणि दुसऱ्या टप्प्यात संबंधित निरक्षर लोकांना डिजिटल साक्षर करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आल्याचे डॉ. देसाई यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे निरक्षर लोकांना साक्षर होण्याची एक चांगली संधी निर्माण होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

My Pune Edition
Jan 17, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# नववी ते बारावीच्या मुलांसाठी चर्चासत्र

**विद्यार्थ्यांना परीक्षा आणि करिअरविषयी मिळणार मार्गदर्शन**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या शाळांमधील नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी करिअरबाबत विविध विषयांचे मार्गदर्शन मिळावे, या हेतूने व्यवसाय मार्गदर्शन दिनानिमित्त राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

दहावी-बारावीनंतर पुढे काय, कुठे जावे, काय निवडावे, असे प्रश्न विद्यार्थ्यांना व पालकांना नेहमी सतावत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी योग्य ते विश्वासार्ह मार्गदर्शन धुंडाळण्याचा प्रयत्न केला जातो. याच प्रयत्नांना बळ देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेने राज्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षकांसाठी करिअर वेबिनारचे आयोजन केले आहे. त्याआधारे आपल्या आवडीच्या क्षेत्राचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रियेचे मार्गदर्शन घेता येणार आहे. त्यामुळे भविष्याच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळाला आहे.

वेबिनारचे प्रक्षेपण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या यूट्यूब चॅनलवरून करण्यात येणार आहे.

परिषदेने दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून किंवा दिलेल्या लिंकवर क्लिक करून वेबिनारमध्ये सहभागी होता येणार असल्याचे परिषदेचे संचालक एम. डी. सिंह यांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Jan 17, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

| विषय | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| शालेय विषय व करिअर निवड | २१ जानेवारी | दुपारी ३ ते ४.३० |
| अभ्यास सवयी व ताणतणाव व्यवस्थापन | २८ जानेवारी | दुपारी ३ ते ४.३० |
| परीक्षेला सामोरे जाताना | ४ फेब्रुवारी | दुपारी ३ ते ४.३० |
| महाकरिअर पोर्टल | ११ फेब्रुवारी | दुपारी ३ ते ४.३० |

Pune Edition
Jan 17, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

पुढारी

# अकरावी सीईटीचे शुल्क परत मिळणार

विद्यार्थ्यांच्या खात्यावर १४३ रुपये होणार जमा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्य सरकारने २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठीची अकरावी सीईटीची परीक्षा रद्द केली होती. त्यामुळे या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना १४३ रुपयांचा परतावा करण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडून देण्यात आली आहे.**



कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दहावीची २०२१ ची परीक्षा रद्द करण्यात आली. मात्र, अकरावी प्रवेशासाठी अडचण येऊ नये, यासाठी अकरावीसाठी स्वतंत्र सीईटी परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार दहावीच्या विद्यार्थ्यांनी सीईटीसाठी १७८ रुपये भरून अर्ज केला. मात्र, कालांतराने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने सीईटी परीक्षा रद्द केली. त्यामुळे या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना ३५ रुपये प्रक्रिया शुल्क कपात करून, १४३ रुपये परत करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील साधारण १२ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना हा शुल्क परतावा मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी राज्य मंडळाने शुल्क परत करण्याबाबत सूचना प्रसिद्ध केली होती. त्यानंतर माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. शुल्क ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले असल्यास, ते त्याच मार्गाने परत करण्यात येईल. त्यामुळे शुल्क हे थेट बँक खात्यात जमा होणार आहे, अशी माहिती संचालक महेश पालकर यांनी दिली आहे.

Pune Edition
Jan 17, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षा एसपीपीयू एज्युटेक घेणार

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे येत्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात घेतल्या जाणाऱ्या कला, वाणिज्य, विज्ञान आदी शाखेच्या प्रथम सत्र परीक्षा एसपीपीयु एज्युटेक फाउंडेशनमार्फत घ्याव्यात, याबाबतचा पत्रव्यवहार विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने कुलगुरू कार्यालयाकडे केला आहे, त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने सुरळीत पार पडतील, अशी अपेक्षा आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ऑनलाइन परीक्षा घेण्याचे निर्देश व सर्व विद्यापीठांना गेले आहेत. त्यानुसार विद्यापीठाने फेब्रुवारी व मार्च महिन्यात परीक्षा घेतल्या जाणार असल्याचे जाहीर केले आहे; परंतु परीक्षा कोणत्या एजन्सीमार्फत येणार, हे अद्याप स्पष्ट झाले नव्हते. विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत व व्यवस्थापन परिषदेत याबाबत चर्चा करण्यात आली नव्हती; परंतु विद्यापीठाचे कुलगुरू विशेष अधिकारांचा वापर करून परीक्षेसंदर्भातील निर्णय घेऊ शकतात; तसेच एसपीपीयु एज्युटेक फाउंडेशन सुरळीत परीक्षा घेतल्या आहेत. त्यामुळे परीक्षा घेण्याची जबाबदारी याच कंपनीकडे देण्याबाबत परीक्षा विभागाने कुलगुरू कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला आहे, असे परीक्षा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 4 Jan 17, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

# 'पदवी उद्योगा'ला लागणार चाप

## ॲपच्या साह्याने अभ्यासक्रम सुरू करणाऱ्यांवर बडगा

Niraj.Pandit
@timesgroup.com
Tweet : @nirajcpanditMT

**मुंबई :** एखाद्या विद्यापीठाशी करार करायचा, नवनवीन अभ्यासक्रम सुरू करून विद्यापीठाच्या नावावर विद्यार्थ्यांकडून पैसे उकळायचे आणि त्यापैकी नाममात्र रक्कम विद्यापीठाला देऊन पदवी द्यायची या शिक्षणसंस्थांच्या 'उद्योगा'ला आता चाप लागणार आहे. असे करार करणाऱ्या शैक्षणिक संस्था; तसेच ॲप आधारित कंपन्यांवर कारवाई करण्याचा निर्णय 'विद्यापीठ अनुदान आयोग' (यूजीसी) आणि 'अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद' (एआयसीटीई) ने घेतला आहे.



ऑनलाइन अथवा ॲप आधारित उच्च शिक्षण देणाऱ्या खासगी कंपन्यांच्या वेबसाइटवर आयआयटीसह अन्य नामांकित विद्यापीठाच्या विविध पदव्यांचे शिक्षण उपलब्ध असल्याचे दिसते. मात्र प्रत्यक्षात हा सर्व प्रकार यूजीसी आणि एआयसीटीई यांची कोणतीही परवानगी न घेता होत होता. याबाबतचे वृत्त नोव्हेंबर २०२०मध्ये मुंबई विद्यापीठाचे एका ॲप आधारित कंपनीसोबत झालेल्या सहकार्य करारानंतर 'मटा'ने दिले होते. यानंतर या कंपन्यांनी देशातीलच नव्हे तर परदेशातील विद्यापीठांशी करार करून विविध अभ्यासक्रम सुरू केले आहेत. तसेच आम्ही तुम्हाला ठरावीक पदवी देऊ, असा दावाही या कंपन्या करीत आहेत. यासाठी केवळ विद्यापीठ आणि त्या कंपनीत करार होतो. मात्र, याची कल्पना उच्च शिक्षणातील दोन्ही शिखर संस्थाना नसायची. या कराराच्या आधारावर कंपन्या जाहिरातीही करत आहेत. हा सर्व प्रकार रोखण्यासाठी दोन्ही शिखर संस्था एकत्र आल्या आहेत. केवळ करार करून शिक्षण देणाऱ्या कंपन्या आणि शिक्षण संस्थांवर कारवाई करण्यात येईल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. 'शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण मिळावे यासाठी एखाद्या कंपनीचे ऑनलाइन व्यासपीठ वापरले तर त्याला आमची काहीच हरकत नाही. मात्र कंपन्या विद्यापीठांशी करार करून त्यांच्या नावावर आम्ही शिक्षण देत आहोत अशी बतावणी करत आहेत. म्हणून याबाबत आम्ही अधिक कठोर नियम करून त्यांच्यावर कारवाई करणार आहोत,' असे एआयसीटीईचे अध्यक्ष अनिल सहस्रबुद्धे म्हणाले.

### 'विद्यापीठांवरही कारवाई'

कंपन्यांना कोणताही सोपस्कार न करता करार करून त्यांच्या माध्यमातून पदवी देण्याचा प्रकार विद्यापीठे करीत आहेत. यामध्ये विद्यापीठाचे निर्धारित शुल्काचा नियमही धाब्यावर बसविला जातो आणि अतिरिक्त शुल्क आकारले जाते. विद्यापीठांनी आपले नाव मागे घेतले नाही तर त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते, असे संकेतही आयोगातील सूत्रांनी दिले आहे.

Maharashtra Times 17.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

# विद्यापीठाची परीक्षा ऑनलाइन

## अर्जाची मुदत २० जानेवारीपर्यंत; शुल्काअभावी विद्यार्थ्यांची अडवणूक

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने येत्या १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून, ही परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर होणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना येत्या २० जानेवारीपर्यंत अर्ज भरता येणार आहे, अशी माहिती पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाने दिली आहे. परीक्षेला एक महिना उरला असताना, शुल्क भरले नाही म्हणून दीड लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे अर्ज महाविद्यालयांनी अडवल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत सहा लाख १० हजार १२० विद्यार्थ्यांनी अर्ज भरले असून, अजूनही दोन लाख ९ हजार ६९४ विद्यार्थी अर्ज भरण्याचे बाकी असल्याची माहिती विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी दिली आहे. यंदा पहिल्यांदाच १०० टक्के अभ्यासक्रमावर आधारित ऑनलाइन परीक्षा होणार आहे. यंदाच्या परीक्षेपासून विद्यापीठाकडून राबविण्यात येणारे परीक्षा पॅटर्न बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने समकक्षता देण्याचा निर्णय घेतला आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांना जुन्या पॅटर्नचा समकक्ष विषय द्यायचा आहे. विद्यार्थ्यांना तसा विषय उपलब्ध नसेल; तर विद्यार्थ्यांनी तसे अर्जात नमूद करायचे आहे. संबंधित विषयांची परीक्षा विद्यापीठ नंतर घेणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानेच संबंधित पॅटर्न रद्द करण्याच्या सूचना दिल्या होत्या. विद्या परिषद आणि परीक्षा मंडळाने संबंधित पॅटर्न बंदच करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जुन्या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना काही जुने-नवे विषय घेउन परीक्षा द्यावी लागणार आहे; तर इतर विद्यार्थ्यांना २०१९च्या पॅटर्ननुसार परीक्षा देता येणार आहे. परीक्षेसाठी एक महिन्याचा कालावधी शिल्लक असल्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षेची कसून तयारी करणे गरजेचे असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

| शाखेचे नाव | अपेक्षित विद्यार्थी | अर्ज भरलेले विद्यार्थी | प्रलंबित विद्यार्थी |
|---|---|---|---|
| कला | १,८८,४७४ | ९२,३१५ | ९६,१५९ |
| वाणिज्य | २,२१,८७० | १,८८,९७० | ३२,९०० |
| एज्युकेशन | २,१८१ | ७०५ | १,४७६ |
| अभियांत्रिकी | २,२९,१७८ | १,६४,१४५ | ६५,०३३ |
| विधि | २४,३८९ | १२,१३६ | १२,२५३ |
| एमएमएस | ४७५ | ३४९ | १२६ |
| व्यवस्थापन | २८,७६४ | ३०,५६४ | १,८०० (जुन्या पॅटर्नचे अतिरिक्त विद्यार्थी) |
| फार्मसी | २२,९३६ | २३,०२३ | ९१ (जुन्या पॅटर्नचे अतिरिक्त विद्यार्थी) |
| विज्ञान | १,०१,५५१ | ९७,९१३ | ३,६३८ |
| **एकूण** | **८,१९,८१४** | **६,१०,१२०** | **२,०९,६९४** |

### महाविद्यालयांनी अडविले दीड लाख विद्यार्थ्यांचे अर्ज

विद्यार्थ्यांना परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी २० जानेवारीपर्यंत मुदत दिली आहे. मात्र, आतापर्यंत सहा लाख १० हजार १२० विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. यातील चार लाख ६० हजार ४८१ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडून 'इनवर्ड' करण्यात आलेले आहेत. अद्याप एक लाख ४९ हजार ६८९ विद्यार्थ्यांचे अर्ज शैक्षणिक शुल्क भरले नाही; तसेच इतर कारणांनी महाविद्यालयांकडून इनवर्ड करणे बाकी आहे. त्यामुळे परीक्षा अर्ज भरताना महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची अडवणूक होत असल्याचे उघडकीस आले आहे.

Maharashtra Times 17.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा आता २०१९च्या अभ्यासक्रमानुसार

### विद्यापीठाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०१९ पूर्वीच्या जुन्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्वतंत्रपणे न घेण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या विद्यार्थ्यांच्या विषयांना २०१९च्या अभ्यासक्रमासाठीची समकक्षता देण्यात आली असून, आता संबंधित जुन्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना २०१९च्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा द्यावी लागणार आहे.

विद्यापीठाकडून सत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये शंभर टक्के अभ्यासक्रमावर ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. याचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने जाहीर केले जाईल. विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी २० जानेवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने २०१९पूर्वीच्या जुन्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्वतंत्रपणे न घेता २०१९च्या अभ्यासक्रमानुसारच घेण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत विद्यापीठाकडून २००३पासूनचे पाच अभ्यासक्रम सुरू ठेवण्यात आले होते. मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २०१६मधील निर्णयानुसार ठरावीक कालावधीपेक्ष जास्त काळ अभ्यासक्रम सुरु ठेवल्यास संबंधित विद्यार्थ्यांची पदवी अवैध ठरू शकते. ही बाब विचारात घेऊन जुने अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परीक्ष व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ महेश काकडे यांनी दिली. जुन्या अभ्यासक्रमांचे जवळपास दहा हजा विद्यार्थी आहेत. त्यांच्या परीक्षांसाठी प्रत्येकवेळी स्वतंत्र प्रश्नपत्रिका तया कराव्या लागत होत्या. प्रश्नपत्रिकांची संख्याही बरीच होती. जुन्या आणि नव्या अभ्यासक्रमाचे नाव सारखे असल्यास गोंधळ व्हायचा, निकाला त्रुटी निघायच्या, निकालाला विलंब व्हायचा. आता जुन्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा बंद करून संबंधित विषयांना २०१९च्या अभ्यासक्रमानुसार समकक्षता देण्यात आली आहे, असेही डॉ. काकडे यांनी स्पष्ट केले.

### लाखभर परीक्षा अर्ज प्रलंबित

परीक्षा अर्जांसाठी २० जानेवारीपर्यंतची देण्यात आलेली मुदत शेवटची आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही. अजूनही सुमारे एक लाख विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज महाविद्यालयाकडून कायम बाकी आहे, असेही डॉ. काकडे यांनी नमूद केले.

लोकसत्ता Tue, 18 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65663339

# 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'ची उच्चशिक्षण संस्थांमध्ये अंमलबजावणी

### यूजीसीकडून निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : देशभरातील विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट' (एबीसी) प्रणालीची अंमलबजावणी सुरू करण्यात येणार असल्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) स्पष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी या प्रणालीशी जोडून घेण्याबाबत पावले उचलण्याबाबत आणि विद्यार्थ्यांना या प्रणालीबाबत माहिती करून देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडू शिकण्याची सुविधा ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटद्वारे मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय अभ्यासाची संधी मिळणार आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांचे श्रेयांक त्याच्या खात्यात साठवले जातील. एखाद्या वेळी विद्यार्थ्याला अभ्यासक्रम सोडून दुसरे काही करायचे असल्यास आणि काही काळाने पुन्हा अभ्याससक्रम पूर्ण करायचा असल्यास विद्यार्थ्याला त्याच्या जमा झालेल्या श्रेयांकांचा उपयोग करून घेता येऊ शकतो. तसेच वेगळ्या महाविद्यालयात किंवा संस्थेत शिकण्याची सुविधाही प्राप्त होईल. या प्रणालीसंदर्भातील राजपत्र यूजीसीकडून २८ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. मात्र त्यात काही बदल करण्यात आले आहेत.

ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटची अंमलबजावणी विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्था आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांमध्ये करण्यात येईल. तसेच 'नॅक' आणि 'एनआयआरएफ' क्रमवारीतील स्थान काहीही असले, तरी या प्रणालीमध्ये सहभागी होण्याबाबत नव्याने २८ डिसेंबर २०२१ रोजी राजपत्र प्रसिद्ध करण्यात आल्याचे यूजीसीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांनी या प्रणालीशी जोडून घेण्याबाबत कार्यवाही करावी आणि विद्यार्थ्यांना या संदर्भात माहिती करून देऊन त्यांचे श्रेयांक खाते सुरू करण्यास प्रोत्साहन द्यावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 18 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65664974

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

पुढारी

# शिक्षण संस्थांमध्ये 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'

## विद्यार्थ्यांना प्रणालीसंदर्भात माहिती देण्याचे 'यूजीसी'चे निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**'देशभरातील विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट' (एबीसी) प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी या प्रणालीशी जोडून घेण्याबाबत पावले उचलावीत आणि विद्यार्थ्यांना या प्रणालीबाबत माहिती करून द्यावी,' असे स्पष्ट निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) देण्यात आले आहेत.**

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडून शिकण्याची सुविधा ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटद्वारे मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय अभ्यासाची संधी मिळेल. याअंतर्गत विद्यार्थ्याचे श्रेयांक त्याच्या खात्यात साठवले जातील. एखाद्या वेळी विद्यार्थ्याला अभ्यासक्रम सोडून दुसरे काही करायचे असल्यास आणि काही काळाने पुन्हा अभ्यासक्रम पूर्ण करायचा असल्यास विद्यार्थ्याला त्याच्या जमा झालेल्या श्रेयांकाचा उपयोग करून घेता येऊ शकतो, तसेच वेगळ्या महाविद्यालयात किंवा संस्थेत



शिकण्याची सुविधाही प्राप्त होईल. या प्रणालीसंदर्भातील राजपत्र यूजीसीकडून २८ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. मात्र, त्यात काही बदल करण्यात आले आहेत.

ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटची अंमलबजावणी विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्था आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांमध्ये करण्यात येईल; तसेच 'नॅक' आणि 'एनआयआरएफ' क्रमवारीतील स्थान काहीही असले, तरी या प्रणालीमध्ये सहभागी होण्याबाबत नव्याने २८ डिसेंबर २०२१ रोजी राजपत्र प्रसिद्ध करण्यात आल्याचे यूजीसीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांनी या प्रणालीशी जोडून घेण्याबाबत कार्यवाही करावी आणि विद्यार्थ्यांना यासंदर्भात माहिती करून देऊन त्यांचे श्रेयांक खाते सुरू करण्यास प्रोत्साहन द्यावे, असेही यूजीसीद्वारे कळविण्यात आले आहे.

Pune Edition
Jan 18, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर घाला

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १८** - महाराष्ट्र विधानसभेत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, सुधारणा विधेयक कुठल्याही चर्चेशिवाय गोंधळाच्या स्थितीत पारित करण्यात आले. या माध्यमातून राज्यातील विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर घाला घालण्याचा घाट सरकार करीत आहे. या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी शैक्षिक महासंघाच्या शिष्टमंडळाने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली.

शिष्टमंडळात शैक्षिक महासंघाचे प्रांत अध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर (अमरावती), प्रांत महासचिव डॉ. वैभव नरवडे (मुंबई), प्रांत

**प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी शैक्षिक महासंघाकडून राज्यपाल यांची भेट**

संगठनमंत्री डॉ. विवेक जोशी, गोडवाना प्रांत उपाध्यक्ष डॉ. नितीन बारी (जळगाव), डॉ. बाळासाहेब आगरकर (पुणे), डॉ. अनिल कुलकर्णी (पूर्व प्रांताध्यक्ष -पुणे) उपस्थित होते.

महासंघाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेऊन विस्तृत निवेदन सादर केले. सध्या उच्च शिक्षणातील शेकडो महत्त्वाचे प्रश्न ऐरणीवर असताना विद्यापीठांचे स्वातंत्र्य हिसकावणारे विद्यापीठ कायदा दुरुस्तीचे शस्त्र शासनाने उपसणे हे अखंड महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या व्यापक दृष्टीकोनांच्या विरोधात जाऊन शिक्षण क्षेत्राचे राजकीयकरण करण्याच्या हेतूचा महासंघाने कडाडून विरोध केला आहे. दुरुस्ती विधेयकातील धोकादायक मुद्दे महासंघाने राज्यपालांसमोर खुले केले. राज्यपालांच्या घटनादत्त अधिकारांची पायमल्ली करीत त्यावर राज्य सरकारचे वर्चस्व स्थापित करण्यासाठी प्र-कुलपती या पदाची निर्मिती करण्यात आली असून या पदावर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांकडे अधिकार एकवटण्याचा प्रकार समोर आला आहे.

प्रभात Wed, 19 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65690907

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# नव्या संशोधनाचे कुपोषण

प्रातिनिधिक छायाचित्र



■ डॉ. अरुण सावंत

जगभरामध्ये कोणत्याही विद्यापीठाची, संस्थेची, महाविद्यालयाची व त्यातील प्राध्यापक, शिक्षक यांची गुणवत्ता त्यांच्या संशोधन कार्यावर मोजली जाते. नावीन्यपूर्ण संशोधन, प्रबंध, विकसित केलेले तंत्रज्ञान, सिद्धान्त यावर मोजली जाते. ती आपल्याकडे किती महाविद्यालये व विद्यार्थी आहेत यावर ठरत नसते आणि म्हणूनच संशोधन कार्य हा उच्च शिक्षणाचा मूळ गाभा ठरला आहे. सर्व देशांमध्ये सरकारे, अर्थसाह्य करणाऱ्या संस्था, कंपन्या विद्यापीठांना भरभरून अनुदान देतात. विकसित देशांत तर प्राध्यापकनिहाय संशोधन अनुदान दिले जाते आणि मिळविले जाते. त्याचा परस्परांना फायदाही होत असतो. म्हणून प्रत्येक देशाच्या सरकारची ही जबाबदारी आहे की विद्यापीठ, महाविद्यालये, प्राध्यापक यांना भरघोस अर्थसाह्य मिळायलाच हवे; मात्र सध्या आपल्या देशात विद्यापीठे व त्यातील मनुष्यबळ विकास; तसेच शिक्षणाची गुणवत्ता राखणे याकडे ना आयोगाचे लक्ष आहे, ना सरकारांचे! उलट विद्यापीठ व्यवस्थापनात केंद्र सरकारचा निष्काळजीपणा व राज्य सरकारांची विद्यापीठातील ढवळाढवळ हा कळीचा मुद्दा ठरत आहे.

देशातील विद्यापीठे, महाविद्यालयांना संशोधन साह्य करणे, ही विद्यापीठ अनुदान आयोगाची (यूजीसी) महत्त्वाची जबाबदारी आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, हे अनुदान वर्षानुवर्षे वाढण्याऐवजी कमी कमीच होत चालले आहे, हे आयोगाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालावरून सिद्ध होते. सन २०१२ ते २०१९ या सात वर्षांच्या काळात देशभरातील विद्यापीठे आणि त्याअंतर्गत घटकांना एक हजार ४९७ कोटी रुपयांचे तुटपुंजे अनुदान मंजूर केले गेले. प्रत्यक्षात ५०७ कोटी रुपयेच देण्यात आले. महाराष्ट्रासाठी त्याच काळात ३९४ कोटी रुपये मंजूर झाले; पण प्रत्यक्षात १२२ कोटी दिले. आश्चर्याची बाब म्हणजे, वर्ष २०१९-२०२० साठी एकही रुपया अनुदान मंजूर झाले नाही. मग या राज्यात संशोधनाने तग धरणे सोडाच, ते जमिनीत गाडले गेल्यासारखे झाले आहे. यूजीसी याच मार्गावर चालत राहिले, तर संशोधन करण्याची जबाबदारी शिक्षक केवळ विसरणारच नाहीत, तर त्यांच्यातील महत्त्वाचा शिक्षकी गुण नाहीसा होईल.

देशात अनेक संशोधन संस्था स्वतंत्रपणे काम करत आहेत. त्यांना विज्ञान तंत्रज्ञान विभागातर्फे निधी देण्यात येतो. पारंपरिक विद्यापीठांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण व्हावी, आपल्या आसपासच्या परिसरातील समस्यांवर उत्तर मिळावे, या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निधी वितरण सुरू झाले. यातच प्राध्यपकांची शैक्षणिक अर्हता पीएचडी अशी निश्चित करण्यात आली. त्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन मिळावे, म्हणून हा निधी महत्त्वाचा मानला जातो. यातून, शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधनास पूरक वातावरण निर्माण व्हावे, त्यासाठी आवश्यक प्रयोगशाळा उभारणे अशा विविध बाबींचा समावेश असतो. निधीच मिळत नसेल, तर हे सर्व घडणार कसे? आज प्राध्यापक एखादे संशोधन करतो, तेव्हा ते सप्रमाण सिद्ध करण्यासाठी कोणत्या उपकरणांचा वापर केला, हे लिहिणे बंधनकारक असते. आपण आजही जुन्याच उपकरणांचा दाखला देतो; त्यामुळे अनेकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले प्रबंध नाकारले जातात. ही बाब खंतावणारी आहे.

> **विद्यापीठ अनुदान आयोगाने गेल्या काही वर्षांत अनेक प्रकारचे निधी कमी केले असून, संशोधनासाठी मिळणाऱ्या अनुदानात कमालीची कपात झाली आहे. यातच लघु संशोधनासाठीही निधीवाटप बंद आहे. हे म्हणजे संशोधनाला खीळ घालणे आहे.**

मोठ्या संशोधनासाठी मोठा निधी नसेल, तर लघू संशोधन प्रकल्प करावा, असे कोणी प्राध्यापकाने म्हटल्यास आज तेही शक्य नाही. लघू संशोधन प्रकल्प हा अनुदान देण्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रकार आहे. आयोगाच्या पुणे उपकेंद्रामार्फत गोवा, महाराष्ट्र, दादरा नगर हवेलीसाठी वर्षाकाठी ३५ कोटी अनुदान होते. ते निव्वळ तीन कोटींवर आणून ठेवले आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० साठी एकही पैसा अनुदान न देणे, म्हणजे शिक्षकांना सेवेत आल्यावर संशोधन न करता शिकवावे, परीक्षा घ्याव्यात व निकाल लावावेत, एवढ्याच कामापुरते मर्यादित ठेवण्यासारखे आहे.

असे धोरण असेल, तर उच्च शिक्षणाचा मूळ गाभाच कापून काढल्यासारखे होणार. सहायक शिक्षकाने पीएचडी घेऊन सेवेत आल्यानंतर पुढेही संशोधन सुरू ठेवले, तर त्याचे नैपुण्य जिवंत राहते. शोधनिबंध प्रसिद्ध होतात. पुढे त्याला पेटंट मिळवता येते. यातून तो शिक्षक, तो शिकवत असलेले महाविद्यालय, विद्यापीठ यांची गुणवत्ता पुढे येते. या सर्व गुणवत्ता विद्यापीठाचा अथवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा दर्जा उंचावण्यासाठी नक्कीच दखलपात्र ठरतात. महत्त्वाचे म्हणजे, तो विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी मार्गदर्शक बनतो व संशोधन शाळा नावारूपास आणतो. देश-विदेशात त्याचे, संस्थेचे, विद्यापीठाचे नाव होते व अशाच पद्धतीने त्या विद्यापीठाची गुणवत्ता, नावलौकिक ठरत असते. जेवढे जास्त संशोधक, संशोधने, प्रबंध त्या विद्यापीठातून बाहेर पडतील, त्यावर दर्जा ठरविला जातो. पुढे याच गुणवत्तेच्या आधारे (केवळ किती वर्षे शिकवले यावर नाही) त्या शिक्षकाची पुढील प्राध्यापकपदावर नियुक्ती होते. लघु संशोधन प्रकल्प राबवणे हा विद्यापीठाच्या विकासाचा व गुणवत्तेचा मूलभूत पाया आहे. तोच खचला, तर महाविद्यालये व विद्यापीठे ही केवळ पदवी देणारी साधने ठरतील व जागतिक पातळीवर आपल्या देशाचा नावलौकिक घसरेल. साहजिकच उद्योगधंद्यासाठी अद्ययावत संशोधन वृत्तीचे विद्यार्थी-कर्मचारी-अधिकारी लाभले नाहीत, तर ते उद्योगदेखील विकसित न होता तंत्रज्ञान आयात करणारे ठरतील. मग 'मेक इन इंडिया'सारखी स्वप्ने हवेत विरून जातील. मोठे संशोधन प्रकल्प हे प्रत्येकी १२ लाख रुपये या वर्गात मोडतात, तर लघु संशोधन प्रकल्प हे अवघ्या दोन ते तीन लाखांपर्यंतचे असतात. शिक्षकाने साधारण असे दोन-तीन प्रकल्प यशस्वीरीत्या पार पाडल्यास, त्यांना मोठे संशोधन प्रकल्प लिहिण्यास आयोग पात्र समजते. ते मिळाले, म्हणजे त्याच्या प्रयोगशाळेचा लौकिक वाढतो, म्हणजेच महाविद्यालय व विद्यापीठात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे काम गुणात्मक होत जाते. असे अनेक प्रकल्प वाढल्यास आंतरराष्ट्रीय परिषदा, सन्मान, तेथे काम करण्याची संधी, उच्च दर्जाच्या नियतकालिकांतून संशोधन प्रसिद्ध होणे असे घडते. अशा प्रक्रियेतून बाहेर पडलेला संशोधकच पुढे नोबेल पारितोषिक विजेता ठरतो. त्याने काय संशोधक केले, हे महत्त्वाचे ठरते. त्याने किती वर्षे प्राध्यापकी केली आणि विद्यार्थ्यांना पदवी दिल्या, हे ठरवत नसते. आता झालेली निधी कपात धक्कादायक आहे. आज आपल्याला पुढे जाण्यासाठी हजारो कोटी रुपयांचे अनुदान असणे आवश्यक आहे. ते फक्त तीन कोटी २७ लाखांवर आणून ठेवले आहे. याचा अर्थ केंद्र सरकारला आयोगामार्फत देशातील महाविद्यालये व विद्यापीठे फक्त पाठशाळा बनवायच्या आहेत का?

**(लेखक मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगरू आहेत.)**

Maharashtra Times 19.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

पुढारी

## कायद्यातील बदल विद्यापीठांच्या गुणवत्तेला तिलांजली देणारे

*विद्यापीठ कायदा २०१६ मध्ये झालेले बदल हे विद्यापीठांची स्वायत्तता संपवणारे असून, विद्यापीठांच्या नावलौकिकावर विपरीत परिणाम करणारे आहेत. राज्यामध्ये शिक्षणाचा दर्जा उत्तम असल्यामुळे देश-विदेशातील विद्यार्थी महाराष्ट्रामध्ये शिक्षण घेण्यासाठी येत असतात; परंतु या कायदा बदलांमुळे शिक्षणाचा दर्जा घसरून राजकीय हस्तक्षेपातील वातावरणात शिकून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तयार होतील. यामुळे रोजगाराच्या संधींवरही विपरीत परिणाम पाहावयास मिळतील आणि झालेले हे बदल महाराष्ट्रातील विद्यार्थी व विद्यापीठांच्या गुणवत्तेला व फायद्याला तिलांजली देणारे ठरतील, असे मत ज्येष्ठ विधिज्ञ एस. के. जैन यांनी मांडले.*

My Pune Edition
Jan 19, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# दहावी, बारावीच्या सराव परीक्षांबाबत गोंधळ

## विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम : परीक्षा घेण्यास हरकत नसल्याची वरिष्ठ अधिकाऱ्यांची पुष्टी

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पहिली ते आठवी व इयत्ता अकरावीचे ऑफलाईन वर्ग बंद ठेवण्यात आले असून इयत्ता दहावी-बारावीचे वर्ग सुरू ठेवण्यास राज्य शासनाने परवानगी दिली आहे. मात्र, परीक्षेपूर्वी सराव परीक्षा घेतल्या जाणार की नाही याबाबत शाळा व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. परंतु, सराव परीक्षा घेण्यास कोणतीही हरकत नाही, असे शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षांकडे विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिले जाते. त्यामुळे इयत्ता नववीपासून विद्यार्थी दहावीच्या तर अकरावीचे विद्यार्थी बारावीच्या परीक्षेची तयारी करतात. शाळा-महाविद्यालयांकडूनही विद्यार्थ्यांची सराव परीक्षेच्या माध्यमातून तयारी करून घेतली जाते. परंतु, वाढत्या कोरोना रुग्णांची स्थिती विचारात घेता सराव परीक्षा घ्याव्यात किंवा नाही याबाबत संभ्रमाचे वातावरण आहे.



**मागीलवर्षी पुणे** विभागात दहावीच्या परीक्षेसाठी ६३३ तर बारावीच्या परीक्षेसाठी ४०१ परीक्षा केंद्र होते. कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता यावर्षी परीक्षा केंद्रांची संख्या वाढवावी लागेल, असे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

### वेळापत्रक नाहीच...

शासनाने दहावीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे विद्यार्थी शाळेत येऊन शिक्षण घेत आहेत. तसेच येत्या १ फेब्रुवारीपासून सराव परीक्षा सुरू होतील असे शिक्षकांनी सांगितले होते. मात्र, त्याबाबतचे वेळापत्रक दिलेले नाही. त्यामुळे सराव परीक्षा होईल की नाही याबाबत संभ्रम आहे.

### अर्ज प्रक्रिया सुरूच

- पुणे विभागातून दहावीच्या परीक्षेसाठी २ लाख ७३ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरला असून परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया अजूनही सुरू आहे.
- तसेच इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी आत्तापर्यंत २ लाख ४५ हजाराहून विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत. अर्जाची मुदत अद्याप संपलेली नसल्याने त्यात वाढ होणार आहे.

### परीक्षा ऑनलाईन की ऑफलाईन?

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावीची परीक्षा ४ मार्च तर दहावीची परीक्षा १५ मार्च रोजी घेतली जाणार आहे. राज्य मंडळाकडून लेखी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार असली तरी सराव परीक्षा ऑनलाईन होणार की ऑफलाईन याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आहे.

Hello Pune
Page No. 6 Jan 20, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

लोकमत

# आरक्षणासाठी प्राध्यापक भरतीला खो

नेट-सेट पात्रताधारक उमेदवारांनी अनेक वर्षांपासून रखडलेली भरती प्रक्रिया सुरू व्हावी, यासाठी दीर्घ मुदतीची आंदोलन केली. उच्चशिक्षण विभागाने प्रक्रिया सुरू करण्याचा अध्यादेश काढूनही रोस्टरच्या लालफितीत प्राध्यापक पदभरती अडकली आहे.

राज्यात अशासकीय अनुदानित १ हजार १७१ महाविद्यालयात एकूण ३४ हजार ५११ प्राध्यापकांच्या मंजूर पदांपैकी २५ हजार ०२० पदे भरलेली आहेत. ९ हजार ५११ पदे रिक्त आहे. वेतन नियंत्रित करताना ३० टक्के कपात करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही व्हावी, असे अपेक्षित आहे, पण उच्चस्तरीय समितीने अत्यंत आवश्यक प्राध्यापकांच्या पदांमध्ये ६० टक्के कपात करण्याचा निर्णय घेऊन ३ हजार ५८३ पदांच्या भरण्यासाठी मान्यता देऊन पात्रताधारकांची फसवणूक केली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ४ एप्रिल, २०२० रोजी सुरू केलेली ४० टक्के पदांची भरती स्थगित केली. आंदोलनानंतर २ हजार ८८ पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली. भरती सुरू झाली, म्हणून पात्रताधारक कुठेतरी नोकरीची संधी उपलब्ध होईल, अशी स्वप्न पाहत होते, परंतु पुन्हा त्यांच्या स्वप्नांना तडा गेला आहे. पदभरती तयारीसाठी





डॉ. संदीप पाथ्रीकर
अध्यक्ष, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना.

शिक्षण संस्थांनी प्रचलित विषयनिहाय आरक्षण धोरणानुसार, रोस्टर तपासणी केली. राज्य सरकारने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार, संवर्गनिहाय आरक्षण विधेयक मंजूर केले. या विधेयकाच्या अंमलबजावणीचा शासन निर्णय अद्यापही प्रसिद्ध न केल्याने प्राध्यापक पदभरतीला अडथळा निर्माण झाला आहे. महाविद्यालय किंवा संस्था एक एकक माणून आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, पदभरतीत कुठले आरक्षण असावे. या संदर्भात संवर्गनिहाय आरक्षण विधेयक मंजूर झाले, परंतु या संदर्भात जोपर्यंत शासन निर्णय येत नाही, तोपर्यंत रोस्टर तयार करण्याची प्रक्रिया सुरू होत नाही. ज्या दिवशी संवर्गनिहाय आरक्षण लागू होईल. त्यानंतर, सर्व शिक्षण संस्थांना नव्याने रोस्टर तयार करून, पदभरतीची प्रक्रिया करावी लागणार आहे. परत शासनाकडे ऑनलाइन पद्धतीने मान्यता घेऊन विद्यापीठ परवानगी घेऊन जाहिरात द्यायची. मग मुलाखतीनंतर नियुक्ती अशी एक प्रक्रिया पार पडवी लागणार आहे. संवर्गनिहाय आरक्षणाचा शासन निर्णय काढण्यास अडचणी येत असतील, तर शासनाने तत्काळ अध्यादेश काढून येणाऱ्या ६ महिन्यांत या २,०८८ जागांची भरती करून, पात्रताधारकांना न्याय द्यायला हवा.

Hello Pune
Page No. 7 Jan 20, 2022
Powered by: erelego.com

# शाळा, महाविद्यालये सोमवारपासून...



## शिक्षण विभागाच्या प्रस्तावास मुख्यमंत्री अनुकूल

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील करोनाची तीव्रता नियंत्रणात आल्यानंतर गेल्या २० दिवसांपासून बंद असलेली शाळा-महाविद्यालये सोमवारपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याबाबतच्या प्रस्तावास हिरवा कंदील दाखविला असून स्थानिक परिस्थितीनुसार बालवाडी ते महाविद्यालय असे संपूर्ण शिक्षण सुरू होणार असल्याची माहिती मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.

करोनाची दुसरी लाट ओसरल्यानंतर गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये निर्बंध शिथिल करताना राज्यात शाळा- महाविद्यालये पुन्हा सुरू करण्यात आली होती. करोना प्रतिबंधक लशीच्या दोन मात्रा घेतलेल्यांना म्हणजेच लसीकरण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येण्याची परवानगी देण्यात आली होती. तर शाळांमध्ये पात्र मुलांच्या लसीकरणावर भर देतानाच करोना नियमांचे काटेकोरपणे पालन करीत शाळा सुरू होत्या. मात्र ओमायक्रॉन विषाणूचा प्रादुर्भाव वाढू लागताच जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात शाळा आणि महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. यातून केवळ इयत्ता १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती.

मात्र गेल्या काही दिवसांपासून करोनाची स्थिती चिंताजनक नसल्याचे लक्षात आल्यानंतर सर्वच स्तरांतून शाळा सुरू करण्याबाबत मागणी होऊ लागली. त्यामुळे सोमवारपासून शाळा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आल्याचे शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून शाळा- महाविद्यालये सुरू करण्याच्या प्रस्तावास मुख्यमंत्र्यांनी हिरवा कंदील दिला असून त्याबाबतचे आदेश लवकरच निर्गमित होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### तीव्रता ओसरल्यामुळे...

राज्यातील करोनाचा संसर्ग आता राज्यभरात विस्तारला असला तरी त्याची तीव्रता अधिक नाही. त्यामुळे रुग्णालयात दाखल होणाऱ्या करोनाबाधितांची संख्या अजूनही नियंत्रित असून राज्यात लसीकरणाचाही वेग वाढला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शाळा सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली.

### झाले काय?

शिक्षणतज्ज्ञ तसेच विद्यार्थी- पालकांचा दबाव आणि राज्यातील करोनाची नियंत्रित स्थिती यांचा विचार करून येत्या सोमवारपासून शाळा पूर्ववत सुरू करण्याचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाने मुख्यमंत्र्यांकडे सादर केला. या प्रस्तावास मुख्यमंत्री अनुकूल असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### हे महत्त्वाचे...

शाळा किंवा महाविद्यालय सुरू करताना स्थानिक करोना परिस्थिती आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून स्थानिक प्राधिकरण निर्णय घेणार आहेत. त्याबाबत जिल्हाधिकारी किंवा पालिका आयुक्तांवर मुख्य जबाबदारी असेल.

लोकसत्ता Thu, 20 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65706699

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

**सामना**

# सोमवारपासून पहिली ते बारावीचे वर्ग भरणार

## नर्सरी, केजीच्या शाळाही उघडणार

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) – येत्या सोमवारपासून (२४ जानेवारी) पहिली ते बारावीच्या शाळा सुरू करण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या प्रस्तावाला राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मान्यता दिली आहे. शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी गुरुवारी ही माहिती दिली. कोरोनाच्या दोन वर्षांच्या काळात यंदा प्रथमच नर्सरी आणि केजीच्या शाळादेखील सोमवारपासून उघडणार आहेत. कोरोना परिस्थितीचा आढावा घेऊन शाळा सुरू करण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनाने घ्यायचा असून, पालकांनी संमती दिल्यास विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश दिला जाणार आहे, असेही वर्षा गायकवाड यांनी सांगितले. ● पान २

### विद्यार्थ्यांचे शाळेतच लसीकरण

*२४ जानेवारीपासून शाळा सुरू झाल्यानंतर १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचे शाळेतच कोरोना प्रतिबंधक लसीकरण करणार असल्याची माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली. मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाल्याचे ते म्हणाले.*

## शिक्षण विभागाच्या प्रस्तावास मुख्यमंत्र्यांची मान्यता



### पुणे जिल्ह्यातील शाळांबाबत शनिवारच्या बैठकीत निर्णय

पुणे शहर आणि जिल्ह्यात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या उच्चांकी वेगाने वाढत आहे. अशा स्थितीमध्ये शहर आणि जिल्ह्यातील शाळा सुरू करायच्या किंवा कसे याबद्दलची चर्चा शनिवारी (दि. २३) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कोरोना आढावा बैठकीत होणार आहे. या बैठकीमध्येच याबद्दलचा निर्णय होईल, असे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी सांगितले.

“ विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता ही आमची प्राथमिकता आहे. शाळा परिसरातील स्थानिक कोरोना परिस्थितीचा



वेळोवेळी आढावा घेऊन शाळेबाबतचा निर्णय घेतला जावा. एका भागात शाळा सुरू झाली म्हणून दुसरीकडील शाळाही सुरू व्हावी, याचे बंधन नाही. कोरोना रुग्णसंख्या पाहूनच शाळेबाबतचा निर्णय घ्यायचा असून, कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. राज्यातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, हीच सरकारची भूमिका आहे.

**- वर्षा गायकवाड**, शालेय शिक्षण मंत्री

Pune Edition
Jan 21, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

**लोकमत**

मुलांच्या व्यथा : दुसऱ्या फेरीत उपलब्ध होतील, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे

# विद्यापीठाला 'गाईड' मिळाले विद्यार्थ्यांना 'मार्गदर्शक' नाहीत

## ऑनलाइन अर्ज करण्यात अनेक तांत्रिक अडचणी; त्यामुळे मिळेना लवकर मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रक्रिया राबविली जात असून पात्र विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, विद्यापीठाकडे पीएचडी गाईडची संख्या वाढली असली तरी हे गाईड विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. परंतु, प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीदरम्यान विद्यार्थ्यांना अधिकाधिक मार्गदर्शक उपलब्ध होतील,असे विद्यापीठातील अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून मान्यता द्यावी, अशी मागणी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थित 'उच्च शिक्षण विभाग @" या उपक्रमांतर्गत घेण्यात शैक्षणिक कार्यक्रमात प्राध्यापक अजय देरेकर व त्यांच्या सहका-यांनी केली होती. सामंत यांनी विद्यापीठाला त्यावर निर्देश दिल्यानंतर विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील सूत्र हल्ले आणि अधिकाधिक प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली. परंतु, पीएचडी प्रवेश प्रक्रियेस अर्ज भरण्यापूर्वीच ही मान्यता मिळाली असती तर अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध झाले असते.

- पीएचडी गाईड म्हणून मान्यता मिळावी यासाठी पात्र प्राध्यापकांना ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाकडे अर्ज करावा लागतो. परंतु, या ऑनलाईन प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडचणी येत होत्या.
- त्यामुळे अनेक प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून लवकर मान्यता मिळू शकली नाही.
- त्यामुळे या प्राध्यापकांना जवळच्या संशोधन केंद्रांवर नोंदणी करून आपल्याकडे उपलब्ध असलेल्या जागांची माहिती विद्यापीठाच्या ऑनलाईन यंत्रणेला देता आली नाही.
- परिणामी विद्यापीठाकडून राबविल्या जाणाऱ्या दुसऱ्या फेरीच्या माध्यमातून मान्यता मिळालेल्या मार्गदर्शकांना विद्यार्थी व मार्गदर्शक नाहीत म्हणून प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना गाईड मिळणार आहेत.



Hello Pune
Page No. 3 Jan 21, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# 'Decision on college reopening likely soon'

### Samant says proposal with Thackeray

FILE PHOTO



The state government's decision to open schools in cities with low COVID numbers has prompted a demand to reopen colleges, as well.

State higher and technical education minister **Uday Samant (in pic)** indicated that the decision with regards to colleges would be taken soon after discussions with chief minister Uddhav Thackeray.

Samant said, "Schools, colleges and coaching classes were shut for offline education in the state till February 15 due to the rise in the number of patients. The decision to reopen colleges will be taken after discussions with chief minister Uddhav Thackeray."

He further said a proposal in this regard had been prepared and sent to Thackeray for consideration.

Earlier, schools were allowed to open for physical classes in areas with low cases. However, after the sudden spike in numbers, all educational institutes were shut. Students of classes X and XII were given concessions in view of the forthcoming board exams, and some physical classes were permitted. Several parents' organisations had opposed the move to close schools and colleges and demanded the resumption of offline classes for students. They expressed the need for children to learn directly as the pandemic had already created havoc in their academics.

> **"Schools, colleges and coaching classes were shut for offline education in the state till February 15 due to the rise in number of COVID patients**
>
> – Uday Samant, state higher and technical education minister

Pune Mirror 21.1.2022

# राज्यातील महाविद्यालयेही सोमवारी सुरु होणार

**मंजुरीसाठी मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव**

**मुंबई, (प्रतिनिधी) :** राज्यातील शाळा येत्या सोमवारपासून सुरू करण्यासाठी सरकारने परवानगी दिली आहे. शाळांप्रमाणे राज्यातील महाविद्यालयेही सुरु करण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला असून, अंतिम मान्यतेसाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनीच ट्विटरद्वारे ही माहिती दिली.

कोरोनाची तिसरी लाट सुरू झाल्यानंतर राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, कोरोनाचा संसर्ग सौम्य स्वरूपाचा असल्याने सोमवारपासून स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन शाळा सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे महाविद्यालयांनाही परवानगी देऊन सुरू करावीत, असा प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पाठवला आहे.

१५ ते १८ वयोगटाचे सध्या कोरोना प्रतिबंधक लशीकरण सुरु आहे. बहुतांश विद्यार्थ्यांनी लस घेतली आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरु करण्याचा विचार सुरु आहे. सोमवारपासून शक्य झाले नाही तरी १ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरु करणे शक्य आहे. पण वसतीगृहे सुरु करावीत की नाही, याबाबत सरकारमध्येच मतभिन्नता असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

Kesari 22.1.2022

# महाविद्यालयेही सुरू होणार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील करोना परिस्थिती नियंत्रणात आल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारपासून शाळांसोबतच महाविद्यालयेही सुरू करण्याची तयारी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्यानुसार सर्व अकृषि विद्यापीठे, स्वयंअर्थसहित, अभिमत विद्यापीठ, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली.

राज्यातील पहिली ते १२वी पर्यंतच्या शाळा सोमवारपासून सुरू होणार आहेत. त्याच धर्तीवर महाविद्यालये सुरू करण्याबाबत सामंत यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीत करोनाचा प्रादूर्भाव कमी होत असल्याने महाविद्यालय सुरू करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव पाठवला आहे. या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल असे सामंत यांनी सांगितले.

लोकसत्ता Sat, 22 January 2022 https://epaper.loksatta.com/c/657517

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

### ऑनलाइन परीक्षा यंदाही विद्यापीठच घेणार

प्रभात वृत्तसेवा



- स्वत: निर्माण केलेल्या कंपन्यांमार्फत प्रक्रिया
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय

**पुणे, दि. २१ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा फेब्रुवारी-मार्च महिन्यात ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. ह्या ऑनलाइन परीक्षा आऊटसोर्सिंगद्वारे न करता यंदाही विद्यापीठ स्वत: निर्माण केलेल्या कंपन्यांमार्फत होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या तक्रारींची त्वरित दखल घेणे शक्य होणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी ही माहिती दिली. ऑनलाइन परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे. या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ही परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर आधारित असल्याचे परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे. शिक्षक भरती, आरोग्य भरतीची परीक्षा खासगी कंपन्याद्वारे घेण्यात आल्या होत्या. त्यातील त्रुटी निदर्शनास आल्याने मोठा गैरप्रकारही समोर आला आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने निर्माण केलेली एसपीपीयु एज्युटेक फाउंडेशन या कंपनीमार्फत ऑनलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वीची ऑनलाइन परीक्षा याच कंपनीने घेतली होती. मात्र, काही त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. त्यामुळे काही विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेत आकृत्या दिसत नव्हत्या, तर इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमाची प्रश्नपत्रिका देण्यात आली होती. ही सर्व लक्षात घेता कंपनीने सुरळीतपणे परीक्षा घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रभात Sat, 22 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65754888

### विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी नियमावली

उच्च-तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सर्व महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये विद्यार्थिनींची सुरक्षितता महत्त्वाची आहे. छेडछाडमुक्त परिसर राहण्यासाठी विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी सर्वसमावेशक नियमावली तयार करण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थिनींच्या छेडछाडीसंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने विधान भवनात बैठक झाली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ यांच्यासह राज्यातील विविध विद्यापीठांचे कुलगुरू, प्र कुलगुरू, कुलसचिव, अधिसभा सदस्य आदी या वेळी उपस्थित होते. सामंत म्हणाले, की ग्रामीण, शहरी भागातील महाविद्यालये, शिक्षण संस्थांचा विचार करून सर्वसमावेश नियमावली करावी. ९० दिवसांमध्ये ही नियमावली तयार करावी. ह नियमावली खासगी विद्यापीठांनाह लागू असेल. विद्यार्थिनींच्य सुरक्षिततेसाठी स्वतंत्र मोबाइल ॲपची निर्मिती करावी. विद्यार्थिनीच्य सुरक्षिततेसाठीच्या कायद्यांची नियमांची कठोर अंमलबजावण झाली पाहिजे.

#### महिलांच्या तक्रारींसाठी संवाद समिती आवश्यक

महाविद्यालयांनी गेल्या दोन वर्षांत विद्यार्थिनींच्या किती तक्रारी प्राप्त झाल्या, प्रलंबित किती आहेत, ऑनलाइन आणि ऑफलाइनचे प्रमाण या संबंधीचा अहवाल तयार करावा. महिला तक्रारींसाठी पुढे येत नसल्याने त्यासाठी संवाद समितीही तयार करावी. समितीमध्ये प्राध्यापक महिला, प्रशासकीय महिला अधिकारी, स्थानिक पोलीस प्रशासन प्रतिनिधी, सायबर सुरक्षा संबंधित प्रतिनिधींचा त्यात समावेश असावा. विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळणे ही संबंधित शिक्षण संस्थांची जबाबदारी असून, त्या दृष्टीने कठोर उपाययोजनांचे निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

लोकसत्ता Sat, 22 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65747922

### विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी नियमावली तयार करणार



**मुंबई, दि. २१ -** महाविद्यालयीन विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता आले पाहिजे. यासाठी सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थिनींची सुरक्षा ही संबंधित शैक्षणिक संस्थांची जबाबदारी आहे. शैक्षणिक परिसर, वसतिगृह, ग्रंथालय, उपहारगृहे तसेच ऑनलाइन शिक्षणामुळे सायबर सुरक्षेबाबत पुरेशा उपाययोजना करुन सुरक्षिततेबाबत नियमांचे कठोर पालन करावे, असे निर्देश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

विधानभवनात राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये परिसरात विद्यार्थिनींच्या छेडछाडीच्या तक्रारींच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती.

ज्ञान, विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान याचा उपयोग महाविद्यालयांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी करावा. विद्यार्थिनींच्या तक्रारी आल्यानंतर त्यांना तत्काळ प्रतिसाद देऊन सहानुभूतीपूर्वक न्याय दिला पाहिजे. अनेकवेळा तक्रारींकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचे विपरित परिणाम होतात. अनेकवेळा महिला तक्रारीसाठी धाडसाने पुढे येत नाही. यासाठी संवाद समिती सुद्धा गठित करावी. त्यामुळे महिला आपल्या अडचणी मोकळेपणाने सांगतील.

या समितीमध्ये प्राध्यापक महिला, प्रशासकीय महिला, स्थानिक पोलीस प्रशासनातील प्रतिनिधी, सायबर संबंधातील प्रतिनिधी अशी सर्वसमावेश समिती असावी, अशा सूचनाही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी केल्या. महाविद्यालयांना गेल्या ... प्राप्त झाल्या आहेत, प्रलंबित किती आहेत, ऑफलाइन आणि ऑनलाइनचे प्रमाण याचा अहवाल तयार करावा. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी उपाययोजना करुन हे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. महिलांच्या ... साधन आहे. या कायद्याच्या माध्यमातून महिलांना सुरक्षेची हमी मिळणार आहे.

पीडित महिलांच्या बाबतीत तत्काळ दखल घेत सक्षम तपास आणि कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे, असेही उपसभापती ...

#### ॲप तयार करा

सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनींची सुरक्षितता महत्त्वाची असून सर्वसमावेशक अशी नियमावली तयार करणार असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी असलेले नियम, कायद्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. ९० दिवसांचा कालावधी गृहित धरून ही नियमावली तयार करण्यात यावी. यामध्ये शहरी भाग, छोटी शहर, ग्रामीण भाग, या परिसरातील शैक्षणिक संस्थांचा अभ्यास करुन सर्वसमावेशक अशी नियमावली तयार करावी. ही नियमावली खासगी महाविद्यालये, विद्यापीठांनासुद्धा लागू राहील. तसेच विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी मोबाइल ॲप तयार करावे. संबंधित महाविद्यालयांचे प्रमुख, विद्यार्थी-विद्यार्थिनी, त्यांचे पालक यांचा समावेश असेल यामुळे या अशा प्रवृत्तीला आळा घालण्यास मदत होईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

प्रभात Sat, 22 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65752828

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# शुल्काअभावी परीक्षा अर्ज अडवले

## दोन दिवसांत अर्ज 'इनवर्ड' करण्याच्या सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. मात्र, या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी २१ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज उर्वरित शैक्षणिक शुल्क भरले नाही म्हणून 'इनवर्ड' केले नाहीत. प्रत्येक परीक्षेपूर्वी हे प्रकार वारंवार घडत असल्याने, महाविद्यालयांवर कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे. दरम्यान, दोन दिवसांत अर्ज 'इनवर्ड' करण्याच्या सूचना महाविद्यालयांना दिल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिली आहे.

पुणे विद्यापीठाने यंदा ऑनलाइन पद्धतीने वेळेत वर्ग सुरू केल्याने, १०० टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा होणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना येत्या २१ जानेवारीपर्यंत अर्ज भरण्याची संधी देण्यात आली होती. परीक्षेसाठी आठ लाख १९ हजार ८१४ विद्यार्थ्यांनी अर्ज भरणे अपेक्षित होते. मात्र, दिलेल्या मुदतीत सहा लाख ६८ हजार ९६८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले. यातील सहा लाख ५२ हजार ८४९ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडून 'इनवर्ड' करण्यात आले आहेत. तर, अद्यापही २१ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज 'इनवर्ड' व्हायचे आहे. परीक्षा अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतरही केवळ पूर्ण शैक्षणिक शुल्क भरले नाही, म्हणून महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांचे अर्ज 'इनवर्ड' करण्यात येत नसल्याचे चित्र आहे.

पुणे विद्यापीठाच्या सत्र परीक्षा सुरू होण्यापूर्वी महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्षाचे उर्वरित शुल्क भरले नाही किंवा कागदपत्रे जमा केले नाही, अशा विविध कारणांमुळे विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडून 'इनवर्ड' केले जात नाहीत. त्यामुळे त्या अर्जांवर विद्यापीठाकडून कार्यवाही करण्यात अडचणी येतात. या प्रकाराबाबत गाजावाजा झाल्यानंतर, महाविद्यालयांकडून कारवाईच्या भीतीपोटी अर्ज 'इनवर्ड' केले जातात. मात्र, दर वेळी होणारे असे प्रकार टाळण्यासाठी महाविद्यालयांवर कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहेत. दरम्यान, प्रवेश घेणारे अनेक विद्यार्थी विविध कारणांमुळे परीक्षांचे अर्ज भरत नाहीत; तसेच कालांतराने प्रवेश रद्द करतात. त्याचप्रमाणे काही विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये तांत्रिक अडचणी असल्याने, यंदा साधारण एक लाख ५० हजार ८६६ विद्यार्थ्यांचे अर्ज कमी आले आहेत.





" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज 'इनवर्ड' केले नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे दोन दिवसांत अर्ज 'इनवर्ड' करण्याच्या सूचना संबंधित महाविद्यालयांना दिल्या आहेत.

– डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### जुने पॅटर्न बंद होणार

पुणे विद्यापीठाकडून राबविण्यात येणारे आतापर्यंतचे परीक्षा पॅटर्न बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने समकक्षता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अर्ज भरताना विद्यार्थ्यांना जुन्या पॅटर्नचा समकक्ष विषय द्यायचा होता. विद्यार्थ्यांना तो विषय उपलब्ध नसेल, तर विद्यार्थ्यांनी तसे अर्जात नमुद करणे गरजेचे होते. त्यानंतर संबंधित विषयांची परीक्षा विद्यापीठ नंतर घेणार आहे. त्यामुळे जुन्या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना काही जुने-नवे विषय घेऊन परीक्षा द्यावी लागणार आहे, असे प्रशासनाने सांगितले.

Maharashtra Times 23.1.2022

## News Paper Clippings During January 2022

### Section: Education

लोकमत

# सगळ्यांनाच ९० टक्क्यांच्यावर गुण, नोकरी द्यायची कोणाला?

## विद्यार्थ्यांवर कोरोनाचा शिक्का : कंपन्यांकडून तपासले जाते ज्ञान

**राहुल शिंदे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जात असल्यामुळे ४० टक्क्यांच्या आसपास असणारा इंजिनिअरिंगसह इतर अभ्यासक्रमाचा निकाल १०० टक्के लागत आहे. सगळ्यांनाच ९० टक्यांच्या वर गुण मिळाले आहेत. त्यामुळे खासगी कंपन्यांकडून विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी परीक्षा घेतली जात आहे.

पुणे शहर व परिसरात अनेक आयटी कंपन्या असून या कंपन्यांमध्ये रोजगारासाठी जाणाऱ्या तरुणांची संख्या वाढली आहे. कोरोनामुळे २०१९-२१ या कालावधीत अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची परीक्षा देणारा अपवाद वगळता प्रत्येक विद्यार्थी उत्तीर्ण झाला आहे. सर्वांनाच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. कोणत्या विद्यार्थ्याला नोकरी द्यावी, असा प्रश्न कंपन्यांसमोर उभा राहिला. त्यामुळे विद्यार्थ्यांवर एक प्रकारे कोरोनाचा शिक्का पडला असून विविध कंपन्यांकडून आता या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे.

नामांकित 'आयटी' कंपन्यांना कर्मचारयांसाठी प्रशस्त कार्यालय, कँटिन, वाहतूक व्यवस्था, कॉम्प्युटर-इंटरनेट आदी तांत्रिक सुविधा उपलब्ध करून द्यावी लागते; परंतु कोरोनामुळे आयटी कंपन्यांकडून अधिक 'वर्क फॉर्म होम'ला पसंती दिली जात आहे. कारण या पायाभूत सुविधांसाठी होणारा कंपनीचा खर्च कमी होत आहे. तसेच पुण्यात येऊन भाडेतत्त्वावर घर घेणे, मेस लावणे आदींसाठी कर्मचाऱ्यांना करावा लागणारा खर्च बंद झाला आहे. परिणामी, बाहेर गावाहून पुण्यात कामासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही घरी बसून काम करणे सोपे जात आहे.



### हुशार विद्यार्थ्यांना कोरोनाचा फटका

सर्वच विद्यार्थी ९० टक्क्यांहून अधिक गुण घेऊन उत्तीर्ण होत आहेत. त्यामुळे कंपन्यांकडून विद्यार्थ्यांना शॉर्टलिस्ट करण्यासाठी परीक्षा घेतली जात आहे. परिणामी कोरोनाचा फटका सर्वसाधारण विद्यार्थ्यांबरोबर हुशार विद्यार्थ्यांना सुध्दा बसत आहे. तसेच कोरोनामुळे 'वर्क कल्चर' बदलल्याने 'फ्रेशर'विद्यार्थ्यांना घरी बसून सुमारे १५० तासांचे ऑनलाईन काम दिले जात आहे.'वर्क फ्रॉम होम' मुळे कमी पगार दिला तरी विद्यार्थी हे काम स्वीकारत आहे.

- डॉ.पराग काळकर, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

कोरोना काळात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रोजगारात मोठ्या अडचणी येत आहेत. माझ्या मुलाने मागील वर्षी कम्प्युटर सायन्सची पदवी घेतली. परंतु, त्याला व त्याच्या वर्गातून उत्तीर्ण झालेल्या एकाही विद्यार्थ्याला नोकरी मिळत नाही. परंतु,कोरोनापूर्वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सहज नोकरी मिळत असल्याचे दिसून येत आहे.

- रोहिणी विटणकर, पालक

- कोरोनाच्या काळात बहुतांश अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या नाहीत. त्याचबरोबर कॅम्पस इंटरव्ह्यूदेखील बंद होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची सवय राहिली नाही. त्याचा त्रास होत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Jan 23, 2022
Powered by: erelego.com

# महाविद्यालये ऑफलाइन सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव

**मुंबई, दि. २२ -** कोविड-१९ आणि ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, अभिमत विद्यापीठ, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील वर्ग ऑनलाइन सुरू असून लवकरच ऑफलाइन सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

कोविड-१९ व ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर सामंत यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीत राज्यात कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी होत असल्याने महाविद्यालय ऑफलाइन सुरू करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव पाठवला आहे. या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर महाविद्यालये ऑफलाइन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.

प्रभात Sun, 23 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/6

## *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

लोकमत

# अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन परीक्षा महाविद्यालयातच?

## दहावी-बारावीच्या ऑफलाइन तर विद्यापीठाच्या का नाही ?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील इयत्ता दहावी-बारावीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी अद्याप कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेले नाहीत. तरीही या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. बहुतांश महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे दोन डोस पूर्ण झाले आहेत. मग या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाइन पध्दतीने का नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालयातील परीक्षा केंद्रांवर पण ऑनलाइन पद्धतीनेच घेण्याचा विचार केला जात आहे.

कोरोनामुळेच राज्य शासनाने विद्यापीठांना सर्व परीक्षा ऑनलाइन घेण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे कोरोना प्रतिबंधक लसीकरण करण्याबाबत मोहीम सुरू आहे.

त्यामुळे दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांपेक्षा महाविद्यालयीन विद्यार्थी कोरोनाचा प्रतिकार चांगल्या प्रकारे करू शकतात. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षासुध्दा ऑफलाइन घेणे गरजेचे आहे, असे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षांमुळे नोकरी मिळण्यास अडचणी येत असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आल्याने यंदा केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन पध्दतीने घेण्याचे विद्यापीठाचे नियोजन होते. परंतु, कोरोनामुळे सर्व विद्यापीठांनी ऑनलाइन पध्दतीने परीक्षा घ्याव्यात, असे निर्देश राज्य शासनाने विद्यापीठांना दिले. त्यावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने फेब्रुवारी-मार्च महिन्यात ऑनलाइन पध्दतीने परीक्षा घेतल्या जातील, असे स्पष्ट केले आहे.

### ऑनलाईन परीक्षेत गैरप्रकार आढळून आला



- परीक्षांबाबत पादर्शकता असणे अपेक्षित आहे. मात्र, घरी बसून ऑनलाइन परीक्षा देताना अनेक विद्यार्थी गैरप्रकार करत असल्याचे निदर्शनास आल्याने परीक्षेबाबतच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.
- त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टिकोनातून कमीत कमी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा तरी महाविद्यालयातील परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन घ्यावी, असा प्राथमिक विचार विद्यापीठाकडून केला जात आहे. एकूण परिस्थिती पाहून पुढील काही दिवसात याबाबत अधिकृत घोषणा केली जाऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 3 Jan 23, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

## ऑनलाइन अर्ज करताना अनेक तांत्रिक अडचणी

## पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना गाईड मिळेनात

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी. प्रवेशप्रक्रिया राबविली जात असून पात्र विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, विद्यापीठाकडे पीएच.डी. गाईडची संख्या वाढली असली, तरी हे गाइड विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून उपलब्ध होऊ शकले नसल्याचे चित्र आहे. विद्यापीठाकडे मार्गदर्शक असूनही त्याचा फायदा विद्यार्थ्यांना मिळत नसल्याची स्थिती आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार



पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून मान्यता द्यावी, अशी मागणी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती. त्यानंतर सामंत यांनी निर्देश दिल्यानंतर विद्यापीठातील शैक्षणिक विभागाने अधिकाधिक प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली. परंतु पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच ही मान्यता मिळाली असती, तर अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध झाले असते.

गाइड म्हणून मान्यता मिळावी, यासाठी पात्र प्राध्यापकांना ऑनलाइन पद्धतीने विद्यापीठाकडे अर्ज करावा लागतो. परंतु, या प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडचणी येत होत्या. त्यामुळे अनेक प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून लवकर मान्यता मिळू शकली नाही. त्यामुळे या प्राध्यापकांना जवळच्या संशोधन केंद्रांवर नोंदणी करून आपल्याकडे उपलब्ध असलेल्या जागांची माहिती विद्यापीठाच्या ऑनलाइन यंत्रणेला देता आली नाही.

प्रभात Sun, 23 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65770106

## विद्यापीठाच्या ऑनलाइन प्रणालीतील त्रुटी 'एथिकल हॅकर' विद्यार्थ्याकडून उघड

### संकेतस्थळावरील संवेदनशील माहिती असुरक्षित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** एथिकल हॅकर असलेल्या श्रेयस गुजर या विद्यार्थ्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन प्रणालीतील त्रुटी आणि असुरक्षितता दाखवून दिल्या आहेत. विद्यापीठाचे संकेतस्थळ हॅक करून लाखो विद्यार्थी, प्राध्यापक, परीक्षा या संदर्भातील संवेदनशील विदा असुरक्षित असल्याची विद्यापीठाला माहिती करून दिली असून, आता संपूर्ण प्रणालीतील त्रुटी दूर करून प्रणाली सुरक्षित करण्यासाठी विद्यापीठाकडून तातडीने पावले उचलली जाणे आवश्यक आहे.

श्रेयस गुजर फर्ग्युसन महाविद्यालयात संगणकशास्त्र शाखेत पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहे. तो प्रमाणित एथिकल हॅकरही





श्रेयस गुजर

आहे. त्याने यापूर्वी विविध कंपन्या आणि केंद्र सरकारसाठीही काम केले आहे. विद्यापीठाच्या प्रणालीत त्रुटी असल्याचे त्याला जून २०२१मध्ये लक्षात आले होते. त्यानुसार त्याने कुलगुरूंचे प्रणालीतील खाते हॅक करून ई मेलद्वारे ही बाब विद्यापीठाच्या निदर्शनासही आणून दिली. मात्र विद्यापीठाकडून त्याबाबत काहीच प्रतिसाद देण्यात आला नाही. त्यानंतर वारंवार पाठपुरावा करूनही प्रतिसाद देण्यात न आल्याने श्रेयसने डिसेंबरमध्ये प्रत्यक्ष विद्यापीठात जाऊन अधिकाऱ्यांना ही बाब निदर्शनास आणून दिली. त्यानंतर विद्यापीठाकडून या प्रकाराची दखल घेऊन प्रणालीतील त्रुटी दुरुस्त करण्यात आली.

प्रणालीतील त्रुटींविषयी श्रेयस म्हणाला, की विद्यापीठाने आपली प्रणाली, संकेतस्थळ अधिक सुरक्षित करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी व्यावसायिक तज्ज्ञांची मदत घेणे गरजेचे आहे. विद्यापीठाकडे संपूर्ण माहिती तंत्रज्ञान विभाग असूनही अशा किरकोळ त्रुटी प्रणालीत राहात असतील तर लाखो विद्यार्थी, प्राध्यापकांची माहिती, संवेदनशील विदा याला धोका निर्माण होऊ शकतो, याचा विचार विद्यापीठाने केला पाहिजे.

**"विद्यार्थ्याने विद्यापीठाच्या ऑनलाइन प्रणालीतील त्रुटी दाखवून दिली ही खरी गोष्ट आहे. त्याबाबत विद्यापीठाच्या आयटी विभागाने विद्यार्थ्याचे कौतुक करून त्याला प्रशस्तीपत्रही देऊन प्रणालीत दुरुस्तीही केली. मात्र, या विद्यार्थ्याने दाखवून दिलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने संपूर्ण प्रणालीच्या सुरक्षिततेचा आढावा घेण्यात येईल. बदलत्या तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. –** **डॉ. प्रफुल्ल पवार,** कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sun, 23 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65768450

## *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

# 'शोधगंगा'वरील पहिल्या दहा विद्यापीठांत राज्यातील एकमेव विद्यापीठ

## पीएच.डी. प्रबंध ऑनलाइन उपलब्धतेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशात चौथे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पीएच.डी. प्रबंध ऑनलाइन उपलब्ध करण्यासाठीच्या शोधगंगा या संकेतस्थळावर सर्वाधिक प्रबंध उपलब्ध केलेल्या देशातील पहिल्या दहा विद्यापीठांतील राज्यातील एकमेव विद्यापीठ असल्याचे दिसून येत आहे. देशातील पहिल्या दहा विद्यापीठांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौथ्या स्थानी आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने पीएच.डी. प्रबंध ऑनलाइन उपलब्ध करण्यासाठी शोधगंगा आणि शोधगंगोत्री या ऑनलाइन रिपॉझिटरी निर्माण केल्या आहेत. तर चौर्यकर्म टाळण्यासाठी शोध शुद्धी सॉफ्टवेअरची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यापीठांमध्ये झालेल्या पीएच.डी.चे प्रबंध शोधगंगा या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतात. हे प्रबंध संशोधक विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. त्यानुसार शोधगंगा या संकेतस्थळावर आतापर्यंत देशभरातील विद्यापीठांकडून ३ लाख ३६ हजार १७६ प्रबंध उपलब्ध करण्यात आले आहेत.

देशातील पहिल्या दहा विद्यापीठांमध्ये सर्वाधिक १३ हजार ३१ प्रबंध मद्रास विद्यापीठाचे आहेत. त्या खालोखाल कलकत्ता विद्यापीठाचे १२ हजार ६५७, अण्णा विद्यापीठाचे ११ हजार ९७७ आहेत. तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ११ हजार ३४६ प्रबंध शोधगंगावर आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संशोधन प्रबंधांमध्ये १९५१ ते २०२१ या कालावधीतील प्रबंधांचा समावेश आहे. तर पहिल्या दहात असलेल्या अन्य विद्यापीठांमध्ये छत्रपती शाहूजी महाराज विद्यापीठ, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ, व्ही. बी. एस. पूर्वांचल विद्यापीठ, पंजाब विद्यापीठ, भरतीयार विद्यापीठ, मनोन्मनियम सुंदरनार विद्यापीठ यांचा समावेश आहे.

### राज्यातील विद्यापीठांचे शोधगंगावरील प्रबंध

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - ५ हजार २३२, एसनडीटी महिला विद्यापीठ - १ हजार १५९
- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ - १ हजार ९४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ - ८२७,
- भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठ - ३८३, टाटा सामाजिक शास्त्र संस्था - ४४९,
- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ - ६०४, मुंबई विद्यापीठ - ५९२, सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ - २९४, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ - ११९,
- डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ - ६४, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ - ६२,
- गोंडवाना विद्यापीठ - ५६, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी - ३७,
- गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था - १७, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूर - १४

> "एकाच विषयावर पुन्हा पुन्हा संशोधन होऊ नये, संशोधनामध्ये चौर्यकर्म होऊ नये, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर संदर्भ साहित्य उपलब्ध होणे, नवीन संशोधन क्षेत्र विकसित होण्यासाठी शोधगंगा हा उपक्रम महत्त्वाचा आहे. पीएच.डी. संशोधन प्रबंध स्वीकारताना विद्यापीठाकडून प्रत्यक्ष प्रबंधासह त्याची सीडीही घेतली जाते. त्यामुळे शोधगंगावर ते उपलब्ध करणे सोयीचे ठरते. - **डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sun, 23 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65768484

## *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

### ब्रेल लिपीसह श्राव्य पुस्तके उपलब्ध करा : 'यूजीसी'

# अंध विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक सुलभ

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ -** विद्यापीठांनी अंध आणि दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीतील पुस्तके, श्राव्य पुस्तके, मोठ्या अक्षरात मुद्रित केलेली पुस्तके आणि सहायक साधने उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

यासंदर्भात केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने यूजीसीला पत्र दिले होते. या पार्श्वभूमीवर यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठ स्तरावर अंध, दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी



**शैक्षणिक साहित्य विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध होणार**

ब्रेल लिपीतील पुस्तके, श्राव्य पुस्तके अशा शैक्षणिक साहित्याची निर्मिती करावेत, असे यूजीसीने सर्व विद्यापीठांना सूचित केले आहे. एवढेच नव्हे, तर संबंधित शैक्षणिक साहित्य विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध करून देण्याबाबतही स्पष्ट करण्यात आले आहे.

अंध आणि दृष्टिदोष विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्यास ते अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ठरू शकतील. हे साहित्य विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांना सहाय्य ठरू शकते, असेही यूजीसीने परिपत्रकात नमूद केले आहे. या सर्व सुविधा पुरवल्यास या विद्यार्थ्यांना शिक्षणात आणखी सहजता उपलब्ध होईल, असेही यूजीसीने परिपत्रकात म्हटले आहे.

प्रभात Sun, 23 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65784700

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

लोकमत

परीक्षेसाठी केली विचारणा : उत्पन्नात होईल वाढ

## सोलापूर विद्यापीठाकडून 'एसपीपीयू एज्यु. टेक'ला परीक्षेसाठी विचारणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एस.पी.पी.यु. एज्यु.टेक फाउंडेशन या कंपनीकडे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने परीक्षेसाठी विचारणा केली होती. त्यामुळे विद्यापीठाच्या कंपनीच्या माध्यमातून केवळ पुणे, अहमदनगर व नाशिकच नाही तर इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सुद्धा परीक्षा घेतल्या जाऊ शकतात. परिणामी या कंपनीच्या माध्यमातून विद्यापीठाच्या उत्पन्नात वाढ करण्याचा वेगळा पर्याय निर्माण झाला आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे येत्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. परीक्षा घेण्याची जबाबदारी एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनकडे देण्यात आली आहे. खासगी कंपनीपेक्षा विद्यापीठाच्या कंपनीने चांगल्या पध्दतीने परीक्षा घेतल्या होत्या. त्यामुळे पुढील काळात विद्यापीठाच्या माध्यमातून इतर विद्यापीठाच्या परीक्षासुद्धा घेतल्या जाऊ शकतात.गेल्या काही वर्षात विद्यापीठाच्या आर्थिक उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाला स्वतःचा निधी उभारावा लागणार आहे. त्यामुळे एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनच्या माध्यमातून परीक्षेसह विविध कामे करून निधी उभारण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.



> एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन कंपनीच्या माध्यमातून परीक्षा घेतल्या जात असल्यामुळे विद्यापीठाचे कोट्यवधी रुपये वाचले आहेत. या कंपनीने आमचीही परीक्षा घ्यावी, अशी विचारणा एकदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने केली होती.
>
> - **डॉ.नितीन करमळकर,** कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाच्या पदभारात बदल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी पदाचा कार्यभार विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागातील (पुम्बा) प्राध्यापिका सी. ए. डॉ. शिल्पा भिडे यांच्याकडे देण्यात आला आहे. लवकरच रिक्त झालेल्या पदाची जाहिरात देऊन हे पद भरले जाईल, असे विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सी.ए. अतुल पाटणकर यांच्या निधनामुळे हे पद रिक्त झाले होते. त्यामुळे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्याकडे हा पदभार होता. सात महिने हे पद सांभाळल्यानंतर पवार यांच्याकडील पदाची जबाबदारी आता सी.ए. डॉ. शिल्पा भिडे यांच्याकडे देण्यात आली आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 24, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

सकाळ

# प्राध्यापकांच्या १७ हजार जागा रिक्त

## राज्यातील स्थिती; नवप्राध्यापक संघटनेकडून भरतीची मागणी

पुणे, ता. २३ : राज्य सरकारने संवर्गनिहाय आरक्षण कायद्याची तत्काळ अंमलबजावणी करावी. तसेच त्यानुसार राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक पदभरतीचा अध्यादेश काढावा आणि ही भरती प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने केली आहे.

राज्यातील एक हजार १७१ अशासकीय महाविद्यालयांमध्ये १ ऑक्टोबर २०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार आणि आतापर्यंत सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांच्या रिक्त जागा पकडून जवळपास १७ हजार प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किमान १२ हजार जागा रिक्त आहेत. अकृषी विद्यापीठांमधील शैक्षणिक विभागात किमान पंधराशे सहायक प्राध्यापक, प्राध्यापक यांच्या जागा रिक्त असून, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या किमान एक हजार जागा रिक्त आहेत.

> **"महाविद्यालय किंवा एखाद्या संस्थेत आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, पदभरतीत कुठले आरक्षण असावे, यासंदर्भात संवर्गनिहाय आरक्षण विधेयक मंजूर झाले. शासन निर्णय होत नाही तोपर्यंत रोस्टर तयार करण्याची प्रक्रिया सुरू होणार नाही. सर्व शिक्षणसंस्थांना नव्याने रोस्टर तयार करून पदभरतीची प्रक्रिया करावी लागणार आहे. परंतु सद्यःस्थितीत पदभरतीला मान्यता असूनही रोस्टरच्या लालफितीत प्राध्यापक पदभरती अडकली आहे. एकीकडे प्राध्यापक पदभरतीला परवानगी द्यायची आणि दुसरीकडे आरक्षण पद्धतीच्या धोरणात पदभरती लांबवायची ही फसवणूक आहे.''**
> – **डॉ. संदीप पाथ्रीकर,** अध्यक्ष, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना

राज्यात एकूण ३१ हजार ५०० इतकी प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्यातील नेट-सेट, पीएच.डी. पात्रताधारकांमध्ये नैराश्य आले आहे. परंतु त्यानंतर सरकारने प्राध्यापक पदभरतीला १२ नोव्हेंबर २०२१ रोजी दोन हजार ८८ पदांसाठी परवानगी दिली. सहायक प्राध्यापक पदभरतीसाठी प्रक्रिया महाविद्यालय व संस्था स्तरावर सुरू झाली होती. परंतु राज्यातील सर्व प्रवर्गांना न्याय मिळावा, या हेतूने राज्य सरकारने २९ डिसेंबर २०२१ रोजी संवर्गनिहाय आरक्षण विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर केले. हे विधेयक मंजूर होऊन जवळपास २५ दिवसांचा कालावधी उलटून गेला, तरीही विधेयकाचे अजून कायद्यात रूपांतर झालेले नाही. परिणामी सहायक प्राध्यापक पदभरतीसंबंधी पुढील कार्यवाही महाविद्यालय व संस्था स्तरावर होत नसल्याचे दिसून येते, असे नवप्राध्यापक संघटनेचे म्हणणे आहे.

Pune, Pune-Today
24/01/2022 Page No. 1

# महाविद्यालयांना ३१ मार्चपर्यंत नॅक मूल्यांकनासाठी मुदत

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २४ -** राज्यातील ९८ वरिष्ठ महाविद्यालयांनी अद्यापही एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतले नसल्याचे उच्च शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. त्या पार्श्वभूमीवर या महाविद्यालयांची बैठक घेऊन त्यांना येत्या ३१ मार्चपर्यंत नॅक मूल्यांकनासाठी मुदत देण्यात आल्याचे उच्च शिक्षण विभागाने म्हटले आहे.

राज्यात एकूण १ हजार १७७ अनुदानित महाविद्यालये आहेत. केवळ अनुदानितच नाही, तर विना अनुदानित महाविद्यालयांनी सुद्धा नॅक मुल्यांकन करणे आवश्यक आहे, असे विद्यापीठ अनुदान आयोगाने वारंवार आदेश दिले आहेत. त्याबाबत राज्य शासनाने ८ ऑक्टोबर २०१० रोजी अध्यादेशही प्रसिद्ध केला होता. मात्र, तरीही राज्यातील ९८ महाविद्यालयांनी एकदाही नॅककडून मूल्यांकन करून घेतले नसल्याचे समोर आले. या महाविद्यालयांच्या प्राचार्यांबरोबर सोमवारी उच्च शिक्षण विभागातर्फे आढावा बैठक घेण्यात आली.

प्रभात Tue, 25 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/65

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

केसरी

: www.dailykesari.com

### आता महाविद्यालयांमध्येही सहकार चळवळ

**पुणे** : सहकार क्षेत्रातीतल विविध स्तरावरील काम यशस्वीरित्या सुरू आहे. सहकाराच्या दृष्टिकोनातून कृषिपूरक उद्योगांना गती देण्यासाठी तरुणांचा सहभाग महत्वाचा आहे. त्यासाठी त्यासाठी एमसीडीसीमार्फत महाविद्यालयीन स्तरावर सहकार सहकार चळवळ राबविण्यात यावी, असे आवाहन सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची (एमसीडीसी) ४० वा संचालक मंडळाची सभा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी एमसीडीसीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, त्यांची परिस्थिती आणि उपाययोजनांचा आढावा घेतला. यावेळी साखर आयुक्त शेखर गायकवाड, सहकार आयुक्त अनिल कवडे, पणन संचालक सुनिल पवार, एमसीडीसीचे संचालक मिलींद आकरे, व्यवस्थापक संजयकुमार सुद्रिक, ज्योती शंखपाल आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, 'सहकार क्षेत्रात सर्वाधिक आघाडीवरील राज्य महाराष्ट्र असून त्याचा पाया आणखी बळकट करण्यासाठी तरुणांनी सहकारातील विविध क्षेत्रात व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवणे गरजेचे आहे. सहकार क्षेत्रातील विविध संधी याविषयी तरुणांच्या मनामध्ये जागृती निर्माण करणे महत्वाचे आहे'

तसेच एमसीडीसीच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी संचालक मंडळाने कार्य करावे, सेवा सहकारी संस्थांमार्फत जास्तीत जास्त सहकाऱ्यांना किफायतशीर दरात खते व औषधे पुरवठा करणे, अन्नप्रक्रिया उद्योगातील छोट्या उद्योजकांना बाजार मिळवून देण्यासाठी दालने उभे करणे, शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या कॉपशॉपसंदर्भात कौशल्य आधारित शिक्षण द्यावे, अशा अनेक सूचना पाटील यांनी यावेळी केल्या.

Kesari 25.1.2022

### Educationists oppose amendment in Maha universities Act

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** A special discuss programme was organised at Vidyapeeth Vikas Manch on Monday to oppose the state government's decision amend the 'Maharashtra Public Universities Act' and introduce a new post of 'pro-chancellor' which will be the state's higher and technical education minister.

Former vice-chancellors, SPPU senate members and senior educationists who attended the meet decided to challenge the decision in court.

"There is no need to create such a post and allow rights to be reserved with the state government. Vice-chancellors are the authority for academic and administrative decisions in the university and the amendment if comes into force will make them toothless," said Prof RS Mali, former vice-chancellor of the then Pune university (Savitribai Phule Pune University).

As per the amendment, the pro-chancellor would be having various powers like chairing the university senate meeting — high-level body that takes policy decision — and to preside over the university's convocation ceremony in the absence of chancellor who is the governor of the state.

Prof Vidyasagar Pandit, former vice-chancellor of Nanded University, said, "Affordable quality education is needed for students coming from rural and below poverty line backgrounds. If the autonomy powers of the universities are reduced then quality of education will also suffer. And more political interference will increase in university functioning."

Prof Murlidhar Chandekar, vice-chancellor of Sant Gadge Baba Amravati University, said, "Creating a new post above the vice-chancellors and giving it powers in policy making decisions is unacceptable. Moreover, why it is that only the state higher education minister will only by on that post. Academic agenda should not change into political agenda while running state universities and we should oppose it together."

Educationists, senate members and owners of institutes present agreed to move the court, if need be, to oppose the state government's plan.

Hindustan Times 25.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# दहावी, बारावी परीक्षेच्या तोंडावर सरकारची कोंडी

## वेतनेत्तर अनुदानासह अन्य मागण्यांसाठी राज्य शिक्षण संस्था महामंडळाचा असहकाराचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षांच्या तोंडावर वेतनेत्तर अनुदान, शिक्षकेतर कर्मचारी भरती, आरटीई शुल्काची प्रतिपूर्ती आदी मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने राज्य सरकारला वेठीस धरले आहे. एका आठवड्याच्या आत या मागण्यांवर निर्णय न झाल्यास दहावी, बारावीच्या परीक्षांसाठी इमारत, इतर सुविधा तसेच कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिला जाणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे मागण्यांवर तोडगा न निघाल्यास तोंडावर आलेल्या परीक्षांवर संकट उभे राहण्याची शक्यता आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांना मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरुवात होत आहे. राज्यावर करोनाचे संकेट असल्याने या परीक्षा ऑफलाईन होणार की ऑनलाईन अशी चर्चा असतानाच आता अचानक महाराष्ट्र

> **“ सरकारकडे अनेक वर्षांपासून वेतनेत्तर अनुदान थकीत आहे. मात्र, सरकार हा प्रश्न मार्गी लावत नाही. त्यामुळे एका आठवड्याच्या आत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास परीक्षेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.** - विजय पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ.

राज्य शिक्षण संस्था महामंडळाने आपल्या मागण्यांसाठी सरकारला वेठीस धरले आहे. मागण्या मान्य न झाल्यास परीक्षेसाठी कुठलीही मदत करणार नाही असा इशाराच संस्थाचालकांनी दिल्याने राज्यातील परीक्षांवर संकट उभे राहण्याची शक्यता आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री व खासदार शरद पवार यांना पत्र लिहिले आहे. यानुसार, पवित्र पोर्टलद्वारे केल्या



जात असलेल्या शिक्षक भरतीचे कार्यक्षेत्र विभागवार करावे, शिक्षकेतर कर्मचारी भरती त्वरित सुरू करावी, इंग्रजी शाळांच्या पाच वर्षांपासून आरटीई २५ टक्के प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती करावी, खासगी शिक्षण संस्थांच्या शाळांना आरटीई कायदा लागू करावा व त्यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा अशा अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत.

या मागण्या त्वरित मान्य न झाल्यास दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी संस्थेच्या, शाळांच्या, महाविद्यालयाच्या इमारती व इतर सुविधा तसेच कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिला जाणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे.

लोकसत्ता Wed, 26 January 2022 https://epaper.loksatta.com/c/65843605

# राज्यातील महाविद्यालये १ फेब्रुवारीपासून

**मुंबई :** करोनामुळे विशेषतः गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या ओमायक्रॉनमुळे बंद करण्यात आलेली राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत, समूह विद्यापीठांचे नियमित वर्ग १ फेब्रुवारीपासून सुरू करण्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी मान्यता दिली. त्यानुसार करोनाची स्थानिक परिस्थिती पाहून महाविद्यालये सुरू करण्याचे अधिकार विद्यापीठ आणि स्थानिक प्रशासनास देण्यात आले आहेत.

लोकसत्ता Wed, 26 https://

लोकमत

# महाविद्यालये सुरू होणार, पण आता जाणार कोण?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनामुळे बंद करण्यात आलेली महाविद्यालये येत्या १ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा येत्या १५ फेब्रुवारीनंतर सुरू होणार आहेत. बहुतांश विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम शिकवून झाला आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरू झाली तरी पंधरा दिवसांसाठी विद्यार्थी येणार आहेत का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

राज्य शासनाने स्थानिक प्रशासनालाच महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी आहे. तसेच लसीचे दोन डोस न झालेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईनच शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे.

अद्याप लस न घेतलेल्या विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यासाठी महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी स्थानिक प्रशासनाशी संवाद साधून लसीकरण मोहीम राबवावी, असेही उच्च शिक्षण विभागाने प्रसिध्द केलेल्या अध्यादेशात स्पष्ट करण्यात आले आहे. फेब्रुवारी महिन्यात विद्यापीठाच्या परीक्षा घेतल्या जाणार असल्याने प्राध्यापकांनी ऑनलाईन पद्धतीने वर्ग घेऊन विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यामुळे आता महाविद्यालयात कशासाठी जायचे, असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

Hello Pune
Page No. 5 Jan 26, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

लोकमत

राज्यातील ९८ महाविद्यालयांना सूचना: एकदाही झाले नाही मूल्यांकन

## नॅक मूल्यांकनासाठी मार्च महिन्यापर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सर्व महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे, अशा वेळोवेळी सूचना देऊनही राज्यातील ९८ महाविद्यालयांनी एकदाही नॅककडुन मूल्यांकन करून घेतले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने सोमवारी ऑनलाईन पद्धतीने या महाविद्यालयांशी संवाद साधून त्यांना येत्या ३१ मार्च २०२२ पर्यंत मूल्यांकन करून घेण्यासाठी मुदत दिली आहे.

राज्यात एकूण १ हजार १७७ अनुदानित महाविद्यालये आहेत. त्यातील ९८ महाविद्यालयांनी एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतलेले नाही. केवळ अनुदानितच नाही तर, विना अनुदानित महाविद्यालयांनी सुद्धा नॅक मूल्यांकन करणे आवश्यक आहे,असे विद्यापीठ कायद्यात आहे. राज्य शासनाने ९ ऑक्टोबर २०१० रोजी याबाबतचा अध्यादेशही प्रसिद्ध केला होता. मात्र, तरीही राज्यातील ९८ महाविद्यालयांनी एकदाही नॅककडुन मूल्यांकन करून घेतले नसल्याचे समोर आले. अमरावती विभागातील सर्वाधिक १९ महाविद्यालये असून त्या खालोखाल नागपूर विभागातील १४ ,नांदेडमधील १२,औरंगाबाद विभागातील ११ महाविद्यालयांचा समावेश आहे. तसेच मुंबई, पुणे, पनवेल,कोल्हापूर ,जळगाव आदी विभागातील एक ते दोन महाविद्यालयांनी सुद्धा मूल्यांकन करून घेतलेले नाही.

राज्य शासनातर्फे अनुदान दिले जात असताना महाविद्यालयांकडून मूल्यांकन करून घेतले जात नसल्याने सोमवारी उच्च शिक्षण विभागातर्फे संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बरोबर आढावा बैठक घेण्यात आली. त्यात महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक यांच्यातील असणारा विसंवाद, आयक्यूएससी प्रमुख सक्षम असणे, नॅक मूल्यांकनाचा अहवाल तयार करणे, उच्च शिक्षण सहसंचालकांनी त्यासाठी महाविद्यालयांना सहकार्य करणे आदी विषयावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. नॅकला सामोरे न गेलेल्या महाविद्यालयांची कार्यशाळा होईल.

### नॅक मूल्यांकन केले नाही

- पुण्यातील येरवडा येथील गेनबा सोपानराव मोझे व पी.एस. मुळगावकर विशेष बी.एड.कॉलेज या दोन महाविद्यालयांनी एकदाही नॅक कडून मूल्यांकन करुन घेतलेले नाही. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी या महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी ऑनलाइन चर्चा केली.
- विद्यापीठांनी तसेच उच्च शिक्षण कार्यालयाने यापूर्वी अनेक वेळा एकदाही नॅकला सामोरे न गेलेल्या महाविद्यालयांची कार्यशाळा घेऊन त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले,तरीही महाविद्यालयांनी त्याकडे गंभीरपणे लक्ष दिले नाही.

Hello Pune
Page No. 4 Jan 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

शासनाकडून मान्यता; स्वहितासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षेचा योग्य पर्याय निवडावा

## विद्यापीठाला आता ऑफलाइन परीक्षा घेता येणार

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील विद्यापीठांना येत्या १५ फेब्रुवारीनंतर ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. विद्यापीठ व महाविद्यालयांनी येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत घेण्यात येणाऱ्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच घ्याव्यात; परंतु त्यानंतरच्या परीक्षा ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर घ्यावा, असे स्पष्ट निर्देश राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिले आहेत.



विजेची अनुपलब्धता, नेटवर्क कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे विद्यार्थी अथवा त्याचे कुटुंबीय कोरोनाबाधित असल्यास किंवा इतर समस्यांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देणे शक्य झाली नाही तर त्यांची ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने पुनर्रपरीक्षा घ्यावी. एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही शासनाने अध्यादेशाद्वारे स्पष्ट केले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीत केवळ शासन आदेशामुळे विद्यापीठांना ऑनलाइन परीक्षा घ्याव्या लागत होत्या. मात्र, ऑनलाइन परीक्षांमध्ये अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आले होते. बहुतांश विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले. मात्र, त्यामुळे कंपन्यांसमोर या विद्यार्थ्यांना नोकरी देण्याबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला. परिणामी सध्या कंपन्यांकडून विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. एकूणच ऑनलाइन परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व करिअरच्या दृष्टिकोनातून योग्य ठरत नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे विद्यापीठाने ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही परीक्षेचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर ठेवावा, असेही तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

> ऑनलाइन पध्दतीने घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत अनेक त्रुटी आहेत. त्यातून विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन करता येत नाही. शासनाने ऑफलाइन परीक्षा घेण्यास परवानगी दिली असेल तर विद्यार्थिहिताचा विचार करुन विद्यापीठाने कोरोनास्थितीचा विचार करुन अधिकाधिक विषयांच्या परीक्षा ऑफलाइन पध्दतीने घ्याव्यात.
>
> - डॉ. अरुण अडसूळ, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

> विद्यापीठांनी आता ऑफलाईन व ऑनलाईन हे दोन्ही पर्याय विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध करुन द्यावेत. विद्यार्थी सुजान असून कोणत्या पध्दतीने परीक्षा देण्यात आपले हित आहे, हे विद्यार्थी जाणतात.ऑफलाईन पध्दतीने परीक्षा सुरु केल्यानंतरच शिक्षण व्यवस्थेची घसरलेली गाडी रुळावर येईल.
>
> - प्रा. नंदकुमार निकम,ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

Hello Pune
Page No. 5 Jan 26, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

सकाळ

# आठवडाभरातच 'सेट'चा निकाल

## चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर परीक्षार्थींमध्ये समाधान

पुणे, ता. २५ : सहायक प्राध्यापक पदासाठीची राज्य पात्रता परीक्षा अर्थात सेटचा निकाल आठवडाभरातच जाहीर होणार आहे. लांबत चाललेल्या निकालामुळे परीक्षार्थींमध्ये चिंतेचे वातावरण होते. अखेरीस चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने महाराष्ट्र आणि गोव्यात २६ सप्टेंबर रोजी सेट परीक्षा घेण्यात आली होती. त्याची प्राथमिक उत्तरतालिका ऑक्टोबर महिन्यातच घोषित करण्यात आली होती. त्यानंतर प्रत्यक्ष निकाल घोषित व्हायला दोन महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे. याबद्दल महाराष्ट्र सेट समन्वयक डॉ. बी. पी. कापडणीस म्हणाले, "विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) नामनिर्देशित सदस्यांची नावे यायला विलंब झाला. त्यामुळे निकाल घोषित करण्यासाठी उशीर होत आहे. आता ही प्रक्रिया पूर्ण झाली असून, याच आठवड्यात परीक्षेचा निकाल आम्ही घोषित करू."

यूजीसीच्या नियमावलीनुसार परीक्षा झाल्यानंतर सर्व विषयांची उत्तरसूची जाहीर करण्यात आली होती. विद्यार्थ्यांकडून या उत्तर सुचीवर हरकतीही मागविण्यात आल्या होत्या. सेट विभागाकडे नियोजित कालावधीत विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या हरकती तज्ज्ञ समिती समोर ठेवण्यात आल्या. दरम्यान, विद्यापीठाने सेट परीक्षेचा सर्व निकाल तयार केला. मात्र, यूजीसीच्या समितीकडून निकाल मंजुरीचे काम पूर्ण झाले नव्हते. परंतु, यूजीसीच्या समितीने निकाल जाहीर करण्यास नुकतीच मान्यता दिली आहे. त्यामुळे निकालाची वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपणार आहे. शुक्रवारी (ता. २८) सुकाणू समितीच्या बैठकीनंतर तातडीने निकाल घोषित केला जाईल, असे डॉ. बी. पी. कापडणीस यांनी सांगितले. मात्र सातत्याने निकालात विलंबाबद्दल विद्यार्थ्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना हा निकाल http://setexam.unipune.ac.inया संकेतस्थळावर पाहायला मिळेल.

**"सेट परीक्षेचा निकाल घोषित करायला दरवर्षी उशीर होतो. निकाल हाती नसल्यामुळे उमेदवारांना नोकरी किंवा इतर प्रक्रियांसाठी अर्जही करता येत नाही. या विलंबामुळे उमेदवारांना प्रचंड ताणतणावाचा सामना करावा लागतो.**
**- शिल्पा क्षीरसागर,** परीक्षार्थी

**परीक्षेचे स्वरूप**

| | |
|---|---|
| ३८ | एकूण विषय |
| १,११,००० | अर्जदारांची संख्या |
| २२० | परीक्षा केंद्रे |

Pune, Pune-Today
26/01/2022 Page No. 1

City | Pune Times Mirror | Wednesday, January 26, 2022 | 10

# Why are colleges forcing PhD aspirants to pay extra fees?

**Students claim research centres not following SPPU structure; taking more than ₹1K from them; demand action**

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

Several PhD aspirants have come forward and raised their voices against the extra fees being charged by colleges for the doctorate pre-viva. Despite the Savitribai Phule Pune University (SPPU) designing a fixed fee structure, students claimed varsity affiliated colleges and recognised research centres are charging more than the stipulated amount of Rs 1,000.

They are now demanding a full audit by varsity officials and strict action against the offenders. The research centres are in Pune, Ahmednagar and Nashik.

Prakash Date, one of the aspirants, said, "The interview process was delayed due to the pandemic, and several students from the rural belt faced financial scarcity. It was difficult for many students to even pay the fixed fees, leave alone the additional charges. Yet, college administrations charged excess amounts. This is nothing less than financial robbery by Pimpri-Chinchwad area college management."

Date further said that SPPU should revoke the recognition accorded to these colleges and research centres for charging unreasonable amounts instead of the prescribed fee.

*"A complaint has been lodged with SPPU in this regard but no action has been taken against violators yet,"* he added.

FILE PHOTO




**SPPU deputy registrar Rajesh Raherkar has assured to investigate the matter and take action**

Apart from the complaints of additional fees, several female candidates have protested against the lack of facilities at the centres and the distance between the centre and where the guides sit.

Aspirant Ashwini Kulkarni said, "Research centres are in one college, while the guides are in another. Girls spend maximum time travelling at odd hours. The centres do not have a library, rest hall, canteen or even toilet facility. It is difficult for females to constantly go looking for basic sanitation facilities. Regardless, the management charges additional fees."

A resident of Ahmednagar and PhD aspirant Pradip Ghule stated that all affiliated colleges and research centres are required to abide by the fee rules set by the university. "All other types of fee structure, including interviews and admissions are fixed by the SPPU. But many centres in the Ahmednagar district collect extra fees under the pretext of processing fees, administrative fees or miscellaneous fees. We will lodge a complaint against the college administration concerned. We request SPPU vice-chancellor Dr Nitin Karmalkar to take stringent action against the guilty," Ghule said.

Another candidate, Shital Patil, said, "The SPPU administration had published a circular on PhD fee structure on February 26, 2016, and November 11, 2021. They had directed the colleges and centres to follow the rules during the admission process otherwise, the varsity has the authority to cancel the approval to the centres. Despite this, many colleges demanded additional charges from students."

An associate professor of a reputed city college, on condition of anonymity, said, "It takes a minimum of three years and maximum of five to seven years to earn a PhD degree. They need to continue with the college or centre for a long period and hence do not speak against the administration. The SPPU should conduct an audit of the admission process and basic facilities.

**"The centres do not have a library, rest hall, canteen or even toilet facility. It is difficult for females to constantly go looking for basic sanitation facilities**
— Ashwini Kulkarni, PhD aspirant

The fellowship stipends are also on the verge of shutting down, and the students are likely to face financial scarcity."

Head of PhD and post-graduate admissions section at SPPU, deputy registrar Rajesh Raherkar, said, "The admission process for PhD students goes smoothly every year, and the free structure has been defined. If we find that rules have been violated, the centres or colleges concerned will be derecognised. Students should file a complaint with the varsity if they are being charged extra fees. We will investigate the matter and take strict action."

*Mirror* tried to contact Karmalkar, pro-vice-chancellor Dr NS Umrani and registrar Dr Prafulla Pawar for comment, but they were unavailable.

Pune Mirror 26.1.2022

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

सामना

# पदवी अभ्यासक्रम होणार चार वर्षांचा

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात स्थापन केलेल्या डॉ. रघुनाथ माशेलकर समितीच्या कार्यगटाचा अहवाल मंत्रिमंडळ बैठकीत आज सादर करण्यात आला. या अहवालातील शिफारशीनुसार पदवीसाठी सध्या सुरू असलेला तीन वर्षांचा अभ्यासक्रम चार वर्षे करण्याबाबत योजना आखण्यात येणार आहे. याविषयीचा आराखडा तयार करण्यात येणार असून मुंबई व पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाची समिती तयार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्यात येणार असून याविषयीच्या निर्णयावर आज मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखालील या कार्यगटात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांच्यासह उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण, क्रीडा, वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय, कौशल्य विकास व उद्योजकता या खात्यांचे मंत्री यांचा समावेश असेल. तसेच समितीने शिफारस केलेल्या काही मुद्द्यांच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती बैठकीत देण्यात आली.

### ५० वर्षे पूर्ण झालेल्या संस्थांना विद्यापीठाचा दर्जा

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या पाच कुलगुरूंची एक समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. ही समिती बहुविद्याशाखीय उच्च शैक्षणिक संस्थांचा आराखडा तयार करण्याबाबत व राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या अधिकार क्षेत्राचा पुनर्विचार करण्याबाबत तसेच अध्यापन व अध्ययनाची उत्कृष्टता केंद्रे तयार करण्याबाबत विचार करणार आहे. ज्या शैक्षणिक संस्थांना ५० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्याकरिता राज्यातील अकृषी विद्यापीठांचे पाच कुलगुरू व इतर तज्ज्ञ यांची एक समिती नेमण्यास मान्यता देण्यात आली.

### माशेलकर समितीच्या शिफारशी

■ पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षांचा करणे ■ ज्या शैक्षणिक संस्थांना पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांना विद्यापीठाचा दर्जा देण्यात यावा. ■ विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीबाबत श्वेतपत्रिका काढण्यात यावी ■ शैक्षणिक रिक्त पदे भरण्यात यावी ■ दहावीनंतर शैक्षणिक तांत्रिक अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी धोरण निश्चित करणे ■ परदेशी विद्यापीठांना राज्यांमध्ये शैक्षणिक कार्य करण्याच्या दृष्टीने वैधानिक तरतूद करण्यात यावी ■ डिजिटल शिक्षणासाठी तीन हजार कोटींची तरतूद अपेक्षित आहे ■ उच्च शिक्षणाकडे जास्त लक्ष देण्यासाठी महाराष्ट्र राज्य संशोधन व नवोपक्रम परिषद स्थापन करण्यात यावी ■ सामाजिक आर्थिक वंचित घटकांना मोफत शिक्षणासाठी जास्त निधी देण्यात यावा तसेच नॅशनल टेस्टिंग एजन्सीपासून सूट द्यावी ■ कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून पदवीपूर्व स्तरासाठी मराठी भाषांतर अभियान राबविण्यात यावे

Pune Edition
Jan 28, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# पंतप्रधान कार्यालयाच्या सुचनेनुसार विद्यापीठात गणित संग्रहालय

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : लहान वयापासूनच मुलांना विज्ञानाची आवड निर्माण होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सायन्स पार्कची निर्मिती केली आहे. आता पंतप्रधान कार्यालयाच्या सुचनेनुसार मुलांना गणिताची गोडी लागण्यासाठी विद्यापीठात गणिताचे संग्रहालय सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ७३व्या प्रजासत्ताक दिनावेळी डॉ. करमळकर बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, नवसंकल्पना केंद्राच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले, गणित संग्रहालयाद्वारे चौथी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यां गणिती खेळांतून गणित विषय शिकवण्यात येईल. ही संकल्पना पंतप्रधान कार्यालयातून आली आहे, त्यासाठी भारत फोर्ज कंपनीचे डॉ. बाबा कल्याणी यांनी आर्थिक सहकार्य केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सीफोर आयफोर प्रयोगशाळा, रिसर्च पार्क फाउंडेशन, सायन्स पार्क, क्रीडा संकुल असे विविध उपक्रम विद्यापीठ राबवत असल्याचे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

### महाविद्यालयांसाठीचे पुरस्कार जाहीर

विद्यापीठातर्फे महाविद्यालयांसाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यात उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिकच्या मराठा विद्या प्रसारक समाज कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे आर्ट, सायन्स ॲंड कॉमर्स कॉलेज, प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीज पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲंड कॉमर्स यांचा समावेश आहे. डिपार्टमेंट ऑफ ॲटमोस्फेरिक ॲंड स्पेस सायन्सला विद्यापीठातील सर्वोत्कृष्ट विभागाचा पुरस्कार जाहीर झाला.

लोकसत्ता Fri, 28 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65865985

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

**लोकमत**

कुलगुरु डॉ. नितीन करमळकर : प्रजासत्ताक दिन उत्साहत

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात लवकरच गणित म्युझियम !

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : लहान वयापासूनच मुलांना विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी विद्यापीठाकडून सायन्स पार्कची निर्मिती करण्यात आली आहे. आता त्यापुढे जाऊन गणिताची गोडी लागावी यासाठी लवकरच गणित म्युझियम सुरू करण्यात येणार आहे, अशी घोषणा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ७३व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, इनोव्हेशन केंद्राच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर उपस्थित होत्या.

डॉ. नितीन करमळकर म्हणाले, चौथीपासून ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या गणित म्युझियम खेळाच्या माध्यमातून गणित विषय शिकविण्यात येईल. ही संकल्पना पंतप्रधान कार्यालयातून आली आहे. यासाठी भारत फोर्ज कंपनीचे बाबा कल्याणी यांचे आर्थिक सहकार्य लाभले आहे.

कोविडकाळात विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे आम्ही सकाळच्या वेळात विद्यापीठाच्या परिसरात प्रदर्शन भरविले. विद्यापीठात सकाळच्या वेळात फिरायला येणाऱ्या नागरिकांकडून याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कायम प्रयत्नशील आहे.

सीफोरआयफोर प्रयोगशाळा, रिसर्च पार्क फाउंडेशन, सायन्स पार्क, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स असे अनेक उपक्रम त्यासाठी सातत्याने करीत आहे. यामध्ये व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तसेच प्र-कुलगुरू व कुलसचिव यांचे मोलाचे योगदान आहे, असेही डॉ. करमळकर यांनी सांगितले.



### विद्यापीठाचे विविध पुरस्कार जाहीर

विद्यापीठातर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार यावेळी जाहीर केले. उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिकच्या मराठा विद्याप्रसारक समाज कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीज पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या विभागामध्ये डिपार्टमेंट ऑफ ॲटमोस्फेरिक अँड स्पेस सायन्स यांना जाहीर झाले; तर वैयक्तिक पातळीवरील पुरस्कार यावेळी घोषित करण्यात आले.

Pune Main
Page No. 2 Jan 28, 2022
Powered by: erelego.com

**सकाळ**

# विद्यापीठात लवकरच गणित म्युझियम

**पुणे, ता. २७** : लहान वयापासूनच मुलांना गणिताची गोडी लागावी यासाठी विद्यापीठात लवकरच गणित म्युझियम सुरू करण्यात येणार आहे, अशी घोषणा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी ७३ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने केली.

प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी डॉ.करमळकर म्हणाले, "इयत्ता चौथीपासून ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या गणित म्युझियम खेळाच्या माध्यमातून गणित विषय शिकवण्यात येईल. ही संकल्पना पंतप्रधान कार्यालयातून आली असून यासाठी भारत फोर्ज कंपनीचे बाबा कल्याणी यांचे आर्थिक सहकार्य लाभले आहे." कोविड काळात विद्यार्थ्यांनी काढलेली चित्रांचे आम्ही सकाळच्या वेळात विद्यापीठ परिसरात प्रदर्शन भरविले. विद्यापीठात सकाळच्या वेळात फिरायला येणाऱ्या नागरिकांकडून याला चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचेही डॉ. करमळकर यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. एन.एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, इनोव्हेशन केंद्राच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर आदी यावेळी उपस्थित होते.



### विविध पुरस्कार जाहीर

प्रजासत्ताक दिनी विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिकच्या मराठा विद्या प्रसारक समाज कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे आर्ट, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीज पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स अँड कॉमर्स यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या विभागामध्ये डिपार्टमेंट ऑफ ॲटमोस्पेरीक अँड स्पेस सायन्स यांना जाहीर झाले, तर वैयक्तिक पातळीवरील पुरस्कार यावेळी घोषित करण्यात आले.

> **विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कायम प्रयत्नशील असून त्यासाठी सीफोरआयफोर प्रयोगशाळा, रिसर्च पार्क फाउंडेशन, सायन्स पार्क, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स असे अनेक उपक्रम सातत्याने करत आहे. यामध्ये व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तसेच प्र कुलगुरू व कुलसचिव यांचे मोलाचे योगदान आहे.**
> **-डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

Pune, Main
28/01/2022 Page No. 2

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

सकाळ

# विद्यापीठाची सत्र परीक्षा ऑनलाइन

## सहा लाख ४० हजार विद्यार्थ्यांचे अर्ज; विविध कारणांमुळे दहा हजार अर्ज प्रलंबित

**पुणे, ता. २७ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार असून ती १०० टक्के अभ्यासक्रमावर घेण्यात येईल. येत्या फेब्रुवारी व मार्च महिन्यात होणाऱ्या या परीक्षेसाठी आतापर्यंत सुमारे सहा लाख ४० हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केला असून अद्याप १० हजार विद्यार्थ्यांचे अर्ज काही कारणांमुळे प्रलंबित आहेत.



या परीक्षेला एक महिना उरला असताना मागील आठवड्यापर्यंत दीड लाख विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांनी अडवल्याची माहिती समोर आली होती. शैक्षणिक शुल्क न भरल्याने, तसेच इतर कारणांमुळे महाविद्यालयांकडून हे अर्ज अडवून ठेवले होते. महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची अडवणूक होत असल्याचा प्रकार विद्यापीठ प्रशासनासमोर आला. त्यानंतर प्रशासनाने महाविद्यालयांना परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांची अडवणूक करू नये, तसेच विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज प्रलंबित ठेवून नयेत, अशा सूचना दिल्या. त्यानंतर महाविद्यालयांनी प्रलंबित ठेवलेले परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे 'इनवर्ड' केले आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२च्या प्रथम सत्रातील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अनुशेषित, तसेच बहि:स्थ, श्रेणीसुधार परीक्षेसाठी अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन फेब्रुवारी-मार्च दरम्यान टप्प्या-टप्प्याने करण्यात येणार आहे.

**अशी असेल परीक्षा...**

- ऑनलाइन परीक्षेसाठी बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू)
- ६० बहुपर्यायी प्रश्नांमधून ५० अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राह्य धरणार
- विज्ञान, प्रथम वर्ष बीसीए (विज्ञान) व अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील गणित व संख्याशास्त्र विषयांसाठी ३० प्रश्न विचारले जातील. त्यातील २५ प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरणार
- परीक्षेत तांत्रिक कारणाने खंड पडल्यास विद्यार्थ्यांना 'सॉफ्टवेअर'मार्फत आपोआप वेळ वाढवून मिळणार
- विद्यार्थ्यांना परीक्षेबाबतची माहिती 'एसएमएस' व 'ई-मेल'द्वारे देण्यात येईल

**"शुल्काअभावी किंवा काही इतर कारणांमुळे काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज अडविण्यात येत असल्याचे दिसून आले. त्यानंतर विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित ठेवू नयेत, असा सूचना विद्यापीठामार्फत संबंधित महाविद्यालयांना दिल्या आहेत.**
**- डॉ. एन. एस. उमराणी,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**"विद्यापीठाकडे सत्र परीक्षेसाठी आतापर्यंत जवळपास सहा लाख ४० हजार अर्ज आले आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षा देता यावी म्हणून अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली होती. बहुतांश महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या अर्जांची प्रक्रिया पूर्ण केली आहे.**
**-डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Pune-Today
28/01/2022 Page No. 4

# राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात अंमलबजावणी

## कार्यगटाची स्थापना, पदवीसाठी आता चार वर्षे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याचा निर्णय गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या वेळी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात स्थापन केलेल्या डॉ. रघुनाथ माशेलकर समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला असून पदवी शिक्षणासाठी आता चार वर्षे तसेच ५० वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने डॉ. माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन केला होता. या कार्यगटाने ३० जून रोजी सादर केलेला अहवाल मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला. या अहवालात पुनर्रचना, अभ्यासक्रम, अध्यापकाचे शिक्षण, सुशासन, डिजिटल शिक्षण, संशोधन व कौशल्याधारित व्यावसायिक शिक्षण, सर्वसमावेशक आणि समानता, भाषा, कला आणि वित्त आदी विषयांच्या अनुषगांने नऊ शिफारशी केल्या आहेत. त्यामध्ये पदवीचा तीन वर्षांचा कालावधी चार वर्षे करणे, ५० वर्षे पूर्ण झालेल्या संस्थेस विद्यापीठाचा दर्जा द्यावा, राज्य विश्वासार्ह संशोधन व नवोपक्रम परिषदेची स्थापना करावी, १० वी नंतर तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांसाठी प्रवेश धोरण ठरवावे अशा शिफारशी समितीने केल्या आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत या अहलावर चर्चा झाल्यावर या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कार्यगटात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण, शालेय शिक्षण, क्रीडा, वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय, कौशल्य विकास व उद्योजकता या खात्यांचे मंत्री यांचा समावेश असेल.

माशेलकर समितीने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी विविध समित्या स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली. बहुविद्याशाखीय उच्च शैक्षणिक संस्थांचा आराखडा तयार करण्याबाबत व राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या अधिकार क्षेत्राचा पुनर्विचार करण्याबाबत तसेच अध्यापन व अध्ययनाची उत्कृष्टता केंद्रे तयार करण्याबाबत राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या पाच कुलगुरूंची एक समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

लोकसत्ता Fri, 28 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65871617

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# Experts' laud decision on NEP

**HT Correspondent**

puneletters@htlive.com

**PUNE** : The Maharashtra Cabinet on Thursday decided to constitute a group of ministers under the chief minister for the implementation of a report submitted by the task force headed by scientist Dr Raghunath Mashelkar on the National Education Policy (NEP) 2020. The task force had made a slew of recommendations, which the cabinet discussed in the meeting. Experts welcomed the decision, calling it a step ahead for the implementation of NEP.

Professor Vasudha Kamat, former vice-chancellor of SNDT University Mumbai and member of committee which formed New Education Policy said, "We interacted and discussed with many people related to higher and school education while drafting this new education policy. So, it is the country's policy and the credit goes to all citizens who have made their contributions to it. We are glad that state cabinet ministry has taken it forward to implement in the state."

The task force had submitted its report in September last year. It formed an 18-member panel under Dr Mashelkar in October 2020 to study the policy and make recommendations to the state. The task force has made a slew of recommendations including migrating to four-year courses from three-year ones, provide university status to those educational institutions which have completed 50 years, establishment of Research Council for the promotion of research in higher education and decide a policy for fee regulatory authority for public and private educational institutions.

NEP 2020 WAS CLEARED BY THE CENTRE LAST JULY, BUT THE STATE GOVERNMENT DID NOT IMPLEMENT IT IMMEDIATELY

**First school in the city adopts NEP**

The kindergarten students of The Academy School (TAS), Pune, on January 26, launched the NEP model in the school.

The school had already started working on the NEP model last year. "NEP brings in a much-needed focus on international standards of applied learning, multiple learning pathways, and focus on technology-enabled pedagogy. NEP paints a positive image of learning that is built on a solid foundation of five years of activity-based learning and another three years of preparation," said Dr Maithili Tambe, CEO, TAS.

Hindustan Times 28.1.2022

---

पुढारी

# विद्यापीठात होणार 'गणित म्युझियम'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'लहान वयापासूनच मुलांना विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी विद्यापीठाकडून सायन्स पार्कची निर्मिती करण्यात आली असून आता गणिताची गोडी लागावी यासाठी विद्यापीठात लवकरच गणित म्युझियम सुरू करण्यात येणार आहे,' अशी घोषणा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने केली.

विद्यापीठात ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, अधिष्ठता डॉ. पराग काळकर, इनोव्हेशन केंद्राच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर आदी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले, 'चौथीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या गणित म्युझियम खेळाच्या माध्यमातून गणित विषय शिकवण्यात येईल. ही संकल्पना पंतप्रधान कार्यालयातून आली असून यासाठी भारत फोर्ज कंपनीचे बाबा कल्याणी यांचे आर्थिक सहकार्य लाभले आहे.'

कोरोना काळात विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे आम्ही सकाळच्या वेळात विद्यापीठ परिसरात प्रदर्शन भरविले. विद्यापीठात सकाळच्या वेळात फिरायला येणाऱ्या नागरिकांकडून याला चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचेही डॉ. करमळकर यांनी सांगितले.

**विविध पुरस्कारांची घोषणा**

विद्यापीठातर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिकच्या मराठा विद्या प्रसारक समाज कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे आर्ट, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, प्रवरा रूरल एज्युकेशन सोसायटीज पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स अँड कॉमर्स यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या विभागामध्ये डिपार्टमेंट ऑफ अॅटमोस्पेरीक अँड स्पेस सायन्स यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. वैयक्तिक पातळीवरील पुरस्कारही यावेळी घोषित करण्यात आले.

My Pune Edition
Jan 29, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

**सामना**

# विद्यापीठात लवकरच साकारणार गणित म्युझियम

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) – लहान वयापासूनच मुलांना विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, यासाठी विद्यापीठाकडून सायन्स पार्कची निर्मिती करण्यात आली असून, आता गणिताची गोडी लागावी, यासाठी विद्यापीठात लवकरच गणित म्युझियम सुरू करण्यात येणार आहे, अशी घोषणा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केली.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, इनोव्हेशन केंद्राच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. नितीन करमळकर म्हणाले, इयत्ता चौथीपासून ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना म्युझियम खेळाच्या माध्यमातून गणित विषय शिकवण्यात येईल. ही संकल्पना पंतप्रधान कार्यालयातून आली असून, यासाठी भारत फोर्ज कंपनीचे बाबा कल्याणी यांचे आर्थिक सहकार्य लाभले आहे.

**विद्यापीठातर्फे विविध पुरस्कार जाहीर**

विद्यापीठातर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिकच्या मराठा विद्या प्रसारक समाज कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीज पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स यांचा समावेश आहे.

Pune Edition
Jan 29, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# 'मार्गदर्शक' मान्यता उपयोगाची नाही?

प्रभात वृत्तसेवा

**संकेतस्थळावर माहिती अद्ययावतसाठी मुदतवाढ देण्याची मागणी**

पुणे, दि. २८ - प्राध्यापकांना पीएचडी संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्यात आली आहे, त्याची माहिती संबंधित संशोधन केंद्र आणि विद्यार्थ्यांनाच नाही. त्यामुळे नव्याने मार्गदर्शक मान्यता मिळालेल्या प्राध्यापकांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी आणि त्यासाठी लिंक विद्यापीठाने खुली करावी, अशी मागणी भारतीय इलिजीबल स्टुडंट टीचर्स असोसिएशनने (बेस्टा) कुलगुरू आणि उच्च शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अहमदनगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना पीएचडी संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्यात येत असून, ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र, सध्या पुणे विद्यापीठामार्फत पीएचडी संशोधन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

ही प्रक्रिया सुरू असताना मार्गदर्शक म्हणून दिलेली मान्यता काहीही उपयोगाची नाही. नवीन मार्गदर्शकाकडे असणारी रिक्त जागांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नमूद केली जात नाही, तोपर्यंत संशोधक विद्यार्थी मिळणार नाहीत, याकडे बेस्टाचे अध्यक्ष डॉ. अजय दरेकर यांनी लक्ष वेधले आहे.

प्रभात Sat, 29 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

पुढारी

# दहावी-बारावीच्या परीक्षा महिनाभर पुढे ढकला

## शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. परंतु परीक्षा नियमित वेळापत्रकानुसार न घेता महिनाभर पुढे ढकला, अशा सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी ऑनलाईन बैठकीत दिल्या आहेत. त्यामुळे दहावी-बारावीच्या परीक्षा महिनाभर पुढे जाणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च महिन्यात होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा एप्रिल महिन्यात घेण्यात याव्या, अशा सूचना शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून बैठकीत केल्या आहेत. मागील दोन वर्षांत शालेय विद्यार्थ्यांना अभ्यास आणि लिखाणाचा सराव झालेला नसल्याने ही मागणी केली पान ६ वर

### परीक्षा ठरल्याप्रमाणे होणार : वर्षा गायकवाड

मुंबई : अभ्यासाला वेळ मिळावा आणि लसीकरण पूर्ण व्हावे म्हणून दहावी, बारावीच्या परीक्षा महिनाभर पुढे ढकला, अशी सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शुक्रवारी शिक्षण संचालकांच्या ऑनलाईन बैठकीनंतर केली. मात्र, जाहीर वेळापत्रकानुसारच या परीक्षा होतील, असे शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी 'पुढारी'ला सांगितले. दहावी आणि बारावीच्या परीक्षा मार्च-एप्रिलमध्येच होतील. कारण कोरोनामुळे परीक्षा देऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा घेण्यास आम्हाला अवधी मिळेल. याबाबत नियोजन करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात येतील, असे वर्षा गायकवाड म्हणाल्या.

Pune Edition
Jan 29, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# दहावी-बारावीच्या परीक्षा महिनाभर पुढे ढकला

(पान १ वरून) जात होती. मुलांचा लिखाणाचा सराव सुटल्याने त्यांना परीक्षेत अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच राज्यात सध्या शाळांबाबत ऑनलाईन-ऑफलाईनचा जो काही घोळ सुरू आहे, त्यामुळेदेखील विद्यार्थी संभ्रमात आहेत. तसेच अभ्यासक्रमही पूर्ण झालेला नाही. त्यामुळे मार्च महिन्यात होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा एप्रिल महिन्यात घेण्यात याव्यात, अशा सूचना बच्चू कडू यांनी बैठकीत दिल्या. त्यानुसार राज्य मंडळाचे अधिकारी प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविणार आहेत. त्यानुसार परीक्षा कधी घ्यायच्या हे निश्चित होऊन नवीन वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे.

२०२०-२१ ची परीक्षा रद्द होऊन अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे निकाल जाहीर करण्यात आला होता. यंदा ७५ टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा घेण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार विद्यार्थी, पालक, शिक्षक यांची परीक्षा देण्याची मानसिकताही तयार झाली होती. परंतु आता परीक्षा पुढे जाणार असल्यामुळे संभ्रम निर्माण होणार असल्याचे दिसून येत आहे. तर शिक्षक, पालक विद्यार्थी यांची परीक्षा पुढे ढकलण्याची कोणतीही मागणी नाही. त्यामुळे परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच घेण्याची मागणी विविध संघटनांनी केली आहे.

### पुढील शैक्षणिक वर्ष विस्कळीत होणार

कोरोनामुळे आधीच दोन वर्षे शिक्षणाचा गोंधळ उडालेला असताना यंदा जर दहावी-बारावीच्या परीक्षा उशीरा झाल्या, तर त्याचा पुढील वर्षीच्या शैक्षणिक वर्षावर परिणाम होऊन अकरावी प्रवेश प्रक्रिया तसेच बारावीनंतरचे प्रवेश तर सीईटी, जेईई, नीट परीक्षांवर परीणाम होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षही विस्कळीत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### परीक्षा वेळेतच घेण्याची मागणी

राज्य मंडळाच्या २०२१-२२ च्या परीक्षा एक महिना उशिरा सुरू होत आहेत. विदर्भामध्ये उन्हाळा चांगलाच तापतो. त्यामुळे परीक्षा उशिराने झाल्यास विद्यार्थ्यांवर उष्माघाताचा परिणाम होऊ शकतो. विद्यार्थ्यांची मार्च महिन्यात परीक्षा देण्याची मानसिकता तयार झालेली असताना परीक्षा लांबणीवर टाकणे योग्य नाही. त्यामुळे परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच घ्याव्यात, अशी मागणी विदर्भ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

### शालेय शिक्षणमंत्री आणि राज्यमंत्री यांच्यातच एकवाक्यता नाही

शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी समाजमाध्यमाद्वारे दहावी-बारावी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करून परीक्षा ऑफलाईन पद्धतीने नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होणार असल्याचे स्पष्ट केले होते; तर शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी परीक्षा महिनाभर पुढे ढकलण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे राज्यमंडळ, विद्यार्थी, पालक, शिक्षक संभ्रमित होणार आहेत. तर शालेय शिक्षणमंत्री आणि राज्यमंत्री यांच्यातच एकवाक्यता नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

Pune Edition
Jan 29, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

सकाळ

## दहावी-बारावीच्या परीक्षा पुढे जाण्याची शक्यता

### राज्य शिक्षण मंडळाचा सरकारकडे प्रस्ताव

**मुंबई, ता. २८ :** दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे लसीकरण अद्याप झाले नसल्याने मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून सुरु होणाऱ्या दहावी-बारावीच्या लेखी परीक्षा पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शुक्रवारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत ऑनलाइन बैठक घेतली. त्यात दहावी-बारावीच्या लेखी, प्रात्यक्षिक आदी परीक्षांची तयारी, नियोजन आदींचा आढावा घेण्यात आला. १५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या लसीकरणाची त्यांनी माहितीही घेतली. शिक्षण विभागाने या परीक्षांचे नव्याने नियोजन करण्याची सूचनामंडळाला दिली. लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना हाती घेता येतील, याविषयी आढावा घेण्याची सूचनाही केली. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे ग्रामीण भागांत बसगाड्यांच्या वेळा निश्चित नाहीत. त्यामुळे 'शाळा तेथे केंद्र' देण्यात यावे. अथवा अशा विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करता येईल का, याचाही विचार व्हावा, असेही त्यांनी नमूद केले.

> **लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांचा विचार करून परीक्षेच्या नियोजनात बदल करण्याचे निर्देश देण्यात आले असून, तसा प्रस्ताव तयार करून तो सरकारकडे पाठविला आहे.**
> **- शरद गोसावी,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune, Main
29/01/2022 Page No. 7

सकाळ

## ऑफलाइन परीक्षा सर्वसमावेशक असाव्यात

### शिक्षणतज्ज्ञांचे मत; नवीन शैक्षणिक धोरणाचा आधार घेण्याचा सल्ला

**पुणे, ता. २८ :** "शैक्षणिक मूल्यमापनासाठी विद्यापीठाने ऑफलाइन परीक्षेला प्राधान्य द्यावे. हे करत असताना नवीन शैक्षणिक धोरणात अभिप्रेत निरनिराळ्या मूल्यमापन पद्धतीचा वापर करावा. जेणेकरून ऑफलाइन परीक्षा पद्धत सर्वसमावेशक होईल," असे मत शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

मूल्यमापन पद्धतीबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. संजय चाकणे म्हणाले, "परीक्षा ऑफलाइनच घ्यायला हवी, या मताचा मी आहे. ऑनलाइन परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांचे परिपूर्ण मूल्यमापन होत नाही. नवीन शैक्षणिक धोरणात सुचविलेल्या विविध मूल्यमापन पद्धतींचा आपण अवलंब करू शकतो. शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन मूल्यमापन पद्धतीचा अवलंब करायला हवा." सरकारने जरी ऑफलाइन परीक्षेला परवानगी दिली असली, तरी काही विद्यापीठांची ऑनलाइन परीक्षेसाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. त्यामुळे पुढील आठवडाभरातच विद्यापीठांच्या परीक्षापद्धतींबद्दल स्पष्टता येईल.

#### तज्ज्ञ म्हणतात...

- ऑनलाइन परीक्षेमुळे एकांगी मूल्यमापन, त्यामुळे तो परिपूर्ण पर्याय असूच शकत नाही
- शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाइनच असावी
- सातत्यपूर्ण मूल्यमापनाचा अवलंब करावा
- मुलाखत, प्रात्यक्षिके, प्रकल्प, चर्चा आदी नवीन शैक्षणिक धोरणातील मूल्यमापन पद्धतीचा अवलंब करावा
- अंतर्गत मूल्यमापनावर अधिक भर हवा
- ऑनलाइन परीक्षांमुळे शैक्षणिक नुकसान

> **परीक्षांसंदर्भात विद्यार्थ्यांची मानसिकता सध्या दोलायमान स्थितीत आहे. ऑनलाइन परीक्षांमुळे त्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे ऑफलाइन परीक्षांना प्राधान्य द्यायला हवे. सातत्यपूर्ण मूल्यांकन आणि निरनिराळ्या पद्धतींचा वापर करत ऑफलाइन परीक्षा घ्यायला हव्यात. यासंबंधी विद्यापीठानेच कार्यपद्धती निश्चित करायला हवी.**
> **- डॉ. पंडित विद्यासागर,** माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

#### विद्यापीठाचे ऑनलाइन नियोजन...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षांचा निर्णय काही दिवसांपूर्वीच घेतला आहे. त्याची तयारीही अंतिम टप्प्यात आली आहे. या बद्दल विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, "ऑनलाइन परीक्षा हा मूल्यमापनाचा परिपूर्ण पर्याय ठरू शकत नाही. मात्र, कोरोनाच्या परिस्थिती आणि तेव्हाचे शासननिर्णय पाहून विद्यापीठाने मागेच ऑनलाइन परीक्षांचा निर्णय घेतला आहे. आता त्या परीक्षांचे नियोजनही सुरू आहे. पुढील काही दिवसांतच परीक्षांच्या तारखा घोषित होतील. या संबंधीचा काही निर्णय घ्यायचा असेल, तर तो कुलगुरू आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळ घेईल."

Pune, Pune-Today
29/01/2022 Page No. 1

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# विद्यार्थ्यांवर राहणार 'वॉच'

## कॉपी टाळण्यासाठी विद्यापीठ ऑनलाइन परीक्षा व्यवस्था बळकट करणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

ऑनलाइन परीक्षा पद्धतीचा गैरफायदा घेऊन कॉपी करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे 'वॉच' ठेवला जाणार आहे. यंदा परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांच्या स्क्रीनचे व्हिडिओ आणि ऑडिओ रेकॉर्डिंग केले जाणार असून, यात विद्यार्थी गैरप्रकार करताना आढळून आल्यास त्याच्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

विद्यापीठाची यंदाची सत्र परीक्षाही ऑनलाइन पद्धतीने होणार असून, त्याचे वेळापत्रक जाहीर होण्यास सुरुवात झाली आहे. या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून होणार आहेत. या परीक्षा ऑनलाइन होणार असल्याने, त्या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या (एमसीक्यू) असणार आहेत. या परीक्षांमध्ये गेल्या वर्षी अनेक विद्यार्थ्यांनी गैरप्रकार केल्याचे आढळून आले होते. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने 'प्रॉक्टर्ड' पद्धतीने परीक्षा घ्यायला सुरुवात केली आहे. आता त्यात आणखी काही कडक नियम लागू करण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या स्क्रीनचे रेकॉर्डिंग केले जाणार आहे. संबंधित विद्यार्थी परीक्षा देताना जर बोलत असतील किंवा ते स्क्रीन सोडून बाहेर जात असतील, तर त्यांना परीक्षेतून बाद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. परीक्षा अधिक पारदर्शी पद्धतीने व्हाव्यात, यासाठी हा प्रयत्न करण्यात येत असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

विद्यापीठाकडून ऑनलाइन परीक्षांबाबतीत अधिक सतर्कता बाळगण्यात येणार असल्याने यंदाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना कसून तयारी करावीच लागणार आहे. प्रॉक्टर्ड पद्धतीने परीक्षा घेण्याचा प्रदीर्घ अनुभव आता परीक्षा विभागाला आहे. त्यामुळे विद्यार्थी कशाप्रकारे गैरप्रकार करू शकतात, याबाबत सर्व माहिती विभागाकडे आहे. नेमक्या त्या गोष्टींवर लक्ष ठेवले जाणार असल्याने कॉपी करणाऱ्यांना यंदा घरचा रस्ता दाखवण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.



### ऑनलाइन परीक्षांमध्ये यापूर्वी झालेली कारवाई

- जवळपास १८०० विद्यार्थी कॉपी करताना सापडले.
- यामधील ६० टक्के म्हणजेच १२००पेक्षा अधिक विद्यार्थी इंजिनीअरिंगचे होते.
- ६०० विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन शाखेतील.
- कॉपीसाठी विद्यार्थ्यांना एक हजार रुपयांचा दंड.
- विद्यार्थ्याने एकापेक्षा अधिक पेपरमध्ये गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास संपूर्ण परीक्षा रद्द.

"परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाला आता ऑनलाइन परीक्षांचा अनुभव आला आहे. यामुळे यंदाच्या परीक्षांमध्ये फारशा अडचणी येणार नाहीत. यंदा विद्यार्थ्यांचे ऑडिओ आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जाणार आहे. त्याची पडताळणी करून, दोषी विद्यार्थ्यांवर कडक कारवाई केली जाईल. परीक्षा अत्यंत पारदर्शी करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

– महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### अंध विद्यार्थ्यांसाठी विशेष व्यवस्था

विद्यापीठात किंवा विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या अंध विद्यार्थ्यांनी जर ऑनलाइन परीक्षा देण्याची मागणी केली, तर त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. गेल्या वेळी विद्यापीठाच्या सहा अंध विद्यार्थ्यांनी प्रायोगिक तत्त्वावर ही परीक्षा देऊन पाहिली होती. तो प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता या वेळेलाही अंध विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास त्यांना परीक्षेची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अंध विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने एका सॉफ्टवेअरची निर्मिती केली असून, त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना ऑडिओद्वारे प्रश्न विचारले जातात. विद्यार्थी स्वतःच्या आवाजात उत्तरांचे पर्याय देतात आणि ते उत्तर रेकॉर्ड केले जाते.

Maharashtra Times 29.1.2022

# मार्गदर्शकांची यादीच नाही

## विद्यापीठाची वेबसाइट अद्ययावत नसल्याने पीएचडी प्रवेशासाठी अडचण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्णयानुसार पीएचडी मार्गदर्शक म्हणून अनेक प्राध्यापकांची नेमणूक केली आहे, मात्र, या प्राध्यापकांची नोंदणीच पुणे विद्यापीठाच्या वेबसाइटवर न झाल्याने, त्यांना इच्छा असूनही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येत नसल्याचे चित्र आहे. तर, मार्गदर्शक उपलब्ध नसल्याने पीएचडी प्रवेश परीक्षा (पेट) उत्तीर्ण झालेल्यांना पीएचडीसाठी प्रवेश घेता येत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

पुणे विद्यापीठाने नगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना पीएचडी संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, या नव्या मार्गदर्शकांची माहिती विद्यपीठाच्या वेबसाइटवर अजूनही अद्ययावत करण्यात आलेली नाही. रिक्त जागांची माहिती आणि संलग्न संशोधन केंद्रांची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर विहित नमुन्यात भरून देत नाहीत, तोपर्यंत संशोधक विद्यार्थी मिळणार नाहीत, अशी तक्रार मार्गदर्शकांनी केली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी 'पेट' परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्या तुलनेत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पीएचडी संशोधक मार्गदर्शकांची संख्या अत्यंत मर्यादित आहे. त्यातच या संशोधक मार्गदर्शकांकडे उपलब्ध जागा अत्यंत कमी आहेत. त्यामुळे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या मार्गदर्शकांची संख्या याचा ताळमेळ कुठेही जुळत नसल्याचे दिसत आहे.

संशोधन मार्गदर्शन केंद्र म्हणून मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांकडेही संलग्न मार्गदर्शक यांची माहिती उपलब्ध नसल्याने या केंद्रांसाठी संशोधक विद्यार्थ्यांकडून प्राधान्यक्रम देण्यात आलेले नाहीत. मोठ्या प्रमाणावर संशोधक विद्यार्थ्यांची असलेली संख्या, नव्याने संशोधन मार्गदर्शन केंद्र म्हणून मान्यता मिळालेले महाविद्यालय आणि नव्याने मान्यता मिळालेले संशोधक मार्गदर्शक या सर्वांचा विचार करता नव्याने मार्गदर्शक मान्यता मिळालेल्या प्राध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढ द्यावी. यासंबंधीची सूचना वेबसाइटवर प्रसिद्ध करून लवकरात लवकर ही माहिती परिपूर्ण स्वरूपात भरून घ्यावी, अशी मागणी भारतीय एलिजिबल स्टुडंटस् अँड टीचर्स असोसिएशनचे (बेस्टा) अध्यक्ष डॉ. अजय दरेकर यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.





### ...तर अनेकांना पीएचडीची संधी उपलब्ध

नव्या मार्गदर्शकांची नोंदणी वेबसाइटवरील पीएचडी प्रवेश प्रणालीत झाल्याने, संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नव्याने संशोधक मार्गदर्शकांचे आणि संशोधन केंद्रांचे अधिकचे पर्याय उपलब्ध होतील. त्यासाठी सध्या चालू असलेली प्रवेश प्रक्रिया काही काळासाठी पुढे ढकलता येईल. त्या कालावधीत नव्याने आलेल्या मार्गदर्शक आणि संशोधन केंद्रांचे नव्याने पर्याय उपलब्ध होतील, असे डॉ. अजय दरेकर यांनी सांगितले.

Maharashtra Times 29.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

# महाविद्यालये सुरू झाली तरी विद्यार्थी येण्याविषयी सांशकता

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २९** - करोनामुळे बंद करण्यात आलेली महाविद्यालये दि.१ फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा दि.१५ फेब्रुवारीनंतर सुरू होणार आहेत. बहुतांश विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम शिकवून झाला आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरू झाली तरी पंधरा दिवसांसाठी विद्यार्थी येतील? या विषयी सांशकता व्यक्त केली जात आहे.

राज्य शासनाने स्थानिक प्रशासनालाच महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. करोना

### विद्यापीठाच्या परीक्षा दि. १५ फेब्रुवारीनंतर सुरू होणार

प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी आहे. तसेच, लसीचे दोन डोस न झालेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाइनच शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे. त्याच अनुषंगाने पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दि.१ फेब्रुवारीपासून संपूर्ण जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.



शहरात करोनाचा प्रादुर्भाव कायम आहे. त्यातच महाविद्यालये दि. १ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून, दि. १५ फेब्रुवारीपासून विद्यापीठाच्या परीक्षा सुरू होतील. त्याप्रमाणे पहिल्या सत्राचा सर्व अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झालेला आहे. अशा स्थितीत केवळ १५ दिवसांसाठी विद्यार्थी महाविद्यालयात येणार आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

प्रभात Sun, 30 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65921118

# अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन होणार?

## जिल्हा प्रशासनाशी चर्चा करून विद्यापीठांनी निर्णय घ्यावा



> करोनाचा प्रादुर्भाव कायम असतानाही राज्यातील इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेतल्या जात असतील तर विद्यापीठाने विद्यार्थी हिताचा विचार करून कमीत कमी अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, अशी भूमिका व्यवस्थापन परिषदेसमोर मांडणार आहे.
>
> – **राजेश पांडे**, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २९** - करोना प्रादुर्भावाचा स्थानिक परिस्थितीचा विचार करून जिल्हा प्रशासनाशी चर्चा करून विद्यापीठांनी ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घ्याव्यात, अशा स्पष्ट सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने किमान अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, असा आग्रह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या काही सदस्यांनी केला आहे. त्याविषयावर येत्या सोमवारी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेत ठोस निर्णय होण्याची चिन्हे आहेत.

### राज्य शासनाची स्पष्ट सूचना

विद्यापीठाची शनिवारी होणारी व्यवस्थाप परिषदेची बैठक दि. ३१ जानेवारीला होणार आहे. यात करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑफलाइन की ऑनलाइन याचा निर्णय राज्य शासनाने विद्यापीठांवर सोपविला आहे. त्यामुळे विद्यापीठास परीक्षेसंदर्भात आपल्यास्तरावर निर्णय घेता येणार आहे. या स्थितीचा विचार करता केवळ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाइन पद्धतीने होणे आवश्यक आहे, तसा विषय सोमवारी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मांडणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. विद्यापीठांना ऑनलाइन परीक्षा घेण्यास परवानगी दिली असली तरी जिल्हा प्रशासन व पालिका प्रशासनाकडून त्यासाठी मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच, केवळ पुणे जिल्हाच नाही तर अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यातील परिस्थिती सुद्धा विचारात घ्यावी लागेत. त्यातच सध्या विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षेची तयारी पूर्ण केली आहे.

प्रभात Sun, 30 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65921155

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

**लोकमत**

# ऑफलाइन परीक्षांसाठी व्यवस्थापन परिषदच आग्रही

## विद्यापीठात सोमवारी चर्चा ; विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून मोठा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाविषयक परिस्थितीचा विचार करून जिल्हा प्रशासनाच्या मान्यतेने विद्यापीठांनी ऑनलाइन किंवा ऑफलाइन पध्दतीने परीक्षा घ्याव्यात,अशा स्पष्ट सूचना राज्य शासनातर्फे देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कमीत कमी अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन पध्दतीने घ्याव्यात,अशी भूमिका विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत येत्या सोमवारी मांडली जाणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांपासून केवळ ऑनलाइन पध्दतीने विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. मात्र, या परीक्षेच्या पारदर्शकतेबाबत अनेक शंका उपस्थित होत आहेत.

> कोरोनाची परिस्थिती असूनही राज्यातील इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेतल्या जात असतील, तर विद्यापीठाने विद्यार्थिहिताचा विचार करुन कमीत कमी अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्याव्यात, अशी भूमिका व्यवस्थापन परिषदेसमोर मांडणार आहे.
>
> **- राजेश पांडे, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

> विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने कस लागला पाहिजे असे वाटत असेल तर अंतिम वर्षाच्या परीक्षा या ऑफलाईन पद्धतीनेच झाल्या पाहिजेत. त्यामुळे विद्यापीठाने ऑफलाईन परीक्षांबाबत विचार करायला हवा.
>
> **- डॉ. संजय चाकणे, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

बहुतांश सर्वच विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळत आहेत. तसेच प्रॉक्टर्ड पध्दतीने परीक्षा घेतली जात असली तरी विद्यार्थी परीक्षेदरम्यान गैरप्रकार करत आहेत. घरी बसून परीक्षा द्यावी लागत असल्याने विद्यार्थी निश्चिंत आहेत. त्यांना परीक्षेचे गांभीर्यच राहिले नाही. ऑनलाइन परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यासही अडचणी येत आहेत. त्यामुळे कमीत कमी अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, अशी भूमिका विद्यापीठातील विविध अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

येत्या ३१ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार असून त्यात परीक्षेबाबत सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

विद्यापीठांना ऑनलाइन परीक्षा घेण्यास परवानगी दिली असली तरी जिल्हा प्रशासन व पालिका प्रशासनाकडून त्यासाठी मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच केवळ पुणे जिल्हाच नाही तर अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यातील परिस्थिती सुध्दा विचारात घ्यावी लागेल. त्यातच सध्या विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षेची तयारी पूर्ण केली आहे.

ऑफलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय झाला तर काही दिवस परीक्षा पुढे जाऊ शकते. त्यामुळे विद्यापीठाकडून ऑफलाइन परीक्षेचा पर्याय स्वीकारला जाणार का? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

Pune Main
Page No. 2 Jan 30, 2022
Powered by: erelego.com

**लोकमत**

# पुण्यातील शाळा, महाविद्यालये एक फेब्रुवारीपासून पुन्हा सुरू

## लसीकरण केंद्रही होणार सुरू ; आढावा बैठकीत निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : पुण्यात गेल्या तीन दिवसात सलग कोरोना रुग्णसंख्या कमी होत असल्याने येत्या १ फेब्रुवारीपासून शहर आणि ग्रामीण भागातील सर्व शाळा, कॉलेज सुरू करण्याचा निर्णय कोरोना आढावा बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला आहे. शहरी भागातील १५ ते १८ वर्षे वयोगटातील लसीकरण वाढविण्यासाठी शाळा, कॉलेजमध्ये लसीकरण केंद्र सुरू करण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे दिली.

पाल्यांना शाळेत पाठविण्यासंदर्भातील निर्णय पालकांनी घ्यायचा असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. पहिली ते आठवीची शाळा काही दिवस सकाळच्या सत्रात चार तासच सुरू ठेवण्यात येणार आहेत. कोविड व्यवस्थापन आढावा बैठकीनंतर पवार बोलत होते. बैठकीसाठी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख उपस्थित होते.

### शाळेत पाठविण्याची सक्ती नाही, पालकांनीच घ्यावा निर्णय

पहिली ते आठवीचे वर्ग अर्धवेळ सुरु करण्यात यावे, तर नववी ते बारावीचे वर्ग पूर्णवेळ सुरु करावेत. पुढील आठवड्यात कोविड परिस्थितीचा आढावा घेऊन सर्व शाळा पूर्णवेळ सुरु करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्याबाबतचा निर्णय पालकांनी घ्यावा, तूर्तास सक्ती करु नये, असेही बैठकीत ठरले.

### मास्क न वापरण्याविषयी कोणतीही चर्चा नाही

मास्क न वापरण्याविषयी मंत्रिमंडळ बैठकीत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, अद्यापही कोविडचे संकट असल्याने नागरिकांनी मास्क वापरणे आणि मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यकच आहे. नागरिकांनी संसर्गापासून बचाव करण्यासाठी चांगला मास्क वापरावा. मास्क न वापरणाऱ्यांविरोधात कारवाई सुरुच ठेवावी, असे त्यांनी सांगितले.



पवार म्हणाले, १५ दिवसापूर्वी पुण्यात कोरोना रुग्णांची संख्या वेगाने वाढत असल्याने पुण्यातील शाळा, कॉलेज सुरू करण्यासंदर्भात थांबण्याचा निर्णय घेण्यात आला. आता रुग्णसंख्या कमी होताना दिसत आहे. लसीकरणाचा चांगला परिणाम झाला असून, मृत्यूदर १ टक्क्यापेक्षा कमी आहे. ग्रामीण भागात १५ ते १८ वर्षे वयोगटातील लसीकरण ९६ टक्क्यांच्या पुढे गेले आहे. शहरी भागात हे प्रमाण खूपच कमी असल्याने शाळा, कॉलेजमध्ये लसीकरण केंद्र सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

Pune Main
Page No. 3 Jan 30, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# पीएच.डी.साठीचे नवे मार्गदर्शक विद्यापीठाकडे नोंदणीविना

## पीएच.डी. प्रवेश नोंदणीला मुदतवाढ देण्याची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**"आतापर्यंत प्रवेश प्रक्रियेला दोन-तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली. सातत्याने मुदतवाढ दिल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते. मार्गदर्शकांची मान्यता आणि त्यांची नोंदणी ही कायम सुरू राहणारी प्रक्रिया आहे. - डॉ. एन. एस. उमराणी,** प्रकुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्णयानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून अनेक प्राध्यापकांना मान्यता दिली आहे. मात्र, या प्राध्यापकांची नोंदणीच विद्यापीठाच्या पीएच.डी. ट्रॅकिंग सिस्टिममध्ये नसल्याने उपलब्ध मार्गदर्शकांची संख्या आणि प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा ताळमेळ जुळत नसून, मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेल्या प्राध्यापकांची नोंदणी करून घेण्यासाठी सध्या सुरू असलेली प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्याची मागणी करण्यात आली आहे.

भारतीय इलिजीबल स्टुडंटस अँड टीचर्स असोसिएशनचे (बेस्टा) अध्यक्ष डॉ. अजय दरेकर यांनी या संदर्भात कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना निवेदन दिले आहे. विद्यापीठाने नगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये कार्यरत प्राध्यापकांना पीएचडी संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. मात्र, या नव्या मार्गदर्शकांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अजूनही अद्ययावत करण्यात आलेली नाही. रिक्त जागांची माहिती आणि संलग्न संशोधन केंद्राची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होत नाही तोपर्यंत मार्गदर्शकांना संशोधक विद्यार्थी मिळणार नाहीत. पेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, तर मार्गदर्शकांची संख्या मर्यादित आहे. मार्गदर्शकांकडे उपलब्ध जागाही मर्यादित आहेत. संशोधन मार्गदर्शन केंद्र म्हणून मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांकडेही संलग्न मार्गदर्शक यांची माहिती उपलब्ध नसल्याने या केंद्रांसाठी संशोधक विद्यार्थ्यांकडून प्राधान्यक्रम देण्यात आलेले नाहीत.

संशोधक विद्यार्थ्यांची संख्या, संशोधन मार्गदर्शन केंद्र म्हणून मान्यता मिळालेली नवी महाविद्यालये, नव्याने मार्गदर्शक मान्यता मिळालेल्या प्राध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढ द्यावी. प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ दिल्यास नव्या मार्गदर्शकांची नोंदणी संकेतस्थळावर पीएचडी प्रवेश प्रणालीत होऊन संशोधक विद्यार्थ्यांना नव्या मार्गदर्शकांचे आणि संशोधन केंद्रांचे पर्याय मिळतील यासंबंधीची सूचना संकेतस्थळावर प्रसिद्ध करून ही माहिती परिपूर्ण स्वरुपात भरून घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

लोकसत्ता Sun, 30 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65911006

पुढारी

# मार्गदर्शक उपलब्ध नसल्याने पीएचडीसाठी अडचण

## मार्गदर्शकांची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढ द्यावी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्णयानुसार पीएचडी मार्गदर्शक म्हणून अनेक प्राध्यापकांची नेमणूक केली आहे. मात्र, या प्राध्यापकांची नोंदणीच पुणे विद्यापीठाच्या वेबसाइटवर न झाल्याने, त्यांना इच्छा असूनही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येत नसल्याचे चित्र आहे. मार्गदर्शक उपलब्ध नसल्याने पीएचडी प्रवेश परीक्षा (पेट) उत्तीर्ण झालेल्यांना प्रवेश घेता येत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

विद्यापीठाने नगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना पीएचडी संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, या नव्या मार्गदर्शकांची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर अजूनही अद्ययावत करण्यात आलेली नाही.

रिक्त जागांची माहिती आणि संलग्न संशोधन केंद्राची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर विहित नमुन्यात भरून देत नाहीत, तोपर्यंत संशोधक विद्यार्थी मिळणार नाहीत, अशी तक्रार मार्गदर्शकांनी केली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी पेट परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्या तुलनेत सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या पीएचडी संशोधक मार्गदर्शकांची संख्या अत्यंत मर्यादित आहे. त्यातच या



संशोधक मार्गदर्शकाकडे उपलब्ध जागा अत्यंत कमी आहेत. त्यामुळे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या मार्गदर्शकांची संख्या याचा ताळमेळ कुठेही जुळत नसल्याचे दिसत आहे.

संशोधन मार्गदर्शन केंद्र म्हणून मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांकडेही संलग्न मार्गदर्शकांची माहिती उपलब्ध नसल्याने या केंद्रांसाठी संशोधक विद्यार्थ्यांकडून प्राधान्यक्रम देण्यात आलेले नाहीत. मार्गदर्शक मान्यता मिळालेल्या प्राध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढ द्यावी, यासंबंधीची सूचना वेबसाइटवर प्रसिद्ध करून लवकरात लवकर ही माहिती परिपूर्ण स्वरूपात भरून घ्यावी, अशी मागणी भारतीय इलिजीबल स्टुडंट्स अँड टीचर्स असोसिएशनचे (बेस्टा) अध्यक्ष डॉ. अजय दरेकर यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना केली आहे.

नव्यामार्गदर्शकांचीनोंदणीवेबसाइटवरील पीएचडी प्रवेश प्रणालीत झाल्याने, संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नव्याने संशोधक मार्गदर्शकांचे आणि संशोधन केंद्रांचे अधिकचे पर्याय उपलब्ध होतील. त्यासाठी सध्या चालू असलेली प्रवेश प्रक्रिया काही काळासाठी पुढे ढकलता येईल. त्या कालावधीत नव्याने आलेल्या मार्गदर्शक आणि संशोधन केंद्रांचे नव्याने पर्याय उपलब्ध होतील, असे डॉ. दरेकर यांनी सांगितले.

Pune Edition
Jan 30, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

पुढारी

# महाविद्यालय दिरंगाईचा शिष्यवृत्तीला खोडा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालयांनी राज्याच्या उच्च शिक्षण विभागाकडून शुल्क मंजुरी न घेतल्यामुळे राज्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीला अडथळे निर्माण झाले आहेत. अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा तपशील महाडीबीटी पोर्टलला सादर न केल्याने शिष्यवृत्तीची रक्कम ठरवण्यासाठी अडचणी येत आहेत.

राज्याच्या उच्च शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलमार्फत विविध शिष्यवृत्ती देण्यात येतात. मात्र, यासाठी महाविद्यालयांना त्यांच्या शुल्काचा तपशील दाखल करून मंजुरी घेणे आवश्यक असते. या शुल्कानुसार संबंधित महाविद्यालयांमधील पात्र विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम ठरवली जाते. असे असतानाही अद्याप अनेक महाविद्यालयांनी शुल्क मंजूर करून घेतले नसल्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या लक्षात आले असून त्यांनी तातडीने महाविद्यालयांना शुल्क मंजूर करून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाविद्यालयांना शुल्क मंजूर करून घेण्यासाठी ९ डिसेंबर २०२१ ते ७ जानेवारी २०२१ अशी मुदत देण्यात आली होती. या मुदतीत बहुतांश महाविद्यालयांनी शुल्क मंजुरी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान, महाडीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यासाठी ३१ जानेवारी २०२२ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यापूर्वी म्हणजेच २५ जानेवारीपर्यंत महाविद्यालयांना शुल्क मंजुरी घेण्यास सांगण्यात आले होते.

> शुल्क मंजुरी न घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान

Pune Edition
Jan 30, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# प्रात्यक्षिक परीक्षेत होणार गुणांची खैरात

## बाह्य परीक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना सढळ हाताने गुण मिळण्याची शक्यता

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दहावी आणि बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांसाठी बाह्य परीक्षक न बोलावता शाळा, महाविद्यालयांना अंतर्गत परीक्षकांच्या साहाय्यानेच परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या या परवानगीमुळे विद्यार्थ्यांवर प्रात्यक्षिक परीक्षेत गुणांची खैरात होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

१४ फेब्रुवारीपासून बारावीच्या तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. यामध्ये शाळांना अंतर्गत परीक्षकांसह तोंडी आणि प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याची मुभा दिली आहे. यामुळे सर्व शाळांमधील शिक्षकच त्यांच्या विद्यार्थ्यांच्या तोंडी व प्रात्यक्षिकांच्या परीक्षा घेणार आहेत. पान ६ वर»

**राज्य मंडळाच्या मार्गदर्शक सूचना**

१) प्रात्यक्षिक परीक्षा अंतर्गत शिक्षकांनीच घ्याव्यात
२) परीक्षा घेताना विद्यार्थ्यांची गर्दी करू नये
३) परीक्षेला येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे तापमान तपासावे
४) टप्प्याटप्प्याने विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात याव्यात
५) सुरक्षित अंतराचे सर्व नियम पाळावेत

Pune Edition
Jan 30, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# प्रात्यक्षिक परीक्षेत होणार गुणांची खैरात

(पान १ वरून...) राज्यात दहावी आणि बारावीसाठी ८० आणि २० गुणांचा पॅटर्न राबवला जातो. ८० गुण हे लेखी परीक्षेसाठी, तर २० गुण वर्षभरातील प्रात्यक्षिकांची कामगिरी आणि अंतिम तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा यासाठी दिले जातात. यापूर्वी अंतिम तोंडी आणि प्रात्यक्षिक परीक्षेला बाह्य परीक्षक असल्याने विद्यार्थी या परीक्षांना महत्त्व देत होते. परंतु, यंदा शाळेतील शिक्षकच परीक्षा घेणार असल्याने आता विद्यार्थ्यांवर प्रात्यक्षिकांच्या गुणांची खैरात केली जाईल, अशी भीती शिक्षण क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

Pune Edition
Jan 30, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education



तंत्रबुद्धी

अजित जावकर
saptrang@esakal.com



# 'एआय'मध्ये पीएच. डी हवीच का?

माझ्या याआधी प्रसिद्ध झालेल्या लेखाला भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल 'सकाळ'च्या सर्व वाचकांचे मी मनापासून आभार मानतो. आता या ताज्या लेखामध्येही मी वेगवेगळ्या भूमिका बजावताना जे काही अनुभवता आलं, ते तुमच्यासमोर मांडणार आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) हा विषय शिकविताना, लंडनमध्ये स्वतःची एआय कंपनी चालविताना, बर्लिनमध्ये अन्य एका कंपनीत 'चीफ एआय ऑफिसर' म्हणून काम करताना बरंच संचित हाती लागलं, ते सार मांडत आहे.

तुमच्यापैकी अनेकजण हे आता शिक्षण क्षेत्रात असतील किंवा नोकरी अथवा व्यवसाय करत असतील. हल्ली एक वाक्य नेहमी आपल्या कानी पडतं, ते म्हणजे 'लोकं चांगली शिकलेली आहेत पण ते आतापर्यंत ज्याचा अभ्यास केला त्याच्यावर कधीच काम करत नाहीत.' एक प्रश्न मला नेहमी विचारला जातो, तो म्हणजे 'डेटा सायंटिस्ट' होण्यासाठी तुम्हाला 'पीएचडी'ची पदवी लागते का? याचं सोपं उत्तर आहे, 'नाही.' अर्थात याचं विस्तृत उत्तर, हे मुळात असा प्रश्न विचारणंच चुकीचं आहे असं असतं. कारण या प्रश्नाला उत्तर म्हणून पुढे येणारे प्रतिसाद 'एआय'मधील करिअरच्या व्यापक संधींना बाजूला सारणारे असतात. आता... याबाबत मी माझीच एक गोष्ट तुम्हाला सांगणार आहे. जगातील आघाडीच्या कन्सल्टन्सी फर्ममध्ये काम करण्यासाठी निवड झालेल्या माझ्या एका मित्राला मी अगदी जवळून ओळखतो. (मॅकिन्झी, बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपसारख्या कंपन्यांसोबत त्यानं काम केलंय.) या व्यक्तीची शैक्षणिक पार्श्वभूमी जेमतेम आहे पण त्यानं नुकतंच ऑलिंपिक स्पर्धांमध्ये ब्रिटनच्या संघाचं नेतृत्व करताना चक्क रजत पदक जिंकलं होतं. हीच कथा 'डेटा सायन्स'मधील 'पीएचडी'च्या पदवीला लागू होते.

### म्हणून त्याचं महत्त्व

'हॉर्वर्ड बिझनेस स्कूल'ने २१ व्या शतकात 'डेटा सायंटिस्ट' ला 'हॉटेस्ट जॉब' ठरवलंय. डेटा सायंटिस्टच्या जाहिरातींचा काळजीपूर्वक अभ्यास केला असता तुम्हाला एक बाब स्पष्टपणे दिसून येते. ती म्हणजे वेतनश्रेणींतील फरक हा होय. हा फरक अगदी ३० हजार पौंडांपासून ते दीड लाख पौंडांपर्यंत असतो. वेतनश्रेणीमध्ये हा पाच पटींचा फरक कशामुळं निर्माण झालाय? वार्षिक दीड लाख पौंडांचं भरभक्कम पॅकेज मिळविणाऱ्या व्यक्तीकडं असं वेगळं काय असतं? यामध्ये आपण बाजारपेठेच्या दृष्टिकोनातून 'डेटा सायंटिस्ट'चा विचार केला तर तो त्याच्या आस्थापनांसाठी ज्या डेटावर काम करत असतो त्यालाच मोठं मूल्य असतं असं दिसतं. यातही तो करतो त्या कामाच्या वेगवेगळ्या पातळ्या असतात आणि त्याचं मूल्य देखील वेगवेगळं असतं. 'डेटा सायंटिस्ट'चं काम फार गुंतागुंतीचं असतं, त्याच्या कामातूनच त्याचं मूल्य तयार होत असतं. यात तुम्ही तुमच्याकडील अतिरिक्त कौशल्याची भर घालून स्वतःचं मूल्य वाढवू शकता. (उदाहरणच द्यायचं झालं तर तुम्ही उत्तम सल्लागार होऊ शकता. तुम्ही एखादे चांगले सेल्सपर्सन, टीम लीडरही होऊ शकता.) फार उच्च पातळीवर विचार केला तर तुम्ही तुमची बौद्धिक संपदा कंपनीसाठी वापरत असता. एखादा 'डेटा सायंटिस्ट' जर त्याच्या कंपनीसाठी बौद्धिक संपदा तयार करत असेल तर तो किंवा ती त्याच्या कंपनीसाठी खूप मौल्यवान एकमेव घटक असतो.



### मोलाचे योगदान

सध्याचा काळ हा 'ओपन सोर्स सॉफ्टवेअर'चा आहे. (काहीप्रमाणात तो ओपन हार्डवेअरचाही आहे.) बौद्धिक संपदा ही अल्गोरिदम्स (एआय), सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर यांचं कॉम्बिनेशन असते. म्हणूनच आपण कधीकधी सायंटिस्ट आणि इंजिनिअर हे शब्द परस्परांना पर्यायी म्हणून वापरत

असतो. विज्ञानामुळं भौतिक आणि नैसर्गिक ज्ञानकक्षा आणखी रुंदावल्या आहेत, हे आपण लक्षात घेणं गरजेचं आहे. अस्तित्वात असलेल्या ज्ञानाचा आराखडा तयार करत त्याची मांडणी करणं, काही विशिष्ट उत्पादने आणि प्रक्रियांची देखभाल करणं तसेच काही समस्या सोडवून गरजांची पूर्तता करणारं ॲप्लिकेशन म्हणूनच अभियांत्रिकीला (इंजिनिअरिंग) ओळखलं जातं. सरसकट ढोबळ व्याख्या विचारात घेतली तर 'डेटा सायंटिस्ट' जी कामं करतो, ती विज्ञानाशी संबंधित नसतात (अर्थात त्यामुळं प्रचलित ज्ञानकक्षांचा विस्तार होत नाही.) इंजिनिअरिंगचं यापेक्षा वेगळं असतं. (काही विशिष्ट परिस्थितीमध्ये ते प्रचलित ज्ञानाचा वापर करतं.) बऱ्याचदा आपण डेटा सायंटिस्टच्या भूमिकेचा उल्लेख करतो तेव्हा त्यातून अनेक विरोधास देखील समोर येत असतात. ज्ञान कक्षांच्या विस्ताराचा विचार केला तर फार कमी कंपन्या त्यावर काम करत असतात, यामध्येही प्रामुख्यानं विज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या 'डेटा सायन्स'शी निगडित कंपन्यांचा समावेश असतो. अशा कंपन्यांच्या मांदियाळीत गुगल, मायक्रोसॉफ्ट, अमेझॉन, मेटा, टेस्ला आदींचा समावेश करावा लागेल. ऑक्सफर्ड, केंब्रिज, एमआयटी, स्टॅनफोर्ड, आयआयटी (इंडिया), टेक्नीयॉन (इस्राईल), त्सिंगुहा (चीन) ही आघाडीची विद्यापीठे 'एआय'मध्ये मोलाचं संशोधन करत आहेत.

### 'पीएचडी'चे मूल्य काय?

आता आपण पुन्हा 'पीएचडी'च्या प्रश्नाकडं वळूयात. हे सगळं वाचल्यानंतर तुम्हाला हे लक्षात येईल की तुम्ही स्वतःला कसं घडविता यावर 'पीएचडी'चे मूल्य अवलंबून आहे. यात तुमच्या कामाचं स्वरूप देखील तितकंच महत्त्वाचं असतं (नाही म्हटलं तरी तुम्हाला ज्या कंपनीत काम करायचं आहे तिचं धोरणही तितकंच महत्त्वाचं असतं.) आता यातही एक सांगावा दडलेला आहे. 'डेटा सायन्स'मधील अत्यंत गुंतागुंतीच्या आणि जटिल समस्या तुम्ही सोडवू शकता, हे दाखविण्यासाठी 'पीएचडी'ची खरोखरच तुम्हाला गरज असते का? आता याकडे आपण दुसऱ्या अंगाने पाहू यात. याला 'एलॉन मस्क'च्या नजरेतून असं म्हणता येईल. कारण हे महाशय पारंपरिक शिक्षणाला फारसे महत्त्वच देत नाही, ते फक्त संबंधित समस्या कोण सोडवू शकतो हेच पाहतात. त्यामुळं 'पीएचडी' धारकाला देखील एका मोठ्या डेटाच्या आधारावर अत्यंत गुंतागुंतीच्या समस्येवर काम करण्याची ताकद आपल्याकडं आहे हे दाखवून द्यावं लागतं. यातून कंपनीसाठी आपण बौद्धिक संपदेची निर्मिती करत आहोत हे देखील त्याला सिद्ध करावं लागतं. अशास्थितीमध्ये एक गोष्ट तुम्हाला स्पष्टपणे दिसून येईल ती म्हणजे एखादी कठीण समस्या सोडविण्यासाठी तुमच्याकडे असलेली क्षमता हीच पदवीपेक्षा अधिक महत्त्वाची ठरत असल्याचे दिसून येईल. रिसर्च पेपर, ओपन सोर्स प्रोजेक्ट हे फक्त तुमचं बौद्धिक प्रतिनिधित्व करत असतात. आता इथं त्या ऑलिंपिक पदक विजेत्याची गोष्ट अगदी चपखलपणे लागू होते. कारण त्याला इथं नियोजन, समर्पण, ध्येय निश्चिती, तसा विचार करणं आणि रणनीती आखणं या गोष्टी कराव्या लागतात. थोड्या बहुत तांत्रिक प्रशिक्षणाच्या आधारावर तुम्ही अतिरिक्त कौशल्ये मिळवून 'डेटा सायंटिस्ट' म्हणून तुमच्याकडे असलेल्या कमकुवत दुव्यांचा शोध घेऊन समस्यांचे निराकरण करू शकता.

### शक्य असेल तर कराच

जाता- जाता आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, संशोधन संस्था या तुम्हाला समविचारी संशोधकांची कम्युनिटी उपलब्ध करून देत असतात. सहकारी आणि मार्गदर्शकांचा संवाद अशा संस्थांच्या प्रतिष्ठेत भरच घालत असतात. 'एआय'चा विचार केला तर उद्योग आणि शिक्षणक्षेत्र यांचं एक वेगळं नातं आपल्याला दिसून येईल. पुढील काही वर्षांमध्ये यामध्ये बरंच संशोधन होणं अपेक्षित आहे. यामुळे या क्षेत्राचे वेगवेगळे आयाम आपल्यासमोर येत राहतील. शेवटी जाता- जाता मी तुम्हाला हेच सुचवेल की, तुम्हाला 'एआय'मध्ये पीएचडी करायची असेल तर तुम्ही निश्चितपणे करावी. पण ते करताना विज्ञान आणि गणिताशी संबंधित काम अधिक करायला हवं. 'ऑक्सफर्ड' आणि 'एमआयटी'सारखी विद्यापीठे त्या आघाडीवर भरीव काम करताना दिसतात. याशिवाय कोडिंग, गणित आणि अभियांत्रिकीशी संबंधित कोणताही पूरक कोर्स केला तरीही ते फायद्याचे ठरेल. तुम्हाला 'पीएचडी' करणे शक्य नसेल तर त्याच्यासाठी देखील अनेक मार्ग खुले आहेत.

**(लेखक हे ऑक्सफर्ड विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा विषय शिकवतात. भारतामध्ये 'एआय'बाबतचं संशोधन व्हावं म्हणून त्यांनी पुढाकार घेतला आहे.)**

(अनुवाद : गोपाळ कुलकर्णी)

Sakaal 30.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education



प्र-कुलपती या पदाची निर्मिती आणि कुलपती या पदाची अवनती करणारे बदल महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात झाले आहेत का, यावरून सध्या वाद सुरू आहे. हा बदल नेमका काय आहे आणि त्यामुळे काय परिणाम होणार आहेत, याविषयी दोन्ही बाजू मांडणारे हे लेख...

आमने सामने

### विद्यार्थ्यांचे हित महत्त्वाचे

दीपक मुकादम

mtedit@timesgroup.com

'शिक्षणाच्या विषयावर, मी एवढेच म्हणू शकतो की मी हा सर्वांत महत्त्वाचा विषय मानतो ज्यामध्ये आपण लोक म्हणून गुंतलेले असू शकतो.' अब्राहम लिंकनच्या या ओळी, शहाणपणाचे शब्द, दुर्दैवाने महाराष्ट्र सरकार सोयीने विसरले आहे. जवळपास २५ वर्षांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा १९९४ तसेच २०१६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. १३ राज्य विद्यापीठे, २१ डीम्ड म्हणजे अभिमत विद्यापीठे आणि महाराष्ट्र राज्यातील सुमारे ३३ लाख तरुणांच्या भवितव्याशी संबंध असणारा हा नवीन कायदा लागू होण्यासाठी खूप वेळ लागला. भारतीय विद्यापीठे जागतिक क्रमवारीत स्थान मिळवण्यात अयशस्वी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे सदोष प्रशासन आणि दृष्टिकोन. सध्या महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणात जे काही चालले आहे, त्यावरून जागतिक विद्यापीठांच्या यादीत फार कमी भारतीय विद्यापीठे का येतात, हे समजते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ हा एक मार्च २०१७ पासून अमलात आला. परंतु, वाईट हेतूने केलेल्या सुधारणांची मालिका संपुष्टात आलेली नाही. परिणामी या कायद्याची संपूर्ण आणि संपूर्णपणे अंमलबजावणी करण्यास अक्षम्य विलंब झाला. २८ डिसेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र विधान परिषदेने 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ (तृतीय दुरुस्ती) विधेयक' मंजूर केले आणि राज्यभरातील उच्च शिक्षणाची केंद्रे असलेल्या विद्यापीठांची स्वायत्तता तसेच पुरोगामी महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाच्या गौरवशाली परंपरा मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. या दुरुस्तीनुसार, महाराष्ट्रातील कोणत्याही राज्य विद्यापीठातील कुलगुरूंची नियुक्ती थेट राज्यपालांकडून केली जाणार नाही आणि ते केवळ राज्य सरकारने शिफारस केलेल्या नावांना मान्यता देऊ शकतात. ही दुरुस्ती म्हणजे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या अधिकारांवर राज्य सरकारने जाणीवपूर्वक केलेले अतिक्रमण म्हणून पाहिली जात आहे. या विधेयकातील दुरुस्त्यांमुळे शिक्षणमंत्र्यांना प्र-कुलपती पदाची ऑफर देऊन त्यांना अधिक अधिकार दिले गेले. हा राज्यपालांच्या स्वायत्ततेशी तडजोड करण्याचा आणि विद्यापीठ प्रशासनात लाल गालिचा पसरून राजकीय हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न आहे.

दुरुस्ती विधेयकातील प्रस्तावित अव्यावसायिक आणि निव्वळ राजकीयदृष्ट्या प्रेरित हानिकारक बदल महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला पूर्णपणे अराजक, अस्वच्छ आणि कोरोना विषाणूपेक्षाही अधिक धोकादायक बनवतील. शासनाकडे प्रलंबित असलेल्या शिक्षकांची सेवा स्थिती, शिक्षकांना करिअर उन्नती योजनेचा लाभ, शिक्षकांना पेन्शन योजना, वेतनेतर अनुदान असे लाखो रुपयांचे लाखो रुपयांचे प्रश्न, अक्षम्य दीर्घकाळापासून दुर्लक्षित असताना, हे अत्यंत अनाकलनीय आहे. संस्था, सर्व शैक्षणिक प्रशासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या आयोगातील वेतन लाभ, मुंबईतील अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना वेतन न देणे, एनईटी/एसईटी नसलेल्या शिक्षकांचे नियमितीकरण इत्यादी प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. खेदाची बाब म्हणजे, या प्रातिनिधिक आणि महाराष्ट्रातील शिक्षणाशी संबंधितांच्या अनेक प्रश्नांवर उपाय शोधण्याऐवजी सध्याचे सरकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये दुरुस्ती करून राज्यपालांच्या घटनात्मक अधिकारांना कमी करण्याचे साधन मानत आहे आणि त्याकडे दुर्लक्ष करत आहे. कोणत्याही विद्यापीठाच्या कुलगुरूंची नियुक्ती करण्याच्या राज्यपालांच्या अधिकारावर नियंत्रण आणि केंद्रीकरण करण्याचा आणि शिक्षणमंत्र्यांना विद्यापीठांचे कुलपती असलेल्या राज्यपालांना शिफारशी करून प्रो-चॅन्सलर म्हणून काम करण्याची परवानगी देण्याचा सरकारचा हा कुटील डाव देखील हे विधेयक प्रतिबिंबित करते.

महाराष्ट्र विधान परिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ (तृतीय दुरुस्ती) विधेयक मंजूर केले. जे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांना राज्य संचालित विद्यापीठांच्या संदर्भात अधिक अधिकार देते. राज्यपालांच्या स्वायत्ततेशी सध्या तडजोड केली जात आहे. मंत्र्याला अधिक सामर्थ्यवान बनवून विद्यापीठांमध्ये अधिकाधिक राजकीय हस्तक्षेप होण्याचा मार्ग मोकळा होत आहे आणि त्यांची कार्यपद्धती ही महाराष्ट्रातील तरुणांसाठी सर्वात धोकादायक प्रवृत्ती आहे, हे दुरुस्ती विधेयक स्पष्टपणे दर्शवते. या मुद्द्यांचे राजकारण करण्याऐवजी, महाराष्ट्र सरकारने हे समजून घेतले पाहिजे की तुलनेने नवीन आणि लहान राज्यांनीही केंद्रीय विद्यापीठे स्थापन करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे, परंतु महाराष्ट्र राज्यात एकही पूर्ण कार्यरत केंद्रीय विद्यापीठ नाही. राजकारण वगळून सरकारने कृतिशील राहावे, आपल्या तरुणांच्या जीवाशी खेळणे थांबवावे, मोकळेपणाचे, जबाबदार आणि जागतिक दृष्टिकोनाचे धोरण स्वीकारावे हीच अपेक्षा आहे.

(लेखक मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आहेत.)

### हा विरोध अनाठायी

शीतल देवरुखकर-शेठ

mtedit@timesgroup.com

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये अमूलाग्र असे कालानुरूप बदल सुचवणारे विधेयक विधिमंडळाने नुकतेच पारित केले आहे. त्यावरून वृत्तपत्रे, समाज माध्यमे यांच्या माध्यमातून भाजप व संघ परिवाराच्या कार्यकर्त्यांकडून एकांगी टीकेची राळ उठवण्यात येत आहे. या सर्व टीकाकारांचा रोष कुलगुरू व कुलपतींच्या अधिकारांमध्ये कात्री लावण्यात आल्याबाबत आहे पण ती रास्त नाही. जेव्हा एखाद्या कायद्यात बदल होतो किंवा नवीन कायदा निर्माण करण्यात येतो तेव्हा त्याचे प्रशंसक व विरोधक असे दोन भिन्न मतप्रवाह असतातच. कारण ते बदल काही लोकांना पटतात तर काही स्वार्थी चष्म्यातून पाहणाऱ्यांना ते पटत नाहीत. आपल्या देशात संसदीय लोकशाही आहे. त्यामुळे लोकांच्या आवश्यकतेनुसार व त्यांच्या हितासाठी कायद्यात बदल होणारच किंवा नवीन कायदेही अस्तित्वात येणारच. पण देशातील १२५ कोटी जनतेला ते पसंत पडतील, असे नाही. भारतातील कोणत्याही कायद्यातील बदलांपेक्षा घटनेतील दुरुस्ती हे फार किचकट काम आहे. तरीदेखील स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेत शंभरापेक्षाही अधिक दुरुस्त्या झाल्या आणि त्यातील काही अतिमहत्त्वाच्या दुरुस्त्या मोदी सरकारने केलेल्या आहेत किंवा बहुमताच्या जोरावर करवून घेतल्या आहेत. खरतर कोणताही कायदा व दुरुस्ती मान्य होण्यासाठी सरकार पक्षाला बहुमताची गरज भासते. त्यामुळे, मविआ ठाकरे सरकारने विद्यापीठ कायद्यातील बदल हे बहुमताच्या जोरावर रेटून नेले, अशी टीका करणाऱ्यांनी अगोदर नागरिकशास्त्र आणि राज्यघटनेचा सखोल अभ्यास करावा. मगच या विधेयकाच्या विरोधासाठी मैदानात उतरावे. अन्यथा त्यांचे पितळ जनतेसमोर उघडे पडेल. खरोखरीच जर कशाला कात्री लागली असेल तर ती केंद्राच्या राज्यातील विद्यापीठांमध्ये राज्यपालांमार्फत ढवळाढवळ करण्याच्या अधिकाराला आणि ते या राज्याच्या लाखो विद्यार्थ्यांच्या हितासाठी गरजेचे होते. ज्या मंडळींना कुलगुरू व राज्यपालांच्या नेमणुकीतच जास्त स्वारस्य आहे, त्यांची मात्र या विधेयकाने पंचाईत केली आहे. परंतु विद्यापीठ कायदा म्हणजे फक्त कुलगुरूंची नियुक्ती आणि राज्यपालांचे अधिकार इतकेच नसून इतरही विषय त्यात आहेत, याचे भान टीकाकारांनी ठेवायला हवे होते. पण तसे झालेले नाही.

वास्तवात प्र-कुलपती हे पद हे देशाला किंवा राज्याला नवीन नाही, अशा प्रकारचे प्र-कुलपती हे पद कर्नाटक, केरळ या राज्यांतही आहे. प्रकुलगुरू या पदाची निर्मिती यासाठी असते की, शासनाच्या ध्येय-धोरणांची अंमलबजावणी सुयोग्य रीतीने होऊन प्रशासकीय कामकाज सुलभ व्हावे. दुसरी बाब म्हणजे विधानसभेत विद्यापीठ विषयीच्या प्रश्नांची उत्तरे शिक्षणमंत्र्यांनाच द्यावी लागतात. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे, आरोग्य विज्ञान विद्यापीठ तसेच पशु व मत्स्य विद्यापीठांमध्ये सध्या प्र-कुलपती हे पद अस्तित्वात आहेच. त्याबाबत टीकाकारांनी कधीही 'ब्र'देखील काढलेला नाही. मग या विधेयकालाच विरोध करण्याचे कारण काय?

आता मूळ मुद्द्याकडे वळूया. या विधेयकातील बदलांमुळे कुलगुरू व राज्यपालांचे अधिकार कमी करण्यात आले आहेत, ही टीका कपोलकल्पित तसेच खोडसाळ आहे. २०१६ मध्ये विद्यापीठ कायदा त्यावेळच्या भाजप सरकारने विधिमंडळात कोणत्याही प्रकारची चर्चा न करता पारित करून घेतला. त्यामुळे, टीकाकारांना राज्यपाल व कुलगुरू यांचे २०१६ कायद्याप्रमाणे असलेले अधिकार व या विधेयक नुसार असलेले अधिकार यात काय साम्य किंवा फरक आहे, याचे ज्ञान नाही.

प्रस्तावित बदलांमध्ये विद्यापीठांच्या अधिसभेवरील सदस्यांचीही संख्या नऊने वाढवण्यात आली आहे. व्यवस्थापन परिषदेवरील सदस्यांची संख्या दोनने वाढवण्यात आली आहे आणि हे वाढीव सदस्य विशिष्ट अर्हताधारक असणार आहेत. हा बदल व्यवस्थापन परिषदेचे गुणात्मक मूल्य वाढवणारा निश्चितच आहे. लोकशाही प्रक्रियेने पर्याप्त प्रतिनिधित्व हे विद्यापीठ कायदा २०१६ चे मुख्य सूत्र होते आणि त्याचेच पालन करत करण्यात आलेला दुसरा महत्वाचा बदल म्हणजे प्र-कुलपती पदाची निर्मिती. लोकशाही प्रक्रियेतून निवडून आलेला राज्याचा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री हा विद्यापीठांचा पदसिद्ध प्र-कुलपती असणार आहे.

राज्यपाल किंवा कुलगुरू यांच्यापेक्षा महत्त्वाचे आहेत, ते राज्यातील नागरिक. हे लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने अतिशय पूरक असे महत्त्वाचे बदल या विधेयकात आहेत. त्यानुसार प्रत्येक विद्यापीठाने दोन मंडळे स्थापन होतील. 'मराठी भाषा साहित्याचे जतन व प्रचलन मंडळ' आणि 'समान संधी मंडळ'. या मंडळांच्या स्थापनेमुळे जे मूलभूत फायदे विद्यार्थ्यांना होणार आहेत, त्याबाबत टीकाखोर काहीच बोलत नाहीत. कारण त्यांचे अंतिम उद्दिष्ट हे या विधेयकाचा विवेकी अभ्यास हे नसून फक्त सरकारची बदनामी करणे, हाच आहे.

प्रस्तावित मराठी भाषा मंडळाचे अधिकार व कार्ये काय आहेत ते आपण बघूया. शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीला प्रोत्साहन देणे, मराठी भाषेमध्ये पाठ्यपुस्तके तयार करणे, अन्य भाषांमधील शैक्षणिक अभिजात साहित्य मराठीत अनुवाद करणे, मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे, आंतरभाषीय संशोधन, मराठी भाषेतील व्यावसायिक व शैक्षणिक पाठ्यक्रम तयार करणे, असे मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखे बदल सुचवण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील व मराठीप्रेमी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व व व्यावसायिक विकासाच्या अनेक नवीन संधी मिळतील. मराठी भाषा आंतरराष्ट्रीय भाषा होण्याच्या दृष्टीने उचललेले ते एक छोटेसे पाऊलच ठरणार आहे. महाराष्ट्र सरकारचा बहुतांश कारभार हा मराठीतूनच चालतो. त्यालाही विद्यापीठाकडून पुरेशी रसद मिळवून देता येणार आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणातही मातृभाषेतील शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे त्याला अनुसरूनच हे बदल सुचवण्यात आलेले आहेत.

आता प्रस्तावित समान संधी मंडळाची उद्दिष्टे पाहूयात. विविध दुर्बल घटकांना म्हणजेच अल्पसंख्यांक, महिला, दिव्यांग, एलजीबीटीक्यूआयए (लेस्बियन्स, गे, बाय सेक्सशुल, तृतीयपंथी इत्यादी) यांना संविधानातील स्वातंत्र्य, समानता, समान संधी, प्रतिष्ठा, सामाजिक न्याय या मूल्यांना चालना देण्यासाठी कृती आराखडा तयार करणे, उच्च शिक्षण व आधारभूत सेवांमध्ये समान संधी कृती आराखडा तयार करणे, स्वाभिमान व प्रतिष्ठेची जाणीव करण्यासाठी कृती आराखडा तयार करणे, विद्यापीठाच्या विविध समित्यांमध्ये दुर्बल घटकांच्या सहभागासाठी आराखडा तयार करणे, सर्वांगीण विकास व कल्याणासाठी कृती आराखडा तयार करणे, सर्व कृती आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी अंदाजपत्रक तयार करणे, भेदभावाच्या तक्रारींबाबत चौकशी करून निवारण करणे, या घटकांसाठी विविध उपक्रमांत खर्च करण्यात आलेल्या अनुदानाचे मूल्यमापन करणे.. अशी ही उद्दिष्टे आहेत. हा निर्णय केवळ ऐतिहासिक व पुरोगामी आहे.

उपरोक्त प्रस्तावित बदल हे सरकारच्या घटनात्मक जबाबदाऱ्या पूर्ण करणारे आहेत आणि त्यामुळेच या विधेयकाला विरोध म्हणजेच देशाच्या घटनात्मक मूल्यांना विरोध होईल. हे टीकाकारांनी ध्यानात ठेवावे आणि मग टीका करावी. ज्या टीकाकारांना विद्यार्थ्यांच्या हितापेक्षाही विद्यापीठाचे कुलगुरू व इतर अधिकारी एका विशिष्ट परिवाराचे नेमण्यात रस आहे, त्यांची मात्र निराशा होणार आहे. काळाच्या ओघात बदल हा एकमेव घटकच स्थिर आहे, हे मान्य करत झालेल्या बदलांचे स्वागत करणेच हितकारक आहे.

(लेखिका अधिनियम सुधारणा समितीच्या सदस्य आहेत.)

Maharashtra Times 30.1.2022

## *News Paper Clippings During January 2022*

### Section: Education

# Schools, colleges in Pune to reopen from February 1

For Classes 1 to 8, the school timings will be half of the regular timings. Classes 9 to 10 will run as per regular schedule

**HT Correspondent**

puneletters@htlive.com

**PUNE:** Maharashtra deputy chief minister Ajit Pawar on Saturday announced that schools and colleges in Pune district will reopen from February 1.

Pawar, during the Covid-19 review meeting, said for Classes 1 to 8, the school timings will be half of the regular timings, although for Classes 9 to 10 as well as colleges will run as per the regular schedule.

According to Pawar, fresh Covid-19 cases have reduced in the past few days as compared to last week. Pawar said the demand for oxygen and hospitalisations of patients is far less during the third wave compared to previous waves.

"Since the cases are falling, we have decided to reopen schools and colleges in Pune city, Pimpri-Chinchwad and rural parts of the district. Consent from parents will be required to attend offline classes. The further decision for Classes 1 to 8 will be taken in the meeting scheduled next week," said Pawar.

According to Pawar, the reason for keeping classes for standard 1 to 8 only for four hours is to allow children to return home and eat their tiffin instead of being at schools.

The minister said there is a need for increasing vaccination in the age group of 15-18 years in the urban areas of the district.

"In rural parts, vaccination in this age group is almost about 86%, but the same is less in Pune and Pimpri-Chinchwad. We need to increase this and for the same reason inoculation drive will be conducted on the campus itself," said Pawar.

> Since the cases are falling, we have decided to reopen schools and colleges in PMC, PCMC and rural parts. Consent from parents will be required to attend offline classes.
>
> **AJIT PAWAR,** Dy CM

For colleges, students who have received both doses of vaccines will only be allowed to attend offline classes.

Earlier this month the Maharashtra government had announced the reopening of schools from January 24 though, in Pune, rising cases had forced the administration to keep the schools closed till January 31.

The state government has given power to decide on reopening of schools to local self-government by considering the situation.

Pawar while speaking to the media said that the use of face masks is mandatory in Maharashtra and denied any discussion contradicting this, having taken place.

"Some news channels wrongly showed news about discussion to relax the rule related to mask. I request everyone not to give such stories", he said.



A person is seen getting a swab test at a centre in Katraj on Saturday. RAHUL RAUT/HT PHOTO

## Teen vaccination a challenge in city, reopening schools might help, says Ajit Pawar

**Steffy Thevar**

puneletters@htlive.com

**PUNE:** Pune's teen vaccination turnout in the city area has been much lower than rural areas. One of the main reasons, according to deputy chief minister Ajit Pawar, is closure of schools in city areas.

The district administration is hoping that with the reopening of schools and by placing mobile vans outside the campuses to attend to post-vaccination symptoms among students, the inoculation numbers could pick up. As of now, Pune city has seen only 34% and PCMC 43% of kids vaccinated which in rural areas the count is about 86%.

Earlier, shortage of the Covaxin had hampered the teen vaccination drive in the city. Now, the turnout is less than expected despite enough stock of vaccines.

At the Saturday Covid review meeting, Pawar said that while rural areas are showing a much better turnout than city areas, the reason for the same as told by the administration is that schools have been functioning in rural areas better as compared to urban areas and kids can get vaccinated in schools.

Pawar said, "With the reopening of schools, hopefully the teen vaccination numbers will improve. In rural areas the numbers are much higher than those in the urban areas. Both PMC and PCMC have recorded lower than state average numbers when it comes to teen vaccination. However, we are not forcing parents to send their kids to school and parents will have to show consent before sending their kids to school. Also, we will set up mobile vans with doctors to help in case any side effects are reported post vaccination."

As of now, of the 0.224 million estimated teen population aged between 15 and 18 years of age who are eligible for the vaccination, only 77,000 or 34% have got the jab in Pune city and in PCMC out of the estimated 0.116 million population, more than 50,000 have got the jab which is about 43% while in Pune rural of the estimated 0.211 million kids, 0.182 million have got the vaccine which is about 86 per cent. The district teen vaccination average stands at 56 per cent.

Hindustan Times 30.1.2022

## *News Paper Clippings During January 2022*

### Section: Education

# Schools & colleges in Pune to reopen from February 1

## Consent Of Parents Must To Attend Classes

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Schools and colleges in Pune will reopen from February 1, announced Maharashtra deputy chief minister Ajit Pawar on Saturday after his weekly review meeting with the district officials.

Classes for standards IX to XII and colleges can be held full time according to their regular timetable. For primary classes (I to VIII), lectures will be held only for half the regular hours, for at least a week.

Pawar, however, emphasized that consent of parents will be compulsory for students to attend schools. A decision to allow standards I to VIII to remain open for a full day will be taken in the next meeting depending on the decline in Covid-19 positivity rate, added Pawar.

School and college managements have welcomed the decision to reopen, and said it will be especially beneficial for students who have practicals pending.

DAV school principal CV Madhavi said they will be reopening on February 1 but only for secondary and senior secondary classes at the moment. "We will be reopening with 50% capacity. Students who do not want to come to school can attend online classes. As for primary classes, we will conduct a survey and see how many parents are willing to send their wards to attend the offline classes. Once we know that, we will decide on the reopening," said Madhavi.

HDFC school principal Amruta Prabhu said they will be postponing the reopening of schools physically at least till mid-February as many students and staff members are suffering from Covid-19. "After a few days, we will analyse the situation and if we feel it is conducive to reopen physically, we shall do so from Class IX onwards. The examinations for higher classes would be held in an offline mode and we need to prepare them to sit for three hours or so and write the answers. Hence we need to reopen schools physically," said Prabhu.

According to Pawar, reopening schools for Standard IX and above will help in increasing vaccination.

"Vaccination rates for children between the ages of 15 and 18 years is around 86% in rural areas and low in urban areas. As this number has increased due to provision of immunization facilities in rural schools, immunization facilities should be made available through mobile immunization centres in schools in municipal areas," he said.

"Colleges will also start from February 1. Students who have been vaccinated with two doses should be admitted, and if they have not been vaccinated, such students should be informed about the vaccination," said Pawar.

Vijay Kombe, the general secretary of Maharashtra State Primary Teachers Association, said most of the school teachers are already vaccinated. "Since the pandemic started, teachers have been working with the state administration in various roles and because of this they have been identified as frontline workers," said Kombe.

### PMC COMMISSIONER'S ORDER HIGHLIGHTS

- Ensure hygiene and disinfection facilities in schools, necessary items such as thermometer, thermal scanner/ gun pulse oximeter, disinfectant, soap, water should be made available
- **Vaccination of all teachers and teaching staff in the school should be completed**
- **Classroom and staffroom seating arrangements should be in accordance with the rules of physical distancing**
- Guide posters/stickers on physical distance, use of masks among others should be posted on the school premises
- Special markings should be made to maintain physical distance of at least 6 feet for standing in line inside and outside the school premises
- To maintain physical distance, arrow marks should be made to determine the different ways of coming and going. It will be necessary for the school to make arrangements in this regard
- Students should get written consent of their parents before attending school
- School premises should be cleaned every day to maintain cleanliness and health conditions in and around the school. The headmaster of the school will need to make sure that the toilets are frequently disinfected

**RT-PCR test of 48 hours is mandatory for teachers and non-teaching staff who have not completed two doses of Covid-19 vaccination**




The Times of India 30.1.2022

# News Paper Clippings During January 2022

## Section: Education

# दहावी आणि बारावीची परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच

### शिक्षणमंत्र्यांचे स्पष्टीकरण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** करोना रुग्णसंख्येत वाढ झाल्याने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या परीक्षांची सर्व तयारी पूर्ण झाली असून दोन्ही परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होतील, असे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले. विद्यार्थी आणि पालकांनी संभ्रमात राहू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

करोनाच्या साथीमुळे गेली दोन वर्षे दहावी आणि बारावीच्या परीक्षांवर परिणाम झाला होता. गेल्या वर्षी तर परीक्षा पूर्णपणे रद्द करून सरासरी गुणांनुसार निकाल जाहीर करण्याची वेळ राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर आली होती. मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत सध्या राज्यातील करोना परिस्थिती नियंत्रणात असल्याने तसेच शाळाही सुरू झाल्याने दहावी आणि बारावीच्या परीक्षा त्याही ऑफलाइन घ्याव्यात अशी मागणी सर्वच क्षेत्रांतून होत होती. त्यानुसार यंदा बारावीची परीक्षा ४ मार्चपासून तर दहावीची परीक्षा १५ मार्चपासून घेण्याची घोषणा शिक्षण विभागाने महिनाभरापूर्वीच केली आहे.

शिक्षणराज्य मंत्री बच्चू कडू यांनी शुक्रवारी शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत आणि बारावीच्या परीक्षा तयारीचा आढावा घेताना या परीक्षा महिनाभर पुढे ढकलण्याच्या सूचना दिल्या होत्या. तर या परीक्षा ठरलेल्या वेळापत्रकानुसारच घेण्याची मागणी मुख्याध्यापक संघाने केली होती. त्यावरून राज्य शिक्षण मंडळ तसेच विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर दहावी आणि बारावीच्या परीक्षा या ठरलेल्या वेळापत्रकानुसारच होतील, असे स्पष्टीकरण वर्षा गायकवाड यांनी दिले आहे. शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक आणि शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करूनच वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या परीक्षांची सर्व तयारी झाली असून करोना परिस्थितीचा सातत्याने आढावा घेत आहोत. १५ फेब्रुवारीपर्यंत पुन्हा आढावा घेतला जाईल. त्या वेळी करोना परिस्थिती पाहून गरज वाटल्यास पुढील निर्णय घेतला जाईल, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.

दहावी परीक्षेचा निकाल लागल्यानंतर मंडळाला पुन्हा पुरवणी परीक्षा घ्यावी लागते. त्याच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना अकरावीचे प्रवेश घ्यायचे असतात. म्हणून दहावी आणि बारावीच्या परीक्षा वेळेवर होणे महत्त्वाचे असून विद्यार्थी आणि पालकांनी परीक्षांबाबत कोणत्याही संभ्रमात राहू नये, परीक्षा वेळेवरच आणि लेखी स्वरूपात होतील, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Mon, 31 January 2022 https://epaper.loksatta.com/c/65933903

पुढारी

# विद्यापीठाच्या परीक्षेचा घोळ सरेना

### ऑफलाइन की ऑनलाइन?; विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सत्र परीक्षा १५ फेब्रुवारीपासून ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळ तयारी करीत आहे. तर, आज सोमवारी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेत किमान अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑफलाइन घेणे गरजेचे आहे, असा प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षा कशा होणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन, याचे स्पष्टीकरण विद्यापीठाने द्यावे, अशी मागणी विद्यार्थ्यांसह संघटनांनी केली आहे.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाइन घ्याव्यात, अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुणे विद्यापीठाकडून २१ जानेवारीपर्यंत विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्यात आले. परीक्षेसाठी साधारण साडेसहा लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा १५ फेब्रुवारीपासून ऑनलाइन घेण्याचे निश्चित झाले होते. परंतु, व्यवस्थापन परिषदेच्या काही सदस्यांनी किमान अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाइन घ्यावी, असा प्रस्ताव देण्याचे ठरविले आहे. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेच्या सोमवारी होणाऱ्या बैठकीत तसा प्रस्ताव सादर करण्यात येईल. संबंधित प्रस्ताव विद्या परिषदेकडे जाईल, त्यानंतर विद्या परिषदेची बैठक होऊन निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे परीक्षा ऑफलाइन होणार की ऑनलाइन, याकडे आता विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

Pune Edition
Jan 31, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# दहावी-बारावीसाठी शाळा तिथे परीक्षा केंद्र

### एका वर्गात असतील २५ विद्यार्थी

**सोलापूर, ता. ३० :** कोरोनाचा संसर्ग आता कमी होऊ लागला असून अभ्यासक्रमदेखील पूर्ण शिकवून झाला आहे. त्यामुळे ठरलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्याचा माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाचा प्रयत्न आहे. पण, कोरोनाचा धोका पूर्णपणे टळला नसल्याने 'शाळा तिथे परीक्षा केंद्र' या संकल्पनेनुसार विद्यार्थ्यांना सोयीच्या ठिकाणी परीक्षा देता येईल, असे नियोजन सुरू आहे.

शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड, राज्यमंत्री बच्चू कडू यांच्यासह शिक्षण आयुक्त व माध्यमिक शिक्षणचे संचालक, यांच्यासह इतर अधिकाऱ्यांची २६ जानेवारीला बैठक पार पडली. त्यावेळी शिक्षणाधिकाऱ्यांचा अभिप्राय जाणून घेण्यात आला. त्यांच्या म्हणण्यानुसार सध्या दहावी-बारावीचा ९० टक्क्यांपर्यंत अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला असून परीक्षेपूर्वी तो शिकवून पूर्ण होणार आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या मानसिकतेचा विचार केला असता, वेळापत्रकानुसारच परीक्षा घेण्याचा प्रयत्न आहे.

Pune, Main
31/01/2022 Page No. 8

पुढारी

### ...तर प्रथम सत्र पूर्ण होण्यास मे महिना उजाडेल

सध्या पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून परीक्षा ऑनलाइन घेण्याची तयारी झाली आहे, तर विद्यार्थ्यांची देखील मानसिकता ऑनलाइन परीक्षेचीच आहे. मात्र, विद्यापीठाने जर परीक्षा ऑफलाइन घेण्याचा निर्णय घेतला, तर पुन्हा प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा घेणे आणि निकाल जाहीर करणे, यासाठी प्रदीर्घ कालावधी जाईल आणि प्रथम सत्राचा निकाल लागण्यासच मे किंवा जून महिना उजाडण्याची शक्यता आहे.

"सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेणार म्हणत आहे, तर कधी ऑफलाइन पध्दतीने घेणार आहे, असे सांगत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्पष्टता येत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण होत असून, मानसिक त्रास होत आहे. विद्यापीठ प्रशासनाने यामध्ये कायमस्वरूपी स्पष्टता आणण्याची गरज आहे.

- **कमलाकर शेटे,** कार्यवाह, पुणे शहर, युवक क्रांती दल

Pune Edition
Jan 31, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Education

प्रभात पुणे, सोमवार, दि. ३१ जानेवारी २०२२ || ५

# सर्व परीक्षांचे अंतर्गत गुण वेब पोर्टलवर भरणे बंधनकारक

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्नित सर्व महाविद्यालयांनी सर्व परीक्षांचे अंतर्गत गुण वेब पोर्टलवर निर्धारित वेळेतच भरणे बंधनकारक आहे. अंतर्गत गुण भरण्यासाठी अभ्यासक्रमनिहाय वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

सर्व विद्याशाखांच्या अभ्यासक्रमाचे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१च्या सत्रांच्या परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. परीक्षा विभागात विद्यार्थ्यांची विषयनिहाय समरी बनविण्याचे काम सुरू झाले आहे. ही समरी




महाविद्यालयांना लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाविद्यालयांकडे परीक्षा विभागाने आवश्यक माहिती उपलब्ध करून दिल्यानंतर विद्यार्थ्यांचे विविध परीक्षांचे सर्व अंतर्गत गुण, ग्रेड्स भरण्याबाबत संबंधित परीक्षांना प्राचार्य, संचालकांनी आदेशित करावे लागणार आहे.

परीक्षा प्रचलित पद्धतीप्रमाणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर गुण नोंदणी विनाविलंब करण्यात यावी. अंतर्गत गुणांची नोंदणी वेळेवर न झाल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अहितास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहणार आहे. विद्यापीठ अधिनियमानुसार विद्यापीठास सहकार्य करणे आवश्यक आहे. त्रुटींची सर्व प्रकरणे कारवाईसाठी परीक्षा प्रमाद समितीसमोर सादर करण्यात येतील, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत पुणे, नाशिक, अहमदनगर मधील महाविद्यालयांच्या प्राचार्य, संचालकांना सूचनाही देण्यात आलेल्या आहेत.

प्रभात Mon, 31 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65933577

पुढारी

# 'राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा' मसुदा जाहीर

## येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी, सूचनांसाठी १३ फेब्रुवारीपर्यंत मुदत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

देशातील उच्च शिक्षणाची कवाडे खुली करणारे 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' देशात येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू होत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने रविवारी त्याची अंमलबजावणी नेमकी कशी करावी, याबाबतचा मसुदा जाहीर केला आहे. या मसुद्यावर सूचना करण्यासाठी १३ फेब्रुवारीची मुदत देण्यात आली आहे.

एकविसाव्या शतकातील आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांना अवगत व्हावीत या उद्देशाने अभ्यासक्रमात आमुलाग्र बदल या मुसद्यात सुचविण्यात आले आहेत. यात विद्यार्थी कोणत्याही स्तरावर शिक्षण सोडू शकतो आणि कोणत्याही स्तरावर पुन्हा त्याची सुरुवात करू शकतो. शिक्षण धोरणानुसार प्रथमवर्ष पदवीनंतर प्रमाणपत्र, द्वितीय वर्षानंतर डिप्लोमा आणि तृतीय वर्षानंतर पदवी दिली जाणार आहे.

**चार वर्षांची पदवी..**

'ऑनर्स'साठी पात्र विद्यार्थी आठ सत्रांचा अभ्यासक्रम म्हणजे चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणर आहे. इंजिनीअरिंग पदवीचे नाव यापुढे 'बीटेक' असे असणार आहे. पदवी शिक्षण पूर्ण झाल्यावर एखाद्या पदवीधरामध्ये कोणती कौशल्ये आवश्यक आहेत हे निश्चित करण्यात आले असून त्यानुसार देशभरातील



सर्व विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमाची रचना असणार आहे. याचबरोबर पारंपरिक पदवी शिक्षण हे तीन वर्षांचे राहणर आहे. मात्र ज्या विद्यार्थ्यांना 'ऑनर्स'ची पदवी हवी असेल आणि अधिक संशोधन करायचे आहे तसेच ज्यांना शेवटच्या वर्षात ७.५ क्रेडीट्स मिळाले आहेत अशा विद्यार्थ्यांनाच चौथ्या वर्षात प्रवेश दिला जाणार असून त्यांना संशोधनाची संधी दिली जाणार आहे. अशा विद्यार्थ्यांना 'ऑनर्स'ची पदवी दिली जाणार आहे.

**पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये एकसमान कौशल्ये..**

सर्व देशातील पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये एकसमान कौशल्ये असावीत यासाठी प्रत्येक पदवीसाठी आवश्यक किमान कौशल्ये निश्चित करण्यात आली आहेत. सध्याच्या अभ्यासक्रमामध्ये एकाच विषयाच्या दोन भिन्न विद्यापीठांच्या पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कौशल्यात मोठ्या प्रमाणात विषमता दिसून येते. यापुढे असे न होता किमान कौशल्ये समान असतील त्यापेक्षा अधिक कौशल्ये देण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात येणार आहे.

### सहा स्तरीय उच्च शिक्षण

उच्च शिक्षणामध्ये सहा स्तर निश्चित करण्यात आले आहेत. याचे क्रमांक पाच ते दहा असे ठरविण्यात आले आहेत. पाचवा म्हणजे उच्च शिक्षणातील पहिला स्तर हा पदवीच्या प्रथम वर्षाचा असून तो पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र मिळणार आहे. तर दहावा स्तर हा सर्वोच्च असून पीएचडीचे शिक्षण या स्तरावर देण्यात येणार आहे.

Pune Edition
Jan 31, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Education**

# शिक्षणाचे समानीकरण

## 'राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखड्या'चा मसुदा जाहीर

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई



- मसुद्यावर सूचना करण्यासाठी १३ फेब्रुवारीची मुदत.
- देशातील तंत्र, व्यावसायिक, कौशल्य, पारंपरिक उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील अभ्यासक्रमाचा पाया एकसमान असणार.
- नव्या धोरणानुसार प्रथम वर्ष पदवीनंतर प्रमाणपत्र, द्वितीय वर्षानंतर डिप्लोमा आणि तृतीय वर्षानंतर पदवी दिली जाणार.

पदवी शिक्षण पूर्ण झाल्यावर एखाद्या पदवीधरामध्ये कोणती कौशल्ये आवश्यक आहेत, हे निश्चित करण्यात आले असून, त्यानुसार देशभरातील सर्व विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमाची रचना असणार आहे. याचबरोबर पारंपरिक पदवी शिक्षण तीन वर्षांचे राहणार आहे. मात्र, ज्या विद्यार्थ्यांना 'ऑनर्स'ची पदवी हवी असेल आणि अधिक संशोधन करायचे आहे; तसेच ज्यांना शेवटच्या वर्षात ७.५ क्रेडिट मिळाले आहेत, अशा विद्यार्थ्यांनाच चौथ्या वर्षात प्रवेश दिला जाणार असून, त्यांना संशोधनाची संधी दिली जाणार आहे.

देशातील उच्च शिक्षणाची कवाडे खुली करणारे 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' देशात येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू होत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने रविवारी त्याची अंमलबजावणी नेमकी कशी करावी, याबाबतचा मसुदा जाहीर केला आहे. या मसुद्यावर सूचना करण्यासाठी १३ फेब्रुवारीची मुदत देण्यात आली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षणातील लवचीकतेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. विज्ञान शिकत असताना, संगीत शिक्षणाचे क्रेडिट मिळवण्याची मुभा विद्यार्थ्यांना मिळणार आहे. मात्र, याची अंमलबजावणी नेमकी कशी होणार, प्रत्येक विद्यापीठामध्ये सर्वच प्रकारचे शिक्षण उपलब्ध असते असे नाही, मग दुसऱ्या विद्यापीठात जाताना अनेक शैक्षणिक आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागतो, या सर्व प्रश्नांची उत्तरे या मसुद्यामध्ये देण्यात आली आहेत.

एकविसाव्या शतकातील आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांना अवगत व्हावी, या उद्देशाने अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल या मुसद्यात सुचविण्यात आले आहेत. यात विद्यार्थी कोणत्याही स्तरावर शिक्षण सोडू शकतो आणि कोणत्याही स्तरावर पुन्हा त्याची सुरुवात करू शकतो. 'ऑनर्स'साठी पात्र विद्यार्थ्यांना आठ सत्रांचा अभ्यासक्रम म्हणजे, चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे.

इंजिनीअरिंग पदवीचे नाव यापुढे 'बीटेक' असे असणार आहे. याचबरोबर या सर्वांमध्ये सर्व देशात पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये एकसमान कौशल्ये असावीत यासाठी प्रत्येक पदवीसाठी आवश्यक किमान कौशल्ये निश्चित करण्यात आली आहेत. सध्याच्या अभ्यासक्रमामध्ये एकाच विषयाच्या दोन भिन्न विद्यापीठांच्या पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कौशल्यात मोठ्या प्रमाणात विषमता दिसून येते. यापुढे असे न होता किमान कौशल्ये समान असतील त्यापेक्षा अधिक कौशल्ये देण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात येणार आहे. यामध्ये 'राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा'ही देण्यात आला आहे. यामध्ये पदवी शिक्षणामध्ये ज्ञानार्जनाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. कोणत्या स्तरावर कोणत्या पातळीचे शिक्षण देण्यात यावे याबाबतचे स्पष्टीकरण या मसुद्यातून समोर आले आहे.

**सहास्तरीय उच्च शिक्षण**

उच्च शिक्षणामध्ये सहा स्तर निश्चित करण्यात आले आहेत. याचे क्रमांक पाच ते दहा असे ठरविण्यात आले आहेत. पाचवा म्हणजे उच्च शिक्षणातील पहिला स्तर हा पदवीच्या प्रथम वर्षाचा असून, तो पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र मिळणार आहे. दहावा स्तर हा सर्वोच्च असून, पीएचडीचे शिक्षण या स्तरावर देण्यात येणार आहे. या प्रत्येक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणते ज्ञान अवगत होणे आवश्यक आहे, याबाबतही मसुद्यात सांगण्यात आले आहे. या प्रत्येक स्तरासाठी क्रेडिटही निश्चित करण्यात आले आहेत. हे क्रेडिट्स देशभर एकसमान असणार आहेत. या सर्वांचा दर्जा राखण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना करण्याची सूचनाही यामध्ये करण्यात आली आहे.

Maharashtra Times 31.1.2022

# *News Paper Clippings During January 2022*

**Section: Research**

# सापसुरळीच्या नव्या प्रजातीचा शोध

## अरूणाचल प्रदेशमध्ये सापडलेली पाचवी प्रजाती

**पुण्यातील संशोधकाचा सहभाग**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २०** - भारत आणि रशिया मधील संशोधकांनी केलेल्या संयुक्त संशोधनातून अरुणाचल प्रदेशामधून सापसुरळीच्या नव्या प्रजातीचा आणि नवीन कुळाचा शोध लागला आहे. या संशोधनात पुण्यातील तरूण संशोधकानेही सहभाग नोंदविला होता. महत्वाचे म्हणजे एकाच मोहिमेतून प्रकाशात आलेली ही पाचवी सरपटणारी प्रजाती असल्याची नोंद अभ्यासकांनी घेतली आहे.

अरुणाचल प्रदेशातील आपाटानी या जमातीच्या नावावरून या नव्या प्रजातीचे नामकरण प्रोटोब्रेफेरस आपाटानी, असे करण्यात आले आहे. अरुणाचल प्रदेशात २०१९ मध्ये केलेल्या मोहिमेद्वारे पाच नव्या सरपटणाऱ्या प्रजातींचा शोध लावला आहे. यामध्ये पुण्यातील आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे गौरांग गावडे, सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस, बंगळूरूचे झिशान मिर्झा, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे हर्षल भोसले, लोमोनोसोव्ह मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटी, मॉस्को आणि वीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठातील संशोधकांचा समावेश आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये सापडलेल्या सापसुरळीच्या नव्या प्रजातीच्या शोधाचे वृत्त नुकतेच 'पीर जे' या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत प्रकाशित झाले आहे.



### असे झाले संशोधन...

टाले व्हॅली वन्यजीव अभयारण्यात ही नवीन प्रजात सापडली. तिचे आकारशास्त्रीय वर्ण, डीएनए चाचणी आणि डोक्यावरील आकारांच्या वैशिष्ट्यांची तुलना करून प्राथमिक निकालांच्या आधारे, सापसुरळीची ही प्रजात वेगळी असल्याचे दिसून आले. मात्र, तिची डीएनए चाचणी करुन तुलानात्मक निरीक्षण करणे आवश्यक होते. जे रशियन संशोधक आंद्रे ब्रेगिन आणि निकोले ए. पोयार्कोव्ह यांनी केले. ज्यामाध्यमातून सापसुरळीची ही प्रजात नवीन असल्याचे समजल्याचे झिशान मिर्झा यांनी सांगितले.

प्रभात Fri, 21 January 2022
https://epaper.eprabhat.net/c/65739403

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Miscellaneous

सकाळ

# मुलं चालवताहेत 'ओटीवरचं वाचनालय'

**क्षण बहराचे**

**एका घरासमोरील ओटीवर मांडलेल्या पुस्तकांमधून बालवाचक हवं ते पुस्तक वाचायला घेत आहेत, त्याची नोंद करत आहेत, एकमेकांशी पुस्तकांविषयी बोलत आहेत... हे लोभस दृश्य सध्या पालघर जिल्ह्यातील बहाडोली या छोट्याशा गावात पाहायला मिळत आहे. शिक्षकांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या 'प्रतिभा बालग्रंथालया'ची प्रसिद्धी सध्या 'ओटीवरचं वाचनालय' या टोपणनावाने पंचक्रोशीत झाली आहे.**

**नीला शर्मा**



पंधरा शिक्षकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे परिसरातील मुलांना पुस्तकवाचनाचा अनमोल आनंद अनुभवायला मिळतो आहे. ही संकल्पना स्पष्ट करताना विवेक कुडू म्हणाले, ''गावचा विकास करताना फक्त साचेबद्ध कामांपुरतं मर्यादित राहू नये. मुलांच्या जाणिवा विकसित करणारा नवा उपक्रम राबवावा. वाचनालयाच्या माध्यमातून नव्या पिढीसाठी मनोरंजन व माहितीचा शाश्वत ठेवा उपलब्ध करून द्यावा, असा विचार मी मांडला. आम्हा पंधरा शिक्षकांच्या समूहाने ही कल्पना उचलून धरली. एका संस्थेने यासाठी सतरा हजार रुपयांची पुस्तकं उपलब्ध करून दिली. सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाकडून कपाट मिळालं. इयत्ता सहावीतील सुरवी संजय कडू ही बालिका या वाचनालयाचं काम बघणार आहे. घराच्या ओटीवर आठवड्यातून दोनदा पुस्तकं मांडली जातील. निवडलेलं पुस्तक नोंदणी करून घरी वाचायला नेता येईल, अशी व्यवस्था केली आहे. मुलांसाठी गोष्टींच्या पुस्तकांचा खजिना यात असेल. त्या बरोबरीने विज्ञानाची माहिती सोप्या भाषेत समजावणारी पुस्तकंही असतील. शरीराच्या अवयवांची ओळख यासारख्या, सामान्य ज्ञानावर आधारित पुस्तकांचा समावेश करण्यात येणार आहे. मनोरंजन, माहिती व ज्ञानवर्धक पुस्तकांचा समतोल यात सांभाळला जाईल.'' प्रतिभा कणेकर या माझ्या शिक्षिका होत्या. त्यांच्यामुळे वाचनाचे संस्कार माझ्यावर झालेत. त्यांच्या नावानेच प्रतिभा बालग्रंथालय हे नाव दिलं आहे. नजीकच्या काळात मुलांना एकत्र जमवून कथाकथन व अभिवाचनाचे कार्यक्रमही करायचं मनात आहे. वर्षभरात कोण जास्त पुस्तकं वाचतं, ते रजिस्टरमधील नोंदींच्या आधारे पाहून बक्षीस द्यायचं ठरवलं आहे. वाचनस्पर्धेसारखे प्रयोग या चळवळीला गती देऊ शकतील, असं वाटतं. डॉ. किरण सावे, अतुल दांडेकर, पराग जोशी, भोगीलाल वीरा, हितेंद्र शाह यांच्या उपस्थितीत आमच्या शिक्षक समूहातील प्रकाश चुरी, निखिल चुरी, वैभव कुडू, आरती कुडू, दिलीप किणी व किरण पाटील आदी सर्वांच्या सहभागाने या उपक्रमाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला.

> **मुलांना पुस्तकं सहजपणे उपलब्ध करून दिली तर ती वाचली जाऊ शकतात. शाळा काहीशा दूर असल्याने घरापासून जवळच्या अंतरावर पुस्तकं मिळावीत, हा उद्देश होता. यातून अवांतर वाचन घडेल. अनौपचारिक शिक्षणाचा आनंद पुस्तकांतून मिळू शकतो. टीव्ही, मोबाईलच्या विळख्यात मुलं सापडू नयेत यासाठी रंजक पुस्तकांविषयी त्यांच्या मनात गोडी निर्माण करणं हा उत्तम पर्याय आहे.**
> **- विवेक कुडू**

Pune, Pune-Today
19/01/2022 Page No. 7

## *News Paper Clippings During January 2022*

### Section: Miscellaneous

# ग्रंथालयांमधील वर्दळीमध्ये घट

## पुस्तक देवघेवीसाठी मोजक्याच वाचकांची भेट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शहरातील करोना रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ होताच ग्रंथालयांमधील वर्दळीमध्ये घट झाली आहे. ज्येष्ठ नागरिक घराबाहेर पडत नसल्याने विविध ग्रंथालयांमध्ये पुस्तकाची देवघेव करण्यासाठी मोजकेच वाचक येत आहेत. गेल्या काही दिवसांपासून करोना रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे शहरातील ग्रंथालयांमध्ये जाणाऱ्या वाचकांच्या संख्येमध्ये प्रचंड घट झाली आहे. करोना संसर्ग होण्याची शक्यता लक्षात घेता ज्येष्ठ नागरिकांना कोणत्याही कारणास्तव घराबाहेर पडू दिले जात नाही. त्यामुळे हमखास वाचक वर्ग असलेले ज्येष्ठ नागरिक पुस्तक बदलण्यासाठी ग्रंथालयांमध्ये येत नाहीत. वाचकांची संख्या घटण्याचे हे मुख्य कारण असल्याची माहिती समोर आली आहे.

पुणे मराठी ग्रंथालयामध्ये वाचक संख्येमध्ये प्रचंड घट झाली आहे. करोना सुरू होण्यापूर्वी दररोज किमान पाचशे वाचक पुस्तक बदलून नेण्यासाठी ग्रंथालयामध्ये येत असत. मात्र, करोना सुरू झाल्यानंतर बराच कालखंड टाळेबंदीमध्ये गेला. आता ग्रंथालय सुरू असले तरी करोना रुग्णांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिक येण्याचे टाळतात. त्यामुळे सध्या दररोज पुस्तक बदलून घेण्यासाठी जेमतेम शंभर जण ग्रंथालयाला भेट देतात, अशी माहिती ग्रंथालयाच्या कार्यवाह डॉ. अनुजा कुलकर्णी यांनी दिली.

पुणे नगर वाचन मंदिरामध्ये वाचकांची संख्या घटली असून पुस्तक बदलण्यासाठी मोजकेच वाचक येत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे यांनी सांगितले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ग्रंथालय सुरू असले तरी वाचकांची वर्दळ कमी झाली आहे. करोना रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ सुरू झाल्यापासून नागरिकांचे येणे कमी झाले आहे.

तरुण वयोगटातील अभ्यासक आणि पीएच.डी. करणारे विद्यार्थी एवढेच संदर्भ ग्रंथांसाठी ग्रंथालयामध्ये येतात, अशी माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

लोकसत्ता Fri, 21 January 2022
https://epaper.loksatta.com/c/

# *News Paper Clippings During January 2022*

## Section: Miscellaneous



# मराठीच्या संशोधनाची अमृतवेल...

**सर चिंतामणराव देशमुख यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या मराठी संशोधन मंडळाने आता पंचाहत्तरीची वाटचाल केली आहे. अनेक दिग्गजांनी नावारूपास आणलेली ही संस्था आज निधीअभावी संकटात आहे....**

ंदा भोसेकर

ाठी संशोधन मंडळ' ही मराठीच्या ्यासकांना आधार आणि अभिमान वाटावा ी संस्था! १ फेब्रुवारी २०२२ रोजी मंडळ ७५ वर्षांत पदार्पण करत आहे. अमृतमहोत्सवाच्या ्त्ताने मंडळाच्या आतापर्यंतच्या कामाचा ावा घ्यावा आणि नव्या योजनांवर एक ्षेप टाकावा म्हणून हा लेखनप्रपंच...

१९४३ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या भि. गुंजीकर व्याख्यानमालेच्या दरम्यान ्ताना सर चिंतामणराव देशमुख म्हणाले होते 'मराठी वाङ्मयाचं, भाषेचे संशोधन व्हावे ाठी खास स्वतंत्र, संशोधनाकरिताच एक ्था स्थापन व्हायला हवी.' या त्यांच्या ्नेनुसार स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बाळासाहेब यांच्या पाठिंब्याने १ फेब्रुवारी १९४८ रोजी ठी संशोधन मंडळाची स्थापना झाली. मंडळाचे ले अध्यक्ष होते भारतरत्न पां. वा. काणे आणि ालक प्रा. कृ. पां. कुलकर्णी. व्युत्पन्न ीक-लेखक प्रा. अ. का. प्रियोळकर मंडळात र म्हणून दाखल झाले. अशा खऱ्या अर्थाने ्जांच्या नेतृत्वाखाली मंडळाची जोमदार ्वाल सुरू झाली. जुन्या मराठी वाङ्मयाचे ाधन, संपादन, प्रकाशन, मराठी भाषा, करण, बोली, लिपी यांचा अभ्यास, मराठी ्मयाचा कोश आणि संशोधन साधनांची ्ती, दुर्मीळ हस्तलिखितांचा शोध, ाधकांना मार्गदर्शन, नव्या संशोधकांना पाठबळ ्णि मासिक अथवा त्रैमासिक पत्रिकेचे प्रकाशन ा भरगच्च कार्यक्रमांची आखणी या पहिल्या ्कारिणीने केली होती.

**मंडळाचे शैक्षणिक कार्य**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने ('मुंमग्रंसं') १८ पासूनच मुंबई विद्यापीठाला मराठीच्या ्ख्यानांसाठी जागा दिली होती. संशोधन ळाची स्थापना झाल्यानंतर लगेचच मंडळाने .ए. (मराठी)साठी लेक्चर्स घ्यायला सुरुवात ी. सुरुवातीच्या काळात मुंबई विद्यापीठाचा ठी विभाग 'मुंमग्रंसं'मधूनच काम करत होता. ्यांचे विभागप्रमुख डॉ. मा. गो. देशमुख इथूनच ्ला विभाग चालवीत होते.

१९५६ मध्ये संशोधन मंडळाला मुंबई ्यापीठाची पीएच. डी.चे संशोधन केंद्र म्हणून ्यता मिळाल्यावर प्रा. कृ. पां. कुलकर्णी आणि अ. का. प्रियोळकर या दोघांच्याही हाताखाली ्क नामवंत विद्यार्थ्यांनी पीएच. डी. मिळवली. प्रा. द. वा. पटवर्धन हे मंडळाचे पीएच. डी.चे पहिले विद्यार्थी. 'तुकारामांच्या अभंगांचा चिकित्सक अभ्यास' हा त्यांचा प्रबंध राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे.

प्रा. कृ. पां. कुलकर्णी, डॉ. श्री. म. पिंगे, डॉ. स. गं. मालशे, डॉ. मीना जोशी, डॉ. सरोजिनी शेंडे, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, डॉ. लीला गोविलकर अशा अनेक ख्यातनाम विद्वान विद्यार्थ्यांची पीएच. डी. मंडळातून पूर्ण झाली. गंमत म्हणजे पीएच. डी. अपूर्ण राहिलेल्यांमध्येही ज्येष्ठ कथालेखिका कमल देसाई, प्रा. पुष्पा भावे, प्रा. सुरेंद्र गावस्कर यांच्यासारखे नामवंत आहेत.

**प्रियोळकर युग**

१९५० मध्ये प्रा. अ. का. प्रियोळकर मंडळाचे संचालक झाले. जवळजवळ १६ वर्षे ते मंडळाचे संचालक होते. मंडळाच्या कार्याला दिशा देण्याचे कार्य मुख्यत्वाने प्रियोळकरांचे आहे. त्यांनी पद्धतशीरपणे एकेक प्रकल्प हाती घेऊन अथक परिश्रमाने ते पूर्ण केले. मंडळात आल्या आल्या त्यांनी मुक्तेश्वराच्या महाभारताची चिकित्सक आवृत्ती तयार करायला घेतली. ती एकेक करून चार खंडांत प्रकाशित केली. त्यासाठी अनेक हस्तलिखिते, दुर्मीळ ग्रंथ, विविध आवृत्त्या जमा केल्या. त्यांनी १९५३ साली मंडळाचे नियतकालिक 'मराठी संशोधन पत्रिका' सुरू केले. निबंधवाचनाच्या मासिक कार्यक्रमांना सुरुवात केली. त्यात प्रियोळकर स्वतः, त्यांचे विद्यार्थी व इतर संशोधक निबंध वाचत असत. एकूण चैतन्याने भारलेले असे वैचारिक देवाणघेवाणीचे वातावरण त्यावेळी होते.

१९५८ साली त्यांनी मुद्रणकलेचा ४०० वर्षांचा इतिहास इंग्रजीत लिहून पुस्तकरूपाने प्रकाशित केला गेला. पोर्तुगीज राजवटीत नाश पावलेल्या मराठी, कोंकणी बोलीतील १६ व्या, १७ व्या शतकांतल्या पुस्तकांचे संशोधन-संपादन त्यांनी हाती घेतले. ख्रिस्ती मिशनरी मंडळींनी रोमन लिपीत लिहिलेले मराठी, कोंकणीत लिहिलेले वाङ्मय उजेडात आणले. अनेक छोट्या-मोठ्या पुस्तिका प्रकाशित केल्या. दोलामुद्रितांचा शोध, मराठी ग्रंथालयांचा शोध, मराठीतले जुने व्याकरणे, बोलीचे नमुने, जुन्या काव्यांच्या संहितांचे संपादन असे प्रचंड काम प्रियोळकरांनी केले. भारतभर हिंडून अनेक हस्तलिखिते जमा केली. 'ज्ञानेश्वरीचे शब्दभांडार' हा कोश प्रकाशित केला. एकाच माणसाने हे असे विविधांगी काम केले यावर आज कुणाचा विश्वास बसणार नाही.

**प्रियोळकरांच्या पश्चात...**

प्रियोळकरांच्याच तालमीत तयार झालेले प्रा. स. गं. मालशे नंतर मंडळाचे संचालक झाले. त्यांनी १९व्या शतकावर आणि त्यातल्या वाङ्मयीन, सांस्कृतिक आणि सामाजिक घडामोडींवर अधिक लक्ष केंद्रित केले. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड'च्या हस्तलिखिताचा शोध लावून त्यांनी ते पुस्तक प्रकाशित केले. केशवसुतांच्या कवितांची वही सापडल्यावर त्याची शासनाकडून यथामूळ आवृत्ती प्रकाशित करून घेण्याचे काम केले. सावरकरांच्या अप्रसिद्ध कवितांची वही प्रकाशित केली. विष्णूबोवा ब्रह्मचारी यांचे दुर्मीळ मराठी-इंग्लिश निबंध निवडून ते प्रकाशित केले. त्यांचे सर्वांत मोठे काम म्हणजे 'मराठी वाङ्मयकोश' प्रकल्पाची आखणी आणि त्याचा प्रारंभ!

डॉ. मालशे यांच्यानंतर प्रा. रा. भि. जोशी, प्रा. म. वा. धोंड, प्रा. सुरेन्द्र गावस्कर, प्रा. रमेश तेंडुलकर असे कर्ते विद्वान मंडळाला संचालक म्हणून लाभले. संशोधन पत्रिकेचे प्रकाशन, पुस्तकांचे संपादन-प्रकाशन, संशोधन प्रकल्प, पीएच. डी.चे मार्गदर्शन अशी सर्व कामे १९८२-८३ पर्यंत उत्तमरीत्या सुरू होती. 'तुकाराम पदकोश' रमेश तेंडुलकरांच्या काळात पूर्ण झाला. मराठी वाङ्मयकोशाचा पहिला खंड प्रकाशित झाला होता आणि दुसऱ्या, तिसऱ्या खंडांचे काम पूर्ण होत आले होते. पण अचानक अनुदाने बंद झाली. मराठी वाङ्मयकोश प्रकल्पासारखा मोठा प्रकल्प संशोधन मंडळाकडून साहित्य संस्कृती मंडळाकडे वर्ग झाला. आर्थिक कोंडी झालेली असतानाही मंडळाचे काम प्रा. तेंडुलकर, प्रा. वसंत दावतर, प्राचार्य दत्ता पवार यांनी चालू ठेवले हे या तिघांचे ऋणच आहे.

**मंडळाची सद्यःस्थिती**

प्राचार्य डॉ. दत्ता पवार यांच्यानंतर डॉ. प्रदीप कर्णिक हे २०१३ मध्ये मंडळाचे संचालक झाले. मंडळाचा घसरलेला गाडा सावरण्यासाठी त्यांनी झोकून देऊन काम केले. मंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यावर आणि त्याचबरोबर मंडळाच्या प्रकाशनांना गती देण्यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. देणग्या मिळवल्या आणि त्यामुळे संशोधन पत्रिकेचा अंक अधिक चांगल्या स्वरूपात प्रकाशित होऊ लागला. शरद पवार यांनी 'विद्या प्रतिष्ठान'तर्फे ५० लाख रुपयांची देणगी दिली. मराठी वाङ्मयकोशात पूर्वी काम करत असणाऱ्या उषा टाकळकर यांनी स्वतःसह आपल्या मित्रमंडळींकडून लाखभर रुपयांच्या देणग्या मिळवून दिल्या. बा. वा. भिडे प्रकल्पाला राज्य मराठी विकास संस्थेने २,६०,००० रुपये दिले. सुधा भट, प्रभाकर/ कमल पाध्ये ट्रस्ट, राणी दुवे, डॉ. पुंडे, डॉ. करमरकर, प्राचार्य दत्ता पवार, चंद्रकांत भोंजाळ यांनी सढळहाताने देणग्या दिल्या. डॉ. प्रदीप कर्णिक सांगतात की, 'देणग्या मिळतात त्या विशिष्ट प्रकल्पासाठी, पुस्तकांच्या प्रकाशनासाठी. पण चांगल्या प्रशासकीय व्यवस्थेशिवाय संस्था चालू शकत नाही. कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी किंवा इतर सुविधांसाठी संस्थेकडे पैसे नाहीत. पूर्वी 'मुंमग्रंसं'च्या संदर्भ विभागात काम करणारे शशिकांत भगत केवळ नाममात्र वेतनावर काम करतात. खरं तर शिक्षण विभागाचे वेतन अनुदान मिळायला मंडळ पात्र आहे. ही पदव्युत्तर संशोधन संस्था आहे, पण प्रशासकीय व्यवस्था नसल्याने हे काम हाती घेता येत नाही. मात्र, विद्यापीठाला किंवा शिक्षण खात्याला तिकडे लक्ष द्यायला उसंत नाही. हे आत्ताचे दुखणे आहे असे नाही, तर माझ्या आधीचे तीन संचालकही याच दिव्यातून गेले आहेत.'

प्रा. प्रदीप कर्णिक संचालक झाल्यानंतर त्यांनी पत्रिकेचे स्वरूप बदलून टाकले आणि त्याचबरोबर मंडळाच्या प्रकाशनांनाही गती दिली. प्रियोळकरांच्या 'प्रिंटिंग प्रेस इन इंडिया' या पुस्तकाचे मराठी भाषांतर, भास्कर पांडुरंग तर्खडकर यांच्या वसाहतवादविरोधी पत्रांचा अनुवाद, गणपत लक्ष्मण यांच्या शिक्षण सुधारणेसंबंधीच्या सहा भागांतील निबंधमालेचा अनुवाद, दादोबा पांडुरंग यांचा स्त्रीशिक्षणावरचा इंग्लिश निबंध, बेहरामजी मलबारी यांची १८८४ साली 'हिंदुस्थानातील बालविवाह' आणि 'सक्तीचे वैधव्य' ही दोन इंग्रजी टिपणे, त्या टिपणांना महात्मा फुले, डॉ. घोले आणि बापूजी शिंदे (ताराबाई शिंदे यांचे वडील) यांचे इंग्रजी प्रतिसाद अशा प्रकारचा इंग्रजीत असणारा आणि दुर्मीळ झालेला मजकूर त्यांनी अनेकांच्या मदतीने मराठीत आणला. अनेक राहून गेलेले लेखसंग्रह प्रकाशित केले. पत्रिकेचे काही विशेषांक काढले. थोडक्यात उल्लेख करायचा तर दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचा जन्मद्विशताब्दी विशेषांक, पंजाबमधल्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रकाशित केलेला नामदेव विशेषांक, टिळक-आगरकर विशेषांक, स. गं. मालशे विशेषांक असे अभ्यासकांच्या पुढच्या पिढ्यांना उपयोगी पडतील अशी ही सामुग्री आहे. अजून काही प्रकाशनांची तयारी चालू आहे. स्वतः डॉ. कर्णिक यांचा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयावरचा पीएच. डी.चा प्रबंध, डॉ. वृ. म. पठाण यांचे ५० शिलालेखांचे पुस्तक, शेठ माधवदास रघुनाथदास या गुजराती समाजातल्या समाजसुधारकाच्या गुजराती आत्मचरित्राचे मराठी भाषांतर, लोकहितवादींचे गुजरातीत लिहिलेले लेख प्राचार्य विश्वास पाटील मराठीत आणत आहेत. डॉ. द. वी. पुंडे यांचा लेखसंग्रह, प्राचार्य पंडितराव पवार यांचा लोकसाहित्याच्या अभ्यासकांचा आढावा घेणारा लेखसंग्रह अशा काही योजना आहेत. मंडळाची वेबसाइट तयार होत आहे. अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने अन्य काही कार्यक्रम करण्याचीही मंडळाची योजना आहे. अर्थात हे सर्व पार पाडण्यासाठी मनुष्यबळाची गरज लागते. त्यासाठी मंडळ केवळ मित्रांच्या आणि हितचिंतकांच्या सदिच्छांवर अवलंबून आहे. प्रत्यक्षात इथे शासनाच्या शिक्षण विभागाने आणि विद्यार्थी मंडळाने आत्तापर्यंत अनेक मौलिक ग्रंथांचे प्रकाशन केले आहे. वर उल्लेख केलेल्या पुस्तकांच्या प्रकाशनाचीही प्रक्रिया सुरू आहे. पुस्तकांच्या विक्रीचे काम मंडळातून चालते. अक्षर प्रकाशनाचे चंद्रकांत माळगवे आणि सुधीर शिंदेही मंडळाच्या प्रकाशनांची विक्री करतात. या विषयातली एक उत्साहवर्धक बाब म्हणजे मंडळाच्या पुस्तकांच्या वितरणाची जबाबदारी 'साधना' साप्ताहिकाच्या विनोद शिरसाठ यांनी स्वीकारली आहे. इतरत्रही प्रयत्न चालू आहेत.

दस्तुरखुद्द सर चिंतामणराव देशमुखांनी ज्या संस्थेच्या स्थापनेची इच्छा दर्शवली आणि प्रियोळकरांसारख्या अनेक विद्वज्जनांनी जी संस्था वाढविण्यासाठी झटून प्रयत्न केले, त्या संस्थेच्या कार्याचा उत्तरोत्तर विस्तार व्हावा हा आपणा सर्वच मराठीच्या अभ्यासकांचा आणि मराठीवर प्रेम करणाऱ्यांचा आस्थेचा विषय आहे, असावा.

sunandabhosekar@gmail.com

aper.loksatta.com
लोकसत्ता Sun, 30 January 2022
https://epaper.loksatta.com/c/65917426

# *Condolence Message*






# *UPCOMING EVENTS*

# *February 2022*

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15<br>*Sant Sevalal Maharaj Jayanti*<br> | 16 | 17 | 18 | 19<br>*Chatrapati Shivaji Maharaj Jayanti*<br> |
| 20 | 21 | 22 | 23<br>*Sant Gadge Baba Jayanti &Sant Ravidas Maharaj Jayanti (Tithinusar)*<br>  | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*